म. ग्रं. सं. ठाणें
विषय इतिहास
सं. क्र. ५९०
REFBK-0006549

दूराष्ट्र ग्रंथमाला–पुष्प ३ रें.

# हिन्दूंचा विश्वविजयी अितिहास

ग्रंथ संग्रहालय
मुंबई शाखा

लेखक
डॉ. नारायण दामोदर सांवरकर

REFBK-0006549

...रचुरे पुराणिक आणि मंडळी
माधवबाग, मुंबअी ४

किंमत ३ रुपये

: प्रकाशक :
अनन्त मोरेश्वर पुराणिक
परचुरे पुराणिक मंडळी
माधवबाग, मुंबअी ४

सर्वाधिकार सुरक्षीत

: मुद्रक :
शांताराम नारायण सापळे
नवयुग प्रिंटिंग प्रेस,
दादर मुंबअी १४

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. नं. ११०२०

# समर्पण.

ज्या ज्या थोर हिंदुपूर्वजांनीं, हिंदुधर्म, हिंदुतत्वज्ञान, हिंदुविद्या, हिंदुशास्त्रें, हिंदुकला, थोडक्यांत म्हणजे, हिंदु-संस्कृति, पूर्वकालीन ज्ञात जगतावर प्रसृत करून, मानव जातींतील रानटीपणा काढून टाकून, तिला मानवता शिकविण्याच्या दिव्य महात्वाकांक्षेनें प्रेरित होऊन, असामान्य धैर्यानें, शौर्यानें, वीर्यानें, जगद्व्यापी बृहत्भारत निर्माण करण्यास सहाय्य केलें, त्या त्या अखिल **हिंदुजातींतील नारसिंहांस** कृतज्ञतेचें हें चिमुकलें तुळसीदल—

— समर्पित असो ! —

ना. दा. सांवरकर.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. नं. ............
स्थळ प्रत

# हिंदूंच्या विश्वविजयी इतिहासाचे

# संदर्भग्रंथ.


1 Hindu Superiority ( By sj Harbilas Sharda ) Ajmer,

2 Indian Culture in Java & Sumatra ( By Bijan Roy Chattargy M. A. PHD.

( London )

3 Ancient Hindu Colonies in the far East ( By. Dr. Rameshchandra Muzumdar M. A. PHD.

4 Indian Colony of Siam ( By Prof. Phaneendra Nath Bose ) M. A.

5 ' बृहत्तर भारत ' ( हिंदी ) ( पं. चंद्रगुप्त वेदालंकार )

6 Cultural Nippon ( Central Federation of Nippon Culture )

7 ' महाराष्ट्रीय ज्ञानकोश '-प्रस्तावना नि अन्य खंड ( श्री. श्रीधर व्यंकटेश केतकर Phd. )

8 विश्वपर हिंदुत्वका प्रभाव ( हिंदी ) पं. श्री. विश्वनाथशास्त्री Research Scholar

9 The Hindu History ( from B. C. 3000 to A. D. 1200 ( By sj. Akshayakumar Muzumdar, Dacca )

10 Issues of the Monthly [illegible]

भूगोल

11 मध्ययुगीन भारत ( भारताचार्य चिं. वि. वैद्य )

12 Encyclopedia Britanica ( 14th Edition )

13 Todd's Rajasthan ( हिंदी )

14 महाभारत ( चिं. वि. वैद्य )

15 Several Periodical Articles in the Amrit Bazar Patrika, Hindusthan Standard Etc

16 Indian Teachers in China (By Sj. Phanindranath Bose )

17 अरब और भारतके संबंध ( हिंदी ) ( बाबू रामचंद्र शर्मा )

18 India & Central Asia ( By Dr. Niranjanprasad Chakravarti, M. A. PHD.. ) ( Calcutta )

Etc.


' फोडिलें भांडार, धन्याचा हा माल ! मी तव हमाल, भारवाही, '
वरील सर्व विद्वानांचे ज्ञानदानासंबंधीं कृतज्ञ आभार !

ना. दा. सावरकर.

# थोडें प्राक्कथन.

‘ हिंदूंचा विश्वविजयी अितिहास ’ या नांवानें पहिला लेखांक अि. स. १९४० जुलैमध्यें ‘ झारापकर ’ मासिकामध्यें प्रसिद्ध झाला. त्याच्या आधीं १-२ वर्षांपासून, आपल्या या भारतानें अेकाकाळीं सर्व जगावर हिंदूंचें सांस्कृतिक, धार्मिक आणि राजकीयहि अधिराज्य कसें गाजविलें होतें, या संबंधीचा माझा अभ्यास सुरू झाला होता. हिंदु जातीनें अेकाकाळीं सर्व जगाला आपल्या तत्वज्ञानानें, शास्त्रज्ञानानें, बुद्धिवैभवानें नि पराक्रमानें दिपविलें होतें नि त्यावेळचे बहुतेक ज्ञातजग हिंदुस्थानला गुरुस्थानीं मानीत होतें, ही दंतकथा, लहानपणापासून मी अैकत होतो नि त्यामुळें माझें मन आत्मविश्वासानें नि हिंदुत्वाच्या अभिमानानें अुत्तेजितहि होत होतें. परंतु, त्याचा साधार अितिहास वाचून, त्या दंतकथेचें, सत्यकथेंत रूपांतर करण्याची तीव्र अिच्छा जरी, कित्येक वर्षांपासून मनांत वसत होती, तरी अनेक कारणांनीं, ती अिच्छा प्रत्यक्ष कृतींत अुतरवितां आली नव्हती. अंतीं, तो योग-थोडा फारच-१९४० च्या वर्षांमध्यें आला. तरीहि ही लेखमाला मध्यें मध्यें स्थगित होत होती, हें जरी खरें, तरी अेकदां तिचें सूतोवाच झाल्यानें, अन्य चळवळींतून सांपडला तो वेळ, ही लेखमाला पुरी करण्यांकडेच लावण्याची निकड मनाला लागली. अितक्यांत, अेका गंभीर दुखण्यानें घेरलें. परंतु, त्यांतून निभावून गेल्यानंतर, पुढें जो कांहीं काल मुंबअीबाहेर दूर जमखिंडीला, आलेलें दौर्बल्य घालविण्याकरतां अपरिहार्यतेनें घरीं बसून घालवावा लागला, तोच काल ही लेखमाला पुरी करण्यास अुपयोगी पडला, हेंहि अेक वाअीटांतून चांगलेंच निघालें, असें वाटलें ! नाहींतर आणखीही किती काल गेला असतां कोण जाणें !

माझें लेखन संपून जवळ जवळ दोन वर्षें तरी संपत आलीं. परंतु, आमच्या प्रकाशक महाशयांच्या, युद्धजन्य कागदाच्या दुर्मिळतेच्या धांदलीमुळें, ही लेखमाला प्रत्यक्ष प्रकाशित होण्यास हा वेळ येअून ठेपला !—

—आणि तरीहि हा वेळ अत्यंत अुचित नि योग्य असाच साधला जात आहे. कारण, आजपर्यंत धुक्यांत, अंधारांत, गुप्तरूपानें चाललेली पाकस्थानी चळवळ, राजकारणामध्यें मोठी निकराची परिस्थिति अुत्पन्न करीत आहे.

या स्वयंभू हिंदुस्थानच्या अखंडत्वावर, घाला घालण्याकरतां, चहुंबाजूंनीं अमंगळ प्रयत्न वेगांत आले आहेत. अशावेळीं, या सर्व प्रयत्नांना विफल करण्यास्तव सज्ज होण्याला, जो प्रथम दुर्दान्त आत्मविश्वास लागतो, तो आत्मविश्वास या बृहत्तर हिंदुस्थानचा अितिहास वाचून, दशगुणित होअील, असाच हा आपल्या हिंदुपूर्वजांचा अितिहास स्फूर्तिप्रद आहे. ह्या मूळस्वयंभू हिंदुस्थानचा भंग अथवा खंड करण्याची गोष्ट तर दूरच; परंतु, याचा बृहत्तर हिंदुस्थान पुन्हां अेकदां करता करतां येअील, अशी भव्य महत्वाकांक्षा, तेजस्वी हिंदुतरुणांच्या हृदयांत अुत्पन्न व्हावी, अितका हा आपल्या हिंदु पूर्वजांचा अितिहास अद्‌भुत आहे, तेजस्वी आहे, आत्मविश्वास नि आत्माभिमान निर्माण करणारा आहे.

—आणि तरीहि, या लेखमालेंत, हें केवळ 'ताकापुरतेच रामायण' सांगणें शक्य झालें आहे. हिंदूंच्या त्या विश्वविजयी अितिहासाचें समग्र दर्शन व्हावयास, अद्याप फार मोठा काल जावयास पाहिजे. ज्यावेळीं हिंदुस्थान स्वतंत्र होअील, सुव्यवस्थित होअील, स्वतःच्या सर्व तऱ्हेच्या दळभारांच्या सामर्थ्यानें, जगाला आदरणीय होअील—त्यावेळीं, त्यावेळचें, तें समर्थ हिंदुस्थानचें हिंदुसरकार, अनेक संशोधक आशियाभर पाठवील–हिंदुमहासागर, प्रशांत महासागर, यांवर कमलांप्रमाणें तरंगणारीं असंख्य लहान मोठीं द्वीपें नि द्वीपकल्पें, जेव्हां ते संशोधक संशोधितील, तेव्हां–आणि तेव्हांच तो पूर्वकालीन हिंदूंचा दिग्विजयी अितिहास, पूर्णपणें लिहिला जाअील!

—परंतु, तोंपर्यंत, निदान असा दिग्विजय आपल्या पूर्वजांनीं केला होता, हें सत्य तरी, आपल्या तरुण पिढीला कळलें पाहिजे. भूतकालीं आपलें राष्ट्र केवढें मोठें होतें, याच्या मोजमापाची केवळ कल्पनाजरी आली, तरी भावी मोठेपणाची रूपरेषा त्यावरून, त्याप्रमाणांत आखतां येते. परकयांनीं लिहिलेल्या तेजोभंगकारी अितिहासांनी, परकीयांनीं केलेल्या निंदेनें, केवळ दोषच–आणि तेहि अतिशयोक्तपणें–आजवर दाखविले गेल्यानें, हिंदुयुवकांची मनोवृत्ति पराभूतपणाची बनण्याची संभवनीयता साहजिकच अुत्पन्न होते. ती घातक वृत्ति नष्ट करण्यास, अंशतः कां होअीना, ही लेखमाला कारणीभूत झाली, तर ती लिहिण्याचें, त्या प्रमाणांत सार्थक झालें असें वाटेल.

या पुस्तकांत पूर्व दिग्विजयच प्रामुख्यानें वर्णिला आहे.

या अितिहासांतील जवळ जवळ १३-१४ लेखांक सुप्रसिद्ध झारापकर मासिकामध्यें महिन्या महिन्याला प्रसिद्ध झाले. त्यामुळें, त्या त्या महिन्यांत सांप्रतच्या महायुद्धाची जी जी अवस्था होती, तिच्या तिच्या आधारानें, तात्कालिक अुल्लेख नि विवेचन केलें गेलें आहे. महायुद्धाचा ओघ अजून वाहत आहे; म्हणून त्या त्या वेळच्या घटनेप्रमाणें केलेलें विवेचन, आज पालटेल; आणि हें महायुद्ध अजूनहि संपलेलें नाहीं, त्याअर्थी अुद्यां कितीतरी विवेचन नवें करावें लागणार आहे. जोंपर्यंत हें महायुद्ध संपून, त्यांतून निर्माण झालेल्या घटनांना निश्चित स्वरूप प्राप्त झालें नाहीं, तोंपर्यंत त्यासंबंधीं कोणतेंहि विवेचन निश्चितपणें करतां येणार नाहीं. म्हणून, निरनिराळया वेळीं लिहिलेल्या मासिक लेखांतील तीं तीं विवेचनें, सांप्रत हें पुस्तक प्रसिद्धितांना बदललीं नाहींत. हेतु हा, कीं त्या त्या वेळच्या महायुद्धाच्या अवस्थेंतून निर्माण झालेलीं, जनमनांतील आंदोलनें यथावत्पणें आज आणि पुढेंहि दिसून यावीत.

त्याचप्रमाणें मासिकांतून खंडशः प्रसिद्ध होत असल्यामुळें, वाचकांना मागील संदर्भ आठवून देण्याकरतां अनेक ठिकाणीं, अपरिहार्यपणें पुनरावृत्ति झालेली आढळून येअील. सबंध पुस्तक संकलित करतांना, ती सुधारतां आलीहि असती. परंतु, प्रत्यक्ष अितिहासाचीच पुनरावृत्ति सृष्टींत वारंवार घडत असतां, अितिहास लेखनांतहि ती कांहीं वेळां घडली, तर विशेष कांहीं बिघडेल असें नाहीं; असें वाटून लेखांकांच्या त्या त्या वेळच्या घडणीस तसेंच राहूं दिलें आहे.

आणखी अेका गोष्टीचा अुल्लेख करणें अवश्यक वाटतें. कांहीं सन्मान्य आणि शिष्ट आक्षेपक, भिवया वर चढवून म्हणतील कीं, ' परंतु हा अितिहास प्रचारकी थाटानें लिहिला आहे अित्यादि. परंतु, आम्ही आधींच सांगून ठेवतों कीं, हा अितिहास याचवेळीं सांगण्याचा आमचा मुख्य अुद्देशच हा आहे कीं, त्याच्या वाचनानें हिंदू तरुणांमधील न्यूनगंड नष्ट होअून, त्यांच्या हृदयांत भव्य महत्वाकांक्षा अुत्पन्न व्हाव्यात. हिंदुतरुण, आपल्या विश्वविजयी आणि अगाध शौर्यशाली पूर्वजांनीं गाजविलेल्या विजय मालिकांनीं, चेतून जावेत. त्यांची आत्मविस्मृति विलयाला जावी, त्यांच्या कर्तृत्वांत जगज्जेतृत्वाची

बीजें समाविष्ट आहेत, हें त्यांना कळावें,—ते सिंहाचेच छावे आहेत—हें आत्मरूपदर्शन, त्यांना, या ' मोहावरणघातिना ' अितिहासानें, भूतकालाच्या दर्पणांत दिसावें, म्हणूनच हा अितिहास लेखनाचा यत्न केला आहे. हाच जर 'प्रचारी थाट,' कांहीं समान्य नि शिष्ट आक्षेपकांना वाटला, तर त्यांत आम्हाला संतोषच वाटेल. परंतु, ' प्रचारकी थाट ' यामध्यें ' असत्यविधानें, अतिशयोक्तिपूर्ण कथन, ' असा आक्षेप गर्भित असेल तर मात्र, तो आक्षेप सर्वथैव निराधार आहे, असें आम्ही या आक्षेपकांना आधींच सांगून ठेवतों. कोणतीहि असत्य घटना यामध्यें निवेदिली नाहीं. कोणतीहि सत्य घटना अतिशयोक्त केली नाहीं. मात्र प्रत्येक सत्य घटना सांगतांना, ती निःसत्त्वपणें न सांगतां, सजीव, स्फुरणदायी होअील, अशीच सांगण्याचा यत्न केला आहे. पूर्वजांनीं घडविलेलें पराक्रमी अितिहास, हे स्फूर्तीचे झरे आहेत. आणि म्हणून ते निरभिमान, निरावेश, निःसत्वपणें सांगण्यापेक्षां, सावेश, स्वाभिमान आणि परिणामकारकपणें सांगण्यानेंच ती अभिवाञ्छनीय स्फूर्ती, वाचकांच्या हृदयांत अुत्स्फूर्त होत असते. आणि म्हणूनच आम्हीं हेतुतः ही निवेदन-पद्धति अंगिकारिली आहे.

नाहींतर, ' रामानें रावणास मारलें ', या अेका वाक्यांतच रामायणाचा मुख्य अितिहास ( अिति-ह-आस ) कथन करतां आला असतां. परंतु, आद्यकवि भगवान् वाल्मीकींनें, ती कथा सांगण्याकरतां अेक 'रामायण' रचलें; आणि त्या रामाणयाच्या पठनानें, श्रवणानें आणि मननानें, या भारतांत वारंवार, प्रादुर्भूत झालेल्या रावणांस रसातळीं गाडण्यास, राणा प्रताप, छत्रसाल, शिवाजी महाराज, गुरुगोविंदसिंह, यांच्या सारख्या हिंदुजातीतील नरश्रेष्ठांस, तें दिव्य रामचरित्र आचरण्यास समर्थ केलें! अितका महिमा, देवतुल्य पूर्व-जांचे अितिहास स्फूर्तिदायक पद्धतीनें कथन करण्याचा आहे!—आणि तोच मार्ग आम्ही या हिंदूंच्या विश्वविजयी अितिहासाचें अल्पदर्शन करवितांना हेतुतः अवलंबिला आहे,

अंतीं, हा स्वयंभू हिंदुस्थान, अखंड, अभंग राखण्यांत नि स्वतंत्र करण्यांत, सांप्रतची पिढी यशस्वी होवो नि भावी पिढी, पुन्हां अेकदां तो बृहत्भारत निर्माण करण्यास बद्धपरिकर होवो, अशी या मातृभू आणि पुण्यभू असलेल्या हिंदुस्थानच्या भाग्य देवतांची प्रार्थना करून, हें प्राक्कथन पुरें करतों.

दादर-मुंबअी ( १४ )<br>अश्विन वद्य १ शके १८६६<br>( २ आक्टोबर १९४४ )

ना. दा. सांवरकर

११०२०

: १ :

## 'प्रयोजन'

अेतद्देशप्रसूनस्य सकाशादग्रजन्मनः ।
स्वं स्वं चरित्रं शिक्षेरन् पृथिव्यां सर्वे मानवाः ॥

वरील श्लोकांत वर्णन केलेली या हिंदुस्थानमधील हिंदूंची थोरवी ही कांहीं दर्पोक्ति नाहीं–अतिशयोक्ति तर नाहींच नाहीं. परंतु हें सत्य पटण्यास आपल्याला हिंदूंच्या विश्वविजयी अितिहासाचें संपूर्ण जरी नसलें, तरी संक्षिप्त तरी ज्ञान होणें अवश्य आहे. परंतु, दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, आम्हां हिंदूंच्या या विश्वविजयी अितिहासाला कालाच्या अंधःकारमय भुयारांत अज्ञानाचें आवरण घालून धूर्त परकीय अितिहासकारांनीं डांबून टाकलें आहे ! आमचा अितिहास हा विषय ज्यावेळीं प्रथम हातीं घेण्यांत येतो, त्यावेळीं मुळीं प्रथम पानाच्या प्रथम परिच्छेदांतच खिस्ताब्द ११९३ या वर्षी महंमद घोरीनें पृथ्वीराजाचा पराभव करून हिंदुस्वातंत्र्याचा नि हिंदुसाम्राज्याचा अुच्छेद केल्याची तेजोभंगाची घटना शिकविली जाते ! परंतु, त्या ११९३ वर्षाच्या आधीं कमींत कमी तीन सहस्त्र वर्षेतरी हिंदूंचीं राज्यें नि साम्राज्यें केवळ हिंदुस्थानांतच नव्हे, तर त्यावेळच्या बहुतेक सर्व ज्ञात जगतांस, हिंदुवीर स्थापीत होते; हिंदूंच्या विजयी सेना तुलुम युद्धांत अनेक परकीयांच्या सहस्त्रावधि नि लक्षावधि सैन्यांना पराभूत करून, कधीं हूणांचा, तर कधीं ग्रीकांचा, तर कधीं

शकांचा नायनाट करून आसेतुहिमाचल हिंदूंचा विजयी ध्वज मिरवीत नेत होत्या, अितकेंच नव्हे तर हिंदूंमधील सहस्त्रावधि धाडसी वीर, मुत्सद्दी तत्त्ववेत्ते, धर्मोपदेशक, पश्चिमेला अिजिप्त, ॲबिसीनियापासून तर पूर्वेस जावा, सुमात्रा, बोर्नियोपर्यंत नि थेट पाताल ( अमेरिका ) खंडापर्यंत, अुदंड राज्यें नि साम्राज्यें स्थापन करून, तेथें हिंदुत्वाचा गौरव शतकानुशतकें वर्धमान करीत होते, याचा नुसता ओझरता अुल्लेखहि आम्हाला शिकविल्या जाणाऱ्या आधुनिक अितिहासशास्त्रांत आढळावयाचा नाहीं ! त्याचप्रमाणें जवळ जवळ तीन शतकें पर्यंत, मुसलमानांच्या धर्मोन्मत्त आक्रमणाला थोपवून धरून हिंदुधर्म नि हिंदुसंस्कृति यांचें पालनपोषण करणाऱ्या तुंगभद्रेच्या तीरावरील प्रबळ विजयनगरच्या साम्राज्याची अन्य कोणतीहि स्फूर्तिदायक माहिती न देतां, केवळ १५६४ च्या वर्षी तालीकोटच्या लढाअींत रामदेवरावाचा पराभव पांच मुसलमान बादशहांनीं केला ही शुभवार्ताच सांप्रतच्या अितिहासांत नमूद करण्यांत येते ! परंतु सतत तीन शतकें पर्यंत या पांच मुसलमान बादशाह्यांना धाकांत ठेवून, त्यांना अनेक युद्धांत धूळ चारल्याची अेकादीहि बातमी या सत्यप्रिय अितिहासकारांना नमूद करावीशी वाटत नाहीं.

हिंदूंचें आत्मतेज, आत्मविश्वास, अंतःस्फूर्ति नष्ट करण्याकरितां, अितिहासक्षेत्रांमध्यें जो हा भयंकर कट परकीयांनीं रचला, त्याचे तितकेच भयंकर दुष्परिणाम सर्व हिंदुजनतेवर झाले नि आपला अितिहास म्हणजे पराभवांचा अितिहास, परकीयांच्या निष्प्रतिकार आक्रमणाचा अितिहास, आमच्या मानखंडनांचा अितिहास, आमच्या दास्य परंपरेचा अितिहास, असा लाचारीचा समज, केवळ सर्वसाधारण हिंदुजनतेमध्येंच नव्हे, तर कांहीं तुरळक अपवाद सोडले तर बाकीच्या सर्व हिंदू सुशिक्षितांमध्यें नि विद्वानां-मध्येंहि गृहीत कृत्याप्रमाणें रुढ झाला आहे ! हा समज अितका खोल हाडींमासीं भिनला आहे कीं, त्याची दैन्यवाणी प्रत्यंतरें आमच्या साहित्यक्षेत्रांत नाट्य, काव्य कादंबरी, नि अन्य शाखांमधूनहि निनादित झालेलीं दिसतात. गचाळ, भेकड, अव्यवस्थित या विशेषणांअैवजीं ‘ हिंदु ’ हा शब्द उपयोजिण्या-मध्यें कोणतीहि लज्जा नि मानहानी न वाटण्याअितका आमचा स्वाभिमान गंडबधिरता पावला ! याचेंच आणखी अेक प्रत्यंतर म्हणजे, डॉ. आंबेड-

करांसारख्या विद्वानानें, या विषारी रचलेल्या अितिहासाच्या वाचनानें अेकदां असें विधान केलें कीं, हिंदु जातीचा अितिहास म्हणजे पराभव, अपमान, आक्रमण, दास्य यांचाच अितिहास आहे! परकीय लोकांनीं रचलेल्या हिंदूंच्या तेजोवधाच्या भीषण कटाचें यापेक्षां अधिक भीषण अुदाहरण दुसरें कोणतें असणार? कर्णासारखा अेवढा विश्वविजयी योद्धा; परंतु शल्याच्या असत्य तेजोवधानें तोहि विपण्ण झाला, अितकें हें तेजोवधाचें विष जालिम आहे. आणि म्हणूनच डॉ. आंबेडकरांच्या अज्ञानजनित काढलेल्या या आत्मवंचनेच्या अुद्गारांचा फोलपणा दाखविण्याकरतां, बॅ. सावरकरांसारख्या धुरंधर अितिहासतज्ञाला अेक तेजस्वी लेख मागें 'किर्लोस्कर' मासिकांत लिहावा लागला.

कोणत्याहि माणसाच्या अथवा राष्ट्राच्या आपत्कालांत त्याचा तेजोभंग होअूं न देणें, हाच त्या आपत्कालावर मात करण्याचा पहिला प्रयत्न होय. अेवढ्याचकरतां आज आपत्कालांत सांपडलेल्या हिंदुजातींत, आत्मप्रतीतीची, आत्मगौरवाची तेजस्वी वृत्ति निर्माण करणें अवश्य आहे. आज अिंग्लंड अेवढें बलशाली; परंतु, जर्मनाकडून प्रचंड पराभवांचा वर्षाव होत असतांना, तेथील राजकारणधुरंधर, स्फोट करणाऱ्या दारूच्या आधींहि जर कशाच्या अुत्पादनाची तत्परता दाखवीत असतील तर ती आत्मविश्वासाची, आत्मगौरवाची! ही दारू राष्ट्राच्या हृदयांत जोंपर्यंत ठांसून भरलेली आहे, तोंपर्यंत शेंकडों पराभवहि राष्ट्राला दास बनवूं शकणार नाहींत! परंतु ही दारूच जर तेजोभंगानीं सर्द झाली, तर बाहेरचें प्रत्यक्ष जर्मनीचे युद्धसाहित्यहि विजयाचा बार अुडवूं शकणार नाहीं!

—आणि म्हणूनच आम्ही आजच्या आपत्तीच्या काळीं हिंदु हृदयांतील आत्मप्रतीतीची, आत्मगौरवाची, ज्योति चेतविण्याकरतां, हिंदूंच्या विश्वविजयी अितिहासाचे कांहीं मंत्र या ग्रंथांत अुद्गारणार आहोंत. हिंदूंच्या कांहीं शतकांच्या पराजयाच्या अितिहास वाचनानें, ज्याचीं अंतःकरणें तेजोभंग पावलीं असतील, त्या अंतःकरणांमध्यें हिंदूंच्या या सहस्त्रकांच्या विश्वविजयी अितिहासाच्या विद्युत्तुल्य अत्यल्पदर्शनानेंहि आत्मप्रत्ययाचें तेजोवलय झळाळावें, हाच अुद्देश हा ग्रंथ लिहिण्यांत आहे. पोकळ डौलाकरतां 'वडिलांची

ही कीर्ति ' सांगण्यांत येत नाहीं, तर पराभूत वृत्तीनें सुस्त, निराश, निष्प्रभ बनलेल्या हिंदुहृदयाला 'क्लैब्यं मास्मगमः' हें बजावण्याकरतां हा अल्प प्रयत्न आहे.

अेवढी प्राथमिक भूमिका कथन केल्यानंतर आतां पुढच्या प्रकरणापासून अुदयाची जननी जी पूर्व दिशा तेथूनच ' इतिहासप्रदीपेन, मोहावरणघातिना ', आपण हिंदूंच्या विश्वविजयी अितिहासाचा चलचित्रपट संक्षेपानें पाहाण्यास आरंभ करूं.

## : २ :
## हिंदूंचें सांस्कृतीक वर्चस्व

गेल्या प्रकरणीं या ग्रंथाचा मूळ हेतु निवेदन केला होता. या प्रकरणांत हिंदूंनीं आपल्या पराक्रमानें हिंदुस्थानाबाहेर जाअून जीं अनेक साम्राज्यें अुभारलीं आणि हिंदुधर्म, हिंदुसंस्कृती, नि हिंदुतत्त्वज्ञान यांचा प्रसार करून रानटी आवस्थेंत असलेला मानव समाज कसा अुन्नत केला, याचा विहंगमदृष्ट्या आढावा घेण्याचें योजलें आहे. या विवेचनांत दोन भाग पडतात. पहिला भाग अितिहासपूर्वकालचा; ज्याला प्राचीन अथवा पौराणिक म्हणतां येअील तो आणि दुसरा अैतिहासिक काल. प्राचीन अथवा पौराणिक कालाची अितिहासाची समालोचना अैतिहासिक कालाच्या समालोचनानंतर करण्याचें ठरविलें आहे. कारण अैतिहासिक कालांतील हिंदुस्थानाबाहेरील घटनांना अनेक पुरावे अुपलब्ध असल्यानें त्या घटना संशयातीतपणानें कथन करतां येतात. आणि त्यामुळें सहाजिकच आपला विश्वास या घटनावर चटकन बसतो. अितिहास पूर्व कालातील घटनांना सिद्ध करण्यास अपुरे पुरावे तपासून, कांहीं दंतकथा, कांहीं लोकप्रवाद आणि बाकीच्या पुराणांत वर्णन केलेल्या घडामोडी यांचें समालोचन करून अनेक सिद्धांत तर्कांच्या बळावर प्रस्थापित करावे लागतात, सांप्रतच्या आपल्या लोकांच्या पराभूत आणि हीनगंडाच्या प्रवृत्तीमुळें या प्राचीन अथवा

पौराणिक कथनावर नसावा तितका विश्वास चटकन बसणें कठीण जातें. अुदाहरणार्थ असा जर सिद्धांत कोणी सांगितला कीं, अमेरिकेंतील मेक्सीकोमध्यें तेथील अत्यंत रानटी निवासियांमध्यें मनुष्य संस्कृतीचा आरंभ भारतीयांनीं केला; त्याचप्रमाणें दक्षिण अमेरिकेमध्यें ज्या 'मय' साम्राज्याचा विस्तार युरोपियन लोक तेथें जाईतोंपर्यंत पसरला होता, तें मय साम्राज्य हिंदुलोकांनींच स्थापन केलें होतें; किंवा महाभारतांतील महायुद्ध संपल्यानंतर पांडवांनीं जो अश्वमेध यज्ञ केला, त्यावेळीं भारतीय योद्धा अर्जुन, गोबीच्या वाळवटांतून आशिया खंडाच्या अुत्तरेच्या टोकानें म्हणजे कामश्चाटकाच्या मार्गे अुत्तर अमेरिकेंत घुसून, तेथें आपला विजयध्वज त्यानें फडकाविला होता, तर या घटनांवर सहसा विश्वास न ठेवणारे लोकच आपणाला अधिक दिसून येतील. कारण या सर्व घटनांना, सिद्ध करण्यास पुराणांतील वर्णनाचा अुल्लेख गृहीत धरून, बाकीचे विवरण पायाशुद्ध का होईना, परंतु तर्काच्या आधारानेंच करावें लागतें; आणि म्हणून तें अैतिहासिक दृष्टीनें अपुरें ठरतें. त्यामुळें आधींच पराभूत वृत्ती झालेल्या आपल्या हिंदुलोकांना, हें पौराणीक आधारें केलेलें विवेचन, कांहींतरी भाकडकथा आहेत असें वाटतें. म्हणून प्रथमतः अैतिहासिक काल सुरू झाल्यापासून, प्रत्यक्ष पुराव्यानीं आपल्या हिंदूंचा प्रभावशाली आणि विजेतेपणाचा अितिहास जर सिद्ध केला, तर सांप्रतची आपली हिंदु लोकांची स्वतःला तुच्छ लेखण्याची प्रवृत्ती नष्ट होअील, नि आपण हिंदुलोकही अेकाकाळीं सबंध जगतावर परिभ्रमण करून राज्यें आणि साम्राज्यें स्थापित होतों, आपल्या धर्माची, आपल्या राष्ट्राची नि आपल्या संस्कृतीची पावन पताका, हिंदुस्थानाबाहेरहि त्यावेळच्या बहुतांश ज्ञात जगावर फडकावित होतों, याची प्रचिती निःसंशयपणें मनाला पटून, मग पौराणिक कालांतील देखील आपल्या दिग्विजयांची निश्चिती आपल्या मनाला सहज पटूं लागेल.

अि. स. पूर्वी ५०० वर्षांपासून भगवान् बुद्धांनीं अुपदेशिलेल्या बौद्धधर्माचा सबंध आशियाखंडामधून प्रसार करण्याकरतां सहस्रावधि भारतपुत्र अनेक हालअपेष्टा सोसून पश्चिमेस अरबस्थानापासून तों पूर्वेस जपानपर्यंत सारखे परिभ्रमण करीत होते. या धर्मप्रसारकांमध्यें, निर्धन भिक्षुपासून तों

सम्राट् अशोकापर्यंत सर्व भारतीय जनतेनें मोठ्या अहमहमिकेनें भाग घेतला होता. हिमालयाची प्रचंड भिंत वलांडून, खोतान ते समरकंद आणि सर्व मध्य आशिया व्यापून, बौद्धधर्माचा दया, प्रेम, अहिंसा अित्यादि दैविक तत्त्वांचा अुपदेश करून, पशुसमान असलेल्या तेथल्या मनुष्यजातीला मानुष्य शिकविण्या-करतां शेंकडों भारतीय बुद्धभिक्षु, निबिड अरण्यांतून मार्ग काढीत, रानटी अवस्थेमध्यें, रोज मारामाऱ्या करून पशुपक्ष्यांपासून तों प्रत्यक्ष मनुष्याचीहि हिंसा केवळ आपल्या अुदरंभरणाकरतां करणारे क्रूर मानवी समाज जेथें वसत होतें तेथें जाअून, त्यांना भारतीय संस्कृतीचें ज्ञानांजन घालून, त्यांच्या पाशवी प्रवृत्तीला, प्रेम, दया, अहिंसा या स्वर्गीय तत्त्वांचें अमृत पाजून, त्या लक्षावधि नि कोट्यवधि मानवांना भारतीय संस्कृतीची दीक्षा देत, शतकोंशतकीं फिरत होते. कधीं त्यांच्या कत्तली होत, कधीं ते हिंस्रपशूंच्या भक्ष्यस्थानीं पडत, कधीं थंडी, पाअूस, अुष्णता यांसारख्या नैसर्गिक प्रकोपांना ते बळी पडत—तरीहि आपला मानवतेचा धर्म, सर्व मनुष्यमात्राला शिकविण्याचें जणुं वेडच त्यावेळच्या भारताला लागलें होतें.

आज ख्रिश्चन मिशनरी, ख्रिश्चन धर्माचा प्रसार करीत साऱ्या जगभर हिंडत आहेत, याचें कितीतरी कौतुक आपणांस वाटतें त्यांचें धाडस, त्यांचा अुद्योग, त्यांची सुखनिरपेक्षता, त्यांची चिकाटी अित्यादि गुणासंबंधीं आपण किती आश्चर्यमुग्ध होतों! आणि तरीहि त्यांना पृथ्वीवरील बहुतेक प्रदेशात समर्थ अशा ख्रिश्चन राष्ट्रांचें संरक्षण नि अपार द्रव्यसहाय्य असतें. आणि त्यांतहि अनेक देशांमध्यें या ख्रिश्चनधर्मप्रसाराच्या धार्मिक अुद्योगाखालीं स्वतःच्या राज्यांचा विस्तार करून, अनेक देशांच्या स्वातंत्र्याचा घास कर-ण्याचा कुटिल डावहि दडलेला असतो. तरीहि आपल्याला या ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या धाडसाविषयीं किती आश्चर्य वाटतें आणि योग्य प्रमाणांत तें सत्यहि असतें; परंतु, आपले पूर्वजहि अशाच धाडसानें, सुखनिरपेक्षतेनें, धर्मप्रसाराच्या स्वर्गीय स्फूर्तीनें, स्वतःचीं सुखमय घरेंदारें, अितकेंच नव्हे, तर स्वतःचीं छत्रचामरें नि राज्यसिंहासनेंहि तृणवत् मानून, जे देशोदेशीं सहस्रशः, शतकोंशतकीं हिंडले, त्यांची स्मृतीहि आपणांस नसावी ही किती शोचनीय स्थिति आहे! आणि त्यांतहि हे सर्व भारतीय धर्म नि संस्कृतिप्रसारक साधु, कोणत्याही साम्राज्यप्रसारक ढंगांपासून अलिप्त होते हें किती गौरवास्पद आहे!

या सहस्रावधि धर्मप्रसारकांच्या नांवांची विस्तृत जंत्री देखील येथें देणें शक्य नसलें तरी त्यांतील कांहीं प्रातःस्मरणीय नांवें तरी आपल्याला माहित पाहिजेत. म्हणून कांहीं कांहीं देशांमध्यें ज्या महाभागांनीं मुख्य प्रसार केला, त्यांची वानगीदाखल कांहीं नांवें पुढें देत आहों. खि. स. पूर्वी २००–३०० च्या वर्षी अशोक सम्राटाचा पुत्र महेंद्र, हा सर्व राजवैभव सोडून लंकेला अेक साधा भिक्षु म्हणून गेला नि तेथील राजा **देवांना प्रिय तिष्य** याला बुद्धधर्माची दीक्षा दिली. ज्या ठिकाणी हा राजभिक्षु प्रथम अुतरला होता, त्या ठिकाणीं '**महाविहार**' या नांवाचा अेक विहार बांधला गेला. तें लंकेतील ठिकाण आजीहि सर्व बुद्ध जगाला वंद्य आहे! पाटलीपुत्राचा केवळ राजपुत्रच धर्मप्रसारक झाला नाहीं, तर पाटलीपुत्राची आवडती राजकन्या, अशोक सम्राटाची मुलगी **संघमित्रा**, धर्मोपदेशिका होअून, भिक्षुणी बनून, आपल्या भावामागें लंकेमध्यें प्रचारार्थ गेली.

खि. स. च्या पूर्वी ५३ व्या वर्षी खोतानमध्यें 'वैरोचन' या नांवाच्या एका तपोनिधीनें तेथील जनतेस बौद्धधर्माची दीक्षा दिली.

खि. स. च्या आरंभीं म्हणजे ६५ व्या वर्षी मगध देशांत जन्माला आलेल्या **काश्यपमातंग** या भिक्षूनें चीनमध्यें जाऊन तेथें प्रथम बौद्धधर्माचा प्रसार केला. काश्यप मातंग प्रथम गांधार (अफगाणिस्तान) देशामध्यें बुद्ध धर्माचा प्रसार करीत होता. परंतु चीनचा 'हान' वंशीय राजा **मिङ्ती** यानें बौद्ध धर्मोपदेशाची तीव्र अिच्छा प्रकट केल्याचें कळल्यावरून, काश्यपमातंग आपल्या वृद्धावस्थेंतहि चीनमध्यें खोतान, कोबीचें वाळवंट, अशा अत्यंत बिकट मार्गानें प्रवास करून पोंचला नि तेथील राजाला बुद्ध धर्माची दीक्षा दिली. यानंतर या प्रगाढ विद्वान भिक्षूनें, चीनी भाषेसारख्या अत्यंत कठीण भाषेचा अभ्यास आपल्या वयाच्या ७० व्या वर्षी सुरू करून तींत पारंगता मिळविली; आणि अनेक संस्कृत ग्रंथांच्या चिनी भाषांतरांच्या द्वारें बुद्धधर्माचें तत्वज्ञान चीनमध्यें प्रसृत केलें. हा भारताचा सुपुत्र आपल्या भारतीय संस्कृतीचा प्रसार आपल्या मृत्यूपर्यंत चीनमध्येंच करीत होता. अंतीं त्यांनीं आपला देह चीनमध्येंच ठेविला! हें अुदाहरण पाहिल्यावर कांहीं खिश्चन मिशनऱ्यांनीं बायबलाचें

भाषांतर सोळाव्या शतकांत मराठींत केलें होतें हें अैकून कुणाला कांहीं जिवाविशेष आश्चर्य वाटणार नाहीं !

यानंतर **धर्मरक्ष, बहाबल, धर्मकाल,** अित्यादि अनेक विद्वान् बुद्धभिक्षु चीनमध्यें गेले नि त्यांनीं बुद्धर्माची संजीवनी सर्व चिनी राष्ट्राला पाजून त्याचा कायापालट केला. शेंकडों संस्कृत ग्रंथांची भाषांतरें चिनी भाषेमध्यें यांनीं केली आणि भारतीय शास्त्रनिधींचा दरवाजा चीनला खुला करून दिला. अेवढें प्रचंड चिनी साम्राज्य, त्याच्या सम्राटासह भारतमातेच्या चरणीं 'शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम् ' अशा आदरानें नतमस्तक झालें ! असा हा भारतीय धर्मप्रचारकांचा, सारखा ओघ अखंडपणानें अेक सहस्र वर्षें चीनमध्यें वाहत होता. अंतीं अि. स. च्या बाराव्या शतकाच्या आरंभींहि **धर्मरक्ष, ज्ञानश्री** वगैरे तेजस्वी धर्मोपदेश चीनमध्यें गेले होते. यापुढें मात्र मुसलमानांचे आसुरी हल्ले या हिंदुस्थानवरच सुरू झाले, त्यामुळें आत्मरक्षणाच्या जीवनमरणाच्या झगड्यांत हिंदुराष्ट्र गुंतून गेल्यानें हा परदेशांतील दिग्विजयाचा प्रवाह अकस्मात् आटून गेला !

अुपरिनिर्दिष्ट भिक्षूंसारख्या अगणित धर्मप्रचारकांनीं केलेल्या परिश्रमानें नि धर्मसेवेनें अि. स. ३७२ पासून बुद्धधर्माचा नि भारतीय संस्कृतीचा प्रसार अतिपूर्व प्रदेशांत म्हणजे कोरिया मध्यें झाला, नि लवकरच कोरिया देशाचा राष्ट्रधर्म म्हणून बुद्धधर्म हा तेथें बद्धमूल झाला. कोरियामध्यें यापुढें सुमारें दोनशें वर्षे बुद्धधर्माचा जयजयकार झाल्यावर, नि कोरिया देशहि हिंदुस्थानचा संपूर्ण शिष्य बनल्यावर, अि. स. ५२२ च्या बेताला बुद्धधर्माचा नि भारतीय संस्कृतीचा दैदीप्यमान् सूर्य जपानवर प्रकाशित होअूं लागला. अर्धशतकाच्या आंतच सबंध जपानी राष्ट्रावर बुद्धधर्माचा प्रभाव पडला, नि सहाव्या शतकाच्या अंतापर्यंत, सबंध जपानी राष्ट्राचा राष्ट्रधर्म बुद्धधर्म झाला ! त्यासोबत संस्कृत ग्रंथाचें ज्ञानभांडारहि जपानी वाङ्मयांत अवतीर्ण झालें नि जपानदेशहि या पुण्यवान् भारतभूमीचा अेक सच्छिष्य बनला ! जपानचा प्रसिद्ध सम्राट **'शो-तो-कु'** यानें घोषणापूर्वक बुद्धधर्माचा राष्ट्रधर्म म्हणून पुकारा केला !

या कालांत नि यानंतरच्या कालांत सर्व सांस्कृतिक जीवनांत जपानमध्यें हिंदुस्थानच्या संस्कृतीचें प्रतिबिंब पडत गेले. गायन, वैद्यकी, शिल्प, गणित आदि शास्त्रांमध्यें नि सर्व सभ्य आचार विचारांत भारतीय विद्यांचें नि आचारविचारांचें प्रतिबिंब पडत गेलें. मधून मधून भारतामधून अनेक धर्मप्रचारक, विद्वान्, शास्त्रज्ञ लोक जपानमध्यें जाऊन, भारतीय संस्कृतीचा प्रचार अखंड करीतच होते. तशाच तऱ्हेनें ख्रि. स. ७३६ मध्यें '**बुद्धसेन**' नांवाचा अेक तेजस्वी ब्राह्मण, भारतामधून अनेक भिक्षु नि गायक लोकांचा मेळा घेऊन, हिंदुचीनच्या हिंदु साम्राज्यांना भेटी देऊन, चीनमध्यें प्रचार करून जपानमध्यें पोंचला. त्यानें तेथें ७६० पर्यंत अत्यंत प्रभावी असा प्रचार केला नि सर्व जपानमध्यें अत्यंत विख्यात नि आदरणीय विभूति म्हणून सन्मान पावला !

## : ३ :

## हिंदूंचें शास्त्रीय वर्चस्व

ख्रि स. १२०६ मध्यें मांगोलियामध्यें अेक प्रचंड मानवी शक्ति '**चेंगीजखां**' या नांवानें प्रकट झाली. या चेंगीजखानानें सर्व मांगोल जातींना अेकत्र करून झंझावाताप्रमाणें मांगोलियांतून बाहेर पडून हिंदुस्थानच्या अुत्तरसीमेपासूनचें बहुतांश आशियाखंड जिंकून, यूरोपमधलें बल्गेरिया, सर्विया, हंगेरी नि रशिया हे देश हस्तगत केलें. पूर्वेच्या प्रशांत महासागरापासून याचें साम्राज्य पश्चिमेस नॉर्वेपर्यंत पसरलें होतें ! हा विख्यात जगज्जेता मेल्यानंतर, ख्रि. स. १२२७ मध्यें कुबलाअीखान त्याच्या विस्तृत साम्राज्याचा धनी झाला. याला सर्व धर्मांच्या चिकित्सिक ज्ञानाची अभिरुची होती. त्याचा धाकटा भाऊ '**मनकूखां**' यालाहि धार्मिक ज्ञानाची आवड होती. या दोघां सम्राटबंधूंनीं त्यांची राजधानी काराकुरमच्याजवळ 'सिराआर्दो' या रमणीयस्थानीं अेक सर्वधर्मपरिषद ख्रि. स. १२५६ मध्यें भरविली. तिच्या-

मध्यें मुसलमान, खिश्चन, कन्‌फ्यूशिअस नि बौद्ध धर्मांचे पंडित अुपस्थित झाले होते. यथास्थित वादविवाद झाल्यावर सम्राट्‌बंधु ' **मनकूखां**'नें बौद्ध धर्मांचेंच तत्त्वग्रहण केलें नि घोषित केलें कीं 'अेका हातापासून जशीं सर्व बोटें निघतात, तसें बुद्धधर्मापासूनच सर्व अन्य धर्म निघाले आहेत.'

या सर्व पंडित चर्चेमध्यें बौद्ध धर्माचा प्रतिनिधि आचार्य '**नेमो**' हा होता. त्यांच्या विद्वत्तेनें नि वक्तृत्त्वानें कुबलाअीखां परम संतुष्ट झाला. कुबलाअीखानानें अेक आध्यात्मिक सल्लागार नेमला. त्याचें नांव '**द्रोगॉन्‌ पक्‌ पा**, हें होतें. हा तिबेटाचा रहाणारा होता नि मोठा बौद्धधर्माचा प्रचारक होता. याला कुबलाअीखानानें ज्या पदव्या अर्पण केल्या, त्या भारतीय गौरवानें भरलेल्या आहेत. त्यांवरून त्या मांगोल सम्राटावर भारतीय संस्कृतीचा केवढा प्रभाव होता हें सहज ध्यानीं येअील. या पंडिताला कुबलाअीखानानें दिलेल्या पदव्या अशा होत्या:—

भारतीय देवपुत्र, बुद्धावतार, लिप्याधिदेवता, साम्राज्यशांति विधायक, आणि पंचविध विधाविज्ञ.'

या विद्याप्रिय सम्राटानें मांगोलियामध्यें शिक्षणदानाचा प्रयत्न केला. त्यावेळीं त्याच्या सल्लागारांनीं भारतीय पंडित आणण्याविषयीं सल्ला दिला. म्हणून कुबलाअीखानानें भारतांत पंडितांकरितां प्रयत्न केला. परंतु यावेळीं (तेराव्या शतकाच्या आरंभीं) हिंदुस्थानांत मुसलमानी अत्याचारांनीं नि संस्कृतिविध्वंसक आक्रमणांनीं सर्व हिंदुजनता संकटांच्या वादळामध्यें सांपडली होती. अनेक विश्वविद्यालयें अुध्वस्त होत होतीं, ग्रंथालयें जळत होतीं; अगणित विद्वान्‌ लोक परागंदा झाले होते, अगणित मारले गेले होते; अगणित छळाबळानें मुसलमान करून भ्रष्टविले जात होते. हिंदुस्थानचें आजवर हजारों वर्षें विजयी असलेलें शस्त्र, मुसलमानी आक्रमणापुढें मोडून पडत होतें नि म्हणून अखंड शस्त्रसंरक्षित रहाणारीं शास्त्रें धुळीला मिळत होतीं! अशा अवस्थेमुळें मांगोलियामध्यें भारतीय ज्ञानाचा प्रसार करण्याला कुणीहि भारतीय पंडित कुबलाअीखानाला मिळाला नाहीं! अंतीं भारतशिष्य तिबेट नि चीन येथील पंडितांवरच त्याला संतुष्ट व्हावें लागलें!

क्षणभर असें वाटतें कीं, यावेळीं जर भारतीय पंडित मांगोलियामध्यें गेलें असते नि त्यांनीं हिंदुधर्म नि हिंदुसंस्कृतीनें मांगोलियाला दीक्षा दिली असती,

तर पुढें या मांगोलियामधून मुसलमानी धर्माचें बीज रुजलेंच नसतें, नि पुढें याच मांगोलच्या वंशांतील जो बाबर, मुसलमान म्हणून हिंदुस्थानांत आला, तो हिंदु अथवा बौद्ध म्हणूनच हिंदुस्थानांत आला असता, नि या मोंगल वंशाच्या मुसलमानी पंथामुळें, पुढें हिंदुस्थानांत जे अनेक शतकें हिंदुधर्मावर आघात झाले ते वांचले असते !

—पण काय वेडी ही आशा ! अितिहासाच्या नि भवितव्याच्या घटना अितक्या का दुबळया आहेत, कीं त्यांनीं केवळ आपल्या सदिच्छांप्रमाणें घडत जावें ! ही नाठाळ भवितव्यता आपल्या केवळ सदिच्छांनीं अनुकूल होत नसते, तर तिला अनुकूल करून घ्यावयास मनगटाचें बळ अवश्य असतें ! असो; हिंदुस्थानच्या सत्पुत्रांनीं पूर्व दिशेकडे हा सांस्कृतिक दिग्विजय केला, तसाच तो पश्चिमेकडे मिश्र ( अेजिप्त ) अबिसीनिया नि अरबस्थानपर्यंतहि केला होता. त्याचा केवळ त्रोटक नामोल्लेख करणेंच **या ग्रंथामध्यें** शक्य असल्यानें, पश्चिम दिग्विजयाचें थोडें विहंगमावलोकन करूं.

मिश्र देशामध्यें ( फार प्राचीन काळीं ) हिंदु लोकांचीच अेक वसाहत गेली होती नि त्यांतील हिंदु लोकांनीं नील ( नाअिल ) नदीच्या कांठीं हिंदु संस्कृतीची प्राणप्रतिष्ठा केली. मिश्रवासी प्राचीन लोक मोठ्या अभिमानानें सांगत कीं आम्ही पूर्वदिशेच्या ‘ पुण्ट ’ देशामधून आलों आहोंत. हा मिश्र लोकांचा आदरणीय ‘ पुण्ट ’ देश दुसरा तिसरा कोणता नसून, दाक्षिण हिंदुस्थानचा पांड्यदेशच होता. मिश्रदेवता या हिंदुदेवतांशीं सर्वस्वीं मिळत्या आहेत. उदाहरणार्थ कांहींचा निर्देश बोधप्रद होईल.

| मिश्र देवता | हिंदुदेवता | मिश्र देवता | हिन्दु देवता |
|---|---|---|---|
| सेव् | शिव | ओीरीस् | अीश |
| हर् | हर | दायनोशिअस् | दिनेश |
| आमन् | ओम् | सखित | शक्ति इत्यादि. |

त्याचप्रमाणें मिश्रलोकांमध्यें, हिंदूंप्रमाणें चातुर्वण्याची व्यवस्था मानण्यांत येत होती. अितकेंच नव्हे तर ब्राह्मण नि क्षत्रियांना ‘द्विज’ अशीच संज्ञा होती !

हिरोडोटसनें मिश्र लोकांच्या स्वभावसमजुतीचें वर्णन करतांना लिहिलें आहे कीं, हे लोक ज्योतिषावर विश्वास ठेवतात, निरनिराळया नक्षत्रांवर

जन्मलेल्या व्यक्तींचीं चरित्रें निरनिराळया विशिष्ट गुणांनीं युक्त असतात. मिश्री लोक फार सभ्य आहेत. तेथें वृद्धांना फार मान देतात. त्यांच्यामध्यें निरनिराळ्या देवतांच्या पूजनाचे दिवस निश्चित ठरविले आहेत. इत्यादि या सर्व वर्णनावरून हे मिश्रि लोक भारतीयच होते हें समजण्यास कठीण नाहीं.

त्याचप्रमाणें ते आत्म्याला अमर मानीत होते. मिश्र लोकांमध्यें 'मनस्' किंवा 'मेन्' हा आद्य राजा मानला जात असे. हिंदूलोकहि 'मनू'ला आद्य पुरुष मानतात. अशा रीतीनें सर्व सांस्कृतिक चिन्हांवशेषांवरून मिश्रांची संस्कृति ही भारतीय संस्कृतीच होती. त्या संस्कृतीची आतांहि अुभीं असलेलीं प्रचंड स्मारकें जीं 'पिरामिड्स्' तीं भारतीय संस्कृतीचेंच संतान आहे!

भारतामधून आपले ऋषिलोक परदेशांत जाअून तेथील संस्कृतीहीन लोकांना, हिंदुत्वाचीं दीक्षा पुराणकालापासून देत होते, ही गोष्ट सिद्ध करणाऱ्या अनेक पुराणांतील अुल्लेखांपैकीं खालील अुल्लेख मिश्र देशासंबंधींच असल्यानें तो मोठा बोधप्रद होअील. तो अुल्लेख भविष्य पुराणांतील आहे. तो असाः–

**सरस्वत्याज्ञया कण्वो मिश्रदेशमुपाययौ ।**
**म्लेच्छान् संस्कृत्य चाभाष्य तदा दशसहस्रकम् ॥**

अशा रीतीनें अेजिप्तची ती प्रसिद्ध पुराण–संस्कृती भारतीय संस्कृतीची नि पश्चिम दिग्विजयाची अेक शाखाच होती.

आतां अरबस्थानसंबंधीं थोडा अुल्लेख करूं. अरबस्थानमध्यें सातव्या शतकाच्या आरंभीं मुसलमान धर्म सुरूं होण्याच्या आधीं नि खिश्चन धर्माच्या आरंभाला, बुद्धधर्माचा प्रसार होअून तेथील जीवनावर बुद्ध धर्माची छाप पडली होती. अितकेंच नव्हे तर प्रत्यक्ष येसू खिस्त यांनीं कांहीं काळ बुद्धविहारामध्यें काढला होता नि त्याच्या पूजाप्रार्थनादि विधीमध्यें बुद्धधर्म पूजाविधिविधेयाची दाट छटा पडली आहे, हें सत्य आतां जवळ जवळ अितिहासमान्य होत आलें आहे. प्रत्यक्ष 'अरबस्थान' हें नांवहि संस्कृतमधूनच प्राप्त झालें आहे. 'अरव' म्हणजे घोडा–घोड्यांकरितां प्रसिद्ध असलेलें स्थान तेंच 'अरवस्थान'–'अरबस्थान.'

परंतु, या गोष्टींपेक्षांहि अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे अरबस्थाननें मुसलमानधर्म स्वीकृत केल्यानंतरहि अरबी जगावर महंमदाच्या अुदयानंतरहि

पांच शतकेंपर्यंत स्वातंत्र्याच्या नि वैभवाच्या शिखरावर नांदणाऱ्या हिंदुस्थानच्या संस्कृतीचा केवढा मोठा परिणाम होत होता, हें पहाणें कितीतरी अभिमानास्पद आहे. म्हणून या घटनांपैकीं कांहीं थोड्या ठळक घटना पुढें दिल्या आहेत.

ज्यावेळीं अरबस्थान मुसलमानमय झालें, त्यावेळीं त्यांनीं अि. स. ६५१ मध्यें 'बलाक' नांवाचें नगर जिंकलें. या नगरीं त्यावेळीं 'नौबार' (नवविहार) या नांवाचें अेक बुद्धिमंदिर होतें. तेथील पुजाऱ्यांना 'बरमक' (परमक, श्रेष्ठ) अशा नांवानें संबोधित असत. बलाक हें नगर, खोरासान-मधील अेक प्रसिद्ध नगर होतें.

तें जिंकल्यावर, मुसलमानांनीं त्यांच्या भयंकर पद्धतीप्रमाणें, त्या नगरामधील नौबहार (नवविहार) हें भव्य, सुंदर नि रमणीय बुद्धिमंदिर लूटून, जाळून अुध्वस्त केलें नि तेथील पुजारी जे बरमक (परमक–श्रेष्ठ) यांना बलात्कारानें मुसलमान केलें. हे बरमक लोक जरी बाह्यतः मुसलमान झाले तरी त्यांच्या अंतःकरणांतील हिंदुसंस्कृतीचें प्रेम अविचलितच राहिलें. त्यानंतर हे लोक भाग्यवशात् बगदादला पोंहोचले. तेथें सुप्रसिद्ध बगदादच्या खलिफाचें राज्य चालू होतें. या बरमक लोकांच्या बुद्धि, शौर्य आदि गुणांनीं यांनीं बगदादच्या सर्व दरबारांत आपलें प्रामुख्य स्थापून, कांहींनीं तेथील मंत्रिपदहि पटकाविलें. याच लोकांनीं भारतीय चिकित्सा, साहित्य, ज्योतिष वगैरे ग्रंथांची अरबीमध्यें भाषांतरें करण्याचा अुत्कृष्ट अुद्योग सुरू ठेवला, नि अरबी भाषेमध्यें संस्कृत ग्रंथांचें ज्ञानभांडार सांठविण्यास आरंभ केला. अि. स. ७६१ मध्यें गणित, ज्योतिष अित्यादि विद्यांमध्यें पारंगत असलेला अेक महान पंडित, आपल्या सांगाती अितर पंडितांना घेअून बगदादला गेला. त्यावेळीं तेथें खलिफा '**मंसूर**' हा विद्याव्यासंगी खलिफा राज्य करीत होता. या पंडितांनीं 'बृहस्पतिसिद्धान्त' या नांवाच्या ग्रंथाचें आरबींत भाषांतर केलें. त्याचप्रमाणें संस्कृत पंचतंत्राचेंहि भाषांतर ९ व्या शतकांत अरबीमध्यें झालें. तें तेथें अितकें लोकप्रिय झालें, कीं त्यांचीं गद्यांत आणि पद्यांत अनेक भाषांतरें झालीं. अनेक कवींनीं त्यावर काव्यें गाअिलीं. त्या काव्यांना बादशाहांनीं पारितोषिकें दिलीं. '**अेब्बान**' नामक अरबी महाकवीनें याचें पद्यांत भाषांतर केलें, त्यावेळीं खलीफा हारूरशीद यानें त्यास अेक लाख दरहम पारितोषिक म्हणून दिले. अितकेंच नव्हे तर अरबी

लेखकांच्या सहाय्यानें, ह्या पुस्तकाचीं युरोपमध्यें अनेक भाषांमध्यें भाषांतरें झालीं. अितका चटका संस्कृत पंचतंत्र या ग्रंथानें तिकडील लोकांना लावला !

गणित विषयाचें ज्ञान अरब पंडितांनीं भारतीय गणित शास्त्रज्ञांकडून ग्रहण केलें. अेक ते नऊ हे अंक भारतीयांपासूनच ते शिकले नि त्याची स्मृति म्हणून या अंकांना ते 'हिंदसा' असें संबोधतात. याच अरबांपासून युरोपच्या पंडितानीं गणिताचें अध्ययन केलें नि या अंकांना ते अरबी अंक म्हणून ओळखतात. परंतु, स्वतः अरब लोक त्याला 'हिंदोसा' म्हणून म्हणतात.

गणिताप्रमाणेंच ज्योतिषविद्याहि भारतीयांनीच अरबांना पढाविली. वर सांगितलेंच आहे, कीं 'बृहस्पति सिद्धांत' या ज्योतिर्विषयक ग्रंथाचें अरबी भाषातर झालें. त्याला 'अस्सिंद हिंद' असे नांव अरबीमध्यें मिळालें. पृथ्वी सूर्याभोंवती फिरते आहे हा सिद्धांत, 'आर्यभट्ट' यानें नमूद केला नि अरबी लोकांनीं तो मान्य केला. अरब लोकांनीं ही भारतीय ज्योतिर्विद्या स्पेनपर्यंत नेऊन पोंचविली नि तेथून ती सर्व यूरोपभर पसरली. बगदादच्या खलीफांच्या दरबारांत प्रथम इराणी ज्योतिषी ठेवीत होते. परंतु, खलीफा '**मंसूर**' च्या राजवटीपासून तेथें हिंदु ज्योतिषी नेमूं लागले.

वैद्यशास्त्र देखील अरबांनीं भारतीयांपासून ग्रहण केलें. त्याची कथा अशी आहे कीं खलीफा '**हारूंरशीद**' हा अेकदां फार आजारी झाला. मोठमोठ्या हकीमांनीं नि अिराणी वैद्यांनीं त्यास औषधें दिलीं. परंतु, गुण येअीना. अशा वेळीं अेका दरबारी माणसानें सांगितलें कीं हिंदुस्थानमध्यें 'मनका' ( माणिक्य ) या नांवाचा वैद्य फार निष्णात आहे. हें अैकतांच खलीफानें फार सन्मानानें त्याला बगदादला नेलें. या वैद्यराजानें खलीफाला रोगमुक्त केला. त्यामुळें हिंदु वैद्यकीय शास्त्रांचा तेथें मोठा विजय झाला नि तेव्हांपासून आयुर्वेदांचा अभ्यास अरब विद्वानानीं सुरू केला. या सर्व हिंदु संस्कृतिप्रचारास वर वर्णन केलेल्या 'बरामक' लोकांनीं फार सहाय्य केलें, हें त्यास निरंतर भूषणावह आहे. छळाबळानें त्याना बाटविलें–परंतु, त्यांनीं हृदय पालटलें नाहीं. भारतीय संस्कृतींचेंच प्रेम त्यांनीं अविरत चालू ठेविलें.

यानंतर बगदादच्या सरकारी औषधालयांत भारतीय वैद्यच मुख्य नेमला गेला. हिंदुस्थानमधून शेंकडों वनस्पति तिकडे नेल्या. 'माणिक्य' आणि

अन्य हिंदु वैद्य यांच्याकडून वैद्यक विषयाचे संस्कृत ग्रंथ अरबीमध्यें भाषांतर केले गेले. 'सुश्रुता'चें भाषांतर झालें. त्याला अरब लोक 'ससरो' म्हणतात. 'चरका'चेंहि पारशी भाषेंत नि मग अरबींत भाषांतर झालें. स्त्रीरोग विषयक अेक संस्कृत ग्रंथ अेका हिंदुविदुषीनें लिहिला होता. त्याचेंहि अरबींत भाषांतर झालें. पशुचिकित्सा विषयक अेक ग्रंथ '**शानाक**' पंडितानें लिहिला होता. त्याचेंहि अरबी भाषांतर झालें. अशा आणखी किती घटना या लहानशा लेखाच्या मर्यादेंत सांगाव्या कीं ज्या वाचून आपल्या हिंदू लोकांच्या पूर्वजांच्या ज्ञानाची, पराक्रमाची, सर्वशास्त्रपारंगततेची यथार्थ कल्पना येऊन, सार्थ अभिमानानें आपलें हृदय भरून यावें ! या सर्व वैद्यशास्त्राचा प्रसार या अरब लोकांनीं सर्व यूरोपभर, अन्य हिंदुशास्त्रांप्रमाणेंच केला, नि सर्व यूरोपला, अरबांनीं—हिंदूंच्या या शिष्यांनीं अनेक शास्त्रें शिकवून संस्कृत केलें ! आतां अंतीं, हिंदूंनां अरब विद्वान् लोक केवढा मान देत होते, याचा अेकच अुतारा देअून हा हिंदूंच्या सांस्कृतिक दिग्विजयाचा भाग आपण पुरा करूं.

**बसरा** येथें अि. स. ८५० च्या सुमारास '**जाहिज**' या नांवाचा अेक मोठा तर्कशास्त्रज्ञ नि दार्शनिक म्हणून नांवाजलेला विद्वान रहात होता. यांनीं अेक मोठा विद्वत्तापूर्ण निबंध लिहिला. त्याचें शीर्षक असें होतें. 'गोऱ्या आणि काळया जातीमध्यें कोण श्रेष्ठ आहे !' या निबंधांत अनेक तऱ्हेनें विवेचन करून त्यांनीं सिद्धांत मांडिला कीं काळीं जातीच श्रेष्ठ आहे. आणि या विधानाच्या पुष्टीकरतां त्यांनीं हिंदुजातीचें अुदाहरण देऊन जो आदरयुक्त स्तुतीचा वर्षाव केला, त्यापैकीं थोडा अुतारा खालीं देत आहे:—

'भारतवर्षाचे निवासी जरी काळे आहेत, तरी त्यांचें ज्योतिष नि गणित या विषयाचें ज्ञान खूप विकसित झालें आहे. वैद्यशास्त्रामध्यें देखील ते लोक फार पुढारलेले आहेत. मूर्ति, चित्र, भवनें निर्माण करण्यांतहि ते कुशल आहेत. शतरंज (बुद्धिबळ) हा खेळहि त्यांनींच काढला आहे. विष उतरविण्याचे नि रोग नष्ट करण्याचे मंत्र त्यांना अवगत आहेत. त्यांचें संगीत किती हृदयंगम आहे ! त्यांनां सर्व प्रकारच्या नृत्याचीहि माहिती आहे. ते कवितांचे तर भांडारच आहेत. वक्तृत्वामध्यें निष्णात आहेत. दर्शन, साहित्यनीति यांमध्येंहि ते चतुर आहेत. त्यांच्यापाशीं सुविचार **आणि**

**त्यांच्या अंगीं वीरताहि वसत** आहे. आणखीहि त्यांच्यामध्यें असे गुण आहेत कीं जे चिनी लोकांमध्यें नाहींत, इत्यादि.

वाचकहो ! हा परदेशी अरब विद्वान् अितक्या मुक्तकंठानें नि हर्ष-भरानें आपल्या प्रतापवान् पूर्वजांची ही स्तुति ९ व्या शतकांत करीत आहे, हें ध्यानांत ठेवा ! परकीयांनीं अशीं काव्यमय स्तुति निरपेक्षपणें करावी. यावरून आपल्या पूर्वजांचा प्रभाव केवढा प्रचंड होता याची कल्पना करा. आधीं कुणाचाहि स्वार्थ नसतां स्तुति करणें, हें कर्म किती दुर्मिळ असतें ! त्यांतहि परकीयांनीं ती करणें, हें त्याहूनहि दुर्मिळ; आणि वरीलप्रमाणें सद्गुण वर्णनाचा वर्षाव करणारी स्तुति अतिशय दुर्मिळ ! ! परन्तु, आपल्या प्रतापवान् पूर्वजांनीं, शतकोंशतकींच्या आपल्या अनंत सद्गुणांनीं त्यावेळीं सर्व ज्ञात जगतावर अेवढा प्रभाव पाडला होता, हेंच यावरून सिद्ध होत नाहीं कां ?

अशा रीतीनें या हिंदुजातीनें, मानवी जातीच्या सांस्कृतिक अितिहासांत केलेल्या दिग्विजयांचें अल्पदर्शन या प्रकरणांत केलें. आतां याच्या पुढील प्रकरणांमधून हिंदूलोकांनीं हिंदुस्थानाबाहेर स्थापन केलेल्या राज्यांची नि साम्राज्यांची माहिती यथावकाश ग्रथित करूं.

## : ४ :

## मलय साम्राज्य.

गेल्या तीन प्रकरणांत आपल्या प्राचीन हिंदु धर्मोपदेशकांनीं, शास्त्रज्ञांनीं, तत्त्वज्ञांनीं, प्रचारकांनीं, हिंदु संस्कृतीची विमलध्वजा हातीं घेअून त्या वेळच्या सर्व ज्ञात जगावर संस्कृति विजय कसे मिळविले नि सर्व ज्ञात जगाचें गुरुस्थान कसें प्राप्त करून घेतलें, याचें पुढील कथासूत्रापुरतें दिग्दर्शन केलें. आतां या प्रकरणापासून आपल्या हिंदु पूर्वजांनीं हिंदुस्थानाबाहेर पडून स्थलमार्गानें नि जलमार्गानें पूर्वदिशेकडे दिग्विजय कसे केले नि शेकडों वर्षे

तेथें हिंदुराज्यें नि प्रबल हिंदुसाम्राज्यें स्थापून, सकल पूर्व दिशेचें स्वामित्व कसें संपादित केलें याचा विस्मयकारक, तितकाच स्फूर्तिदायक अितिहास क्रमशः निवेदन करूं.

## ‘फूनान’ अथवा मलयसाम्राज्य

फार प्राचीनकालापासून हिंदु लोक नौकानयनामध्यें ( दर्यावर्दीपणामध्यें ) अत्यंत धाडसी नि निष्णात म्हणून प्रसिद्ध होते. अत्यंत गतिमान तरीहि हलक्या नि सुढाळ नौका, लहान आकारापासून तो प्रचंड विस्तारापर्यंत कुशलपणें बांधणारे कारागिर नि कारखाने हिंदुस्थानांत फार पुराणकालापासून अस्तित्वांत होते. ज्या धाडसी लोकांनीं अनेक सागर नि महासागर ओलांडून, पश्चिम दिशेस अिराणी आखातापासून तों थेट भूमध्यसमुद्रांतून आफ्रिकेचा अुत्तर समुद्रतट व्यापून कार्थेजपर्यंत आपला प्रचंड व्यापार नि संपन्न राज्यें स्थापिलीं ते ‘पाणी’ लोक, दक्षिण हिंदुस्थानांतील हिंदु होते. अिराणी आखातांतील युफ्रेटिस टैग्रिस नद्यांपासून हे ‘पाणी’ लोक आपलीं राज्यें वसवीत थेट कार्थेजपर्यंत गेले नि तेथेंहि अेक प्रबळ राज्य वसवून कांहीं शतकेंपर्यंत समुद्रस्वामीनी म्हणून–आज जसे अिंग्रज गाजत आहेत तसे–गाजत होते. यानां ‘फोनिशिअन’ असें नामाभिधान प्राप्त झालें होतें. या प्रभावी कार्थेजच्या सागरसत्तेला सबंध भूमध्यसमुद्र त्यावेळीं अेकाद्या क्रीडासरोवराप्रमाणें निर्वेध झाला होता नि अेवढें मानधन रोमचें राज्य, परंतु, तेंहि कित्येक वर्षें कार्थेजला दचकत होते.

अशा रीतीनें प्राचीन हिंदु लोकांनीं, सागर–महासागरावरून सर्व जगामध्यें अखंड नि अप्रतिहत संचार, पाश्चिमात्य पोर्तुगीज, डच, स्पेन, अिंग्लिश वगैरे आधुनिक राष्ट्रें ११ व्या शतकापासून वावरूं लागलीं, त्यांच्या आधीं कित्येक हजारों वर्षेंपर्यंत चालू ठेविला होता. सर्व ज्ञात जगताचा महत्त्वाचा व्यापार हिंदु लोकांच्या हातीं होता नि त्यामुळें दशदिशांनीं अगणित द्रव्याचा पाअूस या हिंदुस्थानावर पडून, तो अक्षरशः ‘सुवर्णभूमि’ म्हणून सर्व जगांत गाजत होता. आज अमेरिका, अिंग्लंड, जपान यांचा व्यापार जसा जगतांतील कोनाकोपऱ्यांत शिरला आहे, त्याचप्रमाणें त्यावेळीं हिंदूंचा व्यापार सर्वज्ञात जगत् व्यापून, तेथें हिंदुसंस्कृतीचा अुज्वल प्रचार करीत, शास्त्रें, विद्या कला

यांचे पाठ देत, मनुष्यजातीला सुसंस्कृत करण्याचें अेक मुख्य साधन झाला होता. त्यामुळें सर्व जगतांतील राष्ट्रें, या हिंदूंच्या हिंदुस्थानापुढें नतशीर्ष होत होतीं–याचें थोडेसें दिग्दर्शन गेल्या प्रकरणीं केल्याप्रमाणें अरबी विद्वान् आदराचा नि स्तुतीचा कसा स्वयंस्फूर्त नजराणा हिंदुस्थानला अर्पण करीत होते, यावरून ध्यानीं येईल.

## ‘ फूनान ’ साम्राज्य–संस्थापक कौंडिण्यः–

पुराणकाळीं हिंदुस्थानमधून शेंकडों नि सहस्त्रशः तरुण नि धाडशी वीर समुद्रपर्यटन नि देशपर्यटन करून स्वतःचीं भाग्यें अुदयास आणीत होते. त्यावेळीं सध्यांची वेडगळ समुद्रबंदी वा परदेशगमनबंदी मुळींच नव्हती; अितकेंच नव्हे, तर समुद्र ओलांडून नि देशाटन करून भाग्य काढण्याची अहमहमिका, त्यावेळच्या त्या धाडशी हिंदूमध्यें रसरसत होती. बेकारीनें बेचैन होअून, त्यावेळीं कुणीहि तरुण पौरुषहीन आत्महत्येचा मार्ग स्वीकारीत नव्हता; तर दैव काढण्यास, देशांतर करण्याचें धाडस करण्यास सदैव तरवरलेला होता. ज्या ‘ फूनान ’ साम्राज्याची कथा आम्ही आतां आमच्या वाचकांस सांगणार आहोंत, त्यांचा संस्थापक असाच अेक धाडसी हिंदुवीर ‘ कौंडिण्य ’ या नांवाचा होता. दक्षिण हिंदुस्थानमधून हा तेजस्वी वीर, महत् आकांक्षेनें प्रेरित होअून देशपर्यटनाला निघाला नि आपल्या अंगच्या अलोट सामर्थ्यानें त्यानें हिंदुस्थानच्या पूर्व सीमेला लागून नि ब्रह्मदेशाच्या पूर्व भागाला ‘फूनान’ चें अेक प्रचंड साम्राज्य निर्माण केलें.

## ‘ फूनान’चा विस्तार

अि. स. च्या पहिल्या शतकांत या ‘ फूनान ’ च्या साम्राज्यांत खालील देश समाविष्ट झाले होते; कोचीन–चीन, कम्बुज ( कम्बोडिया ), चंपा (अनाम), स्याम ( सयाम ) आणि मलाया द्वीपकल्प–अितके देश या ‘ फूनान ’ साम्राज्याचे प्रमुख भाग होते. आजकाल वर्तमानपत्रांमधून ज्या फ्रेंचांच्या अिंडोचायनाचा पूर्वेकडील युद्धक्षेत्रांत वारंवार अुल्लेख येत आहे, नि जो भूमाग जपाननें थोड्याच अवधींत हस्तगत केला आहे, तो विस्तृत अिंडोचायना या फूनानच्या साम्राज्यांत अंतर्गत होता. अितकेंच नव्हे तर सयाम, मलाया द्वीपकल्प यांचाहि त्यामध्यें अंतर्भाव झाला होता. आज

'हिंदुचीन' ( Indochina ) म्हणतात, त्यामध्यें कोचीन, चीन, कंबुज, ( कॉम्बोडिया ), चंपा ( अनाम ) यांचा समावेश होतो. सबंध हिंदुचीनचें अेकंदर क्षेत्रफळ २,८५,००० चौरस मैल आहे. म्हणजे हिंदुचीनचा अेकंदर विस्तार मुंबअी अिलाख्याच्या दुप्पटीवर होतो. मलाया द्वीपकल्पहि सरासरीनें अितकेंच येअील. याच्याच सांगातीं सयामचें स्वतंत्र राज्य धरलें तर त्यावेळीं या फूनानचें, पूर्व दिशेचा विजेता जो **कौंडिण्य** यानें १ ल्या शतकाच्या बेताला संस्थापित केलेलें साम्राज्य, दक्षिण हिंदुस्थान अितकें विस्तृत होतें.

युरोपियन अितिहास वाचीत असतां लॉर्ड क्लाअिव्ह, वास्कोदिगामा वगैरे विजेत्यांची अुदाहरणें पाहिलीं, कीं पूर्वजांच्या अितिहासाचें अज्ञान असलेल्या आमच्या हिंदुलोकांना वाटतें, पाश्चात्य लोकांचें काय हें धाडस, हें कर्तृत्व, हे पराक्रम ! आमच्या आंगीं यांतील कांहीं नाहीं ! असें वाटून आत्म-विडंबनाची प्रवृत्ति निर्माण होते नि त्यानें आपल्या वृत्तींतील न्यूनगंड वाढत जाअून निष्क्रियतेचा, नैराश्याचा, हताशतेचा रोग पसरत जातो. सध्यांच्या हिंदु समाजाला हे सर्व रोग प्रबळतेनें जडले आहेत. म्हणून त्यांच्या नाशनार्थ दोन सहस्र वर्षांपूर्वीचा या कौण्डिण्य महावीराचा अितिहास प्रभावी मात्रेसारखा अुपयोगी पडेल !

कौण्डिण्यानें प्रस्थापित केलेल्या या साम्राज्याचें मूळ नांव काय होतें हें अितिहासज्ञांना अजून कळलें नाहीं ! 'फूनान' हें नांव कांहीं चिनी प्रवाशांनीं नि अितिहासकारांनीं लावलेलें आहे. परंतु, हें नांव कांहीं मूळ नांव नाहीं. आमच्यामतें या संबंध साम्राज्याचें नांव 'मलय' साम्राज्य असें असलें पाहिजे. कारण हें निश्चित आहे कीं, महावीर कौंडिण्य हा ब्राह्मण, दक्षिण हिंदुस्थानांतून तिकडे गेला होता, नि तो बहुधा त्यावेळीं प्रख्यात असलेल्या कलिंग, पांड्य अथवा चोल या दाक्षिणात्य राज्यांपैकींच कुठून तरी गेला असला पाहिजे. अुत्तरेस जसा हिमालय अतिप्रिय, तसें दाक्षिणेमध्यें 'मलयगिरी'वर हिंदूंचें अतिशय प्रेम ! त्याच्यावरील चंदनवृक्षांच्या बनांवर, त्या बनांमधून चंदनगंध लुटून नेअून, दशदिशांच्या रसिकांना मोहविणाऱ्या अनिलावर, त्या मलयगिरीवरून अमृताप्रमाणें स्रवणाऱ्या नद्यांवर, दाक्षिणात्य संस्कृत नि नि प्राकृत कवींचें कोण प्रेम ! तेव्हां अशा अत्यंत प्रिय मलयगिरीला सोडून,

मुलुखगिरी करावयास निघालेल्या त्या कौंडिण्य वीराला, नवीन साम्राज्य निर्माण केल्यावर, त्या मलयगिरीची विस्मृति कशी होअील ? तेव्हां त्यांनीं या नवसाम्राज्याला, आवडत्या मलयगिरीचेंच नांव देणें हें असाहजिक तर नाहींच नाहीं, परंतु, त्या देशभक्त असलेल्या महावीराला अत्यंत साहजिकच आहे. पराक्रमी युरोपिअन पुरुषांनीं ज्यावेळीं नवीन नवीन प्रदेश गेल्या सहस्त्र वर्षांत शोधून काढले त्यावेळीं आपल्या प्रिय मातृभूमींतील स्थलांची किती तरी नांवें, त्यांनीं देशप्रेमानें त्या नूतन प्रदेशांना दिलीं हें, न्यूयार्क, न्यू साऊथवेल्स न्यू झीलंड, वगैरे शेंकडों नांवावरून आढळून येअील. त्याचप्रमाणें महावीर कौण्डियानें देखील स्वदेशांतील प्रिय मलयगिरीचेंच नांव या सबंध साम्राज्याला देणें अगदीं साहजिक आहे. अितकेंच नव्हे तर, या फूनानच्या त्या वेळच्या नवोदित साम्राज्याचा अर्धा भाग आजहि ‘ मलय ’ ( मलाया ) द्वीपकल्प या नांवानेंच प्रसिद्ध आहे. तेव्हां चिनी लोक ज्या साम्राज्याला फूनानचें साम्राज्य म्हणत होते, त्याचें मूळचें नांव मलय साम्राज्य असणेंहि शक्य आहे; परंतु, हा केवळ अेक तर्क आहे—याला अैतिहासिक पुरावा अुपलब्ध नाहीं.

अशा रीतीनें महावीर कौण्डिण्यानें अि. स. च्या पहिल्या शतकांत जें साम्राज्य स्थापन केलें, तें पुढें सहाशें वर्षेपर्यंत अबाधितपणें वर वर्णन केलेल्या विस्तीर्ण प्रदेशाचें स्वामित्व अुपभोगित होतें नि हिंदुसंस्कृतीचा उत्कर्ष नि विकास करीत होतें.

दक्षिणभारतांमधून कौण्डिण्य ब्राह्मण कोणत्या मार्गानें या हिंदु चीन मध्यें गेला याचा पुरावा अुपलब्ध नाहीं. ज्यावेळीं हा महावीर या प्रदेशांत पदार्पण करता झाला, त्यावेळीं तेथें नागाची पूजा करणाऱ्या लोकांचे राज्य होतें. त्यांना कौण्डिण्य यानें जिंकून घेअून ‘ सोमा ’ या नांवाच्या एका नाग-राजकन्येशीं विवाह केला, नि तिला आपली पट्टराणी केली. याच महाराणी-च्या नांवानें ‘ फूनान ’ चा हा राजवंश ‘ सोमवंश ’ या नांवानें पुढें विख्यात झाला. यावेळी फूनानची राजधानी मेकांङ्—नदीच्या तीरावर होती. हा राजवंश आपल्या भारतीय संस्कृतीचें प्रतीक म्हणून आपल्या नांवपुढें ‘ वर्मा ’ हें अभिधान मोठ्या अभिमानानें लावीत असे. या राजघराण्यांत अनेक विख्यात नि दिग्विजयी राजे निर्माण झाले. पैकीं कांहींचीं नांवें चंद्रवर्मा, जयवर्मा, रुद्र वर्मा इत्यादि होतीं.

या पराक्रमी राजांनीं हिंदुसंस्कृतीचा विजयीध्वज, अखंड उभा ठेविला होता; इतकेंच नव्हे तर समाजरचना, राज्यघटना, धर्मप्रणाली हींहि हिंदुत्वमयच राखली होतीं. त्याचप्रमाणें या प्रतापवान् राजांनीं, त्या वेळच्या बलाढ्य नि सुसंस्कृत चिनी साम्राज्याशींहि बरोबरीचे स्नेहसंबंध राखून, अनेक वेळां चीन-मध्यें धार्मिक मंडळें पाठवून, बुद्ध नि हिंदुधर्माचा प्रसार केला. तसेंच मूळ-भारताशींहि आपले संबंध राहण्याकरतां नि टिकविण्याकरितां त्यांनी वारंवार स्नेहसंवर्धक दूतमंडळें पाठवून भारतीय राजांशीं स्नेहसंबंध स्थापित करण्याचे प्रयत्न केले होते. अशाच मंडळांपैकीं एका दूतमंडळाचें वर्णन चिनी ग्रंथां-मधून लिहून ठेविलें आहे. या चिनी ग्रंथामध्यें असें वर्णन आहे कीं, फूनानच्या सम्राटानें एक दूतमंडळ भारताला पाठविलें. तें मंडळ एक वर्षावर प्रवास केल्यानंतर एका नदीच्या मुखाजवळ येऊन पोंचलें. या नदीमधून सातहजार ' ली ' प्रवास केल्यानंतर ते भारताच्या राज्यामध्यें पोंचले. भार-तीय नांवानें या दूतमंडळाची भेट घेतली. आपल्या हिंदुधर्माची नि संस्कृतीची पताका सहस्रावधि मैल दूरवर फडकविणाऱ्या या फूनानच्या सम्राटाचा त्या भारतीय राजानें मोठा गौरव केला नि त्या मंडळाला अनेक दिवसपर्यंत आपल्या राजधानींत ठेवून त्यांचा फार सन्मान केला नि प्रेमळ पाहुणचार दिला. त्याचप्रमाणें परतभेट म्हणून फूनानच्या राजधानीस एक भारतीय दूतमंडळ संदेश नि अनेक मूल्यवान् वस्तूंच्या भेटींसह परतभेट म्हणून पाठविलें. या चिनी वृत्तांतामध्यें दुर्दैवानें या भारतीय राजाचें नि प्रांताचें नांव मात्र दिलें नाहीं. अशा रीतीनें हें ' फूनान ' हें वृहत्भारत निर्माण करणारें राजघराणें, हिंदुत्वाचा गौरव वाढवीत नि मातृदेशाशीं कृतज्ञ रहात अनेक शतकें हिंदु–चीन नि मलय द्वीपावर साम्राज्य गाजवीत होतें.

अशा रीतीनें हिंदुस्थान नि त्याची ही वैभवशाली फूनानची वसाहत यांचे संबंध मधून मधून जरी दूरावत होते, तरी पुन्हां पुन्हां नूतन धाडसी वीर भारतांतून शतशः नि सहस्रशः फूनानमध्यें जाऊन हिंदुसंस्कृतीची जीवनगंगा पुन्हां पुन्हां परीपुरीत करीत होते. याचप्रमाणें इ. स. च्या चवथ्या शतकांत पुन्हां दक्षिण हिंदुस्थानमधूनच दुसरा एक महावीर या मलयसाम्राज्यांत प्रविष्ट झाला. या महावीराचें नांवहि कौण्डियच होतें! हा योगायोग किती

विस्मयकारी आहे ! यावेळीं या मलयसाम्राज्यामध्यें ( फूनानमध्यें ) हिंदु-संस्कृतीची पकड जरा ढिली पडत चालली होती. मलय साम्राज्यांतील नि आसपासच्या पर्वतश्रेणीमधील अहिंदु अशिक्षित अर्ध रानटी जातींच्या भेसळीनें फूनानमधील हिंदुसभ्यता नि निर्भेळ हिंदुजीवन कलुषित होअूं लागलें होतें. तोंच पुन्हां अेकदां कौण्डिण्य या नांवाचाच अेक ब्राह्मण महापुरुष दक्षिण भारतांतून निघून त्यानें फूनानला प्रयाण केलें.

याच्या प्रयाणाची कथा विस्मयकारकच आहे. अेका शुभसमयीं या दुसऱ्या कौण्डिण्याला, दक्षिण भारतांमध्यें तो वसत असतां, अकस्मात साक्षात्कार झाला कीं, ' तूं फूनान ' मध्यें जा नि तेथील खालावत चाललेल्या हिंदु संस्कृतीला पुन्हां अेकदां नवें चैतन्य दे ! ' या स्फूर्तीनें कौण्डिण्याचें सर्व शरीर पुलकित झालें. त्याचें वीर बाहू स्फुरण पावले नि त्याचें धाडसी मन दिव्य महत्त्वाकांक्षेनें चेतून गेलें ! त्यासरसी त्यानें आपल्या मातृभूमीचा निरोप घेतला नि तिचेंच यश अुज्वलित करावयास तो ' फूनान'कडे प्रयाण करता झाला. फूनानच्या दक्षिण भागांत ' पनपन ' नामक स्थळीं तो प्रथम जाअून पोंचला. थोड्याच अवधींत भारताच्या या महापराक्रमी नि तेजस्वी ब्राह्मणाच्या आगमनाची शुभवार्ता सर्व फूनानभर पसरली. हतबल होत चाललेल्या हिंदुधर्मावलंबी लोकांना नवा उत्साह प्राप्त झाला, नि लाखोंच्या संख्येनें ते या महापुरुषाभोंवतीं गोळा झाले. थोड्याच अवधींत फूनानच्या हिंदुत्वहीन बनत चाललेल्या पूर्वीच्या त्या राजवंशाला दूर सारून, फूनान निवासी हिंदूंनीं या दुसऱ्या कौण्डिण्य वीराला आपला राजा निवडलें.

## दुसऱ्या कौण्डिण्याचें राजशासन.

अशा रीतीनें या मलय साम्राज्याची राजसत्ता हातीं येतांच या हिंदुत्वनिष्ठ महावीरानें पुन्हां अेकदां सर्व समाजाची हिंदुत्वाच्या अधिष्ठानावर नवी घडी बसविली. सामाजिक चालीरीति, सामाजिक व्यवस्था, सामाजिक संघटन, राज्यशासनपद्धति हीं सर्व हिंदूंच्या तत्त्वज्ञानाप्रमाणें प्रस्थापित केलीं. पुन्हां एकदां हिंदुसंस्कृतीचा विजयध्वज फूनान साम्राज्यामध्यें विशुद्ध होअून, हिंदूंचीं जयगीतें गात अपराजितवानें फडकूं लागला !

अि. स. पांचव्या शतकामधील ' फूनान' च्या अेका हिंदुसम्राटाचें नांव

११०२०



विशेष प्रामुख्यानें अितिहासामध्यें ग्रथित झालें. हा सम्राट् 'कौण्डिण्य जयवर्मा' या नांवानें प्रसिद्ध झाला. यानें अनेक लढायांतून परकीय आक्रमणांचा बीमोड केला. अि. स. ४८४ मध्यें हिंदुस्थानमधून शाक्य नागसेन या नांवाचा अेक भिक्षु या पराक्रमी राजाच्या राजसभेंत आला. त्याचें योग्य स्वागत करून 'कौण्डिण्यजयवर्म्या' नें त्याला मोठ्या समारंभानें चिनीसम्राट्कडे धर्मप्रचारार्थ पाठविला. 'शाक्यनागसेन' नें चीनला प्रयाण करून तेथील सम्राटाला 'कौण्डिण्यजयवर्म्याचें' राजपत्र अर्पण केलें. तें पत्र खालीलप्रमाणें होतें.

'शाक्यनागसेन' कांतूनमधून परत आल्यावर त्यानें दिलेल्या माहितीवरून आम्हांला असें समजलें कीं, आपल्या देशांत बौद्धधर्माचा प्रचार होत आहे. त्याचप्रमाणें पुष्कळ बुद्धभिक्षूहि हा प्रसार करीत आपल्या राज्यांत नांदत आहेत, हें अैकून आम्हाला फार आनंद झाला आहे. आपल्या सेवेकरतां मी थोर भारत देशाहून आलेल्या या भिक्षुश्रेष्ठाला आपल्या राजसभेंत पाठवींत आहें.'

कौण्डिण्यजयवर्म्यानें या श्रेष्ठ भिक्षुसांगातीं हत्तीच्या दातांचे केलेले कांहीं सुंदर स्तूप चिनी सम्राटाला राजोपहार म्हणून अर्पण करण्यास्तव पाठवून दिले होते. चिनी सम्राटानें अत्यंत हर्षभरानें या भारतीय श्रेष्ठभिक्षुचें स्वागत केले नि कौण्डिण्यजयवर्म्याला अनेक मोलवान् परतभेटी पाठविल्या.

या कौण्डिण्यजयवर्म्याचे राजवटींत फूनान साम्राज्याचें वैभव शिखराला पोंचलेले दिसतें. त्याचा विस्तार, त्याचा दरारा, त्याचें वैभव हें यावेळीं परमकोटीला पोंचलें होतें. यावेळीं 'फूनान' ची हिंदुसंस्कृती अक्षुण्णतेनें वाढीस लागली होती.

यावेळीं फूनानच्या साम्राज्यांत, 'कंबुज' 'श्याम ( सयाम )' 'मलयद्वीप' येथील हिंदुराजे नि अितर छोटे छोटे पर्वतप्रदेशाचे अधिपति समाविष्ट झाले होते नि ते सर्व सार्वभौमत्त्वाचा कारभार कौण्डिण्यजयवर्माच्या सिंहासनापुढें अर्पण करीत होते.

या राजवटींत फूनानमध्यें हिंदुधर्म नि बौद्धधर्म हे खेळीमेळीनें अेकत्र वसत नि वाढत होते. राजघराण्याचा या दोन्हीं धर्मांना सारखाच पाठिंबा मिळत होता. राज्यामध्यें सर्व ठिकाणीं महेश्वराचीं ( शंकराचीं ) शतशः देवळें

निर्माण झालीं होतीं. नि शिवपूजा तिन्ही काळ गुंफली जात होती. त्याचप्रमाणें बुद्धमंदिरें, बुद्धविहारहि ठिकठिकाणीं स्थापलेले दिसत होते.

अेका चिनी प्रवाशानें 'फूनान' मधील जनतेच्या पूजाविधिसंबंधीं खालीलप्रमाणें वर्णन केलें आहे—

'फूनान' चे लोक विविध देवांची पूजा करतात. या देवांच्या ते मूर्ति बनवितात. या देवांपैकीं कांहींना दोन हात असतात. कांहींना चार हात नि चार तोंडे असतात. चारी हातांमध्यें अेक अेक वस्तु घेतलेली असते. कांहींमध्यें पक्षी, कांहींमध्यें पशु, कांहींमध्यें सूर्य नि चंद्र असतात.'

अशा रीतीनें हिंदु देवदेवतांची स्थापना, हिंदु रीतीरिवाज, हिंदुधर्मशास्त्रें नि हिंदुसभ्यता यांची स्थापना, अि. सनाच्या पहिल्या शतकांत पहिल्या प्रतापवान् कौण्डिण्य ब्राह्मण वीरानें केल्यापासून, नि चवथ्या शतकांत दुसऱ्या प्रतापी कौण्डिण्यानें त्याला पुनरुज्जीवन दिल्यानें, 'फूनान' चें हें हिंदु-साम्राज्य पांचव्या शतकांत कौण्डिण्य जयवर्माच्या काळीं उन्नतीच्या शिखराला पोंचलें होतें.

परंतु या नंतर 'फुनान' अथवा 'मलय' साम्राज्याचा हा हिंदुराजवंश क्षीण–बळ होत चालला. सहाव्या शतकामध्यें याच फुनान साम्राज्यामधील अेक मांडलिक, कंबूजचा राजा भववर्मा याचा पराक्रमी बंधु चित्रसेन यानें या दुबळया बनलेल्या फुनानच्या नामधारी सम्राटावर आक्रमण करून त्याला पराभूत केलें. या वेळेपासून या हिंदुचीन, सयाम आणि मलायाचें सार्वभौमपद कंबूजच्या पराक्रमी हिंदुराजवंशांतील पराक्रमी राजा भववर्मा नि त्याचा पराक्रमी बंधु चित्रसेन यांनीं जिंकून घेतलें. या पुढें जवळ जवळ अेक सहस्त्र वर्षे हा राजवंश हिंदुसंस्कृतीचें माहेरघर बनून साम्राज्यपद उपभोगित होता.

त्यानंतर मात्र हें वैभवशाली हिंदुराज्य १४ व्या शतकापासून अुतरत्या अवस्थेला लागलें. तरीहि हें राज्य आज अगदींच नामशेष झालें नाहीं. तेथील राजवंश अजूनहि चालू आहे. हा राजवंश परवांपरवांपर्यंत म्हणजे अि. स. १८४६ पर्यंत संपूर्णपणें हिंदूच होता. त्यानंतर मात्र हा बुद्धधर्मी बनला. तो अद्यापहि बुद्धधर्मीच आहे. त्याचप्रमाणें या राजवंशाची खरीखुरी सत्ताहि अि. स. १८८७ मध्यें फ्रान्सच्या हातीं गेली. आज हा राजवंश सत्ता-

हीन नि तेजोहीन बनला असला तरी आपलें अस्तित्व टिकवून आहे. सत्ता ही चंचल असतें. पराक्रम लुप्त होतांच ती अन्य पराक्रमी लोकांच्या अंकित होते ! आजच पहाना ! ज्या फ्रान्सनें खि. स. १८८७ मध्यें मोठ्या तोऱ्यानें या पुराणप्रसिद्ध कम्बूजच्या ( काम्बोडियाच्या ) राजवंशापासून सत्ता हिसकून घेऊन त्यास सत्ताहीन नि तेजोहीन केलें, त्याच फ्रान्सला केवळ पन्नास वर्षांच्या आंतच पौर्वात्य जपानच्या प्रबळ साम्राज्यापुढें दीन होऊन, सत्ताहीन नि तेजोहीन होण्याची पाळी आली आहे ! आश्चर्य हें कीं, जवळ जवळ दीड हजार वर्षें कम्बुजचें हें हिंदु राज्य टिकून राहिलें आहे. ! त्यांतील प्रथमचीं हजार वर्षें तर तें वैभवानें जगलें नि नंतर आजपर्यंत आपलें अस्तित्व टिकवून धरूं शकलें आहे ! अशा त्या महाविख्यात कम्बुजच्या हिंदुसाम्राज्याचा वैभवशाली अितिहास फूनानच्या–हिंदुसाम्राज्याच्या–अितिहासापेक्षां अनेक पटीनें अधिक अुपलब्ध आहे–हिंदुहृदयाला हर्ष–पुलकित करणारा तो तेजस्वी अितिहास, आपण पुढील प्रकरणापासून अवलोकन करण्यास प्रारंभ करूं.

## कंबूज साम्राज्य

फुनान अथवा मलय साम्राज्याचा त्रोटक अितिहास गेल्या प्रकरणीं आपण पाहिला. सहाव्या शतकाच्या अंताला, याच मलय साम्राज्याचें एक मांडलीक राज्य म्हणून असलेल्या कंबुज देशाच्या चित्रसेन या नांवाच्या पराक्रमी सेनापतीनें मलय साम्राज्याच्या नामधारी नि दुबळ्या बनलेल्या अंतिमच्या सम्राटाला पराजित करून ह्या विस्तीर्ण मलय साम्राज्याचें साम्राज्यपद कंबुज देशाला प्राप्त करून दिलें, अितका वृत्तांत आपण आतांपर्यंत पाहिला. आतां हें कंबुजचें हिंदुराज्य केव्हां, कसें नि कोणी स्थापन केलें याचा अद्‌भुतरम्य अितिहास आपण पाहूं.

‘ हिंदुचीन ’ हें नांवच स्पष्टपणें दर्शवितें कीं चीनचा हा भाग अनेक

शतकेंपर्यंत हिंदूंच्या स्वाधीन झाला होता. हिंदूंची वसाहत, हिंदूंचें राज्य, हिंदूंचा धर्म नि हिंदूंची संस्कृति चीनच्या ज्या भूभागांत शतकों शतकापर्यंत बद्धमूल झाली, तो चीन म्हणजेच 'हिंदु चीन' होय. या हिंदु चीनचा अुल्लेख थेट महाभारतकालापासून आपल्या पुराणांतरी होत आला आहे. प्रत्यक्ष महाभारतांत अनेक ठिकाणीं आर्य हिंदूंच्या वसाहतींचा ज्यावेळीं निर्देश केला आहे, त्यावेळीं जवळ जवळ सर्व आशिया खंड नि मिश्र (अजिप्त) यांचाहि त्यामध्यें समावेश झालेला आढळून येईल.

अुदाहरणार्थ, महाभारतांतील सभापर्वामध्यें अिंद्राच्या पराक्रमी पुत्रानें कोणकोण लोक जिंकिले याचें वर्णन खालीलप्रमाणें आहे.

'दरदान्सह कंबोजैरजयत् पाकशासनिः'

**प्रागुत्तरां दिशं** ये च वसन्त्याश्रित्य दस्यवः ॥ १ ॥

वरील श्लोकांत 'प्रागुत्तरां दिशं' यावरून हिंदुचीन नि त्यामधील दरदस्थान नि कंबुजदेश हें स्पष्ट उल्लिखिलेलें आहे.

'The Western Origin of Chinese Civilization चा कर्ता प्रो. लाकौपेरीच्या मताप्रमाणें अि. स. च्या पूर्वी ६८० च्या सुमारास हिंदुस्थान नि चीन यांच्यामध्यें समुद्रमार्गें घनिष्ट व्यापारसंबंध प्रस्थापित झाले होते आणि या व्यापाराचे मुख्य चालक हिंदु व्यापारीच होते. या हिंदु व्यापाऱ्यांनीं सांप्रतच्या 'कियाटचाअू' आखाताजवळ अेक मोठी हिंदु वसाहत स्थापन केली नि तिला 'लांग्–गा, म्हणजे 'लंका' असें नांव दिलें. ही वसाहत पुढें कांहीं शतकांनी चिनी लोकांच्या आक्रमणामुळें अुठली; परंतु, तेथील लोक कंबुजच्या (कांबोडियाच्या) हिंदु साम्राज्याचा आश्रय घेअून त्यांमध्यें मिसळून गेले. या आणि अन्य अनेक निर्देशांवरून हिंदु–चीनचें स्वामित्व हिंदूंनीं अि. स. पूर्वींहि अनेक शतकांपासून अुपभोगलेलें आहे नि म्हणून अद्यापहि चीनचा हा भाग हिंदु नांवांनीं अंकित आहे.

अि. स. च्या पूर्वींचें कांहीं अुल्लेख वर दिले. यानंतर अि. स. च्या १ ल्या शतकापासून तर ज्याला अैतिहासिक पुरावा म्हणून निश्चितपणें गणतां येईल, त्या अैतिहासिक पुराव्यावरून कंबूजमध्यें अेका बलशाली हिंदुराज्याची प्राण-प्रतिष्ठा हिंदु लोक करीत होते, हें स्पष्ट दिसून येतें. ज्यावेळीं मलय साम्रा-

संस्थापक महाप्रतापी कौंडिण्य, मेकाङ् नदीच्या तीरावर मलयसाम्राज्याची स्थापना करीत होता, त्याच वेळीं 'श्रुतवर्मा' या नांवाचा अेक प्रतापी पुरुष कंबुजच्या अेका प्रबळ हिंदु राजवंशाची स्थापना करीत होता. तो अितिहास कथन करण्याच्या आधीं हिंदूंनीं कंबुजचा विजय कसा केला याची जी अुपलब्ध माहिती ती निवेदन करूं.

फार प्राचीन काळीं आर्यावर्तांचा अेक पराक्रमी राजा 'कंबु' यानें बहुधा पूर्व दिग्विजयाच्या महत्त्वाकांक्षेनें या प्रदेशांत पदार्पण केलें. त्यावेळीं हा प्रदेश अरण्यें आणि निर्जन भूमि यांनीं व्याप्त होता. तेथें नागाची पूजा करणाऱ्या रानटी लोकांची वसती होती. दुर्दैवाची गोष्ट अशी कीं भारतीय राजा म्हणून वर्णन केलेला हा कंबु राजा, हिंदुस्थानच्या कोणत्या प्रांतांत राज्य करीत होता हें अितिहासाला अवगत नाहीं! परंतु, या भारतीय नृपतीनें कंबुज प्रदेशावर स्वारी करून, त्या नागपूजक राजाचा पराभव केला. त्यानंतर त्या राजाच्या कन्येशीं लग्न लावून त्यानें तो सर्व प्रदेश जिंकला नि हजारों हिंदूना तेथें नेलें. त्यांच्याकरवीं त्या प्रदेशांत, रानें तोडून जलाशय निर्माण करून, अेक सुपीक प्रदेश बनविला. तेथें वसती करणारे सर्व लोक, या कंबु-राजाच्या कृपेनें नि आश्रयानें तेथें वसाहत करूं लागल्यानें, या कंबुराजास आपला मूळ पुरुष मानूं लागले नि तेव्हांपासून त्याचें नांव कंबुस्वयंभव असें पडून जो प्रदेश त्यानें आपल्या पराक्रमानें जिंकला नि आपल्या बुद्धिवैभवानें आणि कष्टानें अत्यंत सुपीक केला, त्या प्रदेशाला कृतज्ञ बुद्धीनें 'कंबुज' (कंबूनें निर्माण केलेला) हेंच नांव दिलें. त्याचप्रमाणें कंबुस्वयंभवाला आपला मूळ पुरुष मानून त्याला हिंदुस्थानामधील आपल्या मनूप्रमाणें मान देअून, कंबुजनिवासी यांनीं त्याला आपला मनूच बनविला. अशा रीतीनें 'कंबु' या नांवाच्या अेका पराक्रमी आणि विजिगीषु हिंदु राजानें कंबुजची हिंदु वसाहत स्थापन केली.

पहिल्या शतकाच्या आरंभीं कुंबजमध्यें 'श्रुतवर्मा' या नांवाचा अेक पराक्रमी राजा राज्य करीत होता. अैतिहासिक कालांतील हाच पहिला राजा होय.

येथें अेक गोष्ट अवश्य सांगितली पाहिजे कीं कुंबजचा नि हिंदु-चीनचा

अितिहास पूर्वींच्या देवळांच्या, वाड्यांच्या, शिलालेखांच्या संशोधनामुळें, विशेषत: गेल्या दहावीस वर्षांपासून मोठ्या प्रमाणांत अुपलब्ध होअूं लागला आहे. आणि या अुद्योगाला चालना देअून हें संशोधनकार्य चालविण्याच्या कामीं अिंडोचायनामधील फ्रेंच राज्यकर्त्यांचे या दृष्टीनें आभार मानणें अवश्य आहे. पुराणवस्तुसंशोधनाचें अेक स्वतंत्र खातें स्थापून, हिंदुसंस्कृतीचे पूर्वींचे अवशेष त्या खात्यानें प्रसिद्ध करून, नवीन नवीन अैतिहासिक माहिती अुजेडांत आणली. त्याचप्रमाणें पूर्वींच्या चिनी प्रवाशांच्या वर्णनावरून कंबुजचा पुष्कळसा अितिहास अुपलब्ध होतो, म्हणून त्या पुराण चिनी प्रवाशांचेहि आपल्या हिंदूंवर फार अुपकार आहेत. कारण, त्या योगानें हिंदु दिग्विजयाची अेक अुज्वल शाखा आपल्याला ज्ञात होत आहे. अिंडोचायनामधील फ्रेंच सरकारचे आभार हे अर्थात् सापेक्षच आहेत. राक्षसीवृत्तीच्या मुसलमान आक्रमकांनीं हिंदुस्थानमध्यें ज्यावेळीं स्वाऱ्या करण्यास आरंभ केला, त्या वेळीं त्या रानटी लोकांनीं शेकडों महान् ग्रंथालयें जाळून टाकलीं. नालंदाचें त्या वेळच्या सर्व जगांत श्रेष्ठ असलेलें प्रचंड ग्रंथसंग्रहालयहि माणुसकीला वंचित झालेल्या नि राक्षसीवृत्तीनें ज्ञानशत्रु बनलेल्या मुसलमानांनीं जाळून भस्म केलें ! त्यामुळें हिंदुस्थानची तर अगणित हानि झालीच झाली, परंतु अखिल जगतांतील ज्ञानभांडाराची देखील मोठी होळी पेटली ! हिंदुचीनमधील परक्या फ्रेंच राजसत्तेनें हा राक्षसी जाळपोळीचा प्रयत्न तर केला नाहींच; परंतु माणुसकीला शोभा देअील असा प्रयत्न करून हिंदुचीनची भूतकालीन दिव्य परंपरा शोधून काढण्यास अुत्तेजनच दिलें. आणि म्हणूनच त्यांचे सापेक्षत: अत्यंत आभार झाले आहेत.

पहिल्या शतकांत कंबुज देशामध्यें श्रुतवर्मा या नांवाचा अेक पराक्रमी राजा राज्य करीत होता. याच्या वंशांतील राजांना ' श्रुतवर्म मूला: ' याच नांवानें अितिहासांत ओळखलें जातें. यावेळीं कंबुजचें राज्य हें हिंदूंच्या मलयसाम्राज्याच्या अंकित होतें. नि कंबुजचा राजा श्रुतवर्मा हा आपणांस मलयसाम्राटाचा मांडलिक म्हणवित होता.

श्रुतवर्माच्या नंतर त्याच्या राजवंशांत आणखी कांहीं राजे कंबुजच्या गादीवर आरूढ झाले. परन्तु, त्यांचीं नांवें नि त्यांचीं राजकारणें अजून

अितिहासाला अुपलब्ध झालीं नाहींत. याच श्रुतवर्माच्या कुलांत श्रेष्ठवर्मा या नांवाचा आणखी अेक राजा झाल्याचा अुल्लेख सांपडतो. त्यानें कंबुजच्या राज्यामध्यें आणखी कांहीं प्रदेशांची भर टाकली. तरीहि कंबुजचें राज्य हें मलयाच्या हिंदुसाम्राज्याचेंच मांडलीक म्हणून वावरत होतें. या राजवंशामध्यें ठोकळ मानानें दोनशें वर्षेंपर्यंत कंबुजची गादी चालत होती. त्यानंतर सुमारें तिसऱ्या शतकाच्या आरंभाला कंबुजमध्यें क्रांति झाली नि रुद्रवर्मा या पराक्रमी पुरुषानें पहिला राजवंश कंबुजच्या गादीवरून पदच्युत करून आपण स्वतःच कंबुजचा राजा झाला नि आपलें अेक नवीन राजघराणें त्यानें स्थापन केलें.

नवीन अुपलब्ध झालेल्या अेका लेखात या रुद्रवर्म्याच्या पराक्रमाचें वर्णन करतांना त्यावेळच्या कवींनीं त्याचें 'त्रिविक्रम पराक्रम' असें वर्णन केलेलें आहे. त्यानें राजशासनहि अत्यंत न्यायानें केलें नि सर्व प्रजा त्यावेळीं अत्यंत सुखी नि धर्मरत होती असेंहि त्याचें वर्णन आढळतें. त्याच्या सुराज्याचें वर्णन करतांना अेक कवी म्हणतो कीं—

'यस्य सौराज्यमद्यापि दिलीपस्येव विश्रुतम्' ॥

येथें अेक गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे कीं, या ठिकाणीं कवीनें त्याच्या राज्यास 'सुराज्य' असेंच म्हटलें आहे, 'साम्राज्य' असें म्हटलें नाहीं; यावरून कंबुजचें राज्य जरी अत्यंत सुखी, संपन्न नि उन्नत होतें, तरी त्याचा विस्तार साम्राज्यांत झाला नव्हता. म्हणजेच तें राज्य अद्यापहि प्रबळ अशा फूनान अथवा मलयच्या हिंदुसाम्राज्यांतील अेक मांडलिक राज्यच होतें.

या रुद्रवर्म्याच्या कालांतच कंबुजमध्यें अनेक भारतीय ज्ञानशाखांचा विस्तार झाला नि सशास्त्र असें वैद्यक तर प्रथमच प्रसार पावलें. प्रत्यक्ष रुद्रवर्म्याच्या राजमंडळामध्यें प्रत्यक्ष अश्विनीकुमारांप्रमाणें वैद्यकशास्त्रांत निष्णात असलेले दोन विख्यात वैद्य राजाश्रित म्हणून नेमले गेले होते. त्यांचीं नांवें **ब्रह्मदत्त** नि **ब्राह्मसिंह** अशीं होतीं नि ते दोघेहि सख्खे बंधुबंधूच होते.

अशा रीतीनें 'कंबुज'चा विस्तार जसजसा वाढत होता, तसतसा तेथें हिंदुसंस्कृतीचा सर्वांगीण प्रसारहि अक्षुण्णतेनें चालला होता. यानंतर म्हणजे

सुमारें सहाव्या शतकाच्या आरंभाला कंबुजमध्यें पुन्हां अेक क्रांति झाली. रोजी रुद्रवर्म्यानंतर कांहीं कालानें कंबुजच्या राजपदावर अेक राणी बसली. तिचें नांव कंबुजराजलक्ष्मी असें होतें. तिच्या राज्यशासनकालांत अेक क्रांति झाली. ही क्रांति कां झाली वगैरेचा अितिहास अुपलब्ध नाहीं. परन्तु, या राणीच्या सेनानीपैकीं अेक प्रबळ सेनापति भववर्मा नि त्याचा पराक्रमी बंधु चित्रसेन या दोघांनीं या क्रांतीचें धुरीणत्व घेतलें होतें. त्यांनीं राणी कंबुज-राजलक्ष्मीपासून कंबुजची गादी हिरावून घेतली नि स्वतः भववर्मा हा कंबुजचा राजा झाला. ही घटना सहाव्या शतकाच्या सुमारास घडली नि येथून कंबुज राज्यामधील तिसरें राजघराणें सुरू झालें.

या राज्यक्रांतीमुळें कंबुजची कांहीं हानि झाली नाहीं. अुलट कंबुज-मधील सर्व सुप्तशक्ति जणुं जागृत झाल्या नि कंबुजच्या या क्रांतीचा पुढारी जो भववर्मा याच्या असामान्य कतृत्वानें कंबुजचें हें हिंदुराज्य अेकदम वैभवाला चढलें. भववर्म्यानें राज्य हस्तगत केल्याबरोबर कंबुजच्या आसपास जे अनेक अहिंदु अर्धशिक्षित असे पर्वतीय राजे होते नि जे वारंवार कंबुजवर हल्ले करून तेथील शांतताभंग करीत होते, त्या पर्वतीय राजांवर प्रथम स्वारी करून त्यांचें दमन केलें नि तो प्रदेश कंबुजच्या राज्यांत मिळवून घेतला.

अशा रीतीनें कंबुजचें राज्य वैभवगिरीवर झपाट्यानें चढूं लागलें. राजा भववर्मा फार पराक्रमी राजा झाला. त्याचप्रमाणें तो अत्यंत न्यायी नि धर्मशीलहि होता. तो कट्टा शिवभक्त होता. त्यानें सर्व राज्यांत अनेक शिवमंदिरें स्थापन केलीं. त्यावेळीं कंबुजचा शैवधर्माकडेच अधिक ओढा होता. तरीहि भववर्म्यानें अन्य हिंदुधर्मपंथ यांनांहि पितृवत् संरक्षण दिलें. प्रत्यक्ष राजाचेंच हें अुदार धोरण असल्यानें आपल्या दाक्षिण हिंदुस्थानमध्यें शैव वैष्णवपंथांमध्यें जसें अज्ञनमूलक निरर्थक वैर माजलें होतें, तसें कंबुजमध्यें माजलें नाहीं. हिंदुधर्मांतील अनेक पंथ सुखसमाधानानें अेकमेकांशेजारीं नांदून अखिल हिंदुधर्माचें वैभव वाढवीत होते. भववर्म्यानें या हिंदुधर्मांतील शैव-वैष्णवपंथाना अेकत्र निगडित करण्याकरतां स्वतःच शिवविष्णूची अेकत्र पूजा करण्यास आरंभ केला. त्याचें अत्यंत आवडतें असें अेक शिवमंदिर होतें. त्यामध्यें 'गंभीरेश्वर' या नांवाच्या लिंगाची प्रतिदिनी महापूजा होत असे.

भववर्म्याच्या विमल यशाचे पोवाडे अनेक कवींनीं गाअिले. त्यामध्यें त्याच्या यशाचें नि शौर्याचें वर्णन मेरुपर्वताप्रमाणें तें होतें असें केलें आहे. हा शरीरानें धिप्पाड आणि रूपानें सुंदर म्हणुन विख्यात होता.

कंबुजचें राज्य भववर्म्यानें प्रथम सुसंघटित नि बलवान् केल्यावर त्याच्या गगनचुंबि महत्त्वाकांक्षेला साम्राज्याचीं स्वप्नें पडूं लागली. अितर्के काल-पर्यंत कंबुजचें राज्य हे फूनान अथवा मलय हिंदु साम्राज्याचें एक मांडलीक होतें हें आपण पूर्वी पाहिलें आहे. परंतु, भववर्म्याच्या महत्त्वाकांक्षेला आतां हें मांडलिकत्व रुचेनासें झालें. त्यावेळीं मलयसाम्राज्यावरचे हिंदु सम्राटहि दुबळे बनले होते नि त्यांच्यामधला हिंदुत्वाचा आवेश कमी होअून ते भोंवताली पसरलेल्या अर्धरानटी लोकांशीं संमिश्र झाल्यानें, हिंदुसंस्कृतीची पकड तेथें ढिली पडत चालली होती. त्यामुळें राजा भववर्म्याला ही अुत्तम संधि अनायासें प्राप्त झाली असें वाटलें. त्यांच्या सैन्यावरचा मुख्य सेनापती त्याच्याच सारखा पराक्रमी त्याचा भाअु चित्रसेन हा होता. त्या दोघां वीर बंधूंचीं कारस्थानें होऊन, चित्रसेन हा मलय साम्राज्याच्या प्रदेशावर चालून गेला. त्यानें त्या साम्राज्याचे अेक अेक प्रांत जिंकून घेतले. नि अंतीं प्रत्यक्ष मेकाङ् नदीच्या तीरावर असलेल्या मलय साम्राज्याच्या अंतिमच्या सम्राटाचा संपूर्ण पराभव केला. दिग्वीजयी चित्रसेनानें अशा रीतीनें मलय साम्राज्य जिंकून, तेथील सम्राट् पदाच्या दैदिप्यमान मुकुटासह आपल्या विजयी सैन्यसंभाराना घेअून कंबुजमध्यें विजयी प्रवेश केला. नंतर भववर्म्यानें स्वतः सम्राटपद धारण केलें नि कंबुजचें राज्य जें अेक केवळ मांडलीक राज्य म्हणून गेलीं पांचशें वर्षे अस्तित्वांत होते, त्याला साम्राज्य पदावर अधिष्ठित केलें. कंबुजच्या आजपर्यंतच्या राजांपैकीं कुणालाहि ‘ राजाधिराज ’ ही पदवी लावली जात नव्हती. ती प्रथमच भववर्म्याला प्राप्त झाली, नि यापुढील लेखांमधून भववर्म्याला ‘ राजाधिराज ’ हीच श्रेष्ठ पदवी दिली गेली.

अशा रीतीनें कंबुजमध्यें कंबुज-राजलक्ष्मीच्या राजवटींत जी क्रांति सुरू झाली, तीमध्यें कंबुजचें जुनें नि दुबळें राजघराणें तर लुप्त झालेंच, परंतु भववर्मा नि त्याचा शूर बंधू चित्रसेन या दोघांच्या असामान्य कर्तृत्वानें कंबुजला साम्राज्यपद प्राप्त झालें.

कंबुजचें हिंदुराज्य साम्राज्यपदावर स्थापित झाल्यापासून हिंदुधर्माची नि संस्कृतीची अुन्नति कल्पनातीत वेगानें होअूं लागली. ठिकठिकाणीं शिव, विष्णु, देवी अित्यादि देवतांचीं प्रचंड नि संपन्न मंदिरें आपापल्या अुत्तुंग मंदिरावरील शोभायमान् कळसांनीं, हिंदुसंस्कृतीच्या भरभराटीचाहि कळस गांठला हें सिद्ध करीत होतीं. जिकडे तिकडे वेदांचे अध्ययन, रामायण महाभारताचे पाठ, प्रवचनें नि कीर्तनें यांनीं कंबुजच्या साम्राज्याचें वातावरण दुमदुमून गेलें. त्याच वेळीं म्हणजे सहाव्या शतकाच्या अंताला प्रबल कंबुजच्या हिंदुसाम्राज्याशेजारीं जीं मोठीं जावा, सुमात्रा, बोर्निओ वगैरेसारखीं विस्तीर्ण द्वीपें पसरलीं होतीं, तेथेंहि अशींच हिंदु राज्यें नि साम्राज्यें हिंदुसंस्कृतीचा गौरव नि तेजस्वीतता वाढवीत, हिंदु महासागराच्या अुत्तुंग लाटांशीं स्पर्धा करून हिंदुस्थानचा नि हिंदुधर्माचा कीर्तिमहासागरहि अुचंबळून सोडीत होतीं. या सर्व हिंदु राज्यांचा अितिहास क्रमाक्रमानें आपणांस पाहावयाचाच आहे. सांप्रत हिंदुमहासागरावर विस्तीर्णपणानें पसरलेल्या नि कंबुजाशीं समकालीन असलेल्या हिंदुद्वीप साम्राज्याकडे अंगुलिनिर्देश करूनच आपण कंबूजच्या हिंदुसाम्राज्याच्या पुढील स्फूर्तिप्रद अितिहासाकडे वळूं.

कंबुज सम्राट् भववर्मा पूर्वीच्या रघुराजाप्रमाणें महाप्रतापी, मह्नाविजेता राजकारणपटु, न्यायी, हिंदुधर्मप्रसारक असा लौकिक संपादून सुमारें अि. स. च्या सहाव्या शतकाच्या अंतीं मरण पावला. त्यानंतर !अि. स. ६०४ मध्यें महेंद्रवर्मा या नांवाचा राजा कंबुजच्या सिंहासनावर बसला. त्याच्या राजवटींत कंबुजमध्यें हिंदुविद्या, कला, शास्त्रें यांचा अविरत प्रसार चालू झाला. त्याचे दोन विख्यात प्रधान होते. त्यांचीं नांवें धर्मदेव नि सिंहदेव अशीं होतीं. हे दोघेहि प्रतापी योद्धे तर होतेच; परंतु, मोठे विद्याभ्यासंगी देखील होते. याहि राजवटींत शैव पंथाचा अुत्कर्ष चालू राहिला नि हिंदुसंस्कृतीचीं पाळेमुळें दूरवर सर्व कंबुज साम्राज्यांत पसरलीं.

या सम्राटानंतर नांव घेण्यासारखा राजा **अीशानवर्मा** या नांवानें विख्यात आहे. हा राजा जसा शूर तसाच कवीहि होता. त्याच्या अेका अुपलब्ध लेखामध्यें शिवस्तुतीचा खालील श्लोक सांपडला आहे.

**जयतीन्दुकला मौलिरनेक गुणविस्तरः ॥**
**स आदिरपि भूतानामनादिनिधनः शिवः ॥**

या अेकाच श्लोकावरून भारतीयांची कंबुजमध्यें जी विस्तीर्ण वसाहत झाली ती पूर्णपणें मनानें, वाचेनें आणि कृतीनें कशी हिंदुत्वमय होती हें अुत्तम रीतीनें, ‘ शितावरून भाताची परीक्षा ’ या न्यायानें दिसून येतें.

या अीशानवर्म्याच्या राजवटींत आणखी अेक विशेष गोष्ट घडली. ती म्हणजे वानप्रस्थ आश्रमाचा प्रचार फार वाढला. मोठमोठे राजकारणी लोक, व्यापारी, विद्वान्, हे आपल्या आयुष्याच्या संध्यासमयाला, हिंदुधर्म शास्त्राप्रमाणें प्रत्यक्ष व्यवहाराचा त्याग करून अुर्वरित आयुष्य, धर्माचरण करण्यांत धर्मप्रसार करण्यांत, ज्ञान,, शास्त्रें वगैरेचें अध्ययन नि अध्यापन करण्यांत अेकांत निवास निर्माण करून घालवूं लागले. अशा वानप्रस्थी जगत् कल्याणकारी लोकांकरतां अनेक आश्रम निघूं लागले नि अीशानवर्म्यानें अशा ऋषितुल्य आश्रमांना अुदार हस्तें सहाय्य केलें. या आश्रमांत नि बुद्ध भिक्षूंच्या आश्रमांत अेक मोठा भेद होता. तो येथें ध्यानांत ठेवला पाहिजे. बुद्ध देवांची शिकवण.

‘ यद्व्रजेत्–तत्प्रव्रजेत् ’ अशी कीं—

म्हणजे विरक्ति अुत्पन्न झाली कीं, त्याचक्षणीं संन्यास घ्यावा. मग देश, काल, परिस्थिति याचा कोणताहि सम्यग् विचार करण्याची आवश्यकता नाहीं. या शिकवणीमुळें अगदीं अैन तारुण्यांत आलेल्या सहस्त्रावधि कर्त्या स्त्री-पुरुषांनां समाज वंचित झाला. त्यांचें कर्तृत्व, समाजाची अिहलोकाचीं कर्तव्यें पार पाडून समाज नि राष्ट्र बलवान् करण्यास असमर्थ होअून, केवळ संन्यासी बनण्यांत व्यतीत झालें. त्यामुळें कालांतरानें हिंदुसमाजाचे अिहलोकीचे पुरुषार्थ पंगु बनत चालले नि तो समाज अकालीं शांतताप्रिय होअून, या जगांतील आसुरीवृत्तीच्या आक्रमणास प्रभावी विरोध करण्यास असमर्थ होत गेला. त्याचप्रमाणें संन्यासाचें, म्हणजेच निष्क्रियतेचें ओझें, हिंदुसमाजाच्या पाठीवर अितकें वाढत गेले कीं, त्या ओझ्याखालीं त्याच्या पाठीचा कणाच जणूं वांकून गेला !

परंतु, कंबुजसम्राट् अीशानवर्मा यानें जे आश्रम स्थापले ते हिंदुधर्माचा अत्यंत सूक्ष्म विचार करून प्रस्थापिलेल्या आश्रम धर्माप्रमाणें, ज्यांनीं अैहिक

पुरुषार्थ साधून समाजाचीं नि राष्ट्राचीं ऋणें फेडलीं आहेत, अशा कृतार्थी लोकांना वानप्रस्थ आश्रम सुसाध्य व्हावा म्हणून स्थापले रघुवंशांत वर्णन केल्याप्रमाणें–

> शैशवेऽभ्यस्तविद्यानां, यौवने विषयैषिणाम्।
> वार्धके मुनिवृत्तीनां, योगेनान्ते तनु त्यजाम्।

या अन्वयानें वार्धक्यांत जे मुनिवृत्ति स्वीकारून धर्माचरण करण्यास प्रवृत्त झाले, अशा अिहलोक कृतार्थ केलेल्या संसारी लोकांकरतांच हे आश्रम स्थापन करण्यांत आले होते. ज्याप्रमाणें रसानें रसरसलेलें भरदार अूस, चरकांत घालून त्यांच्या अंगचे सर्व गोड नी पुष्टिदायक रस काढून घेतल्यावर, त्यांचीं अुरलेलीं चिपाडें सुद्धां वायां जाअूं नयेत म्हणून तीं गुरांना खुराक म्हणून देतात नि अशा रीतीनें तो अूस सर्वस्वी उपयुक्त ठरतो, त्याचप्रमाणें हिंदुधर्मशास्त्रानेंहि या चतुराश्रमाच्या संस्थेच्या द्वारें हिंदुसमाजांतील प्रत्येक कर्तृत्ववान् व्यक्तीला, गृहस्थाश्रमाच्या चरकांत घालून त्याच्या अंगचे सर्व समाजपोषक कर्तृत्वरस काढून घेअून, त्यायोगें हिंदुसमाजपुरुष, बलवान् नि पराक्रमी राखण्याची व्यवस्था करून ठेवली होती; नि जेव्हां सर्व तारुण्य, समाजपुरुषाला कर्तृत्वरस देअून कामीं लागेल, त्यावेळीं अुरलेलें वृद्ध शरीराचें हें चिपाड देखील कामीं लागावें म्हणून, वानप्रस्थाश्रमांत, ज्ञानसेवन नि परमेश्वर चिंतन करण्याची शास्त्रकारांनीं आज्ञा दिली. जोंपर्यंत ही चतुराश्रमाची अत्यंत शास्त्रशुद्ध परंपरा स्थूलमानानें का होअीना परंतु, हिंदुसमाजामध्यें चालू होती, तोंपर्यंत तो विजिगीषु, प्रभावी नि प्रसारक्षमच राहिला. अस्तु.

अशा रीतीनें कंबुजसम्राट् अीशानवर्मा हा हिंदुधर्माप्रमाणें चतुराश्रमाचें पालन करून, कंबुजच्या हिंदुसाम्राज्याचा कीर्तिदुंदुभी सर्वभर दुमदुमवीत होता. याच्या राजवटींत अेक चिनी प्रवासी या हिंदुसाम्राज्यास भेट देअून गेला, त्या परकीय प्रवाशानें केलेल्या वर्णनावरून अीशानवर्म्याची योग्यता आपोआप ध्यानीं येअील. तो लिहितो:

‘अिशानवर्म्याची राजधानी अीशानपूर या नांवाची अेक भव्य नगरी आहे. या नगरीमध्यें अेकंदर २०,००० घरें आहेत. नगराच्या मध्यांत

अेक विशाल प्रासाद आहे. तेथें राजसभा (दरबार) भरत असतो. या राज्यांत तीन मोठीं नगरें आहेत. या प्रत्येक नगरांत राजनियुक्त अेकेक शासक राहातो. अुच्च पदाधिकारी पांच प्रकारचे आहेत. हे सर्व पदाधिकारी राजसभेंत येतांच, राजाला सन्मान देण्याकरतां, राजसिंहासनासमोर येअून त्रिवार भूमीपर्यंत लवून अभिवंदन करतात. नंतर हे सर्व राजसिंहासनाभोंवतीं गोलाकार बसतात नि राजाशीं राज्यकारभाराची चर्चा करतात.

.......या राजसभेभोंवतीं सहस्रागणिक सैनिकांचे पहारे असतात. ख्मेर लोक (कंबुजनिवासी लोकांना ख्मेर ही संज्ञा आहे.) अंगानें लहान लहान बांध्याचे आहेत. पुरुष काळया रंगाचे, परंतु, स्त्रिया गोऱ्या रंगाच्या आहेत. हें लोक कानांत छल्लें घालतात. ते फार उद्योगशील आहेत. अुजव्या हाताला हे पवित्र मानतात, नि डाव्या हाताला अपवित्र. प्रत्येकजण प्रभातकाळीं अुठून शौचमुखमार्जन करून आल्यावर स्नान करतो. नंतर धार्मिक ग्रंथाचें पठण करतात. प्रार्थनेनंतर कामधाम करून आल्यावर हे पुन्हां स्नान करतात नि मग भोजन करतात. भोजनाच्या वेळीं हे लोक लोणी, मलयी, साखर, भात नि रोटी हे पदार्थ मुख्यत्वें करून खातात.'

या वर्णनावरून मातृभूमींतलेंच हिंदुजीवन, तिच्या पराक्रमी पुत्रांनीं सागर नि महासागर ओलांडून सहस्रावधि कोस दूर जाअून वसाहती स्थापिल्या तरी, तेथेंहि कसें अभंग राखलें हें दिसून येअील; अितकेंच काय, पण अगदीं आजच्या हिंदुजीवनाचाहि सर्वसाधारण क्रम असाच आहे. सहस्रावधी वर्षांच्या जीवनकलहांत, प्राण घेणारे आघात नि अपघात सोसून, नि त्यांतून यशस्वीपणें पुन्हां बाहेर पडून हिंदुजीवनाची ही गंगा, कशी अखंड अथांग, गंभीरपणें कालाशीं क्रीडा करीत वाहात आहे, हें पाहून आनंदानें नि अभिमानानें मन भरून जातें!

या अीशानवर्म्याच्या वैभवशाली राजवटींत अनेक प्रख्यात व्यक्ति अुदय पावल्या. **अीशानदत्त** या नांवाचा अेक महामुनि याकाळीं मोठा विख्यात झाला. त्यानें अुग्र तपश्चर्या करून सर्व कंबुजनिवासीयांमध्यें मोठी साधुत्वाची ख्याति मिळविली. या मुनीनें शिवविष्णूची अेक संयुक्त मूर्ति स्थापून वर वर्णिल्याप्रमाणें अेक वानप्रस्थाश्रम स्थापन केला. **आर्यविद्यादेव** यांनीं अेक

यज्ञयाग करून आपला वार्धक्य काळ अेकांतांत घालविण्याकरतां अस'ा अेक आश्रम स्थापला. आचार्य **विद्या विनय** नांवाचा अेक महापंडित याचवेळीं अुदयाला आला. अितकेंच काय पण अीशानवर्म्याच्या प्रधानापैकीं अेक प्रधान, **सिंहवीर** हाहि अेक मोठा योद्धा नि महापंडित म्हणून विख्यात झाला. हा त्या वेळच्या कवींचा कविकुल गुरु म्हणून समजला जात असे अितका तो प्रतिभाशाली कवी होता.

अशा रीतीनें अीशानवर्म्याच्या राजवटींत कंबुजच्या हिंदुसाम्राज्यामध्यें शूर वीरांच्या तीक्ष्ण शस्त्रांनीं संरक्षित केलेलीं हिंदुशास्त्रेंहि विकास पावून, हिंदुशस्त्र आणि हिंदुशास्त्र अेकसमयावच्छेदेंकरून निर्भयपणें विलास करीत होतीं.

यानंतर अुपलब्ध झालेला कंबुजसम्राट म्हणजे पहिला जयवर्मा होय. ह्यानें खोदविलेल्या अेका लेखावरून हा अि. स. ६६५ या वर्षी राज्य करीत होता असें दिसतें. याच्या वेळीं बुद्धपंथाचाहि प्रसार कंबुजमध्यें झाला होता असें दिसतें. तरीहि हिंदुधर्मांतील शैव, वैष्णव, बौद्ध इत्यादि पंथ गुण्यागोविंदानें अेकत्र नांदत होते; नि राजाश्रयहि त्यांना समानतेनेच मिळत होता. पहिला जयवर्मा वारल्यानंतर सुमारें दीड शतकापर्यंत कंबुज साम्राज्यांत मोठी यादवी माजली नि हें प्रबळ साम्राज्य दोन गटांमध्यें विभक्त झालें. अेक राजवंश **शंभुपूर** येथें स्थापन झाला नि दुसऱ्यानें आपली राजधानी **व्याधपूर** ला स्थापिली. अि. स. ८०२ पर्यंत ही यादवी सारखी चालू होती. या वर्षी दुसरा जयवर्मा या नांवाचा अेक प्रतापी राजा अुदयाला आला नि त्यानें कंबुजसाम्राज्याचे तुकडे करणारी यादवी नष्ट करून पुन्हां कंबुजचें अेक अखंड साम्राज्य प्रस्थापित केलें. दुसऱ्या जयवर्माचें मूळ नांव महिपतिवर्मा असें होतें. याच्या आअीचें नांव नरपतींद्रदेवी असें होतें नि याच्या पित्याचें नांव राजेंद्रवर्मा असें असून तो शंभुपूरच्या गटाचा राजा होता. महिपतिवर्मानें राज्यावर बसतांना दुसरा जयवर्मा हें नांव धारण केलें.

दुसऱ्या जयवर्मानें कंबुजसाम्राज्य पुन्हां अखंड केल्यावर त्यानें पहिली राजधानी जी अीशानपूर ती बदलली, नि महेंद्रपर्वतावर एक नवी विस्तीर्ण राजधानी बनविली. या राजधानीचे अनेक अवशेष आजहि अुपलब्ध होत आहेत.

कंबूजमध्यें वर वर्णन केलेली जी यादवी सुमारें १५० वर्षे चालली होती, त्याचवेळीं कंबुजवर अेक आक्रमणेहि झालें नि कंबुजचें साम्राज्यपद कांहीं काल लुप्त होअून त्यास मांडलिक म्हणून रहावें लागलें. दुसरा जयवर्मा जेव्हां कंबुजमधील यादवीचा नाश करून कंबुजचा अेकछत्री राजा बनला, तेव्हां त्या तेजस्वी वीराला ही मांडलिकत्वाची पराधीनता असह्य झाली नि त्यानें त्या आक्रमक सत्तेविरुद्ध भीषण झगडा सुरूं केला.

ही आक्रमक सत्ता, म्हणजे ब्रह्मदेश, जावा, सुमात्रा नि मलायाअेशियांतील अितर सर्व द्वीपसमूहावर आपली नुकतीच अविच्छिन्न सत्ता स्थापन करणारें अेक हिंदुसाम्राज्यच होतें. येथील सत्ताधाऱ्यांनां '**शैलेंद्र**' असें नामाभिधान होतें. हे शैलेंद्र सातव्या शतकांत कलिंग देशांतून अेक प्रचंड नाविक सैन्य घेअून निघाले नि त्यांनीं प्रथम ब्रह्मदेश नि नंतर अल्पावधींतच जावा, सुमात्रा, बोर्निओपर्यंत आपला दिग्विजय करून अेक प्रबल साम्राज्य स्थापन केलें. यांचें नौकासैन्य त्यावेळीं समुद्रावर अजेय ठरलें होतें नि अरब चिनी सत्ता त्यांच्यापुढें नमून वागून धाकांत रहात होत्या. या शैलेंद्राच्या साम्राज्याचा तेजस्वी अितिहास पुढें आपणांस क्रमानें पहावयाचाच आहे. या शैलेंद्रांनीं ७ व्या शतकापासून तों १५ व्या शतकापर्यंत, जवळ जवळ आठ शतकें समुद्रस्वामिनीपणाचें वैभव अुपभोगिलें. याच शैलेंद्रांनीं कंबुज-साम्राज्याच्या यादवीच्या काळीं त्याच्यावर स्वारी करून कांहीं काल आपलें सार्वभौम कंबुजवर लादलें.

अशा शक्तिशाली साम्राज्याविरुद्ध दुसऱ्या जयवर्मानें कंबुजला स्वतंत्र करण्याकरतां युद्ध सुरूं केलें. त्यावेळीं या युद्धामध्यें विजय प्राप्त होण्याकरतां अेक इंद्रदेवतेला संतुष्ट करण्याकरतां यज्ञ केला. यज्ञ यथासांग पूर्ण झाल्यावर इंद्रदेवांकडून दुसऱ्या जयवर्म्याला एक दिव्य तलवार प्राप्त झाली, अशी दंतकथा आहे. त्या तलवारीनें दुसऱ्या जयवर्म्यानें, तें स्वातंत्र्ययुद्ध जिंकलें नि अि. स. ८०५ व्या बेताला कंबुजला स्वतंत्र करून, त्यांचें गत-साम्राज्य पुनरपि निर्माण केलें. द्वितीय जयवर्मा मोठा शिवभक्त होता नि तो ज्या लिंगाची प्रतिदिनीं अत्यंत भक्तिभावानें पूजा करीत असे त्या लिंगाचें नांव '**देवराज**' लिंग असें होतें.

कंबुज नि अन्य हिंदुस्थानाबाहेर पसरलेल्या वैभवशाली हिंदुवसाहतींच्या राज्यांचा पुढील अितिहास सांगण्याच्या आधीं प्रत्यक्ष भारतवर्षांत यावेळीं काय परिस्थिति होती याचें सिंहावलोन करणें, या ठिकाणीं फार बोधप्रद होअील. कारण मातृदेश पूर्ण स्वतंत्र नि वैभवशाली असला म्हणजेच त्याच्या वसाहतीं भरभराटीला येत असतात हा अैतिहासिक सिद्धांत आहे. हा सिद्धांत भारतातहि कसा अुत्तम रीतीनें लागू पडतो हें दाखविण्याकरितां खिस्तकाल-गणनेप्रमाणें मध्ययुगीन भारताच्या 'दिग्विजयी अितिहासाचे स्फूर्तिदायी सिंहावलोकन आपण पुढील प्रकरणांत करूं.

: ६ :

## मध्ययुगीन भारत. (अि. स. ६००–८००)

गेल्या प्रकरणांत हिंदूंच्या कंबूज साम्राज्याच्या भरभराटीच्या कालाच्या अितिहासाचें आपण अवलोकन केलें नि या प्रकरणांत, त्याचवेळीं (म्हणजे अि. स. ६०० पासून ८०० पर्यंतच्या कालांत) प्रत्यक्ष भरतखंडांत काय परिस्थिति होती ती विहंगमदृष्टया पाहण्याचें वाचकांना आश्वासन दिलें होतें. त्याप्रमाणें आतां या प्रकरणांत आपण या काळच्या भरतखंडाच्या अितिहासाकडे वळूं.

अि. स. च्या सहाव्या शतकाच्या अंताला, भारतवर्षावरील हूण लोकांच्या स्वाऱ्यांच्या टोळधाडी भारतांतील पराक्रमशाली राजा महाराजांनीं पार पिटाळून लावल्या होत्या नि भारतभूमि या परकीय लोकांच्या आक्रमणापासून मुक्त केली होती. माळव्याचा प्रतापवान् राजा **यशोवर्मा** आणि मगध देशाचा बलिष्ठ सम्राट् **बालादित्य** यांनीं अेकत्र होअून हूण लोकांना अनेक लढायांत पराभूत करून अुत्तर हिंदुस्थानांतून पिटाळून लावलें होतें. तरीहि हूणांच्या

कांहीं हटवादी सरदारांनीं पंजाबमध्यें पुरुषपुर (पेशावर) आणि शाकल (सियालकोट) येथें दोन राजधान्या स्थापून, त्या प्रदेशावर स्वामित्व कायम ठेवलें होतें. परंतु ठाणेश्वरचा महाप्रतापी राजा **प्रभाकरवर्धन**—सुप्रसिद्ध सम्राट हर्षवर्धनाचा पिता—यानें अि. स. ६०५ या वर्षी पंजाबवर स्वारी करून या दोन्हीं हूण राज्यांचा पाया खिळखिळा करून टाकला होता नि ते शरण येअून मांडलिकत्त्वाची याचना करीत होते. या दिग्विजयाहून प्रभाकरवर्धन परत ठाणेश्वरला येतो न येतो तोंच, त्या कपटी म्लेंच्छ राजांनीं पुन्हां अुचल केली नि ते प्रभाकरवर्धनाच्या राज्यावर पुन्हां चाल करून आले. ही वार्ता अैकतांच, प्रभाकरवर्धनाचा ज्येष्ठ पुत्र **राज्यवर्धन** हा त्यावेळीं केवळ १८–१९ वर्षें वयाचा असतांनाहि, निर्भयपणें आपल्या प्रतापवान् पित्याची विजयी सेना घेअून, त्या हूण कपटी राजांवर तुटून पडला. नि त्यांच्याशीं घोर युद्ध करून त्यांचा समूळ नाश करून टाकला. यापुढें मात्र हूण लोकांनीं पुन्हां डोकें कधींहि वर काढलें नाहीं. त्यांचा या युद्धामध्यें निःपात होअून हिंदुस्थान पुन्हां अेकदां पूर्णपणें परकीय आक्रमणापासून मुक्त होअून आपल्या अैश्वर्यानें तळपूं लागला.

अशा रीतीनें परकीय लोकांच्या आक्रमणापासून जसा हिंदुस्थान सहाव्या शतकाच्या अंताला नि सातव्या शतकाच्या आरंभीं मुक्त झाला, त्याचप्रमाणें अतिरिक्त दयाधर्माच्या नि अहिंसावादाच्या शिकवणी शिकवून, राष्ट्राला प्रतिकारशक्तिरहित नि पराक्रमशून्य करणाऱ्या बुद्ध धर्माच्या विपर्यस्त शिकवणीपासूनहि तो मुक्त होत आला होता नि विजीगिषु हिंदुधर्माचें पुनरुत्थान जिकडे तिकडे झपाट्यानें होत होतें. हूणांचा पराभव करणाऱ्या ठाणेश्वरच्या परमप्रतापी प्रभाकरवर्धनाचा लवकरच मृत्यु झाला आणि त्याचा तेजस्वी युवराज राज्यवर्धन हूणांचा विजेता होअून परत आल्यावर, लगेच माळवा नि बंगालच्या गुप्त राजांच्या कपटी कारस्थानांना बळी पडून, विषप्रयोगानें मारला गेला. त्यानंतर प्रभाकरवर्धनाचा दुसरा मुलगा जो **हर्षवर्धन** हा अि. स. ६०६ मध्यें ठाणेश्वरच्या सिंहासनावर अधिष्ठित झाला. **हर्षवर्धन** यावेळीं केवळ सोळा वर्षांचाच होता. परंतु, पुढें अठराव्या शतकांत झालेल्या माधवराव पेशव्याप्रमाणेंच हा असामान्य पराक्रमी नि तेजस्वी पुरुष निघाला.

दोघांवरहि जवळजवळ सारखाच घोर प्रसंग! बाप अकस्मात् वारलेला; पराक्रमी सेनेचा,'पराक्रमी बंधु समवेत नाश झालेला; विजयानें अुन्मत्त झालेले शत्रू या पोरसवदा नृपतीला चिरडून टाकण्यास सर्व बाजूंनीं अुठले होते. अशा विषम अवस्थेंत अठराव्या शतकांत, जसें थोरल्या माधवरावांनीं आपल्या अलौकिक प्रतापामुळें सर्व शत्रूंना चीत केलें, विश्वासघातक्यांना प्रायश्चित्त दिलें नि अेक प्रचंड साम्राज्य पुन्हां निर्माण केलें, त्याचप्रमाणें सातव्या शतकांतील अल्पवयी हर्षवर्धनानेंहि आपल्या शत्रूंचा मोड केला, विश्वासघातकी बंगालच्या गुप्त राजांना शासन करून, त्यानें आसामपासून गांधारपर्यंत दिग्विजय केला. सबंध अुत्तर हिंदुस्थान त्यावेळीं हर्षाच्या साम्राज्याखालीं आला होता. अशा रीतीनें हिंदूंच्या पराक्रमी, तेजस्वी, विजीगिषु वृत्तींचा परम अुत्कर्ष त्यावेळीं भारतवर्षांत होत होता. हर्ष सम्राटानेंहि दिग्विजय केल्यानंतर अशोक सम्राटाप्रमाणें बुद्धिमताचा स्वीकार केला. परंतु, हिंदुधर्माच्या शिकवणुकीप्रमाणें गृहस्थाश्रमांतील चारी पुरुषार्थ पूर्णपणें साधून, निर्वैरमूर्वीतल करून, मग त्यानें बुद्धमताप्रमाणें दया धर्माचा प्रसार केला—असो.

अुत्तर हिंदुस्थानमध्यें ज्यावेळीं हर्षवर्धन आपल्या पराक्रमानें लाखों सेनांसमवेत अेक विस्तीर्ण साम्राज्य निर्माण करीत होता, त्याचवेळीं दक्षिण हिंदुस्थानमध्येंहि महाराष्ट्रीय चालुक्य कुळांतील **दुसरा पुलकेशी** यानें नर्मदेपासून सेतुरामेश्वरापर्यंत आपलें अेक प्रबळ साम्राज्य निर्माण केलें. हा महापराक्रमी राजा अि. स. ६१० मध्यें गादीवर बसला. त्यावेळीं या चालुक्यांची राजधानी बादामी नगराला होती. पुलकेशीनें गुर्जर व मालव (माळवा) हींहि राज्यें आपल्या साम्राज्य छत्राखालीं आणलीं. अशा रीतीनें त्यावेळीं भरतखंडांत अेकाच वेळीं दोन प्रबळ साम्राज्यें शौर्य आणि अैश्वर्य यांमध्यें अेकमेकांची स्पर्धा करीत होतीं. हर्षवर्धनानें दक्षिण विजयाचा प्रयत्न केला; परंतु, पुलकेशीनें हर्षाचा पराभव करून आपलें साम्राज्य अपराजित ठेवलें. यावेळीं सबंध हिंदुस्थानमध्यें वीरवृत्तीला सारखी भरती येत होती नि धैर्य, धाडस पराक्रम या योगानें सर्व हिंदु लोक प्रबळ बनले होते. त्यांच्या सम्राटांचीं आणि राजे महाराजांचीं सैन्यें लक्षांनीं मोजण्यासारखी प्रचंड होतीं. शिल्पकला, गायनकला, चित्रकला, अित्यादि सर्व राष्ट्रजीवनाला भव्यता, अुदारता देणाऱ्या

कला, नि सर्व शास्त्रें यांचा सर्वत्र प्रकर्ष होत होता. धरणी शस्यशालिनी होती, प्रजा सदाचारी, संपन्न धाडसी नि तेजस्वी होती. सैन्यें शत्रुदमनांत निरलस होतीं, नि त्यांचीं शस्त्रें तीक्ष्ण असून विजयान्वित होतीं. यावेळीं हिंदुलोकांच्या व्यापाऱ्यांच्या सहस्त्रावधि नौका थेट चीनच्या पीतसमुद्रापासून, हिंदुमहासागर व्यापून, पश्चिम समुद्राला ( अरबीसमुद्राला ) तर क्रीडा सरोवर बनवून, थेट भूमध्य समुद्रापर्यंत नि आफ्रिकाखंडाच्या पूर्व समुद्रतीरावरून प्रचंड व्यापाराचा प्रपंच यशस्वीपणें करून, या हिंदुस्थानला अक्षरशः सुवर्णभूमि करून सोडीत होत्या. ही वास्तवस्थिति परकीय, अरब, चिनी आदि प्रवाशांच्याहि लेखांवरून सिद्ध होत आहे.

ज्या ऐतिहासिक कालाचें सिंहावलोकन आपण करीत आहोंत, त्याच कालांत सुविख्यात चिनी प्रवासी **हुअेनत्संग** यानेंहि त्या वेळच्या वैभवशाली हिंदुस्थानचें मुक्तकंठानें पोवाडे गायिले आहेत. त्याचप्रमाणें अरब यात्रेकरूं-पैकीं विख्यात यात्रेकरू '**बैरूनि**' हा हिंदुस्थानमध्यें चाळीस वर्षें राहिला नि संस्कृत भाषा शिकून अनेक शास्त्रांचें अध्ययन करून परत स्वदेशीं गेल्यावर त्यानें 'किताबुल हिंद' आदि ग्रंथ लिहून त्यावेळच्या तेजस्वी पराक्रम-शाली नि वैभवसंपन्न भारताचें मुक्तकंठानें गान गाअिलें.

या स्वदेशांतील वैभवाच्या भरतीनें, याचवेळीं भारतांमधून सहस्त्रावधी धाडसी, शूर नि विजिगिषु हिंदु परदेशांमधून जाअूं लागले नि त्यांपैकीं पराक्रमशाली लोकांनीं अनेक देश नि द्वीपें जिंकून घेवून तेथें हिंदु राज्यें नि साम्राज्यें स्थापन करून, त्यावेळच्या ज्ञात जगाच्या आदरास पात्र झालेलें अेक विस्तीर्ण बृहत्भारत निर्माण केलें. याचवेळीं, सातव्या शतकांत कलिंग प्रांतामध्यें, सम्राट दुसऱ्या पुलकेशीनें आपला अेक भाऊ विष्णुवर्धन यांस राजा केलें. या राजघराण्यास प्राच्य चालुक्य वंश असें म्हणतात. या चालुक्यांच्या काळांत कलिंगाचा भारला अुत्कर्ष होत गेला नि तेथील लोकांनीं नौकानयनामध्यें विशेष प्राविण्य नि कीर्ति संपादन केली. हें चालुक्य कुळ महाराष्ट्रीयच होतें. हें मागें दिग्दर्शित केलेंच आहे. या पूर्व चालुक्यांच्या काळीं ७ व्या शतकामध्यें कलिंग हिंदूंचीं अेक टोळी ब्रह्मदेशामध्यें

वसाहतीला गेली नि तेथें वैभवाला चढून सबंध ब्रह्मदेश त्यांनीं जिंकून घेतला; अितकेंच नव्हे तर आठव्या शतकांत या कलिंग हिंदूंनीं, मलयद्वीप, सुमात्रा, जावा, नि त्यांच्या आसपासचीं शेंकडों बेटें जिंकून तेथें अेक प्रबळ असें साम्राज्य स्थापून त्यास आपल्या प्रिय कलिंगाचेंच नांव दिलें. याच कलिंगाच्या वंशजांना पुढें 'शैलेंद्र' हें नामाभिधान प्राप्त झालें. नि त्यांच्या प्रचंड नाविक दलाच्या बलावर १४ व्या शतकापर्यंत हें शैलेंद्रांचें साम्राज्य सर्व मलयाशियावर गाजत राहिलें. आराकान ब्रह्मदेशामध्यें या चौल राजांचीं नाणींहि अुपलब्ध झालीं आहेत.

सातव्या नि आठव्या शतकांत हिंदुस्थानमध्यें साम्राज्य संस्थापकांची नि दिग्विजयी राजांची परंपरा अखंड राहिली. ७ व्या शतकांत हर्षवर्धन नि दुसरा पुलकेशी या सम्राटांची नांवें गाजत होतीं. तीं धन्य नांवें इतिहासांतर्गत होतात न होतात तोंच, अि. स. ७०० च्या बेताला म्हणजे आठव्या शतकाच्या प्रारंभींच काश्मीरच्या महाप्रतापी कर्कोटक वंशांतील दिग्विजयी राजा **मुक्तापीड हा ललितादित्य** हें अभिधान धारण करून काश्मीरच्या गादीवर आरूढ झाला. त्याची महत्त्वाकांक्षा हर्ष नि पुलकेशी यांच्याहूनही मोठी होती. त्यानें सर्व हिंदुस्थान तर आपल्या साम्राज्यछत्राखालीं आणलेंच, परंतु, अुत्तर दिशेकडे आपला विजयाश्व सोडून हिंदुस्थानच्या बाहेरचे देशहि त्यानें पादाक्रांत केले. पूर्वेस दरदस्थान नि तिबेट हे देश त्यानें विशेष आयास न पडतांच जिंकून घेतले. यानंतर त्याचा विजयाश्व, पामीर पठाराकडे चालू झाला. समरकंद वगैरे ठिकाणचे अमीर जिंकून, अंतीं ललितादित्य थेट तुर्कस्थानच्या सीमेवर आपल्या विजयी सेनेसह जाअून धडकला. त्यावेळीं तेथें **मुम्मुनि** म्हणून काश्मीरच्या कागदोपत्रीं वर्णिलेला बादशहा **मुमेनखान** हा राज्य करीत होता. त्याच्या कडव्या तुर्की सैन्याशीं अनेक लढाया झाल्या. त्यांतील तीन मोठ्यामोठ्या लढायांमध्यें ललितादित्यानें त्याचा पुरा पराभव केल्यावर, त्यानें ललितादित्याचें मांडलिकत्व मान्य केलें. त्यानंतर ललितादित्य थेट गोबीच्या वाळवंटापर्यंत सबंध मध्य अेशिया पादाक्रांत करीत चीनच्या साम्राज्याला जाअून भिडला. अशा रीतीनें काश्मीरच्या ह्या विश्व-

विजयी ललितादित्यानें भारतीय सैनिकांना भारताबाहेर नेअून त्यावेळच्या प्रबळ असलेल्या सर्व अिराणी, दुराणी, तुर्की, मुसलमान राजांना जिंकून भारतीय सम्राटांच्या विजयमालिकेंत अुच्चांक पटकविला. प्रत्यक्ष चीनच्या प्रबळ सम्राटानें, या प्रतापवान् ललितादित्याशीं मैत्रीचा संधि करून त्याला ' राजा ' ही समतादर्शकत्वाची पदवी मुद्दाम अेक थोर अधिकाऱ्याचें शिष्टमंडळ काश्मीरला पाठवून अर्पण केली.

ललितादित्य केवळ समरपंडित होता असेंच नाहीं, तर तो अत्यंत न्यायी नि विद्वान राजा झाला. त्याच्या विश्वविजयानें काश्मीरच्या राज्यांत अलोट संपत्ति जमा झाली. तिचा त्यानें प्रजाहिताकडेच अुपयोग केला. ' भूतेश ' नामक अेका अत्यंत सुंदर नि भव्य शिवमंदिराकरतांच त्यानें ११ कोट रुपये व्यय केला. त्याचप्रमाणें सबंध राज्यामध्यें कालवे काढून, अन्नपूर्णागृहें स्थापून, विहिरी खणून, शिक्षणदानाची व्यवस्था करून, तृषितासाठीं पाणपोया मार्गामार्गाला काढून त्यानें प्रत्यक्ष रामराज्य निर्माण केलें. स्वराज्यांत तर त्यानें प्रजेला नितांत सुखी केलेंच; परंतु, तुर्कस्थान नि मध्यअेशियामधील वाळवंटाच्या प्रदेशामधूनहि त्यानें ठिकठिकाणीं विहिरी खोदवून, अन्नगृहें, पाणपोया वगैरे काढून तेथील जित लोकांनाहि सुखी केलें. त्यांपैकीं कित्येक विहिरी नि झरे अजूनहि त्याच्या सहृदतेचें पान तेथें तृषितांस करीत वाहत आहेत ! हा महान् विजेता सम्राट ललितादित्य अि. स. ७३५ च्या चेताला स्वर्गवासी झाला.

याचा नातू जयापीड हाहि आपल्या आजोबाप्रमाणेंच प्रतापवान् निघाला, नि त्यांनींहि तसाच चारी दिशांचा पुन्हा अेकदां विजय केला. हा समरपंडित तसाच शास्त्रपंडितहि होता. भारतामध्यें त्यावेळीं अशा रघुकुलतुल्य राजांची जवळ अत्रुटित अशी मालिकाच अि. स. च्या १०–११ व्या शतकापर्यंत लागली होती.

याप्रमाणें अुत्तर हिंदुस्थानमध्यें कनोज काश्मीर वगैरे साम्राज्यांची भरभराट होत असतांना, दक्षिणेंतहि अशाच विजयी सम्राटांची मालिका लागली होती. बादामीचे महाराष्ट्रीय चालुक्य राजकुल हे अत्यंत प्रतापी

म्हणून गाजले. त्यांतील महत्तम सम्राट दुसरा पुलकेशी यांचें अल्प वर्णन मागें आलेंच आहे. याच कुलांत विक्रमादित्य, विजयादित्य, इत्यादि पराक्रमी राजे निर्माण झाले. खालीं दक्षिणेंत कांचीचें प्रबळ राज्य तुंगभद्रेच्या दक्षिण-तीरापासून समुद्रापर्यंत विस्तारलेलें होतें. या ठिकाणीं **पल्लव** या नांवाचें राजकुल अनेक शतकें अेक प्रबळ राज्य चालवीत होते. हें पल्लवकुलहि महाराष्ट्रीय आर्यांचें होते. मराठ्यांमधील **पालवे** हें आडनांव पल्लवाचेंच प्राकृत रूप आहे. हें अितिहासाचार्य चिंतामणराव वैद्यांनीं सिद्ध केलें आहे.

याप्रमाणें दक्षिण हिंदुस्थानांत **चालुक्य** नि कांचीचे **पल्लव** हीं दोन पराक्रमी महाराष्ट्रीय राजघराणीं प्रमुख होतीं. पूर्व समुद्रतीराला लागूनच कलिंग, वेंगी, येथील पूर्व चालुक्य राजकुल नि ओढ्याचें ' केसरी ' राजकुल हींहिं अशींच पराक्रमी नि प्रजाहितदक्ष राजघराणी त्यावेळीं हिंदुधर्म नि हिंदुसंस्कृतीचें वैभव वाढवीत होतीं; अितकेंच नव्हे, तर परदेशांतहि अनेक वसाहती स्थापून राज्यें निर्माण करीत होतीं. ओढ्या प्रांतांत हिंदूंचें स्थापत्यशास्त्र तर परम अुत्कर्षाला पोंचलें होतें. हें ओढ्याचें बहुतेक सर्व राजे शिवभक्त होते. नि त्यांनीं प्रचंड मंदिरें, तलाव, राजभवनें निर्माण करून सबंध ओढाप्रांत अेक भव्य कलामंदिरच करून सोडला ! महानदीच्या मुखावर **कटक** हें नगर याच राजघराण्यांतील रणवीर या राजानें वसविलें. तेंच कटक आजहि त्या प्रांताची राजधानीच आहे जगन्नाथपुरींत यात्रेकरूंना आजहि नेअून सोडणारा प्रचंड पूल, याच 'केसरी' घराण्यांतील अेका राजानें बांधला.

याप्रमाणें अुत्तर, दक्षिण हिंदुस्थानमध्यें पराक्रमशाली नि विद्याकला संवर्धक गुणी राजांची परंपरा लागली होती; त्याचप्रमाणें पूर्वेस बंगालमध्येंहि गुप्त राजघराणें अत्यंत प्रबळपणें नांदत होतें. यावेळीं याच बंगाल मधील **ताम्रलिप्ति**—म्हणजे आजचें मिदनापूर—हें फार प्रसिद्ध बंदर होतें नि येथें सर्व पूर्व दिशेचा, जपान चीनपासूनचा प्रचंड व्यापार चालत होता.

याच्या पलीकडील हिंदुस्थानच्या पूर्व भागांत महाभारतकालांतील

७९०.२०



प्रबळ भगदत्तापासून चालत आलेला राजवंश अविच्छिन्नपणें आसाममध्यें संपन्न असें राज्य चालवीत होता.

या व्यतिरिक्त, दक्षिण हिंदुस्थानमध्यें सागर तीरावरील पांड्य आणि चोल हीं राज्येंहि फार प्राचीन कालापासून चालत होतीं. या दोन्हीं राज्यांचा विशेष म्हणजे, येथून प्राचीन कालापासून धाडसी हिंदूंच्या वसाहती पश्चिम पूर्व महासागरावर वसाहतीस जात होत्या. याच पांड्य राज्यांतील नौकानयनपटु पराक्रमी लोकांनीं, प्राचीन काळीं मिसर ( अजिप्त ) देशांत प्रथम वसाहत केली. याचा अुल्लेख मागें अेका प्रकरणांत आलाच आहे. दुसरें चोल देशाचें राज्य, हें हिंदूंच्या नौकादलाचें माहेरघरच बनलें होतें. यामध्यें अुत्पन्न झालेल्या महाराज **राजेंद्र चोलानें** तर, आपल्या नौकादलाच्या बलावर बंगालचा अुपसागर हें क्रीडा सरोवर बनवून, पूर्वेस जपान बोर्निओपर्यंत आपलें विजयी नौकादळ नेअून अेक प्रचंड साम्राज्य निर्माण केलें. नि तेथील वर उल्लेखिलेल्या प्रबळ शैलेंद्रांनाहि जवळजवळ अर्धशतकपर्यंत हादरून सोडून, हिंदुमहासागराचें अविच्छिन्न स्वामित्व अुपभोगिलें !

अशा रीतीनें ख्रिस्त शक गणनेप्रमाणें असलेल्या या मध्य युगामध्यें, अखिल भारत हें अखंडपणें पूर्ण स्वतंत्र असून, पराक्रम, धाडस, विद्या, कला इत्यादि क्षेत्रांत पूर्ण वैभवसंपन्न होतें नि त्या वेळच्या जगांतील सर्व देशांत नि राष्ट्रांत मूर्धस्थानी विलसत होतें. हिंदुधर्म, हिंदु संस्कृति, हिंदुराज्य, नि हिंदु साम्राज्य, त्या वेळच्या ज्ञात जगामध्यें जवळजवळ अर्ध्या अधिक भागावर पसरलेलें होतें. व्यापार भरभराटलेला होता. संपत्तीचे कुबेर घरच येथें वसत होते. सर्व शेतें धान्यांनीं फुलून गेलीं होतीं. सर्व गृहें वीर पुरुषांनीं अलंकृत झालीं होतीं. हिंदुस्थानचीं शस्त्रें अपराजित होतीं. हिंदुस्थानचीं शास्त्रें सर्व जग शिकत होतें. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे त्या वेळचा हिंदुस्थान हा स्वातंत्र्यानें, अभिमानानें, वैभवानें, राजैश्वर्यानें नि अतुल पराक्रमशालित्वानें प्रत्यक्ष हिमालयाअितकाच सर्व जगतांत अुन्नत होता !

आणि म्हणूनच, याचवेळीं हिंदुधर्माच्या नि संस्कृतीच्या विकासाला बृहत्‌भारतहि जणुं अपुरें वाटूं लागलें होतें. मायदेश संपन्न, स्वतंत्र, स्वराज्य-

शासित असल्यामुळेंच, त्यांतील वीर संतानांना परदेशीं राज्यें नि साम्राज्यें स्थापतां आलीं. हिंदु संस्कृतीचा विजयी ध्वज सर्व जगभर फडकवितां आला. हिंदुस्थानाबाहेर झालेल्या हिंदूंच्या वसाहतींच्या राज्यांना हिंदुस्थानमधून जोंपर्यंत अखंड नवजीवन मिळत होतें, नवीन सैनिक, नवीन शास्त्रवेत्ते, नवीन कलामिश्र हे जोंपर्यंत अखंडपणें परदेशांतील हिंदु वसाहतींत शेकड्यानीं जात होते, तोंपर्यंत हिंदूंची वसाहत, साम्राज्यें भरभराटींत होतीं. परंतु, जेव्हां हिंदुस्थानवरच रानटी मुसलमान टोळयांचे हल्ले, ११ व्या १२ व्या शतकापासून सुरू झाले नि हिंदु लोकांना स्वदेशांतच ज्यावेळीं प्राणपणाचा झगडा सुरू करावा लागला, तेव्हां या बाहेरच्या वसाहतींहि हळूहळू दुबळया होत जाऊन, अंतीं अेकाद्या झाडावरील शुष्क झालेल्या पानांप्रमाणें परकीय आक्रमणाच्या सोसाट्याच्या वाऱ्यापुढें गळून पडत चालल्या. आणि तरीहि ह्या शूर हिंदु वसाहतीनीं कित्येक शतकें अेकाकीपणें या आक्रमणाला मोठ्या धैर्यानें नि चिकाटीनें तोंड दिलें, त्याचा अितिहास आपणांस पुढें पहावयाचाच आहे.

या प्रकरणांत आपल्या मातृभूमीची या मध्य युगामध्यें कशी भरभराटीची अवस्था होती हें विहंगमदृष्ट्या पाहिल्यावर आतां पुढील प्रकरणापासून मध्येंच सोडलेल्या कंबुजच्या हिंदुसाम्राज्याच्या स्फूर्तिदायक अितिहासाकडे आपण वळूं.

## : ७ :

## कंबूज साम्राज्य

५ व्या प्रकरणांत आपण दुसऱ्या जयवर्म्यानें कंबुजला शैलेंद्रांच्या आक्रमणापासून महापराक्रमानें मुक्त करून पुनरपि हिंदुचीनचें अधिराज्य

कसें प्रस्थापित केलें हें पाहिलें. त्याच्या मरणसमयाला कंबुज हें अेक शक्तीशाली, वैभवसंपन्न नि सुखी असें साम्राज्य बनलें होतें. हा काळ सुमारें अि. स. ८१०–१५ च्या जवळपासचा होता.

यानंतर अि. स. ८७७ मध्यें प्रथम अिंद्रवर्मा हा ह्या वैभवसंपन्न साम्राज्याचा अेक विख्यात राजा झाला. कंबुज साम्राज्याची प्रजा याला किती थोर मानीत, याची कल्पना अेका राजकवीनें केलेल्या नि नवीनच अुपलब्ध झालेल्या अेका काव्यांतील खालील कांहीं श्लोकावरून येअील.—

> त्यागक्षमाश्रुत–पराक्रम–शील–शौर्य–।
> प्रागल्भ्य सत्ववल बुद्धि गुणोपपन्नः ।
> षाड्गुण्य वित्त्रिविधशक्तियुतो जितात्मा ॥
> योगाना जुगोंपमनुवत् सुनयान्यज्ञः ॥ १ ॥

स्थळ प्रत

यावरून हा पहिला अिंद्रवर्मा कंबुज साम्राज्यांत प्रत्यक्ष मनुप्रमाणें मानला जात होता हें दिसून अेअील. त्याचप्रमाणें हेंहि दिसून अेअील कीं, त्यावेळच्या हिंदूंनीं सर्व ज्ञात जगावर ज्या वसाहती केल्या नि विशेषतः आपलीं राज्यें स्थापलीं, तेथें तेथें संस्कृत भाषेचाहि गौरव वाढविला नि सर्व प्रगल्भ ग्रंथ त्याच भाषेंत लिहिण्याची प्रथा कायम ठेअून, हिंदुस्थानच्या मायभूमींतील स्वसंस्कृतीशीं आपले संबंध अक्षुण्ण ठेविले. सांप्रतच्या काळांत अिंग्लिश लोकांनीं ज्याप्रमाणें आपलें साम्राज्य जगभर पसरवून आपल्या मातृभाषेचा—अिंग्लिश भाषेचा–जसा गौरव वाढवून, तिला जगन्मान्यता मिळवून दिली, त्याचप्रमाणें, आपल्या शूर पूर्वजांनींहि भारतीय साम्राज्य त्यावेळच्या जगावर गाजवून संस्कृत भाषेला जगन्मान्य भाषा केली.

या राजानें प्रजेला अभूप सुख दिलें. सर्व प्रजा सुखी, संपन्न, कर्तव्यरत बनली. अनेक शिव, देवी, अिंद्र अित्यादि हिंदु देव देवतांचीं प्रचंड मंदिरें निर्माण करून, नि त्यांना सोन्यारत्नानी मढवून, कंबुज देशाला त्यांनीं अिंद्रपुरीची शोभा आणून दिली. अेका शिवमूर्तीला तर हिन्यांनीं खचलेलें अेक विमान अर्पण करून शिवभक्तीची विमल पताका फडकाविली. त्याच-

प्रमाणें आपल्या नांवाचें 'अिंद्राश्रम' स्थापून संन्यासी, वानप्रस्थ, विद्वान, नि संतमहंतांकरतां आश्रम निर्माण केलें.

याची राजवट केवळ १० वर्षांचीच झाली. अि. स. ८८७ मध्यें यशोवर्मा सिंहासनावर आला. हाहि सम्राट आपल्या पित्याप्रमाणेंच पराक्रमी, धर्मपरायण, महान् दाता निघाला. याच्यावेळीं संस्कृत वाङ्मयाची फार भरभराट झाली नि अनेक शास्त्रीय ग्रंथ नि काव्यें निर्माण केलीं गेलीं. अेका कवीनें याचें वर्णन करतांनां म्हटलें आहे कीं, 'हा अर्जुनाप्रमाणें वीर, भीमाप्रमाणें बलाढ्य, नि कर्णाप्रमाणें अुदार होता, हा अेक अुत्तम वैद्यविद्याप्रवीण होता. सुश्रुतावर त्याचा अधिकार सर्वमान्य होता. त्यानें आपल्या साम्राज्यांत अनेक रुग्णालयें (Hospitals) काढून, आपल्या प्रजेचें आरोग्यसंवर्धन केलें होतें. तो शिल्प, भाषा आणि नृत्य यांच्यामध्यें प्रवीण होता. चार आश्रम व्यवस्थेची यानें फार आस्थेनें जोपासना केली होती, नि त्यावेळीं त्याच्या राज्यांत त्यानें शंभरावर वानप्रस्थाश्रम बांधले होते. या महाप्रतापी नि विद्वान राजानें हिंदुधर्माचा फार दूरवर प्रसार केला नि यशोधनपूर, महानगर, अथवा 'कंबुपुर' या नांवानें प्रसिद्ध असलेलें अेक विस्तीर्ण नगर स्वतः त्याची योजना करून वसविलें नि तें नगर आपली राजधानी बनविली. यशोवर्मा शैव होता. तथापि तो परमतसहिष्णु होता. त्याचा मुख्य मंत्री सत्याश्रय हा वैष्णव होता. अि. स. ९१० व्या वर्षी हा महान् प्रतापी, विद्वान, नि वैभवशाली राजा दिवंगत झाला. याच्या मरणाचा वृत्तांत अत्यंत शोकजनकच आहे. यशोवर्म्याला पुढें अंगावर कोड अुठला. जेव्हां तो रोग असह्य झाला, तेव्हां त्यानें अेका झोंपडींत निवास केला नि तेथेंच मरेपर्यंत राहिला. ही त्याची छोटी झोपडीची जागा, कंबुज निवासी अजूनहि प्रेमानें दाखवितात!

हा महापराक्रमी राजा, मोठा विख्यात शिल्पज्ञहि होता हें वर सांगितलेंच आहे. परन्तु, त्याची शिल्पकला किती अुच्च प्रतीची नि आधुनिक शिल्पकलेसहि कशी मोह पाडणारी होती, यासंबंधींचें वर्णन अेका चिनी प्रवाशानें केलें आहे, तें जरा विस्तारानें देण्याचा मोह आम्हाला आवरत

नाहीं. वाचकानांहि त्या भव्य शिल्पकृतींचें वर्णन वाचून आनंद नि अभिमान वाटल्यावांचून रहाणार नाहीं असा विश्वास आहे. या चिनी प्रवाशाचें नांव ‘शिओता–कान’ असें आहे नि तो चीनच्या सम्राटाचा जो राजदूत कंबुज सम्राटाच्या राजसभेंत राहात असे, त्याच्यासांगातीं कंबुजला आला होता. यशोवर्म्यानें यशोधनपूर या नांवाची जी अेक नवीन राजधानी बसविली होती म्हणून वर सांगितलें, त्या राजधानीचें साग्र वर्णन या चिनी-प्रवाशानें चीनमध्यें परत गेल्यावर, आपल्या प्रवासवर्णनांत लिहिलें आहे. तें संक्षेपानें आम्हीं पुढें देत आहोंत.––

‘या नगराच्या चारी बाजूंनां ३३ फूट रुंद असा खंदक आहे नि त्याचें रक्षण करण्याकरतां चुन्याची अुंच भिंत अुभारली आहे. नगराची वेस भव्य नि सुंदर आहे. याच्या दोन्हीं बाजूंनां पहारेकऱ्यांचीं घरें आहेत. नगर-द्वाराचे बुरुज तीन हत्तीच्या विशाल पाठीवर अुभारले आहेत. शंभर फूट रुंद नि अेक मैल लांब असे पांच मार्ग या नगरद्वारापासून नगराच्या मध्यापर्यंत गेले आहेत. संगमरवरी दगडांनीं निरनिराळ्या आकृति धारण केलेलीं कित्येक स्फटिकधवल सरोवरें आजहि अुपलब्ध आहेत.

नगराच्या मध्यभागीं ‘बैयन’ या नांवानें ओळखलें जाणारें शिवमंदिर आहे. याचें संस्कृत नांव ‘ब्रह्मपतन’ आहे. हें शिवमंदिर सर्व राजधानींमध्यें सर्वांत श्रेष्ठ असें भवन आहे. त्याचा आकार मनोऱ्यासारखा आहे. अशा तीन मनोऱ्यांनीं हें युक्त आहे. मधला मनोरा पुष्कळच पडलेल्या अवस्थेंत आहे. परंतु, अद्याप अुभा आहे. त्याची अुंची १५० फूट आहे. या मनोऱ्यावरून दुसरे चाळीस मनोरे दृष्टीस पडतात. प्रत्येक मनोऱ्याच्या चारी बाजूला अेकेक मनुष्याकृति अत्यंत श्रेष्ठ कलाकृतीची बनविलेली आहे. ह्या मूर्ती समाधिस्त शिवाच्या आहेत. या मूर्तींच्या मस्तकावर शंकराचा तृतीय नेत्र दाखविला आहे. “शिओताकान” हा चिनी प्रवासी ज्यावेळीं कंबुजमध्यें होता, त्यावेळीं शंकराच्या जटा सोन्यानी मढविलेल्या होत्या. मनोऱ्याच्या खालचें मंदिर आज पडून गेलेलें आहे. तरीहि त्यांतील नितांतसुंदर कलाकृति आजहि चित्त आकर्षून घेत आहेत. या मंदिराच्या अत्यंत दुर्गम स्थानांवर सुद्धां सुंदर कारागिरी केलेली आहे. भिंतीभिंतीवर पुराणांतील निरनिराळ्या

कथांची चित्रें चित्रित केलेलीं आहेत. त्याचप्रमाणें अनेक योद्धे हातांत धनुष्य घेअून हत्तीवर स्वार झालेले दाखविले आहेत. सामान्य शिपाअी लोक हातांत, ढाल, भाले अित्यादी शस्त्रास्त्रें घेतलेले दाखविले आहेत. कुठें कुठें यज्ञोपवित-धारी ब्राह्मण, निबिड वृक्षछायेखालीं आराम करीत आहेत. कुठें मल्लयुद्धाचे देखावे, कुठें वीणेवर गाणारी गायक मंडळी, कुठें रत्नांचे हार घातलेले राजे, अशीं अनेक दृष्यें आहेत. कुठें पालखीमध्यें बसून राण्या प्रवासाला निघाल्या आहेत. कुठें बैल रथ ओढीत आहेत, कुठें कोळी लोक जलाशयामध्यें मासे पकडीत आहेत, कुठें समुद्रांत नौकायुद्धाचें चित्र चितारलें आहे, कुठें हत्तीवर परदेशांतून लुटून आणलेली संपदा दाखविलेली आहे; आणि कुठें शंकर आपल्या तृतीय नेत्रांतील अग्नीनें कामदेवाला भस्म करीत आहे असें दृष्य दिसत आहे.

बेयनच्या अुत्तर पश्चिम बाजूला १२०० फूट लांब आणि तेरा फूट अुंच असें व्यासपीठ निर्माण केलें आहे. या ठिकाणावरून बहुधा महाराजांच्या राणीवंशांतील स्त्रिया निरनिराळे खेळ पाहाण्याकरितां बसत असाव्या. याच्या समोर कंबूजमधील सर्वांत अधिक कलापूर्ण असें अेक संपूर्ण हत्तीचें चित्र चितारलें आहे. तें जणू जिवंत हत्तीसारखेंच भासत आहे. या व्यासपीठाच्या मागें राजमहालचें स्थान होतें. पण तें आज बहुतेक नष्ट झालेलें आहे. याच्या थोडे अुत्तरेच्या बाजूला कोड आलेल्या यशोवर्माची अेक सुंदर नग्न प्रतिमा बनविलेली आहे. अशी दंतकथा प्रचलित आहे कीं, हा महान सम्राट् अंतीं कोड होअून मेला. या राजाच्या मृत्यूपासून कांहीं कारण असो, परंतु आपणास यशोवर्मा असें नांव कोणाहि राजानें घेतलें नाहीं. आणि याचें कारण, कोण्या अेका ऋषीचा शाप होता असें सांगितलें आहे.

अि. स. ९१० मध्यें कंबुजचा हा महाप्रतापी राजा दिवंगत झाला. यानंतर नांव घेण्यासारखा पराक्रमी राजा म्हणजे राजेंद्रवर्मा हा ९४४ वर्षी गादीवर आला. याच्या राजवटीचा विशेष म्हणजे या कालांत बौद्ध धर्माचा प्रवेश कंबुजमध्यें झाला. आतांपर्यंतचे सर्व सम्राट पूर्णपणें हिंदु-धर्मानुयायीच होते. परंतु, राजेंद्रवर्मा याची बुद्धधर्मावरसुद्धां श्रद्धा बसली.

याचा अर्थ हिंदुधर्माला त्यानें विरोध केला असा मुळींच नाहीं. हिंदु धर्माची मंदिरें, आश्रम नि अन्य संस्था यानां तर राजाश्रय त्यानें चालू ठेविलाच परंतु, बुद्धधर्मालाहि त्यानें राजाश्रय दिला. आणि हिंदुधर्म नि त्यांतूनच निघालेला बुद्धसांप्रदाय गुण्यागोविंदानें अेकमेकांशेजारीं नांदूं लागले. या राजेंद्रवर्म्याच्या राजवटींत आणखी अेक विशेष गोष्ट घडली. ती म्हणजे याचाच अेक मांडलीक, चंपाचा हिंदु राजा याच्या बरोबर राजेंद्रवर्म्याला अेक युद्ध करावें लागलें. या लढाअीमध्यें चंपाच्या राजाचा पूर्ण पराभव झाला. राजेंद्रवर्मा हा केवळ योद्धा होता अितकेंच नाहीं, तर कंबुज राजघराण्याच्या परंपरेप्रमाणें तो अेक मोठा विद्वानहि होता. आणि पाणिनीच्या व्याकरणामध्यें तर त्याचा हात धरणारा दुसरा कोणीही विद्वान त्यावेळीं अुपलब्ध नव्हता. हा पराक्रमी आणि विद्वान राजा अि. स. ९६८ मध्यें निजधामास गेला.

यानंतर पांचवा जयवर्मा राज्यारूढ झाला. याच्या राजवटींत हिंदुधर्माला पुन्हां अेकदां प्राधान्य प्राप्त झाले. हा मोठा शिवभक्त होता. याचेजवळ मोठें बलाढ्य असें चतुरंग सैन्य नेहमीं सिद्ध असे. यानें पुष्कळ दिग्विजय करून, कंबुज साम्राज्याची आणखी वाढ केली. भारतांतील हिंदु लोक आपल्या परदेशीय वसाहतींत तो पाठवीत असे. याचा अेक प्रेमळ पुरावा याच्या राजवटींत अुपलब्ध आहे. या राजाची बहीण अिंद्रलक्ष्मी या नांवाची होती. नि ती तिच्या रूपगुणाकरितां सर्व साम्राज्यांत प्रसिद्ध होती. यावेळीं 'भट्ट दिवाकर' या नांवाचा पराक्रमी नि विद्वान, यमुना तटावर निवास करणारा अेक भारतीय, कंबुज राजसभेंत आला. याच वेळीं भारतामध्यें मुसलमानांच्या स्वाऱ्यांचा आरंभ झाला होता, या भट्ट दिवाकरानें आपल्या तेजानें कंबुज राजवटींत मोठें स्थान प्राप्त केलें, अितकें कीं राजभगिनी अिंद्रलक्ष्मी हिच्याशीं याचा विवाह झाला. हा भट्ट दिवाकर अेक आदर्श ब्राह्मण म्हणून समजला जात असे. भट्ट दिवाकर आणि त्यावेळच्या अन्य पंडितानी, कंबुज साम्राज्यांत हिंदु संस्कृतीचा विपुल प्रसार केला. हा पांचवा जयवर्मा अि. स. १००१ या वर्षीं दिवंगत झाला.

यानंतर सूर्यवर्मा या नांवाचा राजा सिंहासनारूढ झाला. यानें जवळजवळ ४७ वर्षांअितकें दीर्घ कालपर्यंत राज्य केलें. याच्या राजवटींत कंबुज साम्राज्याचें राजकीय वैभव तर शिखराला गेलेंच होतें—परन्तु, अनेक मोठ-

मोठ्या विद्वानांनीं कंबुज साम्राज्यांत विद्या आणि कला यांचा मोठा प्रचार केला. याच्या राजवटींतील कांहीं विद्वानांची नांवें खालील प्रमाणें आहेतः- याचा राजगुरु योगीश्वर पंडित हा सर्व पंडितांत अग्रगण्य होता. सूर्यवर्म्याचा यासंबंधीं अेवढा मोठा आदर होता कीं, त्यानें आपल्या राजगुरूच्या स्मरणार्थ, योगेश्वरपूर नांवाचें अेक नवीन नगर वसविलें होतें. यावाचून शैवाचार्य या नांवाचे अेक महामुनी याचवेळीं प्रसिद्धीला आले. सूर्यवर्म्यानें यांना सर्व ब्राह्मणांचे प्रमुख नेमलें. या शैवाचार्यांचा शिवबिंदु या नांवाचा अेक पराक्रमी पुत्र, सूर्यवर्म्यानें महाअमात्य या श्रेष्ठपदावर नियुक्त केला होता. शंकर पंडित या नांवाचा आणखी अेक पंडित, पुरोहितपदावर सूर्यवर्म्यानें नेमला होता. पातंजल भाष्यावर शंकर पंडिताचा अेवढा मोठा अधिकार होता कीं, कंबुजमध्यें अशी दंतकथा प्रचलीत होती कीं, या पंडिताला प्रत्यक्ष शेषानें आपल्या सहस्रमुखानें पातंजली भाष्य शिकविलें होतें.

अशा रीतीनें सूर्यवर्म्याच्या राजवटींत कंबुज साम्राज्य हें शौर्य, विद्वता, कला, न्याय, नीति अित्यादींनीं मंडित होअून भारतीय संस्कृतीचें अेक उज्वल आदर्श म्हणून जगतांत विख्यात झालें. असा हा प्रतापी सूर्यवर्मा जवळ जवळ अर्धा शतकपर्यंत राज्य करून इ. स. १०४९ मध्यें निजधामास गेला.

सूर्यवर्म्याच्या पश्चात् उदयादित्य हा कंबुज सिंहासनावर बसला. हा राजा जरी विद्वानांचा पोशिंदा; न्यायी नि दयाळू होता, तरी पूर्वीच्या राजा इतका पराक्रमी नव्हता. त्यामुळें त्याच्या सैनिक विभागांत त्याचा दरारा कमी झाला. यामुळें त्याचा मुख्य सेनापति 'कंबु' या नांवाचा होता, त्याच्या हृदयांत कंबुजच्या सिंहासनाचाच लोभ अुत्पन्न झाला. त्याचा देह धिप्पाड नि त्याचें बल जरासंघासारखें आहे, असा जनतेंत त्याचा लौकिक होता. या सेनापतीच्या महत्वाकांक्षेनें कंबुजच्या राजमुकुटाचीच हांव धरली नि त्यानें अुदयादित्याविरुद्ध बंड पुकारलें. कंबु सेनापतीनें अुदयादित्याच्या अनेक सेनापतींचा लढाअीमध्यें धुव्वा अुडविला नि प्रत्यक्ष राजधानीवरच चाल करून येण्याच्या सिद्धतेंत तो मग्न झाला. अुदयादित्यानें आपला पहिला मुख्य सेनापति जो संग्राम त्याला कंबूवर चाल

करून जाण्याची आज्ञा दिली. परंतु, प्रत्यक्ष संगारामसारखा अनुभवी वीर देखील, कंबूच्या सामर्थ्यापुढें कच खाऊं लागला. तरीहि त्या स्वामिनिष्ठ वृद्ध संगारामानें अंतिमचा विडा उचलला नि आपला सैन्यभार घेऊन तो कंबूशीं सामना करण्यास चाल करून गेला. प्रथम त्यानें, तो शिवभक्त असल्यानें, शंकराचा वर मिळवण्याकरतां त्यास महापूजा गुंफली नि पूजेचीं फुलें शिवप्रसाद म्हणून आपल्या मुकुटांत खोवून तो त्या प्रचंड समरास सज्ज झाला. हें युद्ध मोठें घनघोर झालें. त्यावेळच्या कवींनीं त्याची रामरावण युद्धाशीं तुलना केली आहे. अंतीं संगारामानें अतुल पराक्रम गाजवून कंबु सेनापतीचा पूर्ण पराभव केला. कंबु या युद्धांत मारला गेला नि अशा रीतीनें कंबुजच्या राजघराण्यावरील हें महत् संकट, संगाराम सेनापतीच्या स्वामीभक्तीनें नि पराक्रमानें निवारण झालें. उदयादित्यानें संगारामचा मोठा गौरव केला नि त्याला पुन्हां प्रमुख सेनापतिपद अर्पण केलें.

यानंतर कंबुजच्या घराण्यांतच नव्हे, तर बृहद्भारताच्या सर्व परदेशस्थ राज्यांमध्यें ज्याचें नांव चिरस्मरणीय झालें आहे, असा राजा द्वितीय सूर्यवर्मा हा श्रि. स. १११२ मध्यें कंबुजच्या सिंहासनावर आरूढ झाला. या राजाचा हा अद्वितीय पराक्रम कांहीं समरांगणावरच्या कोणत्या युद्धामध्यें नाहीं घडला, तर तो हिंदुशिल्पकलेच्या क्षेत्रांत घडला. दुसऱ्या सूर्यवर्म्यानें साऱ्या जगामध्यें पूर्वीच्या अद्वितीय भारतीय शिल्पकलेचें एक आश्चर्यकारक दृश्य निर्माण केलें. तें दृश्य म्हणजे **अंकोरवत्चें** सुप्रसिद्ध वैष्णवमंदिर हें होय. याचें शिल्प मध्य-कालीन भारताचेंच आहे. मद्रासेकडील भव्य मंदिरांचीच शिल्पकला या मंदिरामध्यें प्रतीत होत आहे. याची ती दिव्यकला पाहून, इजिप्तच्या पिरामिड्सच्या निर्मात्यांनासुद्धां हेवा वाटावा असें हें शिल्पकमनीय आहे. ह्या मंदिराच्या जिन्यांवरून, भिंतीवरून, दालनांदालनांमधून अनेक पौराणिक आख्यानें, संस्कृत श्लोक, कंबुजच्या राजघराण्यांतील प्रतापवान् राजे यांचीं विविध चित्रें कोरलीं आहेत. मंदिराच्या कोनाकोपऱ्यांपासून, तो मनोऱ्यांच्या प्रोत्तुंग शिखरांपर्यंत हिंदुत्वाची मुद्रा अंकित झालेली आहे.

अंकोर नगराच्या दक्षिण दिशेस ह्या भव्य मंदिराची निर्मिती झाली आहे. ह्या मंदिराची रुंदी अर्धा कोस आहे. याच्या चारी बाजूला ४०० फूट

रुंदीचा खंदक पसरला आहे. या खंदकांवरून मंदिरांत जाण्यास पश्चिम बाजूला अेक भव्य पूल बांधला आहे. याच्या टोंकाला मंदिराचें मुख्य दार लागतें. हें मुख्य द्वारच अेकाद्या मंदिराअितकें भव्य आहे. यावांचून पूर्व, दक्षिण, अुत्तर दिशांनाहि द्वारें आहेत. तीं या मुख्य द्वारापेक्षां कांहीं अंशानें लहान आहेत. नैऋत्य दिशेला डाव्या बाजूस पितामह भीष्म शरपंजरीं पडल्याचें दृश्य प्रेक्षकांच्या नेत्रांना आकर्षून घेत आहे. भीष्माचार्यांच्या दोन्हीं बाजूस धनुष्यधारी कौरवपांडव अुभे असलेले दिसत आहेत. या सर्व मूर्ति दगडावर खोदल्या आहेत नि त्यांचा रंग अनेक शतकांनंतर आजहि, अगदीं नवा जसा दिसत आहे.

मंदिराच्या पश्चिमोत्तर बाजूस रामायणांतील प्रसंग चित्रित केले आहेत. वानर राक्षसांचे घोर संग्राम कोठें दिसत आहेत, तर कुठें प्रभुरामचंद्र हनुमंतांचें खांद्यावर बसून अचुक शरसंधान करीत आहेत. त्याच्याच समोर सिंह जोडलेल्या रथावर बसलेला अुन्मत्त रावण रामशरांनीं व्याकूळ झालेला दिसत आहे.

अुत्तर पश्चिम भागामध्यें देवदैत्यांचा संग्राम दाखविलेला आहे. या चित्रामध्यें सूर्य आणि चंद्र यांची तेजोवलययुक्त प्रतिभा अत्यंत मनोहर वठली आहे. अुत्तर पूर्व भागांमध्यें ऋषी लोक ज्यांची पूजा करीत आहेत, अशा ब्रह्मा-विष्णु महेश, यांच्या मूर्ति आहेत; याशिवाय समुद्रमंथन, अप्सरांचे आकाशांतील नृत्य, यमपुरींतील भयानक दृश्यें, अित्यादीं चित्रें विराजमान झालीं आहेत. या देवालयाचा मधला मनोरा १८ फूट अुंच आहे. याच्यामध्यें तीन जगद्‌विख्यात चित्रशाळा आहेत. या सर्व चित्रशाळांमध्यें रामायण महाभारत आणि हरीवंश पुराण यांतील निरनिराळीं कथानकें चित्रांकित केलेलीं आहेत. ह्या चित्रामध्यें वासुकी सर्प, महेंद्र पर्वत, लक्ष्मी, अुचैः-श्रवा, गणेश, नटराज, किरात वेषधारी शंकराचा अर्जुनाशीं चाललेला संग्राम अचुक रीतीनें रंगविलेला आहे.

अंगकोरवत् यांचे संस्कृत नांव ‘ नगरवाट ’ असें आहे. प्रथम हे मंदीर विष्णूचें होते. परंतु कंबुजमध्यें जेव्हां बौद्ध धर्माचें प्राबल्य झालें, तेव्हां तें बौद्धमंदीर बनविण्यांत आलें. आज तें बौद्ध मंदीर याच स्वरूपांत सर्व जगां-

तील कलावंतांचे नेत्र दिपवीत, अेक सहस्र वर्षेपर्यंत हिंदुसंस्कृतीचा विस्तार गौरव नि वैभव दाखवित वृहत् भारतीय साम्राज्य प्रसाराचा अेक जुना साक्षीदार म्हणून अुभें आहे. अंतीं, या मंदिरासंबंधानें पी. जे. डी. बीर्सकी, या पाश्चात्य संशोधकाचें 'अंगकोर' या ग्रंथांतील मत अुधृत करून, अंगकोर मंदीराचे हे संक्षिप्त वर्णन आम्ही ह्या पुस्तकाची अल्प मर्यादा लक्षांत घेअून संपविणार आहोंत.

"......And particularly prepossessing fact of it is the whole spirit of Brahmanism and of a Brahmanical race that haunts curious Shrines. ..........To understand Brahmanism, one must live in the Orient, one must see the ruined temples of Angkor, then the legends become alive, and the idols with numerous heads, uncountable arms, with unearthly masks, tell you clearly their arcana, the creed of the Hindus is based on the simple and clear belief that "There is but one Being, without a Second.'' This one Being, taking the form of a Giant Universal Spirit, who is all, and does all, the Great Brahman.

अशा रीतीनें दुसऱ्या सूर्यवर्म्यानें हें अंगकोरचें विष्णुमंदीर निर्माण करून जगतांमध्यें आपलें नांव अमर केलें आहे.

आतां यानंतर कंबुज साम्राज्याचा अुत्तरकालीन अितिहास आपण पुढच्या लेखांकांत पाहूं. या कालांत कंबुजची साम्राज्यशक्ति, कशी दुर्बल होत विलयाला गेली नि आज केवळ अेक लहानसें मांडलीक संस्थान हेंच अेक त्याचें कसें प्रतीक राहिलें आहे, याचा अुद्वेगकारक, अितिहास "रिक्ताःभवति भरीताः भरीताःश्च रिक्ताः" या न्यायानें पहावयाचा आहे.

## : ८ :

# ‘सयाम’

गेल्या प्रकरणांत आपण कंबुज ( कंबोडियन ) साम्राज्याचा भरभराटीचा अितिहास अि. स. १११२ मध्यें साम्राज्य सिंहासनावर बसलेल्या द्वितीय सूर्यवर्म्याच्या राजवटीच्या अंतापर्यंत पाहिला. अंगकोरवत् ( नगरवाट ) चें भव्य विष्णुमंदिर याच सम्राटानें बांधलें, हेंहि आपण पाहिलें. या सम्राटानंतर सातवा जयवर्मा हा गादीवर बसला. कंबुजच्या वैभवशाली साम्राज्याचा हा जवळ जवळ अंतिमचाच सम्राट झाला. कारण, यानंतर सयाम नि चंपा ( सांप्रतचें अनाम ) येथील हिंदु मांडलिक राजांनीं, कंबुज साम्राज्यांतून फुटून निघून, आपापलीं स्वतंत्र राज्यें स्थापन केलीं नि कंबुज देशाचें साम्राज्यपद हळूं हळूं तेजोहीन होअूं लागलें. कंबुज साम्राज्याच्या वैभवाचा जवळ जवळ सहासात शतकांचा हा पूर्वार्ध, गेल्या प्रकरणांत आपण पुरा केला नि या कंबुजच्या अुत्तरार्धाचा अितिहास नि संस्कृतीचा तेथील विस्तार या अितिहास-मध्यें कंबुजच्या अितिहासानंतर अनुक्रमानें प्रथम चंपाराज्य, अनाम नि नंतर सयामचें राज्य अशा अनुक्रमानें आम्ही तेथील हिंदुराज्यांचें अितिहासवर्णन करणार होतों. परंतु, फेब्रुवारी १९४१ मध्यें सयाम देशानें आपलें हिरावून घेतलें गेलेलें भूतकालीन वैभव परत मिळविण्याकरतां, अितके दिवस कोपगत झालेली आपली तरवार अुपसून, समर देवतेचा कौल घेण्याचा निर्धार केल्यानें, या प्रकरणांत अनुक्रम थोडासा पालटून, चंपाच्या हिंदु-राज्याच्या अितिहासाआधीं, सयामच्याच हिंदुराज्याचा अितिहास आम्ही

प्रथम निवेदन करण्याचें ठरविलें आहे. सयामचा अितिहास निरीक्षिल्यावर मग आपण पुन्हां पहिल्या अनुक्रमाचें अनुसरण करूं.

सयामच्या प्राचीन अितिहासाला आरंभ करण्याच्या आधीं, सध्यां सयामनें जें युद्ध सुरूं केलें आहे, त्याचें स्वरूप आपण थोडक्यांत पाहूं. सयामनें तेराव्या शतकांत कंबुजच्या दुबळया होत चाललेल्या साम्राज्यांतून फुटून स्वतंत्र राज्य स्थापन केलें. त्यावेळेपासून अेकोणिसाव्या शतकाच्या अंतापर्यंत म्हणजे अि. स. १८८०–८२पर्यंत सयामचें राज्य, कंबुजच्या म्हणजे सध्यां ज्याला फ्रेंच कंबोडिया म्हणतात, त्या प्रांतांतील मोठ्या भागावर पसरलेलें होतें. परंतु अि. स. १८८७ मध्यें फ्रान्सनें, पाश्चात्य राष्ट्रांनीं पंधरा सोळाव्या शतकापासून, आशिया खंडांतील देश गिळंकृत करण्याचें जें अेक पद्धतशीर राज्योपहारक शास्त्र निर्माण केलें होतें, त्या अन्वयें, सयामपासून कंबोडियाचा सर्व भाग मेकांग नदीपर्यंत, दमदाटीच्या राजकारणतंत्रान्वयें हस्तगत केला होता, त्यावेळीं दुर्बल बनलेल्या सयामनें हा अपमानकारक अपहार निमूटपणें सोसला. पुन्हां अि. स. १९०७–८ च्या बेताला फ्रान्सनें मेकांग नदीच्या पश्चिमचा ८ सहस्र चौरस मैलांचा भूभाग नि लुआंगप्रवान या नांवाचा प्रदेश सयामपासून अेका नवीन संधीच्या निमित्तानें गिळंकृत केला. अशा रीतीनें सयामच्या राज्याचे लचके तोडण्याचें काम फ्रान्सनें चालू ठेविलें असतां, मलय द्वीपकल्पांत ठाणें देअून बसलेले अिंग्रजहि कांहीं स्वस्थ नव्हते. त्यांनींहि अि. स. १९०९ मध्यें असाच अेक ' संधि ' करून, सयामचे तीन जिल्हे ' फेडरेटेड मलयद्वीपकल्पा ' च्या आपल्या राज्याला जोडून घेतले! दुबळया बनलेल्या सयामच्या राज्याला राजकीय क्षयरोगाची बाधा होअून तो असहाय नि निस्तेज बनत चालला.

यानंतर गेल्या दहा वर्षांपासून, जपानच्या प्रबळ पौर्वात्य राष्ट्राचें धोरण अुघड अुघड आक्रमक होत चाललें नि त्यानें पाश्चात्य राष्ट्रांनीं आजवर पूर्व आशियामधील गिळंकृत केलेले प्रदेश, त्यांच्या मगरमिठींतून सोडवून आपलें साम्राज्य पूर्व गोलार्धांत वाढविण्यासाठीं ' नवीन सृष्टि ' ( New order ) निर्माण करण्याचा चंग बांधला. या कामांत आपल्या सांस्कृतिक दृष्टीनें नि अिंग्लिशांच्या सिंगापूरच्या प्रबळ आरमारी ठाण्याला शह देण्याच्या दृष्टीनें सयाम देशाचें अतोनात महत्त्व जपानला वाटूं लागलें. म्हणून जपाननें सयामला

आपल्या बाजूला ओढण्याकरितां, सयामशीं राजकीय नि सांस्कृतिक सख्य जोडण्याचें धोरण निश्चयानें अंगिकारलें नि व्यापारी दृष्टीनेंहि मैत्रीचे तह करून, सयामला सैनिक तज्ञ पुरवून, त्यांचें भूमिवरलें, समुद्रांतील नि विमान-क्षेत्रांतील सैनिक सामर्थ्य वाढविण्यास सहाय्य करण्यास आरंभ केला. फ्रेंच नि अिंग्लिश यांच्या असह्य कैचींतून सुटण्याची सयाम संधीच पहात होता. आजवर या दोन पाश्चात्य राष्ट्रांनीं केलेल्या अपमानांनीं सयाम मनांतून जळफळत होता. त्याला जपानची मैत्रीची आलेली ही संधि, सुवर्णसंधीच वाटली सयाममध्यें पूर्व वैभव प्राप्त करून घेण्याच्या महत्त्वाकांक्षेनें तरुण सयामी पिढीचीं मनें अुत्तेजित झालीं नि १९३२ च्या वर्षी त्याचा अेका क्रांतीच्या रूपानें स्फोट झाला. यावेळीं सयाममध्यें 'प्रजाधिपक' या नांवाचा राजा **सातवा राम** या पदवीनें राज्य करीत होता. ही क्रांती रक्तपातावांचून क्रांतिकारकांनीं यशस्वी केली, या क्रांतीचे मुख्य कारण म्हणजे सयाममध्यें दोन पक्ष निर्माण झाले. अेक पक्ष अिंग्रज नि फ्रेंच यांना वचकून त्यांच्या तंत्रानें चालणारा पुराणवादी पक्ष होता. सातवा राम हा याच पक्षांत होता. दुसरा पक्ष तरुण सरदार, नि तरुण सुशिक्षित पिढी यांनीं निर्माण केला होता. त्यांचें म्हणणें असें कीं, फ्रान्स नि अिंग्लिश या अपहारी पाश्चात्य राष्ट्रांच्या 'धाकानें' नि तंत्रानें दुबळे नि मृतवत् जीवन जगण्यापेक्षां, संस्कृती अेकच असलेल्या पौर्वात्य जपानचें सहाय्य घेअून, सयामचें पुन्हां अेकदां पूर्व वैभव प्राप्त करून घ्यावें. या शिकवणुकीचाच परिणाम सयाममधील जनतेवर अधिक झाला नि अि. स. १९३२ च्या वर्षी, या तरुणपक्षानें अेका सुप्रभातीं आपल्या क्रांतीला आरंभ करून, अेका दिवसाच्या अवधींत रक्तपात-विरहित क्रांति घडवून आणली. **सातव्या रामला** त्यांनीं हात लावला नाहीं. राजाच्या मुख्य राण्या 'वल्लभादेवी' नि 'लक्ष्मीलावण्य' यांना नि अल्पवयी युवराज 'आनंद' याला क्रांतिकारकांनीं सन्मानानें वागविलें. जुन्या पक्षाचे जे सेनापति नि मुत्सद्दी होते, त्यांना अेकसमयावच्छेदेंकरून त्यांच्या रहात्या वाड्यांमध्यें कैदी केले नि अशा रीतीनें अत्यंत कौशल्यानें नि चपलाअीनें ही क्रांति, क्रांतिकारकांनीं यशस्वी केली. 'विपुल संग्राम' या नांवाच्या अेका प्रधानानें यामध्यें अग्रभाग घेतला होता. अंतीं, क्रांतिकारकांनीं लोकसत्तेनें नियंत्रित असलेली राजसत्ता स्थापनेची (Limited monarchy)

योजना सिद्ध केली. नि प्रजाधिपक सातवे राम, यांनींहि समयसूचकता नि समंजसपणा दाखवून लोकांच्या या संघटित अिच्छेला मान तुकविली, क्रांतिकारकांच्या मागण्या मान्य केल्या. या क्रांतीमुळें सयामध्मयें जणुं काय अेक नवचैतन्य संचरलें. शेंकडों तरुण–यामध्यें राजघराण्यांतले नि सरदार श्रीमंतांमधले सुद्धां संमीलित होते—अद्यावत् पद्धतीचे शास्त्रीय, सैनिक, नवीन वैमानिक शिक्षण घेण्याकरतां, जपान, अमेरिका, जर्मनी, अिंग्लंड अित्यादि देशांत जाअुं लागले. सयामचें सैन्य जपानी पद्धतीवर रचण्याचा आरंभ जपानमधून आणलेल्या तज्ञांच्या देखरेखीखालीं करण्यांत आला. नवीन युद्धनौका नि विमानदळ वाढविण्याचें पद्धतशीर प्रयत्न चालू झाले. वाङ्मयांत, वृत्तपत्रांत नि व्यासपीठावरून, सयामच्या जनतेमध्यें सयामचें पूर्ववैभव प्राप्त करून देण्याची तेजस्वी महत्त्वाकांक्षा जागृत करण्याचें यशस्वी प्रयत्न करण्यांत आलें. त्यामुळें सर्व सयाममध्यें अेक नवयुग निर्माण होअूं लागले. याचवेळीं जपाननें निरनिराळीं मंडळें सयाम देशामध्यें पाठवून, जपान नि सयाम यांची संस्कृति कशी अेक आहे, प्राचीन काळापासून जपान, सयामचे संबंध कसे मैत्रीचे होते नि म्हणून सयामच्या ह्या विपत्कालामध्यें त्यास अुन्नति·शिखरावर नेण्याकरतां जपान कसें अुत्सुक आहे, अित्यादि गोष्टींचा पद्धतशीर प्रचार सुरू केला. अनेक लहान लहान पुस्तिका, लेख, मासिकें यांच्या द्वारें हा प्रचार सयामभर वाढूं लागला. फ्रेंच नि अिंग्रज या पाश्चात्य राष्ट्रांनीं सयामच्या दौर्बल्याची संधि साधून, सयामचे अनेक प्रांत कसे बळकाविलें, याचें ज्ञान सयामी जनतेस–विशेषतः सयामच्या तरुण पिढीस करून दिलें गेलें. या सर्व प्रचाराचा नि प्रयत्नांचा साहजिकच असा परिणाम झाला कीं, सयाम-जपानचें राजकीय, औद्योगिक नि आर्थिक संबंध, अधिक प्रमाणांत दृढतर होत चाललें नि त्याच प्रमाणांत फ्रेंच, अिंग्लंडशीं सयामचें नातें दूरावत चाललें. सयामचे राजे **सातवे राम [ प्रजादीपक ]** यांनीं जरी नूतन क्रांतीपुढें मान तुकविली, तरी त्यांचा अिंग्लंडकडचा ओढा समूळ नाहींसा झाला नाहीं नि त्यामुळें त्यांनां क्रांतिपुढाऱ्यांचे हें वरील प्रयत्न न पटण्यासारखेंच होतें. त्यामुळें त्यांनीं हळूं हळूं राजकारणांतून आपलें लक्ष काढून अि. स. १९३४ च्या बेताला विलायतेस प्रयाण केलें. त्यांच्या अल्पवयी युवराजाला–आनंदला–त्यांनीं स्विट्झरलंडमध्यें शिक्षणास ठेविलें नि आपण

स्वतः अिंग्लंडमध्यें जाअून तेथें वसति केली. यामुळें जपानानुकूल क्रांति-पक्षाचें वर्चस्व सयामच्या राजवटींत अप्रतिहतपणें स्थापन झालें, नि अिंग्लंडचे संबंध अधिक दुरावले गेले. अंतीं अि. स. १९३५ मध्यें सातवे राम प्रजाधिपक यांना सयामची गादी सोडावी लागली. सयामच्या क्रांतिपक्षानें अल्पवयी युवराज आनंद–जे सातवे राम यांचे पुतणे त्यावेळीं स्वित्झरलंडमध्यें होते–त्यांना राजपद अर्पण केल्याची घोषणा केली. नि **आठवे राम** म्हणून ते सयामचे राजे झाले. अशा रीतीनें, सयाममध्यें नवा मनु सुरू होअून, हळूं हळूं सयाम हें अद्यावत् राष्ट्र होअूं लागलें. सयामची लोकसंख्या अेक कोटीच्या आंतच, म्हणजे जवळ जवळ नेपाळ अितकीच आहे; आणि तरीहि तें राष्ट्र अद्यावत् राजकारणाच्या धुमश्चक्रीमध्यें धाडसानें अुडी घेअून, आज प्रत्यक्ष फ्रान्सच्या साम्राज्यसत्तेशीं यशस्वी टक्कर देत, आपलें भविष्य अुज्वल नि गेलेले वैभव प्राप्त करून घेण्यासाठीं, रणदेवतेला कौल लावीत आहे !

जानेवारी १९४१ च्या आरंभींच्या आठवड्यांतच सयामनें सशास्त्र युद्ध फ्रान्सविरुद्ध पुकारलें. आठवड्यांच्या आंतच अितिहासप्रसिद्ध नि गेल्या प्रकरणांतच वर्णन केलेल्या, भग्नावशेष असलेल्या 'अंगकोरवत्' च्या प्रांताकडे सयामच्या विजयी सैन्यानें, जो कंबुजचा ( फ्रेंचअिंडोचायनाचा ) भाग आक्रमिला आहे, तो फ्रान्सनें अि. स. १९०७-८ सालच्या सयामवर बळानें लादलेल्या तहांत गिळंकृत केलेला भाग आहे.

अशा रीतीनें, जगामध्यें आजवर घडलेल्या अितिहासाचीच, सयाम पुनरावृत्ति करीत आहे. अनेक देश अुदरांत गडप केल्यामुळें प्रबळ झालेल्या फ्रेंच साम्राज्याच्या मूळस्थानावर–फ्रान्सवर–ज्यावेळीं जर्मनीनें केलेल्या प्रचंड पराजयांचा प्रळयवात वाहूं लागला, त्यावेळीं फ्रेंच साम्राज्याचा साम्राज्यमुकुट गडगडून खालीं कोसळला नि त्याच्या साम्राज्याची सारी सृष्टि गदगदा हालूं लागली. त्यासरसीं अेका बाजूनें जपाननें फ्रेंच हिंदु चीनवर अुत्तर–पूर्व भागावर झडप घालून महत्त्वाच्या मान्याच्या जागीं आपलीं नाविक, वैमानिक नि सैनिक केंद्रें स्थापन केलीं नि हिंदुचीनमधील फ्रान्सच्या सत्तेचें जणुं नाकच मुठीत आणलें. त्यासरसी दक्षिण पश्चिमेच्या दिशेनें, जपानचा मित्र बनलेल्या सयामनें, हीच आपल्या मोक्षाची वेळ समजून, फ्रेंच सत्तेनें पूर्वी गिळलेलें प्रदेश मुक्त करण्याकरतां हें युद्ध पुकारलें. सध्यांच्या सयाम फ्रेंच युद्धाची पूर्वपीठिका ही अशी होती.

: ९ :

# सांस्कृतिक सयाम

मागील वृत्तांतावरून अेक गोष्ट वाचकांच्या सहज लक्षांत येअील ती ही कीं, सयाम हा हिंदुसंस्कृतीचाच अेक भाग आहे. यासंबंधाचें सर्व अैतिहासिक विवेचन मागाहून आम्ही करणारच आहो–परंतु, आजहि सयाममध्यें हिंदुसंस्कृतीचीं केवळ चिन्हेंच नव्हेत, तर हिंदुसंस्कृतीची छापहि दिसून येतें.

या संबंधींच्या कांहीं प्रमुख गोष्टींचा आम्ही येथें निर्देश करतो. सयामची सांप्रतची राजधानी आपणांस बैङ्कॉक या नांवानें माहित आहे. परंतु, अिचें खरें सयामी नांव 'कुङ् देव' (संस्कृत–देवनगर) असें आहे. ज्यावेळीं लॉर्ड क्लाअिव्ह, हा बंगालमध्यें अिंग्रजी राज्याचा पाया घालीत होता, त्याचवेळीं म्हणजे अि. स. १७५७ च्या बेताला या देवनगरची स्थापना सयाममध्यें झाली. याच्या पूर्वीची सयामची राजधानी 'अयोध्या' या नांवानें प्रख्यात होती. ब्रह्मीलोकांच्या स्वाऱ्यांनीं ही राजधानी अुध्वस्त झाली, त्यावेळीं सयामी नेता 'फॉयताक' यानें सांप्रतच्या देवनगर (कुङ् देव) या राजधानीची स्थापना अि. स. १७५७ च्या बेताला केली.

सयाममध्यें आज प्रमुखपणें जरी बौद्धधर्म प्रचालित आहे, तरी हिंदुधर्माचें प्राबल्य आजहि सयामी लोकांच्या सांस्कृतिक जीवनांत दृग्गोचर होत आहे. सयामी लोक आजहि जे संस्कार पाळतात, ते गृह्यसूत्रानुसार पाळीत आहेत. मूल जन्मल्यानंतर ७ व्या दिवशीं 'चूडाकृंतन मंगल' म्हणजे मुलाचे केस कापण्याचा संस्कार करण्यांत येतो. या दिवशीं मुलाचे सर्व नातलग

अेकत्र होतात. त्यांपैकी अेक जवळचा नातलग केस कापतो नि अितर मंगल वाद्यें वाजवितात. सर्व नातलग नंतर, त्या मुलांस निरनिराळया वस्तूंच्या भेटी देतात. प्रत्यक्ष राजघराण्यांतील मुलांचे मुंडन समारंभ मोठ्या थाटामाटानें करण्यांत येतात. या समारंभाचें नेतृत्व राजाश्रयास आजहि असलेले ब्राह्मण पुरोहित लोक करतात. सयाममध्यें ब्राह्मणानां ' फ्राम ' म्हणतात. ' फ्राम ' हा शब्द ' ब्राह्मण ' या शब्दाचाच सयामी अपभ्रंश आहे. स्वतः राजा या मुलांचे केस कापीत असतां, दोन ब्राह्मण शंख वाजवितात. नंतर राजपुत्राला अेका पर्वतावर घेअून (पर्वत कैलासचे प्रतीक समजलें जातें.) तेथें गेल्यावर ' फ्राम '—म्हणजे ब्राह्मण पुरोहित पवित्र मंत्रानें त्या राजबालकांवर जलसिंचन करितात. हा अुत्सव अेक सप्ताह चालतो. हा मुंडन संस्कार हिंदुसंस्कारच आहे हें अुघड आहे.

दुसरा संस्कार, ' नामकरण ' संस्कार होय. मुलाच्या जन्माची तिथि, नक्षत्र, मास वगैरे पाहून, ब्राह्मण नवबालकाचें नांव ठेवीत असतात.

तिसरा संस्कार कर्णवेध ( कान टोचण्याचा ) संस्कार होय. हाहि संस्कार समारंभानें करण्यांत येतो.

यानंतर विवाह वगैरेहि संस्कार हिंदूंच्या संस्कारांच्या चालीवरच केले जातात.

अंतिमचा ' मृतिक संस्कार ' हि बहुतेक हिंदूंच्या पद्धतीप्रमाणेंच करण्यांत येतो. प्रेताला स्नान घालून, त्याच्या आवडत्या वस्तू त्याच्याजवळ ठेअून, कपडे घालून, या प्रेताला तीन दिवस अुंच ठिकाणीं ठेवतात. नि सात भिक्षु, तीन अहोरात्रपर्यंत तेथें पालीसूत्रांचें ( पिरितपरिमाण धर्मदेशना ) पठन करतात. तीन दिवसानंतर, शोकजनक वाद्यें वाजवीत प्रेताला स्मशानांत नेतात नि तेथें जाळतात. जाळण्याच्या आधी भिक्षु पुढील मंत्राचा उच्चार करतात.—

' अनित्या बत संस्काराः उत्पादव्ययधर्मिणः ।
उत्पद्य निरुध्यंते तेषां सच्युपशमः सुखम्, ॥

अर्थात् हा श्लोक ते पाली भाषेंत म्हणतात. सजल नारळ फोडून त्याचें पाणी शवावर टाकतात. कांहीं थोडे लोक शवाला पुरतातहि नि मग त्यावर चौकट उभी करून त्याचें नांव, गांव, जन्ममृत्यु तिथि लिहून ठेवतात.

सयामी लोक शेंडीही ठेवतात, नि तिचें रक्षण ते पूर्व हिंदूप्रमाणें प्राणपणानें करतात.

सयामच्या प्रमुख सण नि अुत्सवामध्येंहि हिंदूचेंच सण नि अुत्सव डोकावत आहेत. त्यांच्या नववर्षाचा अुत्सव 'संक्रांति अुत्सव' म्हणून पाळला जातो. हा तीन दिवस मोठ्या समारंभानें पाळतात. बुद्धाच्या मूर्तीचें पूजन, अर्चन या अुत्सवांत विशेपत्वानें केलें जातें. धर्मप्रवचनेंहि होतात.

'वर्षावास' या नांवाचा अुत्सव तेथील लोकांना फार प्रिय आहे. पावसाळयाचे आरंभ नि अंताला हा अुत्सव साजरा करतात. या अुत्सवामध्यें सर्व लोक देवळांत समारंभानें जातात नि कपडे वगैरेचें दान करतात. राजघराण्यांतील लोकहि यावेळीं देवदर्शनास जातात नि या अुत्सवांत भाग घेतात. वर्षावासाच्या आरंभाला स्वतः राजा अथवा त्याचा प्रतिनिधि देवनगर (बँकाक) च्या बाहेरील अेका शेतांत जाअून स्वतः नांगर धरतो. नि कांहीं बी त्यामध्यें पेरतो. यावेळीं भिक्षु नि फ्राम (ब्राह्मण लोक) मंत्र म्हणतात. नंतर बैलाच्या शिंगांतून आणलेलें पाणी त्यावर सिंचन करतात. अनेक लोक राजानें पेरलेल्या या रोपांना शुभकारी समजून, आपापल्या शेतांमध्यें लावतात. सूर्यचंद्रग्रहणांचा समारंभ असतो, यावेळीं अनेक लोक बंदुकांतून बार काढतात, दान करतात.

सयामच्या वाङ्मयांतहि भारतीय रामायण महाभारताचे अनेक, अनुवाद झाले आहेत. अनेक कथा लिहिल्या गेल्या आहेत. **'राम-के-अन'** या नांवाचा अेक ग्रंथ मोठ्या भक्तीनें नि आदरानें लोकांमध्यें वाचला जातो. यामध्यें रामायणाची सर्व कथा गाअिली आहे. रामायणावर आधारलेला आणखीहि अेक ग्रंथ आहे. त्याचें नांव "फालि-सान्-नांङ्" आहे. महाभारतावर आधारलेले अनेक ग्रंथ सयामच्या वाङ्मयांत आहेत. 'अुन्मारुत' या नांवाच्या पुस्तकांत भगवान श्रीकृष्णाचा नातु अनिरुद्ध याची कथा ग्रथित केलेली आहे. दुसऱ्या अेका 'पक्खवदि' (भगवति) या नांवाच्या पुस्तकांत देवी भगवतीची कथा आहे. सयाममधील वैद्यक विषयावरील प्रमुख ग्रंथाचें नांव 'रोख-निघान' असें आहे. अर्थात हें शास्त्र हिंदु वैद्यकीय शास्त्रांतूनच तिकडे नेलें आहे.

सयामी भाषेमध्यें संस्कृत शब्दांचा भरणा शेंकडा जवळ जवळ ४० या प्रमाणांत भरेल. कांहीं वेचक शब्द खालीं देत आहोंतः—

| | |
|---|---|
| संस्कृत--सयामी | संस्कृत--सयामी |
| आकार--अकर | अञ्जलि--अञ्छलि |
| अश्व-अस्व-अस्स | पत्र--बत्र |
| चैत्र--जेत | अीश्वर--अीत्सर |
| कण्ठ--कण्थ | गमन--खमन |
| गङ्गा--खङ्गा | गरुड--करुल |
| मित्र--मित-मित्र | नाग--नाख |
| बंधु--फंदु | वेद--फेत |
| भिक्षु--पिक्खु | बुद्ध--फुत, फुत्थ |

अित्यादि शेंकडों संस्कृत शब्दांचे भाण्डार सयामी भाषेमध्यें भरलेले आहे.

सांप्रतच्या देशाभिमानानी नि नूतत क्रांति घडवून आणणाऱ्या सुशिक्षित लोकांमध्यें स्वभाषेचा नि भाषाशुद्धीचाहि विलक्षण अभिमान जागृत झाला आहे. पाश्चात्य देशाच्या संपर्कानें नि अधुनिक यंत्रशास्त्राच्या प्रवेशानें अनेक नवीन पाश्चात्य शब्दांशीं संबंध येणें अपरिहार्य आहे. परंतु, सयामी देशभक्त लोक शक्यतों अशा पाश्चात्य शब्दांना स्वभाषेंतूनच नवीन नवीन शब्द निर्माण करून भाषाशुद्धिसंबंधीं फार तत्पर आहेत; नि आश्चर्याची गोष्ट अशी कीं, या नूतन शब्दोत्पत्तीकरतां सर्व भाषांची जननी जी संस्कृत भाषा, तिचाच ते अभिमानानें आश्रय करीत आहेत! खालील आम्ही वानगीकरितां म्हणून देत असलेल्या शब्दां-वरून आमच्या वाचकांना कळून येअील कीं अुत्तरदायी सयामी लोक भाषाशुद्धी चळवळीची हेटाळणी वा निंदा करीत नसून, मोठ्या तत्परतेनें ते स्वभाषाशुद्धी संपादित आहेत. कोणत्याहि देशाच्या उद्धाराला नि त्याचा स्वाभिमान प्रखर करावयाला, स्वभाषेलाहि कशी आत्मप्रवण नि आत्मसमर्थ केली पाहिजे हें सत्य सयामी क्रांतिपक्षाला पूर्णपणें अवगत आहे. खालील कांहीं प्रतिशब्द लक्षांत ठेवण्यासारखे आहेत.

अिंग्लिश—सयामी ( संस्कृत )

बायसिकल—चक्रायण.

मोटारकार—रथयंत्र.

अेरोप्लेन—आहासयान ( आकाशयान )

टेलिग्राम—दूरलेख.

टेलिफोन—दूरशब्द.

हे सर्व शब्द किति यथार्थ नि कर्णमधुर आहेत! यांतले मोटारकार, टेलिग्राम हे शब्द तर आपल्या मराठींतहि वापरण्यास कांहींच प्रत्यवाय नाहीं. त्याचप्रणाणें 'टेलिफोन' याला हिंदुमहासभाध्यक्ष स्वातंत्र्यवीर बॅरिस्टर सावरकरांनीं नवीनच शोधलेला प्रतिशब्द, जो दूरध्वनी' हा सयामी देशभक्तांनीं अंगिरलेल्या 'दूर शब्द' या शब्दाशीं किती साम्य पावत आहे, हें पाहून कुतुहल वाटतें; परंतु, अजूनहि आमचे कितीतरी स्नेही सोबती 'टेलिफोन'ला 'दूरध्वनि' म्हटल्यावर हसूं लागतात! परंतु, त्यांचें तें 'हसूं' किती हास्यास्पद आहे हें या देशभक्त सयामी लोकांच्या अुदाहरणावरून अधिकच स्पष्ट होंणारें आहे!

## वाङ्मयाविषयक

सयामी लिपि हीं नागरी लिपीचें केवळ रूपांतरच आहे, असें तज्ञ विद्वानांनीं सिद्ध केलें आहे. नागरी लिपीमध्यें वर्ण, स्वर, नि मात्रा अित्यादींचे जे क्रम ठरले आहेत, तेच सयामी भाषेंतहि ठरविले आहेत. लिंग, वचन, पुरुष, कारक, समास अित्यादि पारिभाषिक शब्दहि संस्कृतमधूनच त्यांनीं घेतले आहेत. व्यवहारामधील अनेक पारिभाषिक शब्द संस्कृत भाषाजननीपासूनच घेतले आहेत, यांचीं कांहीं अुदाहरणें मागें दिलीच आहेत. आणखीही कांहीं ठळक शब्द दिल्यावांचून आमच्यानें रहावत नाहीं. जलविभाग ( Water Works ) या खात्याला सुंदर नि सुटसुटीत असा 'प्रपा' विभाग हा शब्द योजिला आहे, म्युनिसिपालिटीला 'बूरीसफा' हा ( पूरीसभा ) हा शब्दप्रयोग केला जातो. स्टेशनाला ते 'सथानि' म्हणतात. पार्लमेंटला 'बोरिशद' (परिषद) शब्द लावतात. व्यक्तींचीं नि नगरांचीं नांवें तर शेंकड्यांनीं शुद्ध संस्कृतोत्पन्नच ठेविलीं जातात. अुदाहरणार्थ—विष्णुलोक, रामराघव, यमराज, शक्तिशची, राजदेवी, वल्लभादेवी, लक्ष्मीलावण्य अित्यादि हीं व्यक्तींचीं नांवें झालीं. आतां नगरांचीं नांवें पहा—अयोध्या, लवपुरी, विष्णूलोक, नगरश्रीविजय, राजपुरी अित्यादि.

आजहि सयाममध्यें कितीतरी पुस्तकें संस्कृतमध्यें सयामी लिपींतून छापलेलीं दृष्टीस पडतात. कथासरित्सागर, हितोपदेश, नलोपाख्यान, अभिज्ञान शाकुंतल, चाणक्यनीति, भर्तृहरिशतक, नीतिशतक, व्याकरणशतक दशावतारम्, आदि संस्कृत, ग्रंथांचा प्रचार अधिक आहे. त्याच-प्रमाणें नलोपाख्यान, शाकुंतल, दशावतारम्, या संस्कृत ग्रंथावर तर प्रत्यक्ष सयामचे राजे सहावे राम, यांनीं स्वतःच सयामी भाषेमध्यें टीका लिहिल्या आहेत. **देवनगर** ( बँकॉक ) च्या राजधानींत अेक प्रचंड ग्रंथालय राजाश्रयाखालीं चाललें आहे. त्यामध्यें **दोन लाखापर्यंत** ग्रंथसंग्रह सांठविला आहे. त्यामधील संस्कृत ग्रंथरत्नभांडारांपैकीं कांहीं थोड्या ग्रंथांचा नामनिर्देश करणें अवश्य आहे–ती ग्रंथरत्नें अशीं–वास्तुशास्त्र, सैनिकशास्त्र, पुराण, अितिहास, चंपू, नाटक, काव्य, छंद, सङ्गीत, कामशास्त्र, पाकशास्त्र नीतिशास्त्र, वैद्यकशास्त्र, ज्योतिष, कोष, व्याकरण, न्याय, धर्मशास्त्र, तंत्र, सांख्य, योग, वैशेषिक, वेदांत, मीमांसा, अुपनिषदें, गृह्यसूत्रें, श्रौतसूत्र, ब्राह्मण अित्यादि शास्त्रांचे अेकंदर ग्रंथ ६५८ आहेत. या विभागाचे मुख्याधिकारी **कुप्पुस्वामी रेअिर** या नांवाचे अेक ब्राह्मण विद्वान्, गृहस्थ होते. हे अि. स. १९२४ मध्यें २० जुलैला पक्षाघातानें मृत्यु पावले. यांनीं अिंग्रजी, संस्कृत, पाली नि सयामी भाषा यांवर प्रभुत्व मिळविलें होतें.

सयाममध्यें बौद्धशक चालू आहे. हा शक खिस्तशकापेक्षां ५४३ वर्षांनें आधींचा आहे. महिन्यांचीं नांवें हिंदूंच्या राशीच्या नांवानेंच–म्हणजे, मेख ( मेष ), वृष, आदि ओळखलीं जातात. वारांचीं नांवेंहि हिंदूंचींच आहेत. जसें–अतिथ ( आदित्य ), चान ( चंद्र ), अखान ( अंगार मंगल ), फुट ( बुध ) फुरहटबडी ( बृहस्पति ), सुक ( शुक्र ), साव ( सौर्यशनि ) यांचा अनुक्रमहि हिंदूंप्रमाणेंच आहे.

वरील सर्व वृत्तांतावरून सयामसारख्या दूरच्या हिंदुवसाहतीमध्यें, मातृभूमीशीं सर्व संबंध सुटून अनेक शतकें गुजरलीं असतांहि, तेथील हिंदुत्व-निष्ठ जनतेमध्यें अजूनहि केवढा हा हिंदुसंस्कृतीचा अभिमान नि संस्कृत भाषेची प्रतिष्ठा त्यांनीं जतन करून ठेवली आहे, हें पाहून हृदयांत केवढी धन्यता वाटते ! अुलट प्रत्यक्ष हिंदुस्थानांत मात्र अमृतमय असलेल्या या

संस्कृत भाषेच्या कामधेनूची कास सोडून, उर्दू भाषेच्या अुंटणीचेच अचळ चोखण्यास धावणाऱ्या भ्रांत नरपुंगवांचा कपाळकरंटेपणा दृष्टीस पडतो !

वर अेकदां सांगितलेंच आहे कीं, सयामध्यें ब्राह्मणाना 'फ्राम्' असें म्हणतात नि तो शब्द 'ब्राह्मण' या शब्दाचाच अपभ्रंश आहे. या ब्राह्मणांची आजहि तेथें कुठें कुठें वसति आहे. या ब्राह्मणांची मूळ वसति सयाममध्यें फार प्राचीन काळापासून झाली आहे, हें सयामच्या राजकीय अितिहासकथनाच्यावेळीं पुढें आपणांस पहावयाचेंच आहे. परंतु, आज जीं ब्राह्मण घराणीं तेथें वसत आहेत, त्यांची परंपरा अि. स. पांचव्या सहाव्या शतकांपासूनची आहे, हें आश्चर्य नाहीं कां ? अितक्या शतकाशतकांच्या कालानंतरहि, सभोवती प्रचंड क्रांत्या नि संकर यांचे स्फोट होत असतांहि, या ब्राह्मण कुटुंबांनीं अजूनहि आपली हिंदुत्वाची धर्मपरंपरा जतन करून ठेवली आहे, ही केवढ्या चिकाटीची नि अंतःसामर्थ्याची गोष्ट आहे ! स्वदेशाचा संबंध तुटला, स्वकीयांची ओळखहि पुसटली, स्वधर्म, स्वसंस्कृति, स्वभाषा यांचाहि आधार सुटला, आणि तरीहि हे कतिपय ब्राह्मण आजहि त्या दूरदेशीं, आपली परंपरा जीवापलीकडे जतन करून ठेवीत आहेत ही केवढी किमया ! अेकादा विशाल वृक्ष मोडून, उन्मळून पडावा नि त्याची अेकादी शाखाच अधांतरी निराधारपणें अनेक शतकंपर्यंत पल्लवित नि पुष्पित होत रहावी हा केवढा चमत्कार !

परंतु, हा चमत्कार आज सयाममध्यें प्रत्यक्ष दिसत आहे ! सयाममध्यें हिंदुधर्मनिष्ठ अशा ब्राह्मणांची तुरळक वस्ती मधून मधून आजहि आढळून येते. यांपैकीं मुख्य वस्ती राजधानी देवनगर ( बेङ्कॉक ) मध्यें वसली आहे. यांची सांप्रत अेकंदर वस्ती ८०–९० घरांची आहे. यांचें अेक भव्य मंदिर आजहि तेथें विराजमान आहे. कांहीं ब्राह्मण ज्योतिषाचा धंदा करतात, तर कांहीं बुद्धविहारांमध्यें शिक्षक आहेत. वर निर्दिष्ट केलेल्या मंदिराचें नांव 'वाट–फ्राम' ( ब्राह्मणमंदिर ) असें आहे. या देवळांत पंचदेव, नवग्रह, त्याचप्रमाणें दशावतारांच्या मूर्तींची स्थापना केली आहे नि त्यांची नित्य यथाविधि पूजा ब्राह्मणांचे पुरोहित करीत असतात. या मंदिरासंबंधीं अेक हृदयस्पर्शी कथा १९२५–२६ या वर्षीं सयाममध्यें गेलेले अेक भारतीय प्रवाशी 'हरिवदन शर्मा' यांनीं हिंदीमधील 'भूगोल' या मासिकांत प्रासिद्ध

केली आहे. तिचा गोषवारा आम्ही आमच्या वाचकांसाठीं खालीं अुद्धृत करीत आहोंतः–' हरिवदन शर्मा ' लिहितात—

'माझे मित्र साधुप्रवर 'फरा (वर) महासेङ्ग' भिक्षूनें अेक दिवस मला सांगितलें कीं, 'चला, आज तुम्हाला येथील अेक ब्राह्मणांचें देवालय दाखवितों! हें अैकतांच माझें शरीर रोमांचित झालें! याच्यापूर्वी मला कल्पनाहि नव्हती कीं, सयाममध्यें अितके लांबच्या पूर्वकालपासून ब्राह्मण रहात आहेत! आम्ही ज्यावेळीं तें मंदिर बघितलें तेव्हां बुद्धमंदिर रचनेंत नि या हिंदुमंदिरांत थोडें अंतर आढळलें. बुद्धलोकांच्या मंदिरसमूहांत हें उच्च कोटीचे हिंदुमंदिर पाहून हृदय कसल्यातरी अकथनीय आनंदावेगानें भरून अालें! माझ्या मित्रानें या मंदिराचे मुख्य पुरोहित '**वरराजगुरुवामदेव**' यांच्याशीं माझा परिचय करून दिला. मी ब्राह्मण आहें हें कळतांच गुरुवामदेवाचें मुखमंडळ अेकदम प्रफुल्ल झालें. नि त्यांच्या डोळयांत अश्रू अुभे राहिले. भाषाभिन्नत्वामुळें प्रत्यक्ष संभाषण होअू शकले नाहीं. परंतु आम्हीं अेकमेकांकडे कितीतरी वेळ निरखून पहात होतों. या मुक-प्रेम संवादांत कोण अभूतपूर्व अलौकिक आनंद भरला होता! अंतीं गुरुवामदेवनें सयामी भाषेंत मला म्हटलें, 'माझें भारतावर फार प्रेम आहे. मला संस्कृत येत नाहीं, याचा फार खेद वाटतो. बालवयांतच जर माहित झालें असतें, तर त्या पवित्र भारतामध्यें जाअून अवश्य संस्कृतचें अध्ययन केलें असतें!' माझ्या मित्रानें संस्कृतमध्यें मला हें भाषांतर करून सांगितलें. मीहि यथोचित शब्दांत माझ्या हृदयांतील प्रेमाचा भाव व्यक्त केला! हें वरराजगुरु वामदेव सयामी राजाच्या पदरीं राजपुरोहित आहेत.'

या राजपुरोहितांच्या घरीं सांप्रत (१९२५) अेकंदर १९ मंडळी आहेत. गुरुवामदेवनें सांगितलें कीं, पूर्वी भारतामध्यें ज्यावेळीं मुसलमानांच्या अत्याचारांनीं त्यांचे पूर्वज पीडित झाले, तेव्हां त्यांनीं स्वधर्मरक्षणार्थ स्वदेशत्याग करून कंबुज (कांबोडिया) मधील नगरधर्मराज, लवपुरी अित्यादि ठिकाणीं वसति केली. नि तेथें हिंदुधर्माप्रमाणें आचार विचार चालू ठेविले. कंबुज (कांबोडिया) च्या साम्राज्याला ओहोटी लागल्यावर, हे ब्राह्मण सयामच्या रामराज्यांच्या आश्रयाला आले. ते अद्यापपर्यंत तेथेंच राजपुरोहित म्हणून

रहात आहेत. सयामच्या राजांनींहि त्यांचा मानसन्मान अखंड चालविला आहे. हे ब्राह्मण सयामी बुद्ध लोकांसह सर्व खाद्य, पेयादि व्यवहार करतात. हे ब्राह्मण जानवें घालतात. परंतु, ते बाहेर वगैरे जातांना आपलीं जानवीं देवघरांत राखून ठेवतात. नि पूजाअर्चा होमहवन अशा प्रकारच्या धार्मिक विधींच्या वेळींच वापरतात! आणि याचें कारण ते असें सांगतात कीं, यज्ञोपवित हें पवित्र असल्यानें त्याला पवित्र नि सोंवळया ठिकाणींच ठेविले पाहिजे. त्या दृष्टीनें हें कारण सकारणच आहे!

ग्रं. नं. ११०२०

## १०

## सांस्कृतिक सयाम

सयामच्या या राजपुरोहितांच्या ब्राह्मण कुटुंबांत जन्मास येणाऱ्या प्रत्येक अपत्यास सयामी रामराजांकडून महिना २५ 'टिकल' प्रमाणें मासिक वेतन मिळत असतें. १ टिकल म्हणजे जवळजवळ १। रुपया होतो. हें अपत्य वयांत आल्यावर म्हणजे १८ वर्षांचें झाल्यावर हें मासिक वेतन ५० टिकल मिळूं लागतें. सयामी राजांच्या राज्यारोहण प्रसंगीं सर्व पवित्र जलांचे सिंचन हे ब्राह्मण राजपुरोहित राजावर मंत्र घोषणेंत करतात नि मग राज्यारोहणसमारंभ पुरा होतो, त्यांवाचून नाहीं.

सयाममधील अनेक बुद्धमंदिरांमध्यें गणेश, गंगा, शिव, विष्णु, सरस्वति इत्यादि हिंदु देवांच्या मूर्ति कोरलेल्या आहेत. सर्व बौद्धमंदिरामधील मुख्य बौद्ध मंदिर 'श्रीरत्नसदाराम' या नांवाचें आहे. यामध्यें पहिल्या भागांतील मुख्य द्वारासमोर भगवान् गणेशाची पांच फूट उंचीची अेक भव्य मूर्ति स्थापलेली आहे. 'प्रपा' ( Water works ) खात्याच्या प्रवेशद्वारावर राजधानी बङ्कॉकमध्यें संगमरवरी दगडाची अेक सुंदर गंगेची मूर्ति बसविली आहे. या गंगेच्या वेणीमधून लहान नलिकाद्वारें पाण्याचीं सारखीं कारंजी अुडत असतात. या शेंकडों धर्ममंदिरालगतच अनेक मठ स्थापलेले आहेत.

या मठांमधून सयामी मुलें, ब्रह्मचर्याश्रम देअून गुरुकुलामध्यें कांहीं वर्षें ठेवलीं जातात. तेथें त्यांना पाली भाषा नि अन्य धार्मिक ग्रंथ शिकविले जातात. यांवांचून या मठामध्यें शाळाहि स्थापल्या आहेत. इंग्रजी, थायी ( सयामी ) भाषा शिकविल्या जातात. त्याचप्रमाणें शिंपी, लोहार, सुतार अित्यादि धंदेहि तेथें शिकविले जातात. या मठामध्यें नियमित वेळेला प्रत्येक दिवशीं धार्मिक प्रवचनें, कथा पुराणें वगैरे होतात. त्यावेळीं मठाबाहेरील स्त्रीपुरुषांचीहि तेथें गर्दी जमते. मागें अुल्लेखिलेल्या ' श्री रत्न सदाराम ' या प्रमुख बौद्ध मंदिराच्या भिंतीवरून रामायणामधील बालकाण्डापासून तो उत्तर काण्डापर्यंतची रामायणाची प्रत्येक घटना चित्रित केली आहे नि त्या घटनेसमोर सयामी भाषेमध्यें त्याची कथा लिहिली आहे. या कथांमध्यें आपल्या हिंदुस्थानांतील रामायणांत नसलेली अेक अधिक कथा गोवली आहे. याच कथेच्या आधारावर सहस्रमुखी रावणाचें आख्यान बसविलें गेलें आहे. ही कथा चित्रित केलेले मंदिर राजप्रासादाच्या बाहेरच्या कक्षेमध्यें आहे. यामध्यें केवळ राजपरिवाराचेच लोक दर्शनास जातात. मात्र आमावास्येला हें मंदिर सर्वांस खुलें असतें.

सयामी वाङ्मय हें संस्कृतप्रचुर असतें हें वर सांगितलेंच. आपल्या मराठी, बंगाली, हिंदी अित्यादि भारतीय भाषांच्या अुच्च प्रतीच्या वाङ्मयामध्यें, ज्याप्रमाणें संस्कृत शब्दांची विपुल पसरण केलेली असते, त्याचप्रमाणें सयामी भाषेंतील अुच्च प्रतीच्या वाङ्मयामध्यें संस्कृत शब्द विपुलतेनें अुपयोजिलेलें असतात. याचें अेक उदाहरण खालीं देत आहोंत. या प्रकरणामध्यें त्या वेळच्या सयामीमहाराजांचे वर्णन आहे.

' वरंपाद समदच वर परमेंद्र महा—वाजीरा बुध अेक अग्र महापुरुष परमनराधिराज विनीत प्रजानाथ महा समस्त वंश अतिशयवंश विमल रत्नवर क्षत्रियराज निकरात्तेम चतुरन्त महाचक्रवर्ती राजसंकाश अुमेता सुजात सन्सुद्धग्रहणी चक्री परमनाथ चुरालंकरणराज बरांकुर परमकुट्टनरेन्द्र सुरसंतति सुसाधित पूर्वाधिकार कृष्टामिनिहार, अतिरिक्त, पुण्य, ऋद्धि, धान्य, लक्षण, विचित्र सौभाग्य सर्वांग मृहाजनोत्मांत, प्रणतपादयुगुल प्रासिद्ध सर्व शुभफल उत्तम परमसुखमालय, दिव्य देवावतार वैशाल कीर्ति अतुल्य विशेष सर्व देवेशरानुरक्ष, पुरिमाशक्ति, समजदिव द्वारापती श्री महापुरुषमुत सम्मतिसेना निकर. ' ......अित्यादि

या अुद्धृतावरून सयामी भाषेमध्यें संस्कृत भाषेच्या माहेरघरांतून किती आपलेपणानें भाषा संसाराचें साहित्य घेतलें जातें हें सहज दिसून येईल, नि त्याच पुराव्यावरून सयाम हें हिंदु संस्कृतीचें आजहि कसें नांदते घर आहे हेंहि पटेल.

नुकतेच हिंदुस्थानमध्यें सयामचें शुभेच्छा मंडळ ( Good will mission ) येअून गेलें. ( सयाम जपानशीं युद्ध सुरू होण्यापूर्वी ) त्या मंडळाच्या प्रमुखानें अेका सत्कार समारंभाच्या वेळीं मोठ्या अभिमानानें सांगितलें कीं, ' सयाम देश भारतीय संस्कृतीचा मोठा ऋणी नि अभिमानी आहे. आजहि आमच्या वाङ्मयामध्यें संस्कृतीचा किती तरी भरणा आहे. ' अित्यादि.

सयामी लोक संस्कृतोत्पन्न नांवें ठेवण्यांत भूषण मानतात हें वर सांगितलेंच आहे. सध्यां जपानमध्यें फ्रेंच-अिंडोचायनाशीं संधि करण्याकरितां जें सयामी संधिमंडळ गेलें होतें, त्याच्या प्रमुखाचें नांवहि संस्कृतच आहे. तें नांव असें:—'**राजकुमार वर्ण वैद्यकर्ण वरवर्ण**' असें आहे, नि तें सबंद नांव टाइम्समधूनच प्रसिद्धहि झालेले होतें.

वर सांगितलेंच आहे कीं, सयाममध्यें विहार ( मठ ) विपुल आहेत. त्यांची संख्या १६,५३० अितकी आहे. त्यांमध्यें सर्व मिळून सुमारें १,३०,००० भिक्षु रहातात. यांपैकीं अधिकांश विहारांनां राजांकडूनच अुत्पन्नें दिलीं गेलीं आहेत, नि या विहारांचें नियंत्रणहि राजसत्ताधीनच आहे. या विहारांचा आणखी अेक विशेष आहे तो असा कीं, या विहारामध्यें संन्यासी भिक्षूच असतात असें नाहीं; तर मागें सांगितल्याप्रमाणें यांचा अुपयोग गुरुकुलांप्रमाणें ब्रह्मचारी विद्यार्थ्यांना होतो, तसाच तो गृहस्थाश्रमी जनानांही होतो. अनेक गृहस्थाश्रमी लोक कांहीं नियमित कालाकरतां या विहारांमध्यें येअून रहातात.

तीन महिने, सहा महिने, वर्ष अशा निरनिराळया अवधीपर्यंत सयामी लोकांतील बडेबडे श्रीमान, सरदार, संपन्न लोक देखील या बौद्धविहारामध्यें येअून भिक्षु म्हणून रहातात, आणि त्या अवधीपुरतें विहारामधली आहार विहाराची कडक शिस्त कसोशीनें पाळतात. या योगानें तेथील गृहस्थाश्रमी

नि वानप्रस्थी यांची दाट ओळखदेख होअून, दरिद्री, श्रीमंत, अुच्च, नीच असल्या व्यवहारांतील अनिवार भेदांची शल्यें, मठामधील समान-पातळीच्या आयुष्यक्रमानें पुष्कळशी बोथट होअून सर्वसाधारण समाजामध्यें अेक प्रकारची समान बंधुत्वाची भावना खेळत असते.

आतां सयामी लोकांमध्यें जे सांस्कृतिक अुत्सव प्रचलित आहेत त्यासंबंधीं त्रोटक विवेचन करूं.

## सांस्कृतिक विधि नि उत्सव

सयामी लोक जरी, बौद्धधर्मी आहेत तरी, जपान चीनमधील बौद्धापेक्षां यांच्यावर हिंदुसंस्कृतीची छाया अधिक पडली आहे. सर्वसाधारण बौद्ध चीन, जपानमध्यें शवाचें दहन न करतां त्याला पुरतात. परंतु, सयामी लोक शवाचें दहन, हिंदुधर्माप्रमाणेंच करतात. और्ध्व देहिक संस्कार देखील सयामी लोक बहुतेक हिंदुधर्माप्रमाणेंच करतात. मुण्डण, विवाहादि संस्कारहि हिंदूंप्रमाणेंच होतात. प्रथम तेथील अजूनहि विद्यमान असलेले ब्राह्मण, गणेश पूजन, स्वस्तिवाचनादि मंगलकर्में करतात. नि मग बौद्ध भिक्षु ' फरा ' येअून बाकीचे संस्कार करतात. भिक्षूंना सयामी लोक ' फरा ' म्हणतात. ' फरा ' हा शब्द ' वर ' ( श्रेष्ठ ) या संस्कृत शब्दाचेंच रूपांतर आहे. ' फरा ' हा शब्द लिहितांना ' वर ' असाच लिहितात परन्तु ' व ' चा उच्चार मात्र ' फ ' असा करतात. सयामी बुद्ध मंदिरांत अनेक ठिकाणीं हिंदू देवतांच्या मूर्तीहि स्थापिलेल्या आहेत.

**श्राद्धविधिः**— या विधीला भिक्षु लोकांना जेवावयास बोलावून, त्यांना मिष्टान्न खावयास घालतात नि हीं जेवणें चाललीं असतां, त्या घरचा यजमान वारंवार अुदक सोडून प्रार्थना करतो कीं, " या भिक्षूंना अन्न-संतर्पणानें संतुष्ट करून मला जें पुण्य लागेल, तें माझ्या स्वर्गस्थ माता-पित्याना नि आप्तस्वकीयांना हितकारक होवो, हिंदूंच्या श्राद्धांतील कल्पनेचा नि विधीचा हा अवशेष आहे हें अुघड आहे.

**संक्रांतीचा उत्सवः**—नवीन वर्षाचा अुत्सव तीन दिवसापर्यंत पाळतात. या दिवसांत बुद्धाच्या मूर्तीवर फुलें, फळें अर्पण करतात. मोठमोठे लोक भिक्षूंना घरीं निमंत्रून त्यांचा अुपदेश श्रवण करतात.

दिवाळीमध्यें आपल्याकडे जसें पाण्यामध्यें, नद्यांमध्यें, कागदांचे पानांचे, दिवे करून सोडतात, त्याप्रमाणेंच सयामी लोक नारळाच्या पानांवर धूप, दीप, फुलें ठेवून, त्यांना नदीमध्यें नि अन्य पाण्याच्या प्रवाहांमध्यें सोडतात. या अुत्सवास ' पिथि–लायका–थोंड ' असें नांव आहे.

**चंद्रग्रहण**:—या प्रसंगीं बंदुकीचे बार काढून, अनेक वाद्यांचा घोष करतात. हिंदूंतहि अनेक ठिकाणीं हा प्रघात आहे. यांतील भावार्थ असा कीं ' राहू ' नें भयभीत होअुन चंद्राचा सर्वग्रास न करतां, त्यास टाकून पळून जावें!

**शेंडी ठवण्याचा संस्कार**:—याला ' चूडाकृंतनमंगल ' असें नांव आहे. मूल जन्मल्याच्या ७ व्या दिवशीं हा समारंभ करतात. या दिवशीं सर्व इष्टमित्रांना अेकत्र बोलावतात. सुग्रास भोजन समारंभ होतो. वाद्यवादनाच्या समारंभांत मुलाचे केस कापून शेंडी ठेवतात. राजघराण्यामध्यें हा समारंभ फार मोठ्या प्रमाणांत होतो. राजकुमाराच्या शिखासमारंभाला राजकुलाचा हिंदु ब्राह्मण पुरोहित अवश्य लागतो. ब्राह्मण लोक राजकुमाराच्या मस्तकावर अभिमंत्रित जलसिंचन करीत असतांना, राजा स्वतःच्या हातानें राजकुमाराचे केस प्रथम कापतो. यावेळीं दुसरे दोन ब्राह्मण शंख वाजवीत असतात. नंतर त्या राजपुत्राला त्या प्रसंगाकरतां कृत्रिम केलेल्या एका पर्वतावर घेऊन जातात–कारण शंकरानें आपल्या गणेश पुत्राचें मुंडन कैलास पर्वतावर केलें होतें, त्याप्रमाणें हें केलें जातें. नंतर पांढऱ्या शुभ्र कापसाचा एक मुकुट राजकुमाराच्या डोक्यावर चढवतात. हा अुत्सव अेक आठवडाभर चालतो.

**कर्णवेध**:—सयामी लोक हिंदूंप्रमाणेंच मुलीमुलांचें कान टोचण्याचाहि समारंभ करतात. त्यामध्यें मग कुंडलें धारण करतात.

अशा रीतीनें अनेक संस्कार नि उत्सव सयामनें भारतीय हिंदूपासून स्वीकृत करून अद्यापहि परंपरेनें चालविलें आहेत.

शास्त्रीय क्षेत्रांतहि हिंदुशास्त्रांचेच प्रतिबिंब दिसून येते. वैद्यकीय ज्ञान भारतीयांपासूनच सयामला मिळालें. हें शास्त्र प्रथम ' कुमार भक्ा ' ( कुमार भट्ट ) या नांवाच्या भारतीय वैद्यवरानें तेथें प्रसृत केलें. त्यानें रचलेल्या ग्रंथाचें नांव ' रोख निदान ' ( रोग–निदान ) हें आहे.

भारतीय राजाप्रमाणेंच सयामच्या राजांचीहि पांच राजचिन्हें मानलीं जातात. तीं अशीं:—

१ श्वेत छत्र, २ व्यजन (पंखा) ३ खड्ग ४ राजमुकुट ५ राजकीय पादुका.

सयामच्या राजांमध्यें अशी प्रथा आहे कीं, ते दिवाळीच्या बेताला अेकदां तरी अवश्य तीर्थयात्रा करतात. यावेळीं ते देवमंदिरामध्यें अनवाणी जाअून देवदर्शन करतात.

सयामच्या शासक मंडळामध्यें अेकंदर नअु प्रधान असतात. यांची नांवें भारतीयच आहेत. तीं अशीं:—

१ राजमंत्रिन्, २ श्रीकलस (पुलिस अध्यक्ष) ३ कोषाध्यक्ष ४ सूरिज-वंश (प्रधान मंत्री) ५ अमात्य ६ यमराज (कण्टक शोधन) ७ सूर्यवंश मिश्रम्-युद्ध सचिव ८ पुरोहित–न्यायाधीश (Criminal Judge) ९ युद्धराज (सेनापति)

त्याचप्रमाणें Viceroy ला महाअुपराट, Commander-in-Chief ला महासेनापति, Cashier ला श्री. राजकोषाधिपति अशीं नांवें आहेत.

सयाममधील हिंदु संस्कृतीचा अितिहास आपण आतांपर्यंत त्रोटकरूपानें पाहिला. मागील अेका प्रकरणांत सयाममधील सुप्रसिद्ध अंगकोरवत् या मंदिराचे त्रोटक वर्णन केलेलेंच आहे. त्यानंतर आणखी अेका अिंग्रज ग्रंथकाराचा अुतारा वाचण्यांत आला तोहि आमच्या वाचकांकरतां आम्ही खालीं सादर करीत आहोंत—हा इंग्रज लेखक म्हणतो:—

'The Comparatively few European travellers who visited this temple, all unite in declaring it the most colossally stupendous as well as, one of the most architecturally beautiful structures, hey have ever beheld, so that while it rivals or eclipses the Egyption Pyramids in one respect, it hardly falls short of the highest Hellenic Standard as regards

artistic details in the other. The huge building, which is between two and three miles in cicrumference contains a multitudes of courts, colounades chambers........The walls and portals are covered with sculprims the exterior of the Temple being ornamented with bas-reliefs of scenes from Ramayan, the great sanskrit poem.........Angkor Wat was certainly commenced as a Brahmanic Temple, but afterwards, Budhism had become the religion of the land, and so it is, we find here, as in the temple of Borobuddur in Java artistic represe ntations of the dietis of both the religions.'

या त्रयस्थाच्या अभिप्रायावरून, मागें आम्ही, अंगकोरवत्‌संबंधीं जें मत प्रतिपादिलें, तें किती यथार्थ होतें हें दिसून येईल.

सयामच्या या त्रोटक हिंदुत्वनिष्ठ संस्कृतीच्या अितिहासकथनावरून वाचकांना सयाम हें राष्ट्र, हिंदूंना सांस्कृतिक रीतीनें किती जवळचें आहे हें सहज पटेल. स्वतंत्र हिंदू राज्य नेपाळ याच्या खालोखाल जर कोणतें अन्य हिंदुत्वनिष्ठ स्वतंत्र राष्ट्र असेल तर तें 'सयाम' हेंच होय. परंतु सध्यांच्या या विश्वयुद्धाच्या रगाड्यांत राजकीयदृष्ट्या मात्र 'सयाम' हें राज्य आपल्यापासून फार दूरावलें आहे.

: ११ :

## सयामची राजकीय कथा

आतां सयामच्या अैतिहासिक वृत्तांताचें असेंच थोडेसें विहंगमावलोकन करून सयामसंबंधींचा भाग आपण पुरा करूं.

सयाममध्यें प्रचलित असलेल्या अेका दंतकथेचें सार, खालीलप्रमाणें आहे. दोन सहस्र वर्षांपूर्वी या देशांत केवळ अरण्यें नि श्वापदें यांचीच वसती होती नि मनुष्यवस्ती तेथें झाली नव्हती. अशावेळीं अेका चिनी सम्राटाच्या मुलानें आपल्या बापाविरुद्ध बंड करून, राज्यपद प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न केला. परंतु, त्यामध्यें त्याचा पराभव होअून तो आपल्या बापाच्या हातीं सांपडला. त्यावेळीं या बंडखोर राजपुत्राला देहान्त शासनच व्हावयाचें; परंतु, राजाच्या कांहीं मित्रांनीं मध्यस्थी करून या बंडखोर राजपुत्राला राज्यपार करण्याची शिक्षा देवविली. त्याप्रमाणें त्या देशपार झालेल्या राजपुत्रानें कांहीं अनुयायासह सयाम देशामध्यें प्रथम येअून आपली वसाहत स्थापन केली. त्यावेळीं सयाममध्यें अेका ठिकाणीं या राजपुत्राला अेक आश्रम लागला. त्या ठिकाणीं सात साधु आश्रम करून रहात होते. ते परस्पर बंधु बंधु होते. हे साधु भारतांतून येअून तेथें तपश्चर्या आचरित होते. त्यांच्या आशीर्वादांनीं नि मार्गदर्शकत्वानें त्या निर्वासित राजपुत्रानें अेक वसाहत स्थापन केली. तीच वसाहत पुढें पुढें वाढत गेली. तेथें भारतांतूनहि अनेक वसाहती जाअून बसल्या. कंबुज ( कांबोडिया ) मध्यें अेक हिंदुराज्य पहिल्या शतकापासूनच वृद्धिंगत होत होतें. हें कंबुजच्या अितिहासांत आपण पाहिलेंच आहे. त्याच कंबुजच्या हिंदुराज्यानें हळूं हळूं हा सयामचा प्रदेश आपल्या सत्तेखालीं आणून, तेथें हिंदुधर्म संस्कृतीचाच पगडा बसविला. त्याच वेळीं भारतांतूनहि विशेषतः तामिल देशांतून अनेक हिंदु व्यापारी, व्यापाराकरितां येथें येअून वसाहत करूं लागले. याप्रमाणें सुमारें तिसऱ्या शतकापासून सयाममध्यें कंबुजच्या हिंदुराज्याच्या अधिपत्याखालीं, सयाम ही भारतीय हिंदूंची अेक अुदयोन्मुख वसाहत बनली. अशाच अवस्थेंत सयामचीं पहिलीं अेक सहस्र वर्षें कंबुजच्या अितिहासांत निगडीत झाली आहेत.

या अेक सहस्र वर्षांच्या कंबुज साम्राज्या अंतर्गत असलेल्या अवस्थेनंतर अेका वीर पुरुषानें सयामला कंबुजच्या हिंदु साम्राज्यांतून स्वतंत्र केलें. त्याचें, नांव 'अिंद्रादित्य' असें होतें. तोहि संपूर्णपणें हिंदुधर्माचा अभिमानी असून स्वतः शव होता. तेव्हां शैवधर्मच राष्ट्रधर्म बनला. अनेक शिवमंदिरें सयामभर निर्माण झालीं. यानंतर हळूंहळूं बौद्धधर्माचाहि अुदय होअूं लागला.

अिंद्रादित्यानें अि. स. १२१८ मध्यें आपलें स्वतंत्र राज्य स्थापन केलें. यानें 'सुखोदय' या नांवानें आपली राजधानी स्थापन केली. अिंद्रादित्याचा तिसरा मुलगा रामखमूहेङ हा मोठा पितृभक्त, सदाचारी, भ्रातृभक्त, शूर, नि विद्वान् निघाला. त्यानें आपलें आत्मवृत्त लिहून ठेविलें आहे. तें वृत्त नुकतेच संशोधित झालें आहे. आपल्याअिकडे राजे लोक तर काय, पण कुणीं मुत्सद्दी विद्वान् लोकही आपलें आत्मवृत्त किंवा दैनंदिनींहि सर्व साधारणपणें लिहित नसत. यामुळें आपला कितीतरी अितिहास कालाच्या नि विस्मृतीच्या अुदरांत गडप झाला. आत्मवृत्तें काय किंवा अन्यवृत्तें काय, लिहिण्याची संवयच आपल्या लोकांना कमी. अशा परिस्थितींत रामखमूहेङ यानें आपलें आत्मवृत्त लिहिलें नि तें अितकें शतकानंतर आज अुपलब्ध झालें हें सुभाग्य समजलें पाहिजे. या आत्मचरित्रावरून आपल्याला तीन राजांच्या राजवटींची माहिती मिळते. सयामचा पहिला राजा अिंद्रादित्य, त्याचा दुसरा मुलगा 'बान-मुराण', नि तिसरा मुलगा, स्वतः रामखमूहेङ् आपण अेकंदर पांच भाअू बहिणी होतों असें लिहितो. त्यांपैकीं तीन, भाअू नि दोन बहिणी. सर्वांस वडिल भाअू अल्प वयातच मृत्युवश झाला. दुसरा भाअू 'बान् मुराण' हा अिंद्रादित्याच्या मागून गादीवर बसला नि त्याच्या मृत्यूनंतर स्वतः रामखमूहेङ हा गादीवर बसला. रामखमूहेङ् यानें पित्याची अेकनिष्ठ सेवा केली, तशीच वडील भाअू 'बान् मुराण' याचीहि केली. त्यावेळीं तो सेनापति होता. त्याच्या पराक्रमानें सयामचें हें नूतन स्थापन झालेलें राज्य सुरक्षित झालें, नि अुन्नति पावूं लागलें. स्वतः रामखमूहेङ हा अि. स. १२८३ मध्यें गादीवर आला. हा जसा शूर तसा विद्वानहि होता. 'सुखोदय' ही सयामची राजधानी असतांना अि. स. १२१८ ते १२७६ पर्यंत जे राजे गादीवर आले, त्यामध्यें रामखमूहेङ याची योग्यता फार मोठी आहे. यानेच सयामची वर्णमाला प्रचलित केली. यावेळीं सयाम-मध्यें हिंदूधर्मांशेजारीच बौद्धधर्माचाहि प्रचार चालला होता. परंतु, दोन्हीहि धर्मांकडे सयामी राजे सारख्याच सहिष्णुतेनें नि आदरानें पहात असल्यानें धार्मिक वैरभाव वाढला नाहीं. यावेळीं सुखोदय राजधानी नांवाप्रमाणें सर्व सुखांनीं भरलेली होती. या नगराची रचना अत्यंत रेखीव नि संरक्षित होती. सर्व नगर, अुद्यानें, तलाव, बुद्धविहार, विशाल मंदिरें, व्यापार,

पेठा, सार्वजनिक चौकांचौकांतून मनोहर कारंजी आणि या नगरासभोंवार समृद्ध शेती यांनीं संपन्न होते. नगराभोंवतीं भक्कम असा तट होता नि त्यास चार नगरद्वारें होतीं. रामखमृहेङ् याची तुलना त्यावेळचे लोक प्रतापी भारतीय विक्रमाशी करीत असत. कोणत्याहि प्रजाजनाला थेट राजापर्यंत दाद मागतां येत असे. अशारीतीनें अत्यंत न्यायीपणानें, पराक्रमानें, प्रजावत्सलतेनें या रामराजानें दीर्घकाळपर्यंत शासन करून, सयामचें राज्यवैभव संपन्न केले.

यानंतरचा सयामचा विख्यात राजा म्हणजे सूर्यवंशराम हा अि. स. १३५५ मध्यें सिंहासनावर बसला. हा जसा शूर, त्याचप्रमाणेंच गाढ विद्वान्हि होता. ज्योतिपशास्त्रामध्यें हा पारंगत होता. हिंदु नि बौद्ध धर्म या दोहोंनाहि यांनीं समानतेनें नि मुक्तहस्तानें आश्रय दिला. राज्यामध्यें ठिकठिकाणी विहार, आश्रम, पाठशाळा, यांनीं काढल्या. जिथें जिथ बुद्धमूर्ति स्थापन केली, तिथें तिथें परमेश्वर, शंकर, विष्णु यांच्याहि मूर्ति स्थापन केल्या. याच सूर्यवंशरामनें लंकेमधून महाबोधिवृक्षाची शाखा मोठ्या समारंभानें सुखोदय मध्यें आणाविली. लंकेमध्यें हा बोधिवृक्ष, अशोक सम्राटाची सुप्रसिद्ध राजकुमारी संघमित्रा अिनें मूळ बोधिवृक्षापासून काढून नेअून लाविली होती. त्याचप्रमाणें लंकेमधील महास्वामी संघराज यासहि सयाममध्यें पाचारण करून त्याचा फार गौरव केला नि विहार बांधून दिलें. अशाच रीतीनें त्यावेळीं भारतामधून विद्वान् ब्राह्मण, धर्मोपदेशक, साहसी वीर, महत्वाकांक्षी व्यापारी लोक हे पूर्वेकडील महत्तर भारताच्या कंबुज, सयाम, जावा वगैरे ठिकाणच्या वैभवशाली वसाहतींत जात होते, नि मातृभूमींतून वारंवार नव हिंदुजीवनाचें चैतन्य पुरवून, त्यांना हिंदुत्वाच्या अभिमानाचें स्फुरण देत होते.

अशारीतीनें सूर्यवंशराम यानें सुखोदय राजधानीला सयाम देशाचें केंद्र करून कला, वैभव, शौर्य, सौख्य, धर्मरतता, विद्वत्ता अित्यादींनीं सयामचें राष्ट्र अुत्कर्षाला नेलें. हा नृपति अि. स. १३५० च्या बेताला वारला.

परंतु, याच्या मागून सुखोदय राजधानीला अुतरती कळा लागली. याचवेळीं सयाममधील द्वारावती या नगराचें महत्त्व वाढत होतें. तेथें सयाम

वंशीयच अेक नवें राजघराणें अुदयास येत होते. या घराण्याचा पहिला राजा रामाधिपति या नांवाचा होता. त्यानें द्वारावति या नगराचें नांव बदलून त्यास 'अयोध्या' ( अजुध्या ) असें नवें नांव दिलें. रामाधिपतीनें राज्यांत भरभराट तर केलीच; परंतु कित्येक नवीन नगरें, मंदिरें, मठहि निर्माण केले.

यानंतर अि. स. १३९४ मध्यें रामराजा गादीवर आला. यानें अेक भव्य बुद्धमंदिर बांधलें. त्यामध्यें अेक मोठें पुस्तकालय निर्माण केलें. यानें अि. स. १४१७ पर्यंत राज्य केलें. त्यानंतर परम राजाधिराज राज्यावर आला यापुढें सुमारें अेक शतकभरचा अितिहास अितकासा ज्ञात नाहीं. सुमारें १५४८ मध्यें वरधीराज या नांवाचा राजा, अयोध्येच्या सिंहासनावर बसला. या राजाच्या कारकीर्दींत ब्रह्मदेशाशीं सयामचा कलह सुरू झाला. वरधीर राजानें 'सेवाय' नामक ब्रह्मदेशाच्या सीमाप्रांताच्या भागावर हल्ला केला नि तो भाग हस्तगत केला. त्यावेळीं हंसनगर ( आजचें पेगू) येथें ब्रह्मी राजा राज्य करीत होता. त्यानें एक मोठें सैन्य पारिपत्याकरितां पाठवून, सयामी सेनेचा मोठा पराभव केला. त्यामध्यें प्रत्यक्ष राजकुमार ब्रह्मी सेनेनें बंदिवान् केला. तेव्हां सयामी राजा वरधीरराज यानें ब्रह्मी राजाला पुष्कळसे हत्ती, घोडे आणि द्रव्य देअून, त्यांच्याशीं संधि केला नि राजपुत्राला सोडवून आणलें. यानंतर लवकरच वरधीरराज मृत्यु पावला नि 'महामहींद्र' या नांवाचा राजा सयामच्या गादीवर बसला. लवकरच अि. स. १५६४ मध्यें ब्रह्मी राजाशीं आणखी कांहीं प्रकरणावरून भांडण सुरू झालें. तेव्हां ब्रह्मी राजानें सयामची राजधानी अयोध्या, अीच्यावरच चाल करून, तिला वेढा दिला. पुष्कळ दिवसपर्यंत लढाई चालली. अन्तीं महामहींद्रांस वाटलें कीं, आपण शत्रूंचा पराजय करण्यास असमर्थ आहोंत. त्यावेळीं तो शत्रूच्या स्वाधीन झाला. ब्रह्मी सेनेनें सर्व राज-परीवार बंदिवान् केला. कांहीं कालानंतर महामहींद्रास ब्रह्मी राजानें अि. स. १५६८ मध्यें मुक्त केलें. हा राजा जेव्हां परत अयोध्यानगरीच्या राजधानीस परत आला, तेव्हां त्याच्या वडील राजपुत्रानें पुन्हां ब्रह्मदेशाशीं लढाअी पुकारली; परन्तु थोड्याच अवधींत ब्रह्मी सैन्यानें पुन्हां अयोध्येवर झडप घालून ती लुटून

टाकली. महींद्राचा ज्येष्टपुत्र मारला गेला. तिसऱ्यांदा ब्रह्मी सैन्यानें सयामचा पराजय केला. या पराजयानें मात्र अयोध्या राजधानीच्या राजसत्तेस अुतरती कळा लागली.

अि. स. १६१० मध्यें अिंद्रराज या नांवाचा राजा अयोध्येचा राजा झाला. याच समयाला पाश्चात्य साहसी लोकांच्या अंगांत अमेरिका कोलंबसाला सांपडल्यापासून, नवेनवे देश शोधण्याचे नि तेथें जसें जमेल तसें व्यापार राज्य या दोन्हीहि स्थापण्याचें, अेक प्रचंड वारें संचरलें होते. त्या वावटळींत स्पेन, पोर्च्युगाल, फ्रान्स, अिंग्लंड, हॉलंड वगैरे देश प्रामुख्यानें सांपडलें होतें, ही टोळधाड याचवेळीं सयाममध्येंहि पोंहचलीं. अि. स. १६०४ मध्यें प्रथम डच लोकांनीं आपली व्यापाराची वखार, अयोध्या नगरींत अुघडलीं; यानंतर पाहतां पाहतां, फ्रेंच, अिंग्लीश आणि स्पानिश लोकांनीहि आपापले बाडबिछानें सयामच्या समुद्रतीरावरील निरनिराळया नगरांत पसरले, व्यापाऱ्यांनीं दुकानें थाटलीं व पाद्र्यांनीं आपलीं 'मिशनें' अुघडलीं, सयामच्या राजानें अि. स. १६५६ च्या बेताला फ्रान्सचा बादशहा पंधरावा लुअि याच्या दरबारीं व्यापारी संधि करण्याकरितां आपले राजदूत पाठवून दिले. पोर्च्युगीज लोकांनीं तर आपल्या पाद्र्यांच्या कारवायांच्या बळावर सयाममध्यें चांगलाच जम बसविला. आणि आश्चर्य हें कीं, हिंदुधर्म नि बौद्धधर्माच्या सहिष्णुतेच्या अतिरिक्त शिकवणीनें, सज्जनदुर्जनामधला फरक ओळखण्याची शक्तीच नष्ट झाल्यानें सयामी राजानें असल्या प्रचारकांनाहि वेतनें देण्याचें आत्मघातकी औदार्य दाखविलें !

याचा जो परिणाम व्हावयाचा तोच झाला. बुद्धधर्म नि हिंदुधर्माला त्यांतच अुतरती कळा लागत चालली. त्यांतच ब्रह्मदेशांशीं वारंवार फटकटी अुत्पन्न होअून, सयामी लोकांचें प्रतिकार सामर्थ्यहि कमी होअूं लागलें. अशा बिकट प्रसंगीं लंकेमधील बौद्ध भिक्षूंनीं सयामला या आपत्तींतून वाचविण्याकरतां अनेक भिक्षु सयाममध्यें पाठविले नि पुनरपि हिंदुसंस्कृतिनिष्ठ बुद्ध हिंदुधर्माचा जोम वाढविला. अिकडे राजकीय क्षेत्रांत अयोध्येचें राजघराणें ब्रह्मी आक्रमणांमुळें निर्बळ नि निःसत्त्व होत चाललें होतें. अशावेळीं सयामला या पाश्चात्य नि अन्य परकीय आक्रमणांतून वाचविण्याकरतां,

अेकाद्या नवजीवनदायी क्रांतीची आवश्यकता होती. याचवेळीं म्हणजे अठराव्या शतकाच्या प्रथमार्धांत भारतखंडांतहि पाश्चात्य लोकांचे असेच आक्रमण सुरूं झालें. होतें. तें थोपवून धरण्याचा भगीरथ प्रयत्न सयाममध्येंही दृढतेनें सुरूं झाला. अयोध्यानगरीची सर्व राजवटी दुर्बल बनली होती. तेव्हां सयाममधील तरुणपिढीनें, क्रुङ्देव ( देवनगर ) या नांवाचें अेक नवें नगर निर्माण केलें. यालाच अिंग्रजादि परके लोक 'बँकांग' असें संबोधतात. या नगरांत अि. स. १७६७ मध्यें, फॉय-ताक या नांवाच्या अेका पराक्रमी सयामी नेत्यानें, अयोध्येच्या पराभवांतून बचावलेल्या शूर नि धर्मनिष्ठ सैनिकांना अेकत्र करून, त्यांच्यामध्यें देवधर्म नि संस्कृति यांचा जाज्वल्य अभिमान निर्माण केला. त्यांतूनच त्यानें अेक सैन्य अुभारलें. या सेनेच्या बलावर नि सेनापतित्वाच्या कौशल्यानें, 'फॉय-ताक' नें अनेक लहानमोठ्या लढाया करून, ब्रह्मी लोकांना सयाममधून बाहेर हांकून लावलें. त्याचवेळीं सयामी लोकांमध्यें जें धर्मशैथिल्य आलें होतें. ते लंकेहून बौद्धभिक्षू आणवून, नि सर्व देशांत ठिकठिकाणीं बौद्ध भिक्षूंचे मठ स्थापून, सयामी लोकांमध्यें पुन्हां अेकदां धर्म नि संस्कृति यांचा जाज्वल्य अभिमान 'फॉय-ताकनें' चेतविला. अशा रीतीनें सयामी राष्ट्रामध्यें धर्मजागृति करून नि परकीयांचे आक्रमण पिटाळून लावून, नवजीवन नि नवचैतन्य खेळूं लागलें. यानेंच बनविलेलें देवनगर ( बंगकॉग ) आतां विजयाच्या वैभवानें शोभित झालें नि फॉयताकनें याच नगरांत आपल्यास चक्रवर्ति राजाचा अभिषेक करून घेअून, देवनगराला राजधानीचें पद अर्पण केलें. ही मंगलघटना अि. स. १७६८ मध्यें घडली नि येथून सयाममध्यें अेक नवें राजघराणें सुरूं झालें.

: १२ :

## सयामची राजकीय कथा

फॉयताकनें अशा रीतीनें सयाममध्यें नवजीवन ओतलें. यावेळीं सयामच्या हिंदुत्वनिष्ठ संस्कृतीवर अेक मोठें संकट कोसळण्याच्या बेतांत होतें. पाश्चात्य खिश्चन राष्ट्रांनीं आपल्या व्यापाऱ्यांच्या नि पाद्री लोकांच्या द्वारें, सयाममध्यें कशी हातपाय पसरविण्याची सुरवात केली होती नि परमत सहिष्णु सयामी राजानें त्यांना किती आतिथ्यानें वागविलें होतें, याचा मागें अेकदां अुल्लेख आलाच आहे. पाद्री लोकांनीं आपलें मायाजाल पसरून, सयामी लोकांमधील धर्माभिमान पोखरण्यस आरंभ केलाच होता नि ब्रह्मी लोकांशीं चाललेल्या दीर्घकालीन झगड्यानें, अयोध्या राजधानींतील केंद्रसत्ता खिळखिळी झाल्यामुळें, सयाममधील सर्वच घडी विघडून गेली होती. त्यामुळें सयाममधील हिंदु नि बुद्ध धर्माला अुतरती कळा लागून, लोकांमध्यें स्वसंकृतीचा अभिमान शिथिल होत चालला होता. याचवेळीं पाद्री लोकांचेहि कपट प्रयत्न नेटानें सुरू झाले अितकेंच नव्हे, तर सयामी राजानें सौजन्यानें जें अेक शिष्टमंडळ फ्रान्सचा राजा पंधरावा लुअी यांजकडे पाठविल्याचा मागें अुल्लेख आला आहे, त्याच्या परत भेटीकरितां फ्रान्सच्या वतीनें जें अेक शिष्टमंडळ सयामला आलें, त्यानें तर सयामच्या हिंदुसंकृतीच्या गळ्यालाच नख लावण्याचा प्रयत्न केला. फ्रान्सचा राजदूत जो सयामला आला, त्यानें प्रत्यक्ष सयामच्या राजालाच खिस्ती धर्माची दीक्षा देण्याचा कपटव्यूह रचला. याचवेळीं सयामच्या राजदरबारीं अेक खिश्चन अधिकारी ‘ कॉन्स्टंटाइन फाअुल्कन ’ या नांवाचा होता. त्यानें राजानें दाखविलेल्या औदार्याचा दुरुपयोग करून कृतघ्नपणें, फ्रान्सच्या राजदूताच्या, सयामी

राजाला खिस्ती करण्याच्या कटांत प्रमुखपणें भाग घेतला. परंतु, सयामी लोकांच्या सुदैवानें, कांहीं धर्माभिमानी लोकांच्या ध्यानीं हें कपट वेळींच येऊन त्यांनीं जनतेला सावध केलें नि कॉन्स्टन्टाअीनच त्या धार्मिक लोकक्षोभाला बळी पडला. नंतर सर्व खिश्चन लोकांविरुद्ध मोहीम सुरू झाली नि त्यांची सयाममधून हकालपट्टी केली गेली. फ्रान्सशीं जे संबंध जुळविण्याचा प्रयत्न केला गेला होता, तो सयामच्या राजानें अेकदम बंद केला. ही घटना अठराव्या शतकाच्या अंताला घडली नि सयाम हिंदुबुद्ध संस्कृतीच्या अुच्छेदाच्या आपत्तींतून वांचला. यानंतर सयामच्या देवनगरला स्थापन झालेल्या फॉयताकच्या राजघराण्यानें लंकेहून बुद्धभिक्षु आणवून सयाममधील विसंघटित झालेला हिंदुबुद्धधर्म पुन्हां संघटित करून सत्व राखलें.

फॉयताकच्या पश्चात फ्रःबुद्धल्ला देवनगरच्या गादीवर आला. तो मोठा कवि होता नि आजहि त्याची कविता सयामी लोक मोठ्या प्रेमानें गात असतात. परन्तु, या राजाच्या राजवटीच्या अुत्तरार्धांत, या राजाला भ्रम झाला. त्यामुळें देशांत पुन्हां अशांतता माजली नि ब्रह्मी आक्रमक नि पाश्चात्य देशचे बकध्यान घेअून बसलेले खिश्चन लोक, यांनीं देशामध्यें पुन्हां क्रांति करण्याचा दुष्ट अुद्योग चालू केला. पण याहिवेळीं सयामचा मुख्य सेनापति ‘ चावफाय चक्री ’ यानें मोठ्या धडाडीनें ही बिकट परिस्थिति निभावून नेली. सयामचा राजा त्यांस झालेल्या भ्रमांतच अंति मरण पावला नि ह्याच पराक्रमी सेनापतीनें देननगरच्या गादीवर स्वतःला अभिषेक करून घेतला. नंतर सयाममध्यें पुन्हां अेकदां समर्थ अशी सत्ता स्थापन होअून, परक्यांचे आक्रमणाचे दुष्ट प्रयत्न विफल झाले. याच पराक्रमी पुरुषानें अेक प्रसिद्ध राजघराणें देवनगरला स्थापन केलें. नि तेंच घराणें अद्याप सयाममध्यें राजपदावर अधिष्ठित आहे. अशा या पराक्रमी पुरुषाचें पूर्वचरित्रहि आश्चर्य-जनक आहे.

या सेनापतीचा पिता अेक भारतांतील खत्री जातीचा व्यापारी होता. तो देवनगरमध्यें कलकत्त्याहून व्यापाराच्या निमित्तानें गेला होता. आपल्या पित्याच्या सांगातीं, १४ वर्षांचें वय असतांना, पुढें लोकोत्तर

होणारा हा बालक, प्रथम देवनगरमध्यें पदार्पण करता झाला. लहानपणापासूनच या मुलाचें चित्त, बडिलांनीं पत्करलेल्या तराजु तागडयांकडे न लागतां, तें नित्य धनुष्यबाण, दांडपट्टा तरवार यांजकडचे आकर्षित होत असे. घोड्यावर बसणें, मल्लयुद्ध खेळणें यामध्येंच त्याचें तरुण मन रमत असे. असा हा चपळ वृत्तीचा नि लढाअु बाण्याचा मुलगा, आपल्या वडिलां सांगाती देवनगरला गेल्यावर, तेथें वडिलांच्या व्यापारी पेढींत निर्जीव मालाची अुलाढाल करण्यांत न रमतां, सयामच्या सैन्यामध्यें अेक साधारण शिपाई म्हणून भर्ती झाला. १८ व्या शतकाचा अंतिमचा हा काळ होता नि तेव्हां सयामच्या राज्यामध्यें जिकडे तिकडे अस्वस्थता माजली होती. सयामनें जिंकिलेल्या कंबुजच्या ( कंम्बोडिया मधल्या ) लहान मोठ्या सरदारांनीं संधि साधेल तेव्हां बंडाळी चालविली होती. याचवेळीं देवनगरला राजधानी बनवून सबंद सयाम राष्ट्राला अेका मोठ्या विप्लवांतून वाचविणारा प्रसिद्ध राष्ट्रोद्धारक फॉयताक नुकताच कालवश झाला होता. त्याच्या मागून आलेला सयामचा राजा जरी मोठा विद्वान् नि पंडित कवि होता, तरी समरपांडित्याची त्याला फारशी आवड नव्हती. त्यामुळें सयाममधील परकी आलेले पाश्चात्य व्यापारी नि पाद्री आणि राज्यांतील बंडखोर सरदारांनीं मधून मधून गडबड चालू केली. अशा अवस्थेंत सैन्यामध्यें सामान्य सैनिक म्हणून शिरलेल्या फायचक्रीनें, आपल्या अंगचे शौर्य, धाडस, नेतेपणा, इत्यादि गुण दाखवून, अल्प अवकाशांतच अनेक विजय मिळवून, राजाचा मोठा विश्वास संपादन केला. त्याच्या अेवढा धाडसी नि यशस्वी सेनापति अन्य कुणी नाहीं असें पाहून, सयामच्या गुणज्ञ राजानें, त्यास मुख्य सेनापति केला. याच वेळीं कंबुजमध्यें बंडाळी माजली होती नि राजालाहि भ्रम होअूं लागला होता. तेव्हां फायचक्रीची योजना कंबुजची बंडाळी नष्ट करण्याकरतां तिकडे करण्यांत आली. फायचक्री कंबुजमध्यें जाअून तिकडील बंडखोरांचें दमन करीत असतांच, अिकडे राजाचा भ्रम वाढून त्यांतच त्याचा अंत झाला. ही बातमी फायचक्रीला कळतांच, तो ससैन्य देवनगर राजधानींत वेगानें दाखल झाला, राज्याभिषेक करून घेअून सर्व सयामचा सार्वभौम राजा बनला. नि सर्व राज्यसत्ता हातीं घेअून अि. स. १८०६ मध्यें

राज्याभिषेकाच्या वेळीं यांनीं आपल्याला 'पहिला राम' अशी पदवी धारण केली. तेव्हांपासून हें प्रसिद्ध भारतीयवंशोद्भव रामघराणें, सयामचें शासन करीत आहे.

परकीय धाडसी लोकांनीं हिंदुस्थानांत येअुन, क्लाअिव्हासारख्या अेकाद्या अुडाणटप्पू म्हणून गणल्या गेलेल्या तरुणानें राजसत्ता स्थापन करावी, हें वाचून कितीतरी हिंदुतरुण आजपर्यंत दिपून जाअून आश्चर्यमुग्ध झाले असतील आणि हिंदुजातींतून असे तेजस्वी तरुण कसले अुसन्न होतात, असल्या आत्मवंचक विचारानें निराश बनले असतील. अशा हताश झालेल्या हिंदुतरुणांनां, सयामच्या ह्या प्रतापी पहिल्या रामराजाचें प्रभावी चरित्र निश्चितपणें नवीन स्फूर्ति देअील. आपल्याहि पूर्वजांत क्लाअिव्हसारखे धाडसी लोक निघून, त्यांनीं द्वीपांतरास जाअून, नवीन राज्यें निर्माण केलीं, नवीन राजवंश प्रचलित केले, नवीन राष्ट्रें जन्मास घातलीं ! आणि ही कांहीं फार पुराणकालची घटना नव्हे ! अगदीं परवांची—केवळ सवाशें वर्षां-पूर्वींची ही घटना आहे ! हिंदु जाती ही ज्याचीं मुळें भूगर्भांतील जिवंत-पाण्याच्या पातळीपर्यंत पोंचलेली आहेत, अशा काशींतील अध्यक्ष विशाल-वटवृक्षाप्रमाणें आहे. या वृक्षावरची अेकादी शाखा जरी पर्णहीन होअून गोठून जाअूं लागतें, तरीं त्याच वेळीं दुसऱ्या अेखाद्या बाजूला नवीन पल्लवानीं बहरलेली दुसरी अेखादी शाखा फुटत असते ! १९ व्या शतकाच्या आरंभीं, प्रबल अशा मराठे हिंदूंचें साम्राज्य जरी कोमेजून जात होते, तरी ह्याचवेळीं सयामसारख्या दूर द्विपांतरी, अेक हिंदुरामराजा दुसरें अेक प्रबल हिंदुसाम्राज्य प्रस्थापित करीत होता ! हिंदुजातीच्या अितिहासांत हे असले चमत्कार नित्यच पहावयास मिळतात. अेक सहस्त्र वर्षांपासून अुत्तर हिंदुस्थानांतील हिंदुसाम्राज्यें जरी गळून पडत होतीं, तरी दक्षिण हिंदु-स्थानांत देवगीरीच्या यादवांचें प्रबल साम्राज्य नांदत होतें. हें यादवांचें साम्राज्ये ज्यावेळीं कोसळत होते, ह्याचवेळीं कंबुज ( कांबोडिया ), चंपा सयाम, जावा, सुमात्रा, ते बोर्निओपर्यंत अनेक प्रबळ हिंदुराज्यें नि हिंदु-साम्राज्यें हिंदुसंस्कृतीचा विजयीध्वज, सर्व पूर्व दक्षिण आशियाभर नि हिंदु महासागरावर नि प्रशांत महासागरावर डालौनें मिरवीत होती ! यादवांचें

प्रबळ साम्राज्य अंतीं जेव्हां कोसळून पडलें, तेव्हांपासून अर्धशतकाच्या आंतच तुंगभद्रेच्या तीरीं विजयनगरचें प्रचंड हिंदुसाम्राज्ये पल्लवित होत होतें. तीनशें वर्षांनंतर, ज्यावेळीं ती शाखा कोमेजत होती, त्याचवेळीं महाराष्ट्रांतील सह्याद्रीच्या दऱ्यांखोऱ्यांमधून, मराठी हिंदूंच्या साम्राज्याची प्राणप्रतिष्ठा होत होती. होता होतां हें मराठी हिंदूंचें साम्राज्य अितक्या जोमानें नि पवन वेगानें फोफावलें कीं, त्याच्या विशाल शाखा, अुपशाखाना पल्लवित, कुसुमित, नि सुफलित होअून अेक शतकांतच जवळजवळ अखिल हिंदुस्थान व्यापून टाकला !

अशा रीतीनें हिंदुजातीचा हा अक्षय्य वटवृक्ष, मानवजातीच्या मानवतेच्या आदीपासून, अनुप्राणित होत आला आहे आणि कांहीं काळ, कांहीं शाखा, जरी याच्या कोमेजल्या, कोसळल्या, तरी या जिवट हिंदुजातीच्या वटवृक्षाला, नवीन अनेक जोमदार शाखा फुटत आणि फुलत असतात, असा हा अखंड अितिहास आहे.

असो; अशा रीतीनें अेका हिंदुपुत्रानें सयामचें विस्खळित झालेलें राज्य पुन्हां संघटित करून ' पहिला राम ' ही हिंदुत्वाभिमानदर्शक पदवी धारण करून, अि. स. १८०६ च्या बेताला सयामचें राजपद पुनर्जीवित केलें.

याच्या पुढच्या वंशजांनींहि हीच महनीच ' राम ' पदवी, आपल्या घराण्याला मोठ्या अभिमानानें लावली, आणि सांप्रतचे सयामचे राजे, ' आठवे राम ' या नांवानें सयामच्या गादीवर अधिष्ठित आहेत.

या रामराजांचा राजधर्म बौद्धच आहे. तरी राजघराण्याच्या सर्व धार्मिक विधींतून हिंदुधर्माचेंच प्राबल्य वसत आहे. राज्याभिषेक, चूडासंस्कार, प्रेतदहन संस्कार, राष्ट्रीय अुत्सव, वगैरे प्रसंगी ब्राह्मणांकडूनच प्रमुख विधि हिंदुशास्त्रांप्रमाणें करण्यांत येतात, याचें दिग्दर्शन मागें आलेलेंच आहे. त्यांचे राजपुरोहित हे हिंदूच असतात. सांप्रत, ( १९२८ ) सयामच्या राजघराण्याचे राजपुरोहित, वरराजगुरु वामदेव या नावांचे आहेत. १८०६ पासूनच्या रामराज्याचे शासन काल सर्व साधारणपणें खालीलप्रमाणें आहेत. १८०६–१८१२ पहिले राम. १८१२–१८३२ दुसरे राम. १८३२–१८४४ तिसरे राम. १८४४–१८६७ चवथे राम. १८६७–१९१० पांचवे राम. १९१०–१९२६ सहावे राम.

यानंतर १९२६ वर्षापासून ते १९३५ वर्षापर्यंत प्रजाधिपक हे 'सातवे राम' या पदवीनें सयामवर राज्य करीत होते. त्यांच्याच राजवटींत, इ. स. १९३३ च्या बेताला सयाममध्यें, तरुण सयामी पक्षानें 'विपुल संग्राम' या नांवाच्या अेका तत्कालीन प्रधान मंडळांतीलच समर्थ प्रधानाच्या नेतृत्वाखालीं, रक्तरहित अशी यशस्वी क्रांति केली. या क्रांतिकारकांशीं प्रजाधिपक (अथवा प्रजादीपक) सातवे राम, यांचे न पटल्यामुळें, त्यांनीं १९३४ मध्यें देशत्याग करून अिंग्लंडमध्यें जाअून वास्तव्य केलें. नंतर १९३५ मध्यें, सातवे राम यांना सयामची गादी सोडावी लागली. ह्यानंतर क्रांतिकारक पक्षानें प्रजादीपक यांचे अल्पवयी पुतणे 'आनंद,' यांना सयामचें राजपद नि 'आठवे राम' ही राजपदवी अर्पण करून क्रांतीचें कार्य पूर्ण केलें. सांप्रत हेच 'आठवे राम' आनंद सयामचे राजे आहेत. सध्यां सयामच्या राजकारणाचीं सर्व सूत्रें, क्रांतीचे यशस्वी पुढारी 'विपुलसग्राम' यांचे हातीं असून तेच, मुख्य प्रधान नि जवळ जवळ सर्वाधिकारी झाले आहेत. यांच्याच नेतृत्वाखालीं सयामनें, युरोपांत फ्रान्सचा जर्मनीनें संपूर्ण पराभव करून फ्रान्स जर्मनाना शरण गेल्यानंतर, अिंडोचायना मधील फ्रान्सनें पूर्वीं सयामचा १९०७-८ सालीं जो प्रदेश गिळंकृत केला होता, त्यांपैकीं पुष्कळसा प्रदेश अि. स. १९४१ आरंभीं, फ्रान्सच्या अिंडोचायनावर स्वारी करून जपानच्या मध्यस्तीनें परत मिळविला आहे. त्यानंतर प्रत्यक्ष, जपाननेंच अिंग्लंड, अमेरिका वगैरे मित्रराष्ट्रांविरुद्ध युद्ध पुकारल्यानंतर सयामहि जपानच्या बाजूनें या महायुद्धांत सामील झालें आहे. या त्यांच्या साहसाचा काय परिणाम होतो, तो आज कुणीहि सांगूं शकणार नाहीं. जगभर चाललेल्या या प्रचंड युद्धाच्या अुल्कापातांतून, पुढें कोणती सृष्टि निर्माण होते, हें केवळ अेक भविष्य काळाची देवताच सांगूं शकेल!

अशा रीतीनें हिंदुसंस्कृतीच्याच पोटीं जन्माला आलेल्या या सयामी राष्ट्राचा त्रोटक अितिहास आपण अद्यावत् अवलोकन केला. आतां मागें अेका प्रकरणामध्यें कंबुजमधील अंगकोरवतचे अद्वितीय असें प्रचंड वैष्णव मंदिर, ज्यानें निर्माण करून, हिंदूंच्या प्राचीन शिल्पकलेला अजरामर केलें, त्या विख्यात द्वितीय सूर्यवर्म्याच्या कंबुजमधील राजवटीचा अितिहास

१११२ पर्यंतचा, आपण पाहिल्यानंतर तो अर्धवटच सोडून, अेकाअेकी सांप्रतच्या काळीं युगपरिवर्तन घडवून आणणारा सयामचा अितिहास प्रथम कथन करण्यास घेतला होता. आतां पुढील प्रकरणापासून कंबूजच्या त्या विख्यात हिंदुराज्याच्या अुत्तरार्धाचा अितिहास पुढें कथन करण्यास आरंभ करूं.

## : १३ :

## कंबुज साम्राज्य ( अुत्तरार्ध )

अंगकोरवतचें सुप्रासिद्ध मंदिर अुभारून, कंबुजच्या समृद्ध हिंदुसाम्राज्याच्या मंदिराचेंहि शिखर ज्यानें गाठलें, तो द्वितीय जयवर्मा, बाराव्या शतकाच्या प्रथमार्धापर्यंत राज्य करून दिवंगत झाला. त्याच्यानंतर कंबुजच्या साम्राज्याला अुतरती कळा लागली, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. तरीहि अेक शतकभर कंबुजचें साम्राज्य कष्टानें कां होअीना, परंतु, आपलें आसन राखून होतें. या पतनोन्मुख स्थितीमधील शेवटचा पराक्रमी राजा सातवा जयवर्मा होता. याचे पश्चात् कंबुज साम्राज्यांतील सयाम आणि चंपा येथील मांडलिकांनीं, या कंबुजच्या साम्राज्यसत्तेविरुद्ध बंडें करण्यास आरंभ केला, नि कंबुजचें साम्राज्यपद हळूं हळूं विलुप्त होअूं लागलें. अि. स. १२१८ मध्यें, सयामला स्वतंत्र करणारा पहिला राजा अिंद्रादित्य यानें, कंबुज सैन्याचा पराभव करून, 'सुखोदय' या नांवानें पुढें विख्यात झालेल्या नगराची स्थापना केली नि तेथें आपली राजधानी बसविली. हा वृत्तांत मागें सयामच्या अितिहासांत आपण पाहिलाच आहे. त्याचवेळीं चंपाचें मांडलीक राज्यहि स्वतंत्र झालें नि कंबुजवरच स्वाऱ्या करण्यास आरंभ करून, पूर्वीच्या साम्राज्य सत्तेलाच त्यांनीं आपलें मांडलिक बनविलें. हीं तीनहि राज्यें हिंदुसंस्कृतीचींच संतानें होतीं. म्हणून राजसत्तेचीं केंद्रें जरी बदलली, तरी हिंदुसंस्कृतीचा विकास अक्षयतेनें चालू राहिला.

चौदाव्या शतकांत तर सयामच्या राजांनीं कंबूजची राजधानी जी 'अंकोरथोम्', अिच्यावरच वारंवार आक्रमणें करून, कंबूज-राजसत्ता संत्रस्त केली. अन्तीं कंबुजच्या राजांनी 'अंकोरथोम्' येथून राजधानी अुठवून, तीं-दूरच्या प्रदेशांत अुत्तरेला 'लोवक' येथें नेली. ही गोष्ट १६ व्या शतकांत घडली. यानंतर सतराव्या शतकांत पाश्चात्य युरोपियन राष्ट्रांनीं कंबुज-वर आक्रमण करण्यास आरंभ केला. युरोपियन राष्ट्रांचें आक्रमण सुरू होतांच, कंबुजवर तेथील राजसत्ता अधिकच क्षीणबल झाली. अिकडे सयाम नि चंपा येथील राजांमध्यें कंबुजचें राज्य जिंकिण्यासंबंधीं अनेकवार लढाया चालू झाल्या. या दीर्घकालीन चाललेल्या, सयाम नि चंपा येथील राजांच्या झटापटींत, अंतीं सयामच्या गादीवर अि. स. १८४४ मध्यें बसलेल्या 'चवथे राम' यांनीं पराक्रमानें, चंपाच्या सैन्याला पराभूत करून, कंबुजचें सिंहासन हस्तगत केलें. आतांपर्यंत कंबुजचें राजे जरी बुद्ध धर्माला मोठ्या प्रेमानें नि भक्तीनें संरक्षण नि अुत्तेजन देत होते, तरीं राजघराणें हिंदुधर्मीयच होतें. परंतु, सयामच्या 'चवथ्या रामनें' कंबुजच्या राजाचा पराभव केल्यापासून, तेथील राजेहि बौद्ध धर्मानुयायी बनलें, ते अद्यावत् बौद्ध-धर्मीयच आहेत.

येथें अेक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, बृहत्तर भारताच्या या सर्व वसाहतींच्या साम्राज्यामध्यें, हिंदु-धर्म नि बौद्ध-धर्म हे जुळया भावांप्रमाणेंच अेकत्र नांदत आणि भरभराटत असत. पहिलें मलयसाम्राज्य होतें, तेव्हां हे दोन्हीहि धर्म सारखेच वृद्धिंगत होत होते नि त्यांची संस्कृति, तर अेकच होती. ते मलय साम्राज्य लुप्त होअुन, तेथें कंबुजच्या साम्राज्याचा अुदय झाला तेव्हांहि हिंदुसंस्कृतीला, यत्किंचितहि धोका न पोहचतां, केवळ राजसत्तेची आलटापालट झाली अेवढेंच. त्यानंतर चंपा नि सयाम येथें नवीन राज्यें जन्माला आली नि कंबुज साम्राज्य विलयाला जाअून प्रत्यक्ष कंबुजच सयामचें मांडलिक बनलें. तरी, या सर्व हिंदुवसाहतींच्या हिंदुसंस्कृतीच्या जीवनांमध्यें कसलाहि खंड पडला नाहीं; किंवा त्यावर कसलाहि आघात झाला नाहीं. हिंदुस्थानमध्यें ज्याप्रमाणें कधीं मगध तर कधीं अिंद्रप्रस्थ, कधीं शातवाहन तर कधीं राष्ट्रकूट, कधीं विक्रमादित्य तर कधीं हर्ष असे निरनिराळे सम्राट् नि साम्राज्यें जरी अुदयाला येअून राजसत्तेचें संक्रमण होत गेलें, तरी सांस्कृ-

तिक जीवन नि धार्मिक प्रवाह त्रुटित झाले नाहींत; तद्वतच या बृहत्तर भारताच्या विशाल विस्तारामध्यें जोपर्यंत खिश्चन किंवा अिस्लामी पंथीयांचा प्रवेश नि आक्रमण सुरू झाले नव्हते, तोंपर्यंत या ठिकाणचें हिंदुसांस्कृतिक जीवन अक्षुण्णच राहिलें.

वर सांगितल्याप्रमाणें अि. स. १८४६ मध्यें सयामच्या 'चतुर्थरामराजानें' कंबुजचें राज्य अंकित केल्यावर, सुमारें अर्ध शतकानें, हिंदुचीनमध्यें हळूंहळूं आक्रमण करून, तेथील राजसत्ता बळकावून बसलेल्या खिश्चनधर्मी फ्रान्सनें सयामशीं स्पर्धा चालविली. सयामी राष्ट्र त्यावेळीं फ्रान्सच्या मानानें सैनिक सामर्थ्यांत, राजकीय शास्त्रांत, मागासलेलें असल्यानें अि. स. १८८७ या वर्षी, सयामला फ्रान्सशीं अेक अपमानास्पद संधि करावा लागला. त्या अन्वयें, सयामनें कंबुजवरच्या आधिपत्याचा अधिकार सोडून देअून, त्यावर फ्रान्सची सार्वभौम सत्ता मान्य केली. अशा रीतीनें कंबुजचें हें सुप्रसिद्ध हिंदुराज्य प्रथम अि. स. च्या पहिल्या शतकांत, 'कंबुस्वयंभव' या अेका भारतीय राजानें प्रस्थापन केलें, तें प्रथम सहाशें वर्षेपर्यंत प्रतापशाली 'फूनान' अथवा 'मलय' साम्राज्याचें मांडलिक म्हणून नांदलें; नंतर ७ व्या शतकांत, या कंबुजच्या 'भववर्मा' या विख्यात राजानें, मलय साम्राज्यांतून आपली मुक्तता करून, स्वतःच साम्राज्यपद प्राप्त करून घेतलें. तें साम्राज्यपद अि. स. १२१८ पर्यंत सातव्या जयवर्म्याच्या अन्तापर्यंत, म्हणजे सुमारें ६०० वर्षे वैभवानें अुपभोगलें. त्यानंतर सयामनें ते हिरावून घेतल्यावर सुमारें ४-५ शतकें कंबुजचें राजपद सयामच्या राजांच्या अंकित झालें; आणि अि. स. १८८७ च्या वर्षापासून तें फ्रान्सचें केवळ अेक अंकित संस्थान बनलें ! अशा रीतीनें जगांतील अति प्राचीन नि अविच्छिन्नपणें चालत आलेल्या थोड्या राजघराण्यांपैकीं कंबुजचें अेक राजघराणें आहे. आजहि तें संपूर्ण नामशेष न होतां, हिंदुस्थानांतील ब्रिटिशसत्तेखालील-संस्थानांप्रमाणें, फ्रान्सच्या सत्तेखालील अेक संस्थान म्हणून अस्तित्वांत आहेच ! फ्रान्सनें १८८७ नंतर हळूंहळूं, त्या दुष्कीर्त पाश्चात्य राजनीतीच्या शास्त्राप्रमाणें, कंबुजच्या राजांचें सर्व खरेंखुरें राजकीय स्वातंत्र्य हिरावून घेतलें, नि सर्व सत्ता फ्रेंच रेसिडेंटाच्या हातीं केंद्रित केली.

आतां फ्रान्सचा जर्मनीकडून हा प्रचंड पराभव झाल्यावर, फ्रान्सच्या

आधीन असलेल्या इंडोचायनावर जपाननें आपली मगरमिठी बसविली आहे. अर्थात् हें कंबुज म्हणजे सांप्रतचें कंम्बोडियाचें हिंदुसंस्कृतिनिष्ठ राज्यहि जपानच्याच अधिराज्यांत अंतर्भूत झालें आहे. कंबुजचे प्रजाजन नि कंबुजचा राजा, हे बौद्ध–धर्मीयच आहेत. यापुढील कंबुजचेंच काय, परंतु सर्व पूर्व, मध्यम नि दक्षिण आशिया खंडाचे भवितव्य, सांप्रतच्या प्रचंड जगद्व्यापी युद्धाच्या मुशींत ओतलें गेलें आहे. त्यांतून कोणत्या राष्ट्रांची कशी मूस बनली जाते, हें केवळ भविष्यकाळ भूतकाळ झाल्यावरच कळेल !

## कंबुज ( कांबोडिया ) मधील हिंदुसंस्कृतीचें दर्शन.

आपण मागें पाहिलें आहे कीं, कंबुजचें राज्य जरीं अि. स. च्या पहिल्या शतकांतच हिंदुवीरांच्या, हिंदु धाडसी व्यापाऱ्यांच्या आणि महत्वाकांक्षी हिंदु वसाहतवाल्यांच्या प्रयत्नांनीं, हिंदु संस्कृतीचें अेक केंद्र बनलें होतें. तरी तें ६ शतकेंपर्यंत, फूनान अथवा मलयहिंदु–साम्राज्याच्या अंकितच होतें. नंतर कंबुजचा पराक्रमी राजा भववर्मा नि त्याचा तसाच पराक्रमी भाअू चित्रसेन यांनीं मलयसाम्राज्याच्या दुर्बल बनलेल्या सम्राटांचा पराभव करून, कंबुजला साम्राज्यपद प्राप्त करून दिलें. त्या वेळेपासून पूर्व आशियांतील सर्व हिंदुसंस्कृतींच्या विजयी प्रसाराचें केंद्र, पुढील सहा शतकेंपर्यंत कंबुजच राहिलें. भारतामधून अनेक धाडसी वीर, विद्वान् पंडित, प्रतिभावान् कवि, ज्योतिषी, गायक, वैद्यशास्त्रपारंगत असलेले भिषग्वर्य, शिल्पज्ञ, गणिती असे सर्व वर्गांचे नि सर्व प्रतींचे सहस्त्रावधि भारतीय लोक, अंग, वंग, कलिंग, आंध्र, पांड्य, चोल अित्यादि, विशेषतः समुद्रतीराच्या बाजूकडील हिंदुलोक कंबुज, चंपा, सयाममध्यें अभ्याहत जात होते. कंबुजच्या वैभवशाली हिंदुसाम्राज्यामध्यें, भारतामधील सर्व प्रकारच्या हिंदु संस्कृतींचें जणुं यथातथ्य चित्रच रंगाविलें जात होतें. कंबूजमधील मूळचे रहिवासी ख्मेरवंशीय नि पर्वतामधील प्रदेशांत मानवी सुधारणेच्या प्रथमावस्थेंतच असलेलें 'नेग्रिटो' लोक यांना, पाश्चात्य लोकांप्रमाणें तुच्छ न लेखतां अथवा त्यांना निर्मूल न करतां, हिंदुधर्माची, हिंदु चालीरीतींची, हिंदु पुराणपरंपरेची दीक्षा तेथील हिंदुराजांनीं त्यांना देअून सुसंस्कृत केलें. अितकेंच नव्हे तर, अशा सुसंस्कृत झालेल्या तद्देशीय लोकांनां, समानतेचा अधिकार देअून, त्यांच्याशी आंतरविवाहहि करून, त्यांचें जीवन पूर्ण हिंदु करून टाकलें, कंबुजमध्यें भारतां-

तील हिंदुधर्मांतर्गत सर्व पंथ विद्यमान होते. बुद्ध, शैव, वैष्णव अित्यादि सर्व पंथोपपंथानां कुंबुजचे सम्राट अेकाच दृष्टीनें पहात होते, नि समानतेनें त्यांना वागवून, राजाश्रयहि देत होते. कंबुजचे सम्राट स्वतः शैव होते. त्यामुळें कंबुज राज्यांत विशाल शिवमंदिरें विपुल बांधलीं गेलीं नि त्यांतील त्रिकाल पूजेनें नि मंत्रघोषानें कंबुजचें वातावरण कित्येक शतकें पावित्र्यानें भारून गेलें होतें. कंबुजचें बहुतेक सर्व सम्राट शिल्पकलेचे मोठे भोक्ते होते नि आपल्या राज्यांत सुंदर मंदिरें, रम्य आश्रम, मठ, नि प्रासाद बांधण्यांत जणु अहमहमिका लावीत होतें. यामुळें भारतीय शिल्पकलेचें कमनीय आविष्करण कंबुजमध्यें प्राचीन काळीं सर्वत्र दिसून आलें. त्या पूर्व वैभवाचे अवशेष, सध्यांच्या काळीं विशेषतः गेल्या दहा बारा वर्षांत–फ्रेंच संशोधकांच्या असामान्य परिश्रमांनीं, अुपलब्ध होत आहेत. सांप्रत, गहन अरण्यांनीं संकीर्ण झालेले भूभाग, पूर्वीं गगनचुंबी मंदिरांनीं, विलासी प्रासादांनीं, मनोरम अुद्यानांनीं, अमरावतीशीं स्पर्धा करीत होते ! आणि ही सर्व कमनीय स्थापत्यनिर्मिति, कंबुजचें सम्राट्कुल भारतीय सम्राट्कुलाचें अनुकरण करून, राज्यशासन करीत होते. कंबूजच्या राजकुलानें स्वतःपुढें 'वर्मा' ही भारतीय संस्कृति-दर्शक पदवी धारण केली होती. या राजकुलामध्यें जसे शस्त्रविशारद नृपांते अुत्पन्न झाले, तसेच शास्त्रविशारद नृपतीहि अुत्पन्न झाले. 'अिदं ब्राह्मं। अिदं क्षात्रम्' ही परंपरा, भारतीय नृपतीप्रमाणेंच कंबूजच्या नृपतींनींहि अुत्कृष्टपणानें आचरली. याचीं कांहीं थोडीं अुदाहरणें देअू. अि. स. ८७७ मध्यें 'अिंद्रवर्मा' हा कंबूज साम्राज्याचा शास्ता झाला. तो महापराक्रमी तर होताच, परंतु तो अुच्च कोटीचा कवीहि होता. त्याचा पुत्र **यशोवर्मा** हा अि. स. ८८७ मध्यें सिंहासनावर बसला. तो अुत्तम सेनानायक तर होताच, परंतु, वैद्यविद्येवर त्याचा मोठा अधिकार होता. सुश्रुतावर त्यानें ग्रंथ लिहिला होता. त्याचप्रमाणें शिल्प, भाषा, नृत्य, यां मध्येंहि तो प्रवीण होता. अि. स. ९४४ मध्यें राजेंद्रवर्मा या नांवाचा असाच विख्यात नृपवर होअून गेला. त्यानें चंपा येथील मांडलिकानें केकेलें बंड, स्वतः सैन्याचें आधिपत्य घेअून मोडून काढलें. त्याचप्रमाणें तो विद्वान्हि होता. विशेषतः तो मोठा वैय्याकरणी होता. पाणितीच्या ग्रंथावर त्याचा अधिकार सर्वमान्य गणला गेला होता. या प्रमुख अुदाहरणावरून कंबूजचा हा राजवंश भारतीय राजत्वाच्या ध्येयाचें अनुकरण करण्यांत किती पूर्णत्वाला गेला होता, हें ध्यानीं येअील.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
५५२८
ग्रंथ संग्रहालय

: १४ :

# कंबूजचा सांस्कृतिक विकास

## कंबूजची राजसभा

कंबूजच्या सम्राटांच्या राजसभेचा थाट, अेखाद्या विक्रमादित्याच्या अेखाद्या हर्षवर्धनाच्या, अेखाद्या दक्षिण हिंदुस्थानमधील पुलकेशीच्या अथवा काश्मीरमधील अेखाद्या ललितादित्याच्या राजसभेसारखाच असे. या राजसभेमध्यें, विद्वान ब्राह्मण, पुरोहित, न्यायशास्त्री, राजगुरु, सेनापति नि अन्यान्य राजविभागाचे मंत्री विराजमान होत असत. मुख्य प्रधानाला राजमहामात्य नि मुख्य सेनापतीला, महासेनापति अशा पदव्या असत. महासेनापतीचा अधिकार बहुधा सम्राटाच्या बंधुगणामध्यें दिला जात असे. राजशासन हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें चालत असे. राजगुरूंची योग्यता नि सन्मान मोठा केला जात असे. या पदावर अत्यंत विद्वान, धर्मपरायण, निःस्पृह, तेजस्वी अशाच गुरूंची योजना केली जात असे. या राजाधिकाऱ्यांप्रमाणेंच वेद, वेदांग, योगशास्त्र, व्याकरणशास्त्र, ज्योतिषशास्त्र यामध्यें पारंगत झालेले विद्वान अधिकारी ब्राह्मणहि सन्मानानें नेमले जात असत.

## कंबुजमधील राज्यशासन.

कंबुजची राजसत्ता, त्यावेळच्या भारतांतील राजसत्तेप्रमाणेंच, स्वयंपूर्ण नि अनिर्बंध होती. ते पृथिवीपति, महाराजाधिराज, राजाधिराज वगैरे भारतीय राजपदव्यासारख्याच पदव्या, आपणांस धारण करीत असत.

## शिक्षण.

राज्यामध्यें प्रजेच्या शिक्षणाकरतां वेदवेदांगांच्या, त्याचप्रमाणें अन्य-

शास्त्र-शिक्षणाच्या पाठशाला, अुच्च-विद्यापीठें, आश्रम, नि मठ स्थापले जात असत. **येथें विनामूल्य शिक्षण दिलें जात असे.** शिक्षकवर्ग, त्या त्या वर्गांतील निष्णात आचार्यांमधून राजाकडून नेमला जात असे. विशेष अुत्सवांमध्यें शास्त्रोत्सव होत असत. यावेळीं अनेक विद्वान् लोक निरनिराळ्या विषयांवर चर्चा करीत असत. नि यामध्यें विद्वान् स्त्रियाहि भाग घेत असत नि विजयहि संपादित असत. या संस्थांप्रमाणेंच, धार्मिक शिक्षण, धर्माभिमान सदाचार, सात्त्विक वृत्ति यांचा प्रजेमध्यें प्रसार करण्याकरितां, कंबूजसम्राट् वारंवार, महाहोम, लक्षहोम, कोटिहोम आदि वैदिक होमसत्रेंहि अुघडीत असत. यांवाचून अनेक मंदिरांमधून रामायण, महाभारत, आणि अन्य पुराण-धर्मग्रंथ यांचे अखंड पाठ सुरू असत. नुकत्याच अुपलब्ध झालेल्या कंबूजमधील संशोधनांतील लेखामध्यें या प्रकारांचें निर्देश नि वर्णनें आलीं आहेत. संस्कृत भाषेवर राजघराण्याचें नि विद्वान् लोकांचें फार प्रेम होतें. संस्कृतमध्यें खोदलेले कंबूजमधील लेख, तेथील लोकांचे संस्कृतवरील प्रेम दिग्दर्शित करीत आहेत. या सर्व विद्यांचा विकास होण्यास अवश्य असणारें ग्रंथसंग्रहालयहि राजाश्रयाखालीं अनेक मंदिरें नि मठांमध्यें केले जात असते.

## आरोग्य रक्षण.

अशा रीतीनें कंबूजमधील हिंदुसम्राट्, आपल्या प्रजेच्या मानसिक आरोग्याकरतां, आणि अज्ञानाचा रोग घालविण्याकरतां काय काय योजना करीत होते, हें आपण वर संक्षिप्तपणें पाहिलें. आतां कंबूजसाम्राज्यांतील प्रजेच्या शारीरिक आरोग्याकरतां, कंबूज-सम्राटांनीं काय काय योजना योजल्या होत्या, हें आपण थोडक्यांत पाहूं. बाराव्या शतकांत झालेला, कंबूजचा अंतिमचा पराक्रमी राजा सातवा जयवर्मा, यांचे कांहीं लेख त्या प्रांतांमध्यें अुपलब्ध झाले आहेत, त्यावरून कंबूजच्या सम्राटांनीं आपल्या प्रजेच्या आरोग्यासाठी केवढी दक्षता बाळगली होती, नि त्याकरतां किती तरी द्रव्य ते सढळ हातानें व्यय करीत होते, हें दिसून येईल.

अनेक चिकित्सालयें, रुग्णालयें नि औषधालयें, राज्यामध्यें राजद्रव्यानें अुभारलीं होतीं. **राजा सातवा जयवर्मा** म्हणतो कीं, माझ्या राज्यांत अेकंदर १०२ आरोग्यालयें प्रमुख ठिकाणीं अुघडलीं होतीं. तो पुढें म्हणतो कीं,

कुशल वैद्यांच्या सहाय्यानें, मी माझ्या राज्यांत सर्व रोगांचा मूलच्छेद केला. या चिकित्सालयांमध्यें नि आरोग्यालयामध्यें दोन प्रकारचीं खातीं असत. अेका खात्याचें नांव 'स्थितिदायिनः' ( Indoor patients ) आणि दुसऱ्या खात्याचें नांव 'स्थितिदाः' ( Out door patients ). यांपैकीं प्रत्येक खात्यांत कमींतकमी दोन प्रमुख वैद्य, तीन परिचारक, दोन स्वयंपाकी, दोन औषधमिश्रक, ( Compounders ) चौदा दाया आणि आठ स्त्रीपरिचारिका नेमलेल्या असत. त्या सबंद विस्तृत राज्यामध्यें या असल्या परिचारक नि चाकरलोकांची अेकंदर संख्या ८१, ६४० होती ! याच लेखांत, रोग्यांनां देण्यांत येणाऱ्या अनेक औषधांचाहि अुल्लेख केला आहे. या लेखांत, हीं आरोग्यालयें अुघडण्याचा अुद्देश खालीलप्रमाणें प्रकट केला आहे.

**देहिनां देहरोगो यन्मनो रोगो रुजत्तराम् ।**
**राष्ट्रदुःखंहि भर्तृणां दुःखं दुःख तु नात्मनः ॥**

अशा रीतीनें राष्ट्रांतील लोकांचे रोग, दुःख, हेच राष्ट्ररक्षक राजांचे खरे रोग, दुःख असतें, स्वतः चे रोग, दुःख नव्हे हा अुदात्त भारतीय राजनीतीचा भाव, हृदयांत बाळगून, कंबुजच्या नृपतींनीं मुक्तहस्तानें आपल्या प्रजेच्या आरोग्यरक्षणासाठीं द्रव्याचा व्यय करून, आरोग्य साधनाच्या विपुल सोअी निर्माण केल्या होत्या आणि हें सर्व पाहून त्या पूर्वकालीन वसाहतींसंबंधीं आदरानें नि अभिमानानें, कोणा हिंदूचें हृदय भरून येणार नाहीं ! आणि विशेषतः या सुधारलेल्या विसाव्या शतकांत, भारतांतील परकीय सत्तेनें येथील प्रजेचें आरोग्य राखण्याकरतां काय प्रयत्न केले आहेत, हें तुलनेनें पाहिलें म्हणजे हा आदर नि अभिमान द्विगुणित झाल्यावांचून रहाणार नाहीं.

## धर्म

कंबुजमध्यें प्रथम भारतीय वसाहत करणारा कौंडिण्य या नांवाचा अेक महातेजस्वी नि पराक्रमी ब्राह्मण होता. त्यानेंच कंबुजमध्यें ( जें त्यावेळीं फूनान अथवा 'मलय' साम्राज्याच्या अंतर्गत होतें ) सर्व भारतीय धर्मांची नि संस्कृतीची प्रस्थापना केली. स्वतः तो मोठा शिवभक्त होता. त्यामुळें कंबुजमध्येंहि शैव पंथाचे प्राबल्य स्थापन झालें. कांहीं कालानें कंबुजमध्यें बौद्ध धर्माचाहि प्रचार झाला. परंतु, त्यामुळें शैव धर्माला गौणपद आलें नाहीं.

हें हिंदुधर्मांतर्गत शैव धर्माचें प्राबल्य अगदीं परवां परवांपर्यंत म्हणजे अि. स. १८४४ पर्यंत टिकून होतें. त्यावेळीं सयामच्या बुद्धधर्मी चवथ्या रामनें, कंबुजच्या राजाचा मोठा पराभव करून, त्याचें राज्य आपल्या शासनाखालीं आणलें. तेव्हांपासून कंबूजच्या राजघराण्यानेंहि बुद्ध धर्माचा अंगिकार केला नि तें घराणें सांप्रतहि बुद्धधर्मीयच राहिलें आहे; म्हणजे अि. स. च्या पहिल्या शतकापासून, तों एकोणिसाव्या शतकाच्या मध्यपर्यंत, सुमारें अठराशें वर्षें, कंबूजमध्यें हिंदुधर्माचेंच अखंड प्राबल्य होतें. हिंदुधर्मांतील शैवपंथच बहुतेक काळीं प्रधानपंथ होता. म्हणून कंबुजमधील देवालयांमध्यें शिवमंदिरांचाच भरणा विपुल आहे.

या मंदिरांमधून कधीं शिवलिंगें अथवा कधीं शिवमूर्ति स्थापन करण्यांत येत असत. शिवलिंगें, दगड आणि धातूंचीं बनवित असत. सम्राट् भववर्मा यानें अेक सोन्याचें लिंग बनविल्याचा अुल्लेख आहे. त्याचप्रमाणें शिव नि विष्णु यांची अेकत्र पूजाहि करण्यांत येत असे. अि. स. ६२७ मध्यें **अीशानवर्मा** या नांवाच्या राजानें, शिवविष्णूची हरिहरांची–अेक मूर्ती बनविली होती. शिवपूजेसोबत देवी पार्वतीचीहि पूजा होत होती हें निराळें सांगणें न लगे. कंबुजमधील अेका नवीन अुत्खननांत पार्वती–स्तवात्मक खालील श्लोक–चरण सांपडला आहेः—

**‘ सा शक्तिर्भुवनेश्वरोदयकरी वागीश्वरी पातुवः ’**

त्याचप्रमाणें शिववाहन जो नंदी, त्याचेंहि अधिष्ठान शिवमंदिरांमधून झालें होतें. तसेंच शिवपुत्र गणपति हेंहि दैवत गणलें जात होतें.

शिवपूजेनंतर विष्णु, ब्रह्मदेव, अिंद्र, सरस्वती, गंगा, लक्ष्मी आदि अन्य हिंदुदेवदेवतांचेहि अुपासनापंथ होते.

बौद्धधर्माचा प्रवेश कंबुजमध्यें अि. स. सातव्या शतकामध्यें झाला. ‘ पूर्णप्रज्ञाचंद्र ’ या नांवाचा अेक थोर भिक्षुक बुद्धधर्माचा प्रमुख प्रचारक त्यावेळीं होता. कंबुजच्या राजांनीं हिंदु नि बौद्ध धर्म या दोघांनांहि मान्यता देअून, दोघांनांहि राजाश्रय दिला. राजेन्द्रवर्मा याचा अेक प्रधान ‘ सत्यवर्मा ’ हा कंबुजमधील बौद्धधर्माचा मोठा विख्यात् पंडित झाला.

अेकंदर आजच्या हिंदुचीनमध्यें कंबूजच्या भागांतच मंदिरें, मूर्ति,

आश्रम हे विपुलतेनें सांपडतात. अिंडोचायनाच्या ( हिंदुचीनच्या ) फ्रेंच सरकारनें या संबंधांत अत्यंत महत्वाचें संशोधन चालविलें होतें. त्यामुळें या विस्मृत नि नष्टप्राय झालेल्या भारताच्या पूर्वकालीन वसाहत साम्राज्याचें ज्ञान अितिहासाच्या कक्षेंत येअूं शकलें. फ्रेंच सरकारचें भारतीयांवर हें मोठें सांस्कृतिक ऋण झालें आहे, यांत शंका नाहीं.

या मंदिरांची व्यवस्था प्रत्यक्ष राजसत्तेनें अगदीं चोख रीतीनें ठेवलेली असे. त्याचप्रमाणें खालील कामगारांचीहि नेमणूक होत असेः—

१ नट ( नर्तक ) २ वाद्य-वादक, ३ देवांच्या दागिन्यांचे रक्षक, ४ हार, तुरे बनविणारे माळी, ५ अग्निकुंडाचे रक्षक, ६ द्वारपाल, ७ पाकशाळाध्यक्ष, ८ पत्रव्यवहार करणारे कामदार, ९ गायक अित्यादि—हें सर्व थोडें विस्तृतपणें अेवढ्याकरतां दिलें आहे कीं, त्यावरून वाचकांस पूर्ण कल्पना येअील कीं, हिंदु-चीन सारख्या भारताबाहेरच्या या दूरच्या देशांतहि हिंदु-संस्कृतीचें बीजारोपण करून, आपल्या सहस्त्रावधि धाडशी पूर्वजांनीं तेथें हिंदुसंस्कृतीचा केवढा भव्य वृक्ष जोपासून, त्याला शतकानुशतकें सुपल्लवित आणि सुफलित केले होते हें पूर्णपणें ध्यानीं यावें.

## सामाजिक व्यवस्था

कंबुजमध्यें आरंभापासून अनेक शतकेंपर्यंत, भारताप्रमाणेंच वर्ण-व्यवस्था नि आश्रमव्यवस्था प्रचलित होती.

अि. स. ९६८ मध्यें कंबुज सिंहासनावर बसलेल्या **पंचम जयवर्म्यानें** चार वर्ण नि चार आश्रम यांची सुव्यवस्था लावून दिली होती. त्यानंतर अि. स. १००२ मध्यें, सूर्यवर्म्यानें पुन्हां या पद्धतीला सुसंघटित स्वरूप दिलें. या व्यवस्थेप्रमाणेंच भारतीय सार्वभौम राजे करीत, तसे यज्ञहि कंबूजचे राजे करीत असत. ' चा-ता-क्वान् ' या चिनी प्रवाशानें कंबूजच्या लोकांचा यज्ञावर मोठा विश्वास आहे, असें लिहून ठेविलें आहे.

मृतसंस्कारासंबंधीं कंबुजमध्यें तीनहि प्रकार प्रचलित होते हें पाहून आश्चर्य वाटतें. पहिला प्रकार, पारशी लोकांसारखा. म्हणजे पर्वत-शिखरावर प्रेतें टाकून देअून, ती पशुपक्षांकडून भक्षण करविण्याचा; दुसरा प्रकार प्रेतें पुरण्याचा नि

तिसरा प्रकार प्रेतें जाळण्याचा. शेवटचे दोन्ही प्रकार हिंदु- मधून तेथें गेलें, हे अुघड आहे. परंतु, पहिला पारशांचा प्रकार- प्रेतें पशु, पक्ष्यांकडून खावविण्याचा मात्र तेथें कसा गेला हें अेक कोडेंच आहे !

मृतांचें सुतक सात दिवस पाळीत असत. शवाला वाजत गाजत नेत असत नि सांप्रत हिंदूलोक जशी चिता रचतात तशीच चितारचून जाळीत असत. नंतर अवशिष्ट राख चांदी सोन्याच्या पात्रांत अथवा मातीच्या सुबक मडक्यांत भरून कोणत्या तरी नदी प्रवाहामध्यें विसर्जन करीत असत.

## कंबुजमधील वाङ्मय.

हिंदुधर्माच्या सांगातीं, अपरिहार्य असलेल्या संस्कृत वाङ्मयाचाहि प्रसार भारतीय वाङ्मयाच्या अनुकरणावर कंबूजमध्यें वेगानें झाला. दहाव्या शतकांत यमुना तीरावर रहाणारा, चतुर्वेद पारंगत असलेला '**भट्ट दिवाकर**' या नांवाचा अेक तेजस्वी ब्राह्मण कंबूजमध्यें गेला. त्यानें कंबूजमध्यें संस्कृत वाङ्मयाचा फार प्रसार केला. त्याची विद्वता, त्याचें तेज याचा प्रभाव, त्यावेळचा विद्याभ्यासंगी राजा 'पंचम जयवर्मा' याच्यावर अितका पडला कीं, राजानें आपल्या बहिणीचें–जिचें नांव 'अिंद्रलक्ष्मी' असें होतें–भट्ट दिवाकराशीं लग्न लावून दिलें नि त्याला आपल्या राजसभेंतील पंडितांचा प्रमुख नेमलें. भारतामधून असे विद्वान् तेजस्वी ब्राह्मण मधून मधून, कंबुजमध्यें जाअून, तेथील संस्कृत वाङ्मय समृद्ध तर करीतच होते, परंतु कंबुजसाम्राज्याचे सम्राटहि समरपांडित्याप्रमाणेंच वाङ्मयपांडित्यामध्येंहि प्रवीण होते, हें आपण मागें पाहिलेंच आहे. हे विद्वान् नृपवर नि त्यांच्या राजसभेंत विलसणारे अनेक पंडित यांनीं, कंबुजमधील संस्कृत वाङ्मय पुष्ट केलें होतें. रामायण, महाभारत हीं हिंदुसंस्कृतीची प्राणभूत झालेलीं पुराण काव्यें कंबुजमध्यें नगरांनगरांमधूनच नव्हे, तर ग्रामाग्रामामधूनहि घोषित होत होतीं. त्यांतील वीररस स्फुरविणारीं तीं महायुद्धें यांच्या कथापठनानें नि पाठनानें सारें कंबुज साम्राज्याचें वातावरण निनादित होत होतें, तेथील ब्राह्मणांचे वर्णन अेका श्लोकार्धामध्यें त्यावेळीं केलेले असें अुपलब्ध आहे:—

**'वेदान्तज्ञानसारैः, स्मृतिपथनिरतैः, अष्टांगयोगप्रकटितकरणैः, चतुर्वेद विज्ञातैः'**

यावरून भारतामधील सर्व विद्या तेथेंहि प्रकट झाली होती हें स्पष्टपणें सिद्ध होतें अि. स. ८८६ मध्यें कंबुजच्या सिंहासनावर बसलेला महावैभवशाली सम्राट **यशोवर्मा** हा तर, सुश्रुत, शिल्प, भाषा, लिपी, नृत्य, गीत आणि अन्य शास्त्रांमध्यें पंडित होता! या सर्व संस्कृत साहित्याच्या सतत अुत्कर्षाचा सुपरिणाम कंबुजची लौकिक भाषा जी 'ख्मेर भाषा' तिच्यावर साहजिकपणें अुत्कटतेनें झाला. आपल्या मराठी, बंगाली वगैरे भाषांमध्यें संस्कृत शब्द जसे विपुलतेनें सांपडतात, तसेंच या ख्मेर भाषेमध्येंहि सांपडतात. ख्मेर भाषेची लिपीहि दक्षिण हिंदुस्थानमधील पल्लव वर्णमालेपासून अुचलली आहे असें कांहीं विद्वानांचें मत आहे.

कंबुजमध्यें भारतीय दंडविधानाची अद्यापहि प्रतिष्ठा ठेवली जात आहे. तेथें दिवाणी आणि फौजदारी कित्येक निर्बंध मनुस्मृतीच्या नियमानुसार पाळले जात आहेत. हिंदुचीनपर्यंत, भारतीय संस्कृतीची अितकी प्रभावी छाप बसलेली होती कीं, परकीय प्रवाशांनीं भारत देशाचीं मर्यादा हिंदु चीन अंतर्गत करूनच वर्णन केली आहे. अि. स. ९०३ मध्यें अेका अरब प्रवाशानें कंबुजसंबंधीं असें लिहिलें आहे कीं, 'कंबुज हा भारत देशाचाच अेक भाग आहे. तेथील निवासी आणि भारतीय लोक यांचा घनिष्ट संबंध आहे. अि. स. ९४३ मध्यें कंबुजमध्यें प्रवास करून गेलेला 'मसूदी' नामक प्रवाशी लिहितो कीं, 'भारत फार विस्तीर्ण देश आहे, भारतांतीलच लोक कंबुजमध्यें जाअून वसाहत करून राहिले आहेत.'

अशा रीतीनें कंबुज (कांबोडिया) मधील आपल्या हिंदु-साम्राज्याचा अितिहास हा अतिशय अुज्वल नि अभिमानास्पद आहे. आणि ही प्राचीनकाळीं अि. स. च्या पहिल्या शतकांत वसलेली हिंदु वसाहत दीड सहस्रवर्षांपेक्षांहि अधिक वर्षेंपर्यंत हिंदुसंस्कृतीचा गौरव अखंडपणें वाढवीत होती!

## : १५ :

## चंपाचें हिंदुराज्य

आतां आपण ज्या हिंदुराज्यासंबंधींचा अितिहास लिहिणार आहोंत, तो विशेषतः आपल्या महाराष्ट्रीयाना विशेषच आत्मीय भाव नि गौरव अुत्पन्न करणारा आहे. कारण, ही चंपाची वसाहत वसविण्यामध्यें, कमीतकमी अि. स. च्या सातव्या शतकापासून महाराष्ट्रीयांनीं भाग घेतला असला पाहिजे. यासंबंधींचा पुरावा पुढें आपण, भाषाशास्त्रदृष्ट्या विद्वानांनीं जें अनुमान काढलें आहे, त्यासंबंधीं विचार करूं तेव्हां कळेलच. 'चंपा' ची वसाहत हिंदु लोकांनीं फार पूर्व काळीं-कांहीं सहस्रवर्षांपासून-वसविली होती, असे अनेक अुल्लेख चंपामध्यें सांपडलेल्या लेखांमधून आढळून आले आहेत. आणि असे अुल्लेख केवळ चंपासंबंधींच नव्हे, तर अिंडोनेशियांतील बहुतेक प्रदेशांसंबंधीं आढळून येतात. आपल्या पुराणांतरींहि कांहीं कांहीं अुल्लेख असे आढळतात कीं, त्यावरून अि. स. च्या पूर्वीहि भारतीय हिंदूंनीं अनेक शतकांपासून जावा, सुमात्रा, तो थेट जपानपर्यंत दिग्विजय करून आपल्या भारतीय संस्कृतीचा झेंडा तेथें अुभा केला होता. यासंबंधींचा खालील अुतारा ध्यानांत भरण्यासारखा आहे. श्री. अे. के. मुझुमदार यांनीं विद्वत्तापूर्वक नि कुशाग्र संशोधनानें 'Hindu History' from B. C. 3000 to A. C. 1200 या नांवाचा एक विस्तृत अितिहास लिहिला आहे. त्यामध्यें पृष्ठ ३७६ ( १९२०-दुसरी आवृत्ति ) ते लिहितातः—

'The Emperor Arjun ( Sahasr'arjun ) of the Haihaya Dynasty, was a great Conqueror and he

conquered not only the whole of India, but a vast territory in the Indian ocean, upto the Pacific. The following are some of the names of the Island Countries, that he had conquered:—

'Tamraku (Ceylon), Gabhastiman (Andamans), Naga (Nicobars), Saumya (Sumatra), Gandharva (Java) Baraha (Bali), kankca (Cocos), Shankha (Hongkong) Favan gaka (Japan) Etc.

This was somewhere in the 1800th Centery B. C. He was the son of Kartaveerya, whom the great Brahmin Hero, Parashuram, defeated and killd, enraged by the atrocities, that Arjun, through the intoxication of his wide Conquest, perpetrated on his own subjects, in general, and the Brahmins, in particular, killing once upon a time, the great sage Jamadagnya, Parshuram's father'

त्याचप्रमाणें चंपामध्येंच सांपडलेल्या अेका लेखामध्यें चंपांत हिंदूंची वसाहत पांच सहस्र वर्षांपूर्वी द्वापारयुगामध्यें सगरपुत्रांपैकीं विचित्र सगर यानें केली असा अुल्लेख आहे. तें संस्कृत वचन खालीलप्रमाणें:—

**'पंचसहस्र नवशतैकादशे विगतकलिकलंक द्वापरवर्षे'**
**'श्रीविचित्र सगर संस्थापितश्श्रीमुखलिंगदेवः।'**

परंतु, आम्ही या पुस्तकांत, हा पौराणिक नि प्राचीन काळ सोडून देअून, ज्याला पाश्चात्य लोक अैतिहासिक काळ म्हणतात, त्या अि. स. च्या पहिल्या शतकापासूनच हिंदूंनीं स्थापिलेलीं नि शतकानुशतकें वैभवानें चालविलेलीं वसाहतराज्यें नि साम्राज्यें यांसंबंधींचाच निःसंदेश ठरलेला अितिहास ग्रथित करीत आहोंत. कारण, मध्यंतरीच्या मुसलमान आक्रमणापासून समुद्रबंदीची जी अेक धार्मिक अंधपरंपरा हिंदुस्थानमध्यें प्रचलित झाली, त्यामुळें अलीकडे आपले हिंदुलोक, आपणहि पाश्चात्य अिंग्लिश, फ्रेंच, डच, पोर्तुगीज अित्यादि

राष्ट्रांइतकेच, सागर नि महासागरांवर संचार करून प्रबल नाविक दल निर्माण करून, अनेक विस्तृत प्रदेशांमध्यें हिंदूंचीहि वसाहतराज्यें स्थापन केलीं नि तीं, अनेक शतकेंपर्यंत अनिर्बंध चालविलीं, हें अैतिहासिक सत्य सर्वस्वी विसरून गेले आहेत. अितकेंच नव्हे, तर असें हें अैतिहासिक सत्य कुणी प्रतिपादलें तरी, त्यावर विश्वास ठेवण्यासहि त्यांचें मन निःशंकपणें धजत नाहीं. अितकें तें 'आत्मनि अप्रत्ययचेतः' झालें आहे! म्हणूनच आम्हीं या पुस्तकांत केवळ अि. स. च्या आरंभींच्या तथाकथित अितिहासिक कालापासून, हिंदूंच्या प्रत्येक वसाहत राज्याचा अितिहास वाचकांपुढें ठेवीत आहोंत.

तेव्हां चंपांतील खिस्त पूर्व हिंदुवसाहतीचा अितिहास केवळ वरीलप्रमाणें निर्देशून, इ. स. च्या आरंभापासून आपण त्या अितिहासाचा परामर्ष घेअूं:-

अि. स. च्या पहिल्या शतकांत हिंदुस्थानमध्यें जणु अेक सागर विजय करण्याची प्रचंड लाट अुसळली. हिंदुस्थानमधील सहस्रावधि धाडसी हिंदु लोक कुणी व्यापाराच्या, कुणी धर्मप्रचाराच्या, कुणी दैव काढण्याच्या, कुणी जगत्प्रवास करण्याच्या नि कुणी, देशांतरीं द्विपांतरीं जाअून राज्यें निर्माण करण्याच्या अवखळ महत्त्वाकांक्षेनें प्रेरित होअून, त्या वेळच्या ज्ञात असलेल्या जगावर पसरले. त्यांपैकीं कुणी व्यापारी जगत् जिंकलें, कुणी राजकीय जगत् जिंकलें, कुणी हिंदुसंस्कृतीचे प्रचंड विजय आशिया, युरोपमधील अन्य देशांवर गाजवून त्या वेळचीं बहुतेक सर्व मानवजात, आपल्या प्रभावी तत्वज्ञानानें, शास्त्रज्ञानानें नि धर्मप्रसारानें आपली शिष्य बनवून सुसंस्कृत केली.

याच वेताला अनेक हिंदुवीर, मलयसाम्राज्य (फुनान), कंबुज (कंबोडिया), सयाम, या देशांमध्यें जाअून त्यांनीं तेथेंहि अेक अेक हिंदुराज्य पहिल्या शतकांत स्थापन केलें.

चंपाचें राज्य कंबुजच्या पूर्वोत्तर भागीं थेट समुद्र तटापर्यंत (दक्षिण-चिनी समुद्राच्या) पसरलें होतें. चंपाचा सर्व प्रदेश आज 'आनाम' प्रांतांत समाविष्ट झाला असून 'चंपा' हें नांवहि केवळ गत अितिहासांतर्गत झालें आहे!

चंपामधील हिंदुराज्याचा मूळ संस्थापक कोण होता, याचा अजून निश्चित

सुगावा, आपल्या दुर्दैवानें लागला नाहीं. त्या प्रतापी पुरुषाचें नांव, अचिर भविष्यकाळीं आपल्याला ज्ञात होओील अशी आशा आपण करूं या, तरीहि 'वोचन्ह' पर्वतावर अेक शिलालेख नुकताच अुपलब्ध झाला आहे. त्यांतील निर्देशावरून सध्यां तरी, अधिक संशोधनाच्या अभावीं, असें म्हणतां येते कीं, चंपा राज्याचा मूळ संस्थापक–निदान प्रथम शतकांतला अत्यंत प्रभावी राजा 'श्रीमार' हा होता.

या वेळीं चंपामध्यें 'चम' आणि 'रानटी' म्हणजे मानवी सुधारणेच्या प्रथम अवस्थेंतील असंस्कृत लोक—असे दोन प्रकारचे लोक होते. यापैकीं 'चमलोक' हे हिंदु–भाषा नि हिंदु चालीरीति यांचा संपूर्णपणें आनंदानें स्वीकार करून ते त्यांच्याशीं समरस झाले.

वर वर्णन केलेल्या 'श्रीमार' प्रतापशाली नृपतीचा अुल्लेख अि. स. १९२ या वर्षीच्या अेका शिलालेखांत केलेला आहे. त्यानंतर सुमारें दोन शतकांचा चंपाचा अितिहास अजून अनुपलब्ध आहे. परंतु, या अवधींत चंपाचें हिंदुराज्य हळूंहळूं वैभवास चढत होतें. ते प्रथम 'मलय साम्राज्या'चें (फूनानचें) मांडलिक म्हणून असण्याचा पुष्कळ संभव आहे. या अज्ञात दोनशें वर्षानंतर अितिहासाला सांपडलेला चंपाधीश, अि. स. ३८० मध्यें राज्य करीत असलेला, राजा भद्रवर्मा होय. यानें 'धर्मराज' ही पदवी घेतलेली दिसते. हा अतिशय प्रतापी नि शक्तिशाली होता. याच्या अधिपत्त्याखालील प्रांतांच्या नांवांपैकीं, 'अमरावती', 'विजय' आणि 'पांडुरंग' हे प्रांत होते. प्रांतांच्या या नांवांवरूनहि चंपाचे हिंदुराज्यकर्ते, महाराष्ट्रीयच असावे या संशोधकांच्या तर्काला पुष्टीच मिळते. यानेंच चवथ्या शतकाच्या अंताला 'भद्रेश्वरस्वामी' या नांवानें बांधलेलें अेक शिवमंदिर चंपामध्यें अेक पवित्र तीर्थक्षेत्र बनलें. हा राजा केवळ प्रतापीच नव्हता, परंतु त्यावेळच्या अन्य हिंदुराजपरिवाराप्रमाणें तो अत्यंत विद्वान् नि वेदविद्हि होता, हें त्याच्या अुपलब्ध लेखांवरून संशोधकांना ठरवितां आलें आहे.

राजा भद्रवर्म्यानंतर चंपाच्या राज्यावर गंगाराज हा राजा बसला. गंगाराज हा चतुराश्रम पद्धतीचा मोठा अभिमानी होता, नि त्याचें आपल्या मूळ देश भारतावर फार प्रेम होतें. गंगाराजानें पुष्कळ वर्षे वैभवानें चंपाचें

राज्य केलें. अंतीं ‘ **वार्धके मुनिवृत्तीनां** ’ या न्यायानें, आपल्या युवराजाला राज्यावर बसवून, हा राजर्षि या पवित्र भारतामध्यें आपलें अंतिमचें आयुष्य परमेश्वर चिंतनांत घालविण्याकरितां, पवित्र जान्हवीच्या तीरावर येअून राहिला होता असें चंपामध्यें सांपडलेल्या ‘ मीसन ’ मध्यें प्राप्त झालेल्या अेका अुल्लेखावरून सिद्ध होतें. तो अुल्लेख असाः—

**गंगाराज इति श्रुतो नृपगुणप्रख्यात वीर्यश्रुतीः ।**
**राज्यं दुस्त्यजं................प्रग्रहे ॥**
**गंगादर्शनजं सुखं महदिति प्रायादतो जान्हवीम् ॥**
( चंपाके अुपवनमे भारतीय संस्कृति ’ याच्या आधारें )

अशा रीतीनें हा प्रतापी नि राजमहर्षि गंगाराज हिंदुस्थानमध्यें पवित्र जान्हवीच्या तीरावर परमेश्वर चिंतनांत आपल्या आयुष्याचे अंतिम दिवस व्यतीत करीत असतां, तिकडे चंपाच्या राज्यांत फार अव्यवस्था माजली. चीनच्या राज्याशीं चंपाचें युद्ध जुंपलें. प्रथमच्या युद्धांत अि. स. ४३१ च्या सुमाराला, चंपाच्या सैन्यानें चीनी सैन्याचा समुद्रावर नि भूमीवर संपूर्ण पराभव करून यश संपादन केलें. परंतु लवकरच अि. स. ४४६ मध्यें चीननें चंपावर स्वारी करून, चंपाच्या सैन्याचा पराभव करून, चंपाची राजधानी जी चंपापूर, तीहि त्यानें हस्तगत केली. त्यानंतर चीनी सैन्यानें फार अत्याचार केले. पंधरा वर्षांच्या पुरुषाची हत्या केली. राजधानी चंपापूर लुटून उध्वस्त केली. तिच्या मधील शेंकडों मंदिरें लुटलीं. त्यांतील सोन्या-चांदीच्या असंख्य मूर्ति गाळून आणि अगणित संपत्ति लुटून नि अनेक राक्षसी अत्याचार करून चिनी सेना परत फिरली.

या प्रचंड आपत्ती नंतर चंपाचें हिंदु राज्य पुन्हां आपलें डोकें वर काढील असें कुणाला वाटलें नव्हतें. परंतु, हिंदुस्थांनमधील हिंदुमध्यें जी प्रत्यक्ष कालालाहि दुर्दम्य असलेली अेक जीवनशक्ति आहे, तीच त्यावेळीं चंपामधील हिंदुराज्यामध्यें भरपूर संचित होती. तिच्याच बळावर अनेक आपत्ती सोसून अर्धशतकाच्या आतच, गंगाराजच्या अेका शूर वंशजानें चीनचा संपूर्ण पराभव करून चंपाचें राज्य परत स्वतंत्र केलें,

अि. स. ५२६ मध्यें चंपाचें राज्य पुन्हां आपल्या पूर्व वैभवानें नांदतांना असलेलें दिसतें. त्यावेळीं चंपाच्या सिंहासनावर ‘ रुद्रवर्मा ’ या नांवाचा राजा राज्य करीत होता. याच्या नंतर शंभुवर्मा या नांवाचा राजा गादीवर आला. मागच्या राजवटींत ‘ भद्रेश्वरस्वामींचें मंदिर ’ आगीच्या भक्षस्थानीं पडलें होतें. तें मंदिर चंपामध्यें अेक राष्ट्रतीर्थ म्हणून मानलें जात होतें, हें मागें सांगितलेंच आहे. मध्यन्तरी चंपावर जी चीनी टोळधाड आली, त्याचवेळीं त्या अत्याचारी आक्रमकांनीं बहुधा हें मंदिर जाळलें असलें पाहिजे. या चंपाला पूज्य असलेल्या मंदिराचा, राजा शंभुवर्मा यांनीं पुनरुद्धार केला नि त्याचें नांव ‘ शंभुभद्रेश्वर ’ असें ठेविलें. अशा रीतीनें चंपाराष्ट्राचा एक मानबिंदु–जो दग्ध झाला होता, तो शंभुवर्म्यानें पुनर्निर्मित केला.

याच्या मागून कित्येक राजे झाले. परंतु, त्याचा अितिहास अजून अुपलब्ध नाहीं. यानंतर ‘ प्रकाशधर्मा ’ याचें नांव अुपलब्ध होतें. त्यानें राज्यावर बसल्यावर आपल्यास ‘ विक्रांतवर्मा ’ हें अभिधान धारण केलें. याच्या राजवटींत चंपाचें वैभव अुत्कर्ष पावत होतें नि याच्या पराक्रमामुळें शत्रूंहि नत होअून, चंपाला शांति आणि सौख्य यांचा लाभ झालेला दिसतो. कारण, यांनीं विष्णु, शिव, कुबेर अित्यादि देवांचीं मंदिरें अुभारून चंपाला शोभा आणली. याच्यावेळच्या अुपलब्ध लेखावरून हा महान् पराक्रमी नि वैभवशाली राजा होता असें सिद्ध झालें आहे. महापराक्रमी गंगाराजच्या वंशाचा हा अंतिमचाच पराक्रमी राजा होता. कारण पुढें अि. स. ७५७ त गंगाराजचा वंश संपून ‘ पृथिवींद्रवर्मा ’ या नांवाच्या अेका पराक्रमी पुरुषानें चंपाचें राज्य–सिंहासन हस्तगत करून, अेक नवीन वंश स्थापन केला. अशा रीतीनें हा गंगाराजवंश अि. स. ३८० पासून, अि. स. ७५७ पर्यंत म्हणजे जवळ जवळ चार शतकेंपर्यंत चंपाच्या हिंदुराज्याचें शासन करून त्याचें वैभव वाढवीत होता.

या गंगाराजवंशाच्या हातून चंपाचें सिंहासन पृथिवींद्रवर्म्यानें कसें हस्तगत केलें याचा अितिहास अजून अुपलब्ध झाला नाहीं.

पृथिवींद्रवर्म्यानें, चंपामध्यें जें अराजक माजलें होतें, तें नाहींसें केलें. चोर, लबाडू, अत्याचारी यांचें दमन करून, राज्यांत सर्वत्र शांतता आणि सुव्यवस्था हीं प्रस्थापित केली, असें वर्णन कांहीं शिलालेखांमध्यें

याच्यासंबंधीं केलेलें आहे. अशा रीतीनें चंपाराज्याची जी अवनति झाली होती नि कदाचित् तें विनाशाच्या जबड्यांतहि पडण्याचा संभव होता, अशा वेळीं या पृथिवींद्रवर्म्यानें पुढें येअून, चंपाचें ढासळलेलें सिंहासन तोलून धरलें नि बाहेरच्या नि आंतल्या आक्रमणापासून अुद्धरलें, म्हणूनच चंपांतील जनतेनेंहि या नूतन वंशस्थापक पृथिवींद्राचें स्वागत करून, त्याला कृतज्ञतेनें आपल्या राजा म्हणून मान्य केलें असलें पाहिजे, हें अुघड आहे. चंपाचें सिंहासन प्राप्त झाल्यावर पृथिवींद्रवर्म्यानें थोड्याच अवधींत चंपाचें पूर्व वैभव परत स्थापन केलें नि विद्वान्, कलावंत लोकांना आश्रय देअून, अेक नवें प्रबळ राजकुल सुरू केलें.

पृथिवींद्रवर्म्यानंतर चंपाच्या सिंहासनावर सत्यवर्मा, या नांवाचा राजा गादीवर बसला. हा अत्यंत शूर नि कलेचा भोक्ता होता. यानें चंपामध्यें मध्यंतरीं जें अराजक माजलें होते, त्यावेळीं चंपाचा जो प्रदेश अन्य नृपतींनीं बळकाविला होता, तो सर्व प्रदेश परत विळविला. आपलें भूदल नि नौकादल हें समर्थ बनविलें. याचवेळीं जावा बेटाच्या कांहीं चांचेगिरी करणाऱ्या लोकांच्या टोळीनें, चंपामधील प्रसिद्ध असलेल्या, समुद्रतटावरील मुखलिंग मंदिरावर आक्रमण केलें. तें मंदिर लुटलें नि त्यांतील मूर्ति समुद्रांत फेकून दिली. हें वृत्त कळतांच सत्यवर्म्यानें त्या चांचे लोकांचा पराभव करून त्यांना परत पिटाळून लावलें. अुध्वस्त केलेलें मुखलिंग मंदिर पुन्हा निर्माण करून, त्यांतील मूर्तीची पुनरपि विधियुक्त प्रतिष्ठापना केली. हा पराक्रमी सत्यवर्मा नवव्या शतकाच्या आरंभाला, चंपाचें सर्व पूर्व वैभव त्यास प्राप्त करून देअून, परमधामाला प्रयाण करता झाला.

सत्यवर्म्याच्या मागून, चंपाच्या सिंहासनावर अिंद्रवर्मा नांवाचा राजा बसला. हाहि अत्यंत पराक्रमी निघाला. याच्यासंबंधीं अुपलब्ध झालेल्या लेखांवरून, यानें परकीय आक्रमणास तोंड देअून, अनेक शत्रूंना पराभूत केलें होतें, असें सिद्ध होतें. त्याचें वर्णन अेका ठिकाणीं असें केलें आहे कीं,

**'सोहनत् परसैन्यानि वज्रहस्त अिवासुरान्'**

तो जसा शूर होता, तसाच तो धर्मशीलहि होता. अेका ठिकाणीं त्याची धर्मराजाशीं तुलना केली आहे, ती अशीः—

'राज्येहि धर्मसंयुक्तो धर्मराज अिवाभवत्'

त्यानें चंपामध्यें अनेक सुंदर मंदिरें बांधून राज्याची शोभा वाढविली नि प्रजेला सुखी केले.

पृथिवींद्रवर्म्यानें स्थापन केलेला हा राजवंश, 'पांडुरंग राजवंश' या नांवानें प्रसिद्ध आहे. या वंशाचा अंतिम राजा 'तृतीय विक्रान्तवर्मा' या नांवाचा झाला. या राजानंतर अितर राज्यलक्ष्मीप्रमाणें चंचल असलेल्या चंपाच्या राजलक्ष्मीनेंहि पुन्हां अेका नव्या राजघराण्याच्या गळयांत माळ घातली. कोणतीहि राजलक्ष्मी ही वीर पुरुषांवरच अनुरक्त असते. त्या वीरपुरुषांच्या परंपरेमध्यें जेव्हां वीरत्वाचा लोप होअू लागतो, शौर्य मंदावत जाते, तेव्हां राजलक्ष्मीहि त्यांच्याकडे पाठ फिरवूं लागते, नि जो कुणी वीरता शौर्य यांनीं अन्वित असतो, अशा पुरुषाला ही राजलक्ष्मी आपल्या सिंहासन, नि छत्रचामरासह माळ घालते. हाच सनातन नियम सर्व देशांच्या सर्व-कालीन अितिहासामध्यें दिसून येतो.

पृथिवींद्रवर्म्यानें स्थापन केलेलें 'पांडुरंग' घराणें अि. स. ८७० व्या वर्षीपर्यंत चंपाच्या सिंहासनावर अधिष्ठित होतें.

अि. स. ८७० व्या वर्षी अिंद्रवर्म्यानें, चंपाचें सिंहासन 'पांडुरंगराज-वंशा' पासून काढून आपल्या हातीं घेतलें. हा अिंद्रवर्मा भृगुवंशीय होता. म्हणून या राजघराण्यास 'भृगुवंशीय' असें नामाभिधान प्राप्त झालें. या अिंद्रवर्म्याचें मूळचें नांव 'लक्ष्मींद्रभूमीश्वरग्रामस्वामी' असें होतें. परंतु, त्यानें चंपाचें राजसिंहासन हस्तगत केल्यावर, 'अिंद्रवर्मा द्वितीय' असें नामाभिधान धारण केलें. यावरून असे दिसतें कीं, चंपामध्यें यावेळीं मोठी अशी राज्यक्रांति झाली नसून, केवळ वंशक्रांतीच झाली असावी. कारण, लक्ष्मींद्रभूमीश्वरानें 'पांडुरंगवंशीय' अंतिमचा राजा तृतीय विक्रांतवर्मा याच्या दुबळया हातांतून जरी राजसिंहासन काढून घेतलें, तरी 'पांडुरंगवंशा' संबंधीं आपला आदर दाखविण्याकरतां त्यानें, त्या पांडुरंगवंशांतील महापराक्रमी नि धर्मरत राजा 'अिंद्रवर्मा' याचेंच नांव धारण केलें नि द्वितीय अिंद्रवर्मा या अभिधानानें तो प्रसिद्ध झाला.

पांडुरंग राजवंशानें अि. स. ७५७ पासून ८७० पर्यंत, म्हणजे अेक शतकावर राज्य केलें.

द्वितीय अिंद्रवर्म्याच्या राजवटींतच बुद्धधर्माचा प्रथम प्रवेश चंपामध्यें झाला. यानें बुद्धमंदिर नि विहार बांधला. तथापि त्याची हिंदुधर्मावरील निष्ठाहि अविचलित होती. शैव पंथाची सारखी भरभराट चंपाराज्यामध्यें होत होती. द्वितीय अिंद्रवर्म्यानेंहि अेक शिवलिंग स्थापन केलें. अन्यमंदिरांच्या व्यवस्थेकरतां भूमिदानहि केलें. त्याचप्रमाणें 'भाग्यकांतेश्वर' या नांवाचे अेक अन्य मंदिर अुभारलें. यानें अि. स. ९११ पर्यंत अत्यंत वैभवानें राज्य करून चंपाच्या हिंदुराज्याचा गौरव वाढविला.

अि. स. ९११ मध्यें द्वितीय अिंद्रवर्म्याच्या मृत्यूनंतर तृतीय अिंद्रवर्मा राज्यावर बसला. हा अतिशय विद्वान होता. पंडितांचा मोठा आश्रयदाता होता. बुद्धधर्माचें देखील त्यानें चांगलें ज्ञान संपादन केलें होतें. त्याकाळच्या विद्वानांमध्यें तो अग्रगण्य होता. त्याच्यासंबंधीं तत्कालीन लेखांमध्यें जीं वर्णनें आहेत, त्यामध्यें याच्या या विद्वत्तेसंबंधींच जास्त वर्णन आहे. परंतु, हा विद्वान राजा, 'शस्त्रेण रक्षिते राष्ट्रे'च शास्त्रचिंता सुरक्षितपणें होते हें सत्य विसरलेला दिसतो. कारण हा शास्त्राभ्यासामध्यें सर्वस्व मानून समरचिंता वाहीनासा झाला. हें जाणूनच कीं काय, कंबुजच्या हिंदुराजानें चंपावर आक्रमण केलें. यावेळीं कंबुजमध्यें पंचम जयवर्मा हा पराक्रमी राजा राज्य करीत होता. चंपामध्यें अि. स. ४४६ मध्यें चिनी लोकांनीं जें आक्रमण केलें होतें, त्यानंतर पांच शतकेंपर्यंत चंपावर बाहेरच्या राजांचें आक्रमण झालें नव्हते. परंतु शास्त्रनिपरत, परंतु शस्त्रविरत असा तृतीय अिंद्रवर्मा चंपाचें राज्यावर असतांना, ही बाह्य आक्रमणाची आपत्ति चंपावर ओढवली. कंबुजच्या सैन्यानें चंपावर आक्रमण करून, पोनगरवर चढाअी केली. तेथील मुख्य मंदिरांत भगवती देवीची अेक सुवर्णप्रतिमा होती. ती घेअून कंबुजचें सैन्य पुष्कळशी आणखी लूट घेअून, परत आपल्या राज्यांत निघून गेले. अिंद्रवर्म्यानें, मागाहून या मंदिराचा अुद्धार करून तेथें भगवतीची अेक पाषाणमूर्ति स्थापन केली. हा राजा अि. स. ९७१ मध्यें दिवंगत झाला.

चंपाच्या आग्नेयेस चीनच्या सिमाभागावर 'अनामी' या नांवाची अेक क्रूर नि अशिक्षित, अभिमानही असा नेबलीट प्रवृत्तीची जाति, फार पूर्वी

काळापासून निवास करीत होती. चंपा अथवा चीन येथील शासक, जरा दुबळे झालेले दिसले कीं, या जातीनें त्यांच्यावर आक्रमण करावें; लुटालूट करावी; प्रदेश वैराण करावें. जेव्हां चंपानें अथवा चीननें, यांच्या पारिपत्त्यासाठी सबळ अशीं सैन्यें पाठवावीं, तेव्हां त्यांना शरण जाऊन, नाममात्र त्यांचें स्वामित्व मानावें, नि पुन्हां बंड करण्याची केव्हां संधि मिळतें याची वाट पहात बसावें. अंतीं, अि. स. ९३६ मध्यें, या जातीला अेक सुवर्णसंधि मिळाली नि त्यांनीं चीनच्या दक्षिण भागावर आक्रमण करून तो हस्तगत केला नि तेथें आपलें अेक स्वतंत्र राष्ट्र स्थापन केलें. जवळ जवळ अेक सहस्र वर्षांच्या बंडाळीनंतर अनामी जातीनें आपली स्वतंत्र राज्याची चिरमहत्त्वाकांक्षा सफल केली. ह्या जातीनें बौद्धधर्माचा अंगिकार केला होता. अि. स. ९८० मध्यें 'ली–होन' या नांवाचा अेक महापराक्रमी पुरुष त्यांच्यामध्यें अुत्पन्न झाला. त्यानें अनामी लोकांच्या लहान लहान सरदार लोकांनां, आपल्या आधिपत्त्याखालीं आणून, अेक संघटित शक्ति निर्माण केली. नंतर त्यानें चीनचा दक्षिणेकडील बराच मोठा प्रदेश जिंकून घेअून, तेथें आपलें अेक स्वतंत्र राज्य स्थापन केलें. त्याचा दुसरा बलिष्ठ शेजारी म्हणजे चंपाचा राजा होय. 'ली–होन्' नें मुत्सद्दीपणानें या दुसऱ्या बलिष्ट शेजाऱ्याशीं सख्य जोडण्याचा प्रयत्न करण्याचें ठरविलें. कारण, चीनला दुखवून त्यानें नुकतेच अेक राज्य चीनपासून हिरावून घेतलें होतें. अशा वेळीं दोन्ही बलिष्ठांशीं अेकदम वैर नसावें. अशा हेतूनेंच बहुधां 'ली–होन' नें चंपाच्या राजसभेकडे सख्यसंधी करण्याकरतां अेक दूत पाठविला. त्यावेळीं चंपाच्या सिंहासनावर परमेश्वरवर्मा या नांवाचा राजा राज्य करीत होता. हा राजा 'ली–होन' सारखा मुत्सद्दी तर काय, परंतु शूर नि मोठा सावधहि दिसून येत नाहीं. त्यानें, अनामचा संधिदूत, त्याच्या राजसभेंत आला असतां, त्याचा अपमान करून त्यास बंदींत घातलें. अुदयोन्मुख शूर अनामचा हा अपमान, 'ली–होन्' यास असह्य झाला, नि त्यानें त्याचा बदला घेण्यासाठीं निश्चय करून, आपल्या सैन्यासह चंपावर आक्रमण केलें. परमेश्वरवर्मा लढाअीस अुभा राहिला. परंतु, 'ली–होन' च्या सैन्याच्या टोळधाडीपुढें त्याचा निभाव न लागतां, तो युद्धामध्यें मारला गेला नि

चंपाचें सैन्य पराभव पावून अुधळून गेलें. प्रत्यक्ष राजधानीपर्यंत ली-होन्‌चा मार्ग निष्कंटक झाला. राजधानी हस्तगत करून, या अर्धरानटी अनामी सेनापतीनें, तेथें अनन्वित अत्याचार नि लूट केली. राजघराण्यांतील राणी-वशांतून कांहीं स्त्रियांचें अपहरण केलें नि ही सर्व लुटीची विपुल संपत्ति घेअून तो परत आपल्या प्रदेशाकडे वळला. यावेळीं, त्यानें चंपामधून बुद्ध-धर्माचा प्रसार करणारा अेक भारतीय भिक्षूहि आपल्या सांगातीं नेला. या विजयामुळें अनामी लहानमोठ्या सेनानायकांचें डोळे फिरून गेले नि 'ली-होन्' चें आधिपत्य त्यांनीं झुगारून देण्याकरतां यादवी माजविली. याच सेनापतींपैकीं अेक सेनापति 'लू-की-तङ्' यानें 'ली-होन्' च्या विरुद्ध यशस्वी बंड करून, नुकत्याच जिंकिलेल्या चंपाच्या राज्यावर त्यानें स्वतःला अभिषेक करून घेतला नि चंपाचें आपण राजे आहोंत अशी चहूं-कडे द्वाही फिरविली.

अशा रीतीनें पराक्रमी दुसरा अिंद्रवर्मा यानें अि. स. ८७० मध्यें जो प्रतापी भृगुकुलाचा राजवंश चंपा राज्यावर स्थापन केला होता, तो राजवंश अनामी लोकांच्या या आक्रमणापुढें कोसळून पडला. या वंशानें अि. स. ८७० पासून सुमारें १०३० पर्यंत चंपावर शासन केलें.

वर सांगितल्याप्रमाणें लू-की-तङ या अनामी सेनापतीनें चंपाचें राजपद धारण केल्यावर, चंपानिवाशीं प्रजेचें त्यानें फार हाल केले. या अर्धरानटी राजवटीला कंटाळून कित्येक चंपादेशनिवासी, चंपा सोडून अन्य राज्यांमध्यें निघून गेले. अशा रीतीनें या क्रूर, पीडक, अत्याचारी बंडखोरानें अेकंदर सहा वर्षें चंपामध्यें धुमाकूळ घातला.

परंतु, चंपाच्या प्रजेनें लवकरच या अत्याचारी राजवटीचा सूड घेतला. चंपामधील 'विजय' या नांवाच्या नगरामध्यें अेक तेजस्वी तरुण, या परकीय सत्तेच्या विरुद्ध असलेल्या राज्यक्रांतीचा पुढारी झाला. त्यानें चंपाच्या स्वातं-त्र्याचा झेंडा अुभारला. चंपामधील परकीय सत्तेला अुच्छेदून टाकण्याच्या दिव्य ध्येयानें प्रेरणित झालेले सहस्रशः तरुणवीर त्यांच्या झेंड्याखालीं आले. या स्वातंत्र्यप्रिय स्वयंसेवकांच्या सैन्याचें आधिपत्य स्वीकारून, विजयनगर निवासी त्या तरुणानें, लूं-की-तङ्-या परकीय सरदाराचा अनेक ठिकाणी

पराभव करून, अंती त्याला, त्याच्या क्रूर साथीदारांसह चंपामधून हांकून लाविलें. नंतर या तरुण विजयी वीरानें 'श्रीहरिवर्मा' हें नामाभिधान धारण करून, चंपाचें अल्पकाल परकीयांनीं बुडविलेलें सिंहासन पुन्हां प्रस्थापित केलें. त्यानें आपली राजधानीं विजयनगरलाच स्थापन केली.

याप्रमाणें मधल्या परकीय आक्रमणाच्या भयानक वावटळींतून मुक्त होऊन चंपाचें हिंदु राज्य, श्रीहरिवर्मा यांच्या अधिपत्याखालीं पुनरपि, नांदू लागले. हा पराक्रमी नृपति श्रीहरिवर्मा अि. स. १०४१ मध्यें मरण पावला, त्यानंतर, जयसिंहवर्मा हा चंपाच्या गादीवर बसला.

चंपानिवासीयांनीं अनामीयांचा पूर्ण पराभव करून, त्यांना श्रीहरिवर्म्याच्या अधिपत्याखालीं चंपांतून जरी हुसकून लाविलें होतें, तरी तेव्हांपासून आनामी लोकांनीं चंपाशीं अुभें वैर बांधलें. श्रीहरिवर्मा जिवंत असेतोंपर्यंत, त्याच्या पराक्रमापुढें अनामीयांचें कांहीं चाललें नाहीं, हें जरी खरें, तरी ते लोक चंपाचें वैर विसरले नव्हते. श्रीहरिवर्म्याचें देहावसान होऊन जयसिंहवर्मा चंपाच्या गादीवर येतांच, दोन वर्षांनीच अि. स. १०४३ मध्यें, आनामी बंडखोरांनीं चंपाच्या नाविक दळावर अेकाअेकीं अचानक आक्रमण करून, त्याची फार नासाडी केली. चंपाच्या राज्याला पूर्वभागीं समुद्र तीरच असल्यानें, चंपाचें नौकादळ चांगलें समर्थ असल्यावांचून, त्या राज्याचें, चिनी, आनामी, जावा अित्यादि चांचे लोकांपासून संरक्षण करणें अशक्यच होतें. हें ओळखून चंपाच्या राजांनीं जवळ जवळ पांचशें सहाशें वर्षेंपर्यंत आपलें नौकादळ समर्थ ठेवून, या चांचे लोकांचें वारंवार पारिपत्य करून, चंपाच्या समुद्रावर आपलें स्वामित्व, पांचशें वर्षेंपर्यंत अव्याहत ठेविलें होतें हें अुघड होतें. त्यामुळेंच चंपाचा समुद्रीय व्यापार भरभराटीनें चालून, चंपाचें संपत्तीवैभव अपरंपार वाढलें होतें. अशा या चंपाच्या महत्वाच्या नौकादळावर, या आनामी चांचे लोकांनीं, ज्यावळीं अि. स. १०४३ मध्यें अचानक चाल करुन, त्याची फार हानि केली, त्यावेळीं चंपाचें लढाअु बळ साहजीकच फार दुबळें झालें. ही संधि साधुन आनामचा त्यावेळचा शासक 'फत्‌ः मा' यानें अि. स. १०४४ च्या आरंभाला चंपावर भूमीवरूनहि आक्रमण केलें.

जयसिंहवर्म्यानें प्रतिकाराची पराकाष्ठा केली. परंतु, अेका लढाअींत तो मारला गेला आणि चंपासैन्य पराजित झालें. यावेळीं चंपाच्या सैन्यानें लढण्याची शर्थ केली. जयसिंहवर्मा ज्या लढाअींत मारला गेला, त्या प्रचंड लढाअींत चंपाचे तीस सहस्त्र योद्धे समरांगणांत पतन पावले; परंतु, त्यांनीं समरास पाठ दाखविली नाहीं. येवढ्या संहारानंतर चंपाची नूतन राजधानी ' विजय ' नगर आनामी सैन्यानें जिंकून घेतली. अशा रीतीनें श्रीहरीवर्म्यानें स्वतंत्र केलेलें चंपाचे हिंदुराज्य पुन्हां अर्धशतकानें आनामी लोकांच्या क्रूर आक्रमणास बळी पडलें.

आनामी लोकांच्या या अर्धरानटी सत्तेशीं अि. सनाच्या १० व्या शतकाच्या अंतापासून, चंपाच्या हिंदु राज्याचा सारखा झगडा सुरू झाला. याच समयाला, प्रत्यक्ष हिंदुस्थानमध्येंहि वायव्य सीमेकडून अशाच अर्ध-शिक्षित, धर्मपिसाट, क्रुर मुसलमान जमातींच्या स्वाऱ्या जशा सुरू झाल्या, तशाच स्वाऱ्या आनामी लोकांनीं या चंपाच्या हिंदुराज्यावर सुरू केल्या. चंपाच्या हिंदुराज्यानें, अत्यंत शौर्यानें, चिकाटीनें या रानटी आक्रमणा-विरुद्ध दीर्घकालपर्यंत झगडा केला.

चंपाच्या या पराभवानंतर, आनामी लोकांना कांहीं फार वेळ शांतता मिळूं शकली नाहीं. अि. स. १०५० मध्येंच ' जयपरमेश्वरवर्मादेव ' या नांवाचा आणखी अेक स्वातंत्र्यवीर चंपाला लाभला, आणि त्यानें महापरा-क्रमानें पुनरपि चंपाचें सैन्य अेकत्र करून, आनामी सैन्याचा पराभव केला नि चंपामध्यें पुन्हां अेकदां शांतता स्थापून, आनामीयांनां देशांतून बाहेर हाकलून दिलें. यानें गादीवर बसतांच आपल्यास, ' जयपरमेश्वरदेववर्मा अीश्वरमूर्ती ' अशी पदवी धारण केली. या पराक्रमी वीरापासून आणखी अेक नवा राजवंश चंपामध्यें सुरूं झाला. या राजानें, नुकत्याच झालेल्या आनामीयांच्या क्रुर आक्रमणामध्यें ज्या शेंकडों मंदिरांचा विध्वंस झाला होता, त्यांची पुनःस्थापना केली नि चंपाचें सौंदर्य पुन्हां वर्धमान केलें. जयपरमेश्वरदेववर्म्यानें किती वर्षें राज्य केलें, त्यानंतर या वंशांत किती राजे झालें, हें अद्याप अनुपलब्धच आहे. या वंशाचा अंतिम राजा ' चतुर्थरुद्रवर्मा होता. त्याच्या राजवटींत पुन्हां अेकदां आडदांड आनामी लोकांनीं चंपावर आक्रमण केलें.

यावेळीं जें युद्ध झालें, त्यामध्यें चतुर्थरुद्रवर्म्याचा पराजय झाला नि तो स्वतः शत्रूच्या हातीं पडला. शत्रूंनीं त्याला कित्येक वर्षें बंदींत ठेवले.नंतर कांहीं संधिकरून, चतुर्थ अुद्रवर्मा ज्यावेळीं चम्पा राज्यामध्यें परत आला, त्यावेळीं चंपामध्यें चंपाच्याच अनेक सेनापतींमध्यें यादवी माजलेली त्यास आढळून आली. ठिकठिकाणी छोटे छोटे सरदार स्वतंत्रबनून सर्व चंपामध्यें अव्यवस्था माजली. ही स्थिति सुधारण्याचा प्रयत्न करीत असतानांच चतुर्थ अुद्रवर्मा मरण पावला.

त्याच्या मृत्यूनंतर तर ही अव्यवस्था अधिकच माजलीनि कांहींकाळपर्यंत चंपामध्यें अराजकच सुरु झालें. याचवेळीं आनामी लोकांना पुन्हां आक्रमणास आरंभ केला. अशा या आणीबाणीच्या वेळीं चंपाचें राज्य बुडतें कीं काय, अशी शंका त्यांतील देशभक्त लोकांना पडून ते व्याकूळ झाले. परन्तु, अजूनहि चंपाच्या राजलक्ष्मीवर सर्व भक्षक ' काला ' चा घाला पडावयाचा नव्हता, म्हणून पुन्हा अेकदां चंपाच्या अुद्धाराला चतुर्थ हरिवर्मा या नावाचा वीर पुढें आला

या नवीन वीरानें, दृढ प्रयत्नांनीं प्रथम चंपामधील यादवी मोडून काढून, चंपाला अेकछत्री सत्तेखालीं आणलें. नंतर त्यानें मोठें अजिंक्य असें सैन्य अुभारून आनामी, आणि अन्य वन्य जातींचें पारिपत्य करून, चंपाला त्या रानटी लोकांच्या आक्रमणापासून मुक्त केलें. नंतर त्यानें, अशी शांततां प्रस्थापित झाल्यावर, चंपामधील मंदिरें, धर्मशाळा, मठ वगैरे जे जे मधल्या अराजकतेंत अुध्वस्त झाले होते, त्यांची पुन्हां स्थापना केली. त्यानें अनेक नवीन ग्रामें आणि नगरें वसवून चंपामध्यें सुबत्ता, सौख्य, वैभव प्रस्थापित केलें. त्यांच्या पराक्रमाचें, प्रजाहितदक्षतेचें, सैनिक बलाढ्यतेचे पुष्कळ अुल्लेख, त्यावेळच्या लेखांमध्यें सांपडतात.

अशा रीतीनें या महापराक्रमी राजानें, चिरकाल राज्य करून वृद्धकालांत वानप्रस्थाश्रमाचा स्वीकार करून, आपल्या ज्येष्ठ मुलाला राज्यावर प्रस्थापित केले नि आपण शिवभक्ति करण्याकरतां वनांत निघून गेला. तेथें कांहीं कालानंतर सर्व पुरुषार्थ परम अुत्कर्षानें पार पाडणारा हा राजर्षि शांत चित्तानें शिवभक्तींत मग्न असतां, शिवरूपी लीन झाला.

याच्यामागून पांचवा हरिवर्मा अि. स. १११३ मध्यें गादीवर बसला. याच्या राजवटींत चंपामध्यें शांतता असून चंपाचें वैभव सारखें वाढत होतें.

नंतर अि. स. ११४७ मध्यें 'जयहरिवर्मदेव' हा राज्यावर आला. याच्या राजवटींत कंबुजच्या हिंदुराजानें चंपावर स्वारी केली. परंतु, जयहरिवर्मदेवानें कंबुजच्या सैन्याचा पराभव केला. नंतर या विजअी राजानें 'महिश पर्वतावर' नि अन्य ठिकाणीं नवीन मंदिरें अुभारलीं. अेकंदरींत याच्या राजवटींतहि चंपाला पूर्ण शांतता लाभली. अि. स. ११६३ पर्यंत यानें वैभवानें राज्य केलें.

याच्यामागून सातवा जयअिंद्रवर्मा राज्यावर बसला. यानें अीशानभद्रेश्वराच्या मंदिरामध्यें, सोनें, चांदी, चंदन यांनीं अभियुक्त असें अेक भवन अुभारलें. विपुल वैभव यानें चंपाला प्राप्त करून दिलें. अि. स. ११७० मध्यें यानें कंबुजच्या विरुद्ध युद्ध पुकारलें. कित्येक दिवसपर्यंत हें युद्ध चाललें. जयअिंद्रवर्म्यानें अेका चिनी युद्धविशारदाला बोलावून, निराळया धर्तीवर घोडदळ सिद्ध केलें. परंतु, त्याचाहि फारसा अुपयोग झाला नाहीं, अंतीं, जयअिंद्रवर्म्यानें आपल्या बलवान नौकादलासह समुद्रमार्गानें कंबुजवर स्वारी केली. त्यामध्यें कंबुजचा संपूर्ण पराभव झाला. त्यांची राजधानी लुटली गेली. पुष्कळशी संपत्ती जमवून जयअिंद्रवर्मा विजयोत्साहानें चंपाला परत फिरला. यावेळीं कंबुजला अुतरती कळा लागली होती.

सातव्या जयअिंद्रवर्म्यानें चंपामध्यें बुद्धलोकेश्वर, जयअिंद्रलोकेश्वर, भगवति जयअिंद्रेश्वरी अित्यादि देवदेवतांची स्थापना केली. यानें समुद्रसत्ता अुत्कर्षाला आणली. भूमिदल आणि नौकादल प्रबळ असें निर्माण केलें. सर्व शत्रूंचा पराभव करून दिग्विजय संपादन केलें, आणि चंपाला अुत्कर्ष नि वैभवाच्या अुच्च शिखरावर नेअून बसविलें. हा दिग्विजयी राजा केव्हां नि कसा मृत्यु पावला हें अितिहासाला अजून अवगत झालें नाहीं.

अि. स. ११९० च्या बेताला चंपावर आठवा जयअिंद्रवर्मा या नांवाचा अेक राजा राज्य करींत होता. त्याच्यावर कंबुजच्या राजानें स्वारी केली. लढाअींत आठव्या जयअिंद्रवर्म्याचा पराभव होअून, तो बंदींत पडला. त्याला कंबुजमध्यें नेण्यांत आलें. चंपाचें राज्य कंबुजचें हस्तगत झालें, त्याचे दोन

भाग पाडण्यांत आले. परंतु थोड्याच अवधींत 'रसुपति' या वीरानें कंबुजविरुद्ध बंड केलें नि कंबुजच्या सैन्याला देशाबाहेर घालवून दिले. या विजयी वीरानें जयअिंद्रवर्मदेवाच्या नांवानें राज्य करण्यास आरंभ केला. परंतु, पुन्हां अि. स. ११९२ मध्यें कंबुजनें चंपावर स्वारी करून, 'रसुपती' चा पराभव केला. नंतर कंबुजच्या राजानें स्वतः चंपामध्यें येअून, तो स्वतः हिंदुराजा असल्यानें त्यानें चंपामधील भग्न मंदिरें वगैरे पुन्हां बांधविलीं. यानंतर बराच काळपर्यंत चंपा कंबुजच्याच अंकित राहिलें.

तेराव्या शतकाच्या आरंभाला 'चेंगीजखा' या नांवाचा अेक महापराक्रमी नि तितकाच क्रूर असा अेक मंगोल विजेता होअून गेला हें अितिहासज्ञांना विदितच आहे. त्याच्या मागून विस्तृत मंगोल साम्राज्याचा धनी 'कुबलाअीखान' झाला. याच कुबलाअीखानाला सर्वधर्मचिकित्सेची फार आवड होती. तो मोठा अुदार नि विद्वान् लोकांचा आश्रयदाता होता. त्यानें अि. स. १२५६ मध्यें काराकोरमच्या जवळ असलेल्या 'सिराआर्दो' या राजधानीमध्यें अेक सर्वधर्म परिषद, त्याच्या सत्वशील बंधु 'मनकूखां' याच्या देखरेखीखालीं भरविली. त्यामध्यें मुसलमान, ख्रिश्चन, बौद्ध वगैरे धर्मांचे प्रतिनिधि अुपस्थित होते नि प्रत्येकानें आपापल्या धर्माचें महत्व वर्णन केलें. अंतीं, 'मनकूखां' यानें बुद्ध धर्माचींच मतें ग्रहण केलीं. ही गोष्ट मागें अेका भागांत सांगितलीच आहे. तोच कुबलाअीखान राज्यावर असतां, त्याच्या अेका सेनापतीनें चंपावर आपलें सार्वभौमत्व लादण्याचा प्रयत्न केला. त्यावेळीं चंपामध्यें अिंद्रवर्मा नांवाचा राजा राज्य करीत होता. त्यानें कुबलाअीखानाचें स्वामित्व मान्य केलें. परंतु, अिंद्रवर्म्याच्या मागून चंपाच्या राज्यावर आलेला त्याचा पुत्र जो 'हरिजित्' याला हें परदास्य सहन झालें नाहीं. त्यानें स्वतंत्रता घोषित केली नि मंगोल साम्राज्याचे प्रतिनिधि बंदींत घातले, हें अैकतांच मंगोल साम्राज्य सैन्यानें चंपावर आक्रमण केलें. या प्रचंड शक्तीपुढें मान वाकविण्यापेक्षां स्वदेश स्वातंत्र्याकरतां शक्यतों युद्ध करण्याचाच तेजस्वी निश्चय वीरवर 'हरिजित्नें' केला. परंतु, असम अशा या युद्धांत त्याचा पराभव झाला नि तो बंदिस्त केला गेला. परंतु, पुढें साम्राज्य सरकारास खंडणी भरून त्याची सुटका करण्यांत आली.

अितक्या अवधींत, आनामचें राज्य दिवसेंदिवस अधिकाधिक बलशाली होत होतें. त्याचेंहि आक्रमण पुन्हां चंपावर सुरू झालें. चंपाचे कित्येक प्रांत आनारमध्यें दाखल करण्यांत आलें. अंतीं चंपाच्या स्वतंत्र हिंदु राज्याचा अधिपति महेन्द्रवर्मा यानें स्वातंत्र्याकरतां अंतिमचें समर अि. स. १३१२ च्या सुमारास केलें. परंतु त्यांत चंपाच्या सैन्यास यश आलें नाहीं आणि अनामच्या राजानें सर्व चंपाराज्य आनामला जोडून घेतलें. येथपासून चंपा आनाममध्येंच अंतर्भूत झालें. आनामचा राजाच चंपाचाहि राजा झाला. चंपानें हें स्वतंत्र हिंदु राज्य जवळ जवळ दीडसहस्र वर्षें वैभवानें तळपून हिंदुधर्मांचा नि हिंदुसंस्कृतीचा विजयध्वज अितक्या दूरच्या प्रांतांत मिरवीत होतें. अंतीं, तें दीड सहस्र वर्षांच्या दीर्घकालीन तेजस्वी, वैभव संपन्न आणि पराक्रमी जीवनानंतर, कालाच्या अुदरांत अंतर्हित झालें!

यानंतर आनामी राजांचे प्रतिनिधीच चंपाचें शासन करूं लागले. कधीं कधीं ते प्रमुख सत्तेशी बंड करून अल्पकाळपर्यंत स्वतंत्र होत. परंतु, पुन्हां आनामच्या मुख्यसत्तेनें पराजित केल्यावर अस्तंगत पावत. अशा तऱ्हेचा अेक आनामी सरदार शा-कू-पू-लो यानें आनामी सत्तेविरुद्ध बरेंच यशस्वी बंड केंले. अेकदां तर त्यानें आनामवरच चढाअी केली. परंतु, अंतीं १५४५ मध्यें त्याचा पुरा मोड झाला नि तो स्वतः बंदी बनून त्या बंदींतच मरण पावला.

यानंतर अठराव्या शतकांच्या पूर्वार्धापर्यंत चंपाचा अितिहास यथावत् अुपलब्ध नाहीं. तरी पण याहि पतनावस्थेंत चंपानें अनेक वेळां स्वराज्य स्थापण्याचे प्रयत्न केल्याचे आढळून येतें. कांहीं अल्पकाल तो स्वतंत्रहि झाला असावा. परंतु त्यासंबंधींचा अितिहास आज अुपलब्ध नाहीं. अि. स. १८२२ मध्यें, चंपाचा आनामीवंशीय राजा 'पो-चडू' ही कंबुजमध्यें पळून गेला नि मग मात्र चंपाचें आनामी वंशाखालचे राज्य नष्ट झाले. पूर्वींची हिंदु जनता देशोधडीला लागून, कांहीं अन्य हिंदु, हिंद्वेतर समाज—समुद्रांत मिसळून गेले. आनामच्या राजसत्तेनें अंतीं 'चंपा' हें नांवहि नष्ट करून 'आनाम'मध्येंच या सर्व राज्याचा समावेश केला. सांप्रत 'चंपा' हें त्या प्रदेशाचें प्रिय नांवहि लुप्त होअून गेलें! आनाम हेंच नांव त्याला प्राप्त झालें।

मागें अेकदां अुल्लेख आलेलाच आहे कीं आनामच्या राजांनीं आणि

त्यांच्या प्रजेनें बुद्धधर्माचा अंगिकार केला होता. तो बुद्धधर्म म्हणजे अर्थात् विशाल हिंदु धर्मवृक्षाची अेक समृद्ध शाखा. आनामी लोकांवर त्या धर्माचा आधींच पुष्कळ परिणाम होअून त्यांचा अर्धरानटीपणा बराच विलयाला गेला होता. त्यांतच चंपाच्या हिंदु राज्याशीं अनेक शतकें राजकीय संघर्षाच्या निमित्तानें कां होअीना, त्यांचा संबंध आल्यानें, चंपाच्या हिंदु संस्कृतीचे आनामवर दृढ संस्कार होत होते. अंतीं, चंपाच्या राजकीय सत्तेचें जरी आनामनें अुच्चाटण केलें, तरी चंपाच्या हिंदु संस्कृतीनें मात्र त्यांच्या मनाची पकड जी अेकदां घेतली, ती दिवसेंदिवस बळकटच होत गेली. चंपाचे राजकीय वर्चस्व जरी आनामनें नष्ट केलें तरी चंपाच्या हिंदु संस्कृतीच्या थोरवीनें ते चंपाच्या हिंदु संस्कृतीचें अंकितच झालें ! आजहि आनाममध्यें बुद्धधर्माचाच प्रसार चालू आहे नि चंपाच्या संस्कृतीची वारसदारी आजहि आनाममध्यें जतन केली जात आहे.

चंपाच्या या संक्षिप्त राजकीय अितिहासावरून, अेक गोष्ट आपल्या प्रामुख्यानें ध्यानीं येते ती ही कीं, चंपावर मधूनमधून जरी अनेक वेळां परकीय सत्तेचीं आक्रमणें झालीं नि कांहीं काल जरी चंपा परतंत्र केली गेली, तरी त्या प्रत्येक वेळीं चंपामध्यें कुणीतरी अेकादा राष्ट्रीय वीर अुत्पन्न होअी नि चंपाची जनता त्याच्या पाठीशीं अुभी राहून, स्वातंत्र्यसमरांत अुडी घेअून तें यशस्वी करीत असे. चंपाचें हें स्वातंत्र्यप्रेम नि शौर्य अनेक वेळां निदर्शनास आलें आहे, आणि त्याच्याच बळावर चंपाचें हिंदु राष्ट्र दीडसहस्र वर्षाच्या वर हिंदूसंस्कृतीचा ध्वज विजयीपणानें अुचलून धरूं शकलें नि मंगोल, चिनी अनामी अशा कडव्या नि अर्धरानटी टोळ्यांशीं सतत झगडा नि त्यांचें दमन करून अनेक शतकें आपलें राज्य, वैभवसंपन्नतेनें स्वतंत्र राखूं शकलें.

राजकीय अितिहासाचें संक्षिप्त समालोचन केल्यानंतर आपण चंपाच्या हिंदुराज्याचा सांस्कृतिक अितिहास पुढील प्रकरणीं थोडासा निरीक्षण करूं.

: १६ :

## चंपाची हिंदुसंस्कृति

चंपाचें राजपद हें मनूच्या आदेशाप्रमाणेंच संस्थापित झालें होतें. तेथील बहुतेक नृपति विद्याविद होते, आणि कांहीं कांहीं तर पंडिताग्रणी होते. विद्वान् लोकांना चंपाच्या राजसभेंत अखंड मान मिळत असे नि त्यांना अुदारपणाच्या देणग्या, वृत्ति, वतनेंहि करून दिलीं जात असत. त्याचप्रमाणें चंपाचे राजे हे सर्व कलांचे पोशिंदे होते. सर्व चंपामध्यें अगणित मंदिरें, विहार, मठ, धर्मशाळा, विद्यालयें, चंपाच्या नृपतींनीं अुभारलीं होतीं. तें सर्व शैवमताचे असल्यानें, अर्थातच शिवमंदिरांचीच संख्या विपुल होती. तरी देखील बुद्धधर्माला त्यांनीं प्रेमानेंच वागवून, मुक्तहस्तानें त्याला राजाश्रयहि दिला. विष्णु, देवी, लक्ष्मी, सरस्वती, गणपति अित्यादि सर्व हिंदु देवदेवतांचीहि मंदिरें शेंकडोंनी बांधलेली आजहि भग्नावशेष अवस्थेमध्यें सांपडत आहेत.

चंपाच्या नृपतींचें अुत्कृष्ट राजपदाचें ध्येय काय होतें, हें परमेश्वर धर्मराय या विख्यात राजाच्या वर्णनपर जो अेक लेख सांपडला आहे, त्यावरून अुत्तमपणें ध्यानीं येअील. हा परमेश्वरराय अि. स. ३८० मध्यें सिंहासनारूढ झाला होता, नि त्यानें चंपाचें विस्तृत राज्य स्थापित केलें होतें. त्याच्यासंबंधीं वर्णन केलेल्या अेका लेखांत खालीलप्रमाणें अुल्लेख केला आहे.

तो सर्व शास्त्रांमध्यें निष्णांत आहे; युद्धामध्यें महादेव आहे, सौंदर्यामध्यें प्रत्यक्ष कामदेव आहे; यज्ञकर्यांमध्यें अिंद्र आहे; आणि रचना करण्यामध्यें ब्रह्मदेव आहे.

यावरून चंपाच्या राजवंशाचें ध्येय काय होतें हें स्पष्ट होतें.

चंपामधील राज्यकारभारहि पुष्कळ अंशीं मनुप्रणीत प्रथेप्रमाणेंच चालत असे. धार्मिक कार्ये, ब्राह्मण पंडित आणि ज्योतिषी यांच्या नियंत्रणाप्रमाणें जात असत. राज्यांतील भूमीवरील कर, अुत्पन्नाच्या अेकषष्ठांशाअितका वसूल केला जात असे. कधीं कधीं, युद्धें वगैरे आपत्तींच्या वेळीं तो दशांशाअितकाहि घेतला जात असे.

सर्व सैन्य विभाग हा महासेनापतीच्या स्वाधीन असे. चंपामधील सर्व राजकीय रचना मनुस्मृति नि कौटिल्य अर्थशास्त्र यांवरच आधिष्ठित झाली होती.

चंपामध्यें भारतीय पुराणें, कथा, अितिहास हे सर्व ज्ञात होते. सांप्रत तेथील पुराण वस्तु संशोधन खात्यानें जे अनेक लेख संशोधित केले आहेत, त्यांमध्यें भारतांमधील सर्व शिवकथा गोंवलेल्या आढळतात. चंपामध्यें शैवपंथाचें प्राबल्य अनेक शतकें होतें, हें आपण पूर्वीं पाहिलेंच आहे. शंकरानें केलेलें कामदहन, त्रिपुरहनन, वगैरे कथांचा ठिकठिकाणीं उल्लेख आढळतो. चंपामध्यें शिवपूजा, शिवमूर्ति आणि शिवलिंग या दोन्हीं प्रकारांनीं होत होती. चंपामध्यें आजहि शेंकडों शिवमूर्ति सांपडतात. कंबुजच्या हिंदु राज्यांत ज्याप्रमाणें प्रमुख शिवमूर्ती नंतर गणपति, पार्वती, लक्ष्मी, अिंद्र वगैरे देवदेवतांच्या मूर्तींची पूजा होत होती, त्याचप्रमाणें चंपामध्येंहि ती होत होती. नंदीच्या मूर्तीहि शिवमूर्तींप्रमाणेंच ठिकठिकाणीं सांपडतात हें साहजीकच आहे.

दशावतार चरित्रें—आणि विशेषतः राम आणि कृष्णावतारांची चरित्रें तेथील लोकांना मुखपाठ होतीं.

चंपाचें राजे स्वतःला, भारतीय राजांप्रमाणेंच विष्णूचा अवतार समजत असत. अिंद्र, चंद्र, यम, सूर्य, कुबेर वगैरे सर्व दैवतें, त्यांच्या कथा नि त्यांच्या पूजा हिंदुस्थानप्रमाणेंच तेथें होत असत.

गृहज्योतिष, फलज्योतिषांवर त्यांचा भरंवसा असे नि तद्विषयक ग्रंथाचें अध्ययन तेथें होत असे. आपल्यासारखीच चार युगांची कल्पनाहि त्यांच्यामध्यें प्रचलित होती. निरनिराळ्या प्रसंगीं परमेश्वर निरनिराळ्या रूपानें अवतार घेअून, भक्तांचा उद्धार करतो, अशी त्यांची पूर्ण श्रद्धा होती. पहिल्या अिन्द्रवर्म्याच्या वेळच्या अेका लेखांत यासंबंधीं खालीलप्रमाणें अुल्लेख आहे.

'क्वचिदपि वलभिज्जो ब्रम्हजो विष्णुजस्य ।
क्वचितदपि भुजगेंद्रश् शंकरश्च क्वचिद्वा ।
क्वचिदपिरविचंद्रोऽपांपतिर्वन्हिरूपः ।
क्वचिदभयदर्विबस्स्स्य मोक्षाद् वभूव ॥ १ ॥

अशा रीतीनें चंपामध्यें हिंदुसंस्कृति पूर्ण स्वरूपानें अवतीर्ण झाली होती. बुद्धधर्माचेंहि महत्त्व तेथें दृग्गोचर होतें. आणि सुमारें सव्वाशें वर्षांपूर्वी-म्हणजे अि. स. १८२२ मध्यें चंपाचें अुरलें सुरलें राजवैभव नष्ट होअून ज्यावेळीं अंतिमचा राजा आनामी यांकडून पराभूत नि संत्रस्त होअून चंपाचा त्याग करून कंबुजच्या हिंदुराजाच्या आश्रयास निघून गेला, त्यावेळेपासून चंपामध्यें बौद्धधर्माचाच सर्वत्र प्रसार झाला आहे.

## सामाजिक जीवन.

चंपामध्यें भारतीयाप्रमाणेंच ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, अशा चार जाति अस्तित्वांत होत्या. तेथें ब्राह्मण आणि क्षत्रिय यांच्यामध्यें लग्नेंहि होत होतीं. ब्राह्मणांचें स्थान अुच्च असे. त्यांचा फार आदर होत असे. भारतीयां-प्रमाणेंच 'भूदेव' मानले जात असे.

चंपामधील लोक कोणत्याहि तऱ्हेचें मद्यसेवन करीत नसत हें मोठें आश्चर्य वाटतें. गायन, नर्तन यांची त्यांना फार आवड असे. नैतिक आचरणाचें महत्त्व फार समजलें जात असे.

चंपांतील हिंदु लोकांचा वेष सर्वसाधारणपणें पायांपासून कमरेपर्यंतचा भाग आणि छातीचा भाग हे वस्त्रावृत्त असत. बाकी सारें अंग अवस्त्र असे. तपस्वी लोक भारतीयांसारखेंच कौपिन धारण करीत असत. केशकलापांना निरनिराळ्या तऱ्हांनी बांधीत असत आणि त्यामध्यें फुलें नि भूषणें गुंफित असत. ते यज्ञोपवीतहि धारण करीत असत.

विवाह संस्था अत्यंत पवित्र समजली जात असे नि तिचें पावित्र्य दूषित करणाऱ्यास भयंकर प्रायश्चित्त देण्यांत येत असे. विवाह हा स्वजातिमध्यें गोत्रा-दिकांचा विचार करूनच ठरवीत असत. चंपामधील प्राचीन निवासियांनीं हिंदुधर्माची दीक्षा घेतल्यावर, त्यांच्यांतूनहि कांही जातींची अुत्पत्ति झाली

नि त्या जाति अेकंदर हिंदुजातीमध्यें समाविष्ट करून घेतल्या गेल्या. अुपजातीमध्येंहि आपापसांत लग्नें होत असत.

चंपामधील विवाहपद्धति आपल्या अिकडच्या सर्वसाधारण विवाहपद्धतीप्रमाणेंच होती. त्यामध्यें ब्राह्मणांचे स्थान प्रमुख होतें. तेच तिथि, मुहूर्त वगैरे ठरवीत असत. लग्न समारंभ हे भारतांप्रमाणेंच ठराविक महिन्यांतच होत असत. विवाहविधि समंत्रक असे नि तो ब्राह्मणच पार पाडीत असत.

पतीच्या मरणानंतर पत्नी सती जाण्याची चाल चंपामध्यें रूढ होती. ज्या स्त्रिया कांहीं अन्योन्य कारणांनीं सती जात नव्हत्या, त्या आपलें वैधव्यांतील आयुष्य अिकडील हिंदु विधवेप्रमाणेंच तपस्वीपणानेंच व्यतीत करीत असत. त्याचप्रमाणें कांहीं कांहीं पुनर्विवाहवहि करीत असत; परंतु हा मार्ग गौण समजला जात असल्यानें अशीं थोडींच अुदाहरणें घडत असत. चंपामध्यें स्त्रीयांना फार मान देत असत नि त्या धर्मरक्षणांत आधारभूत नि दक्ष असत.

त्यांच्यामधील अुत्सव वगैरे हिंदुतिथींना अनुसरूनच त्या त्या तिथीलाच होत असत. चंपाचा नूतन वर्षदिन चैत्रारंभालाच सुरूं होत असे नि महिना आमावास्येला समाप्त होत असे.

चैत्री पौर्णिमेला गांवाबाहेर लांकडाचा अेक चबुतरा बांधून, त्यावर राजा आणि सर्व लोक अुत्तम अुत्तम कपडे आणि सुगंधीं द्रव्यें रचीत असत. नंतर तें सर्व परमेश्वराला अर्पण व्हावें, म्हणून त्यास अग्निसात करीत असत.

आषाढ महिन्यांत नौकांची शर्यत लागत असे.

मृत देहाला चितेवर अग्नि दिला जात असे. साधारण मनुष्याला दुसऱ्या दिवशीं नि मोठ्या लोकांना ३ ते ५ दिवसानंतर जाळीत असत. शवाला दारूनें भिजवून, मग वाद्यें वाजत गाजत स्मशानांत नेत असत. मृत माणसांचे संबंधी बोडख्यानें, शोक करीत स्मशानयात्रेसोबत जात असत. प्रेत दहन झाल्यावर त्याची राख कोणत्यातरी नदीपात्रांत विसर्जन करीत असत. राजे लोकांची रक्षा, सोन्याच्या भांड्यांत भरून समुद्रांत विसर्जन करीत.

मागें कंबुजमधील लोकांच्या चालीरीतींविषयीं विवेचन करतांना कांहीं वेळेला प्रेतें पारशी लोकांप्रमाणें हिंस्र पशुपक्षांकडून खावविलीं जात असत असें सांगितलें. चंपामध्येंहि हीच चाल थोड्या प्रमाणावर प्रचलित होती.

प्रेत खाववून शिल्लक राहिलेलीं हाडें अग्निसात करून मग त्याची रक्षा नदींत विसर्जन करीत असत.

संशोधित लेखावरून विद्वानांचें असें मत आहे कीं, चंपामध्यें दहाव्या शतकांपर्यंत तरी संस्कृत भाषेचे अध्ययन अुत्कटपणें होत होतें. केवळ हिंदुस्थानमधील संस्कृत ग्रंथ तेथें अभ्यासिले जात नव्हते, तर तेथील पंडितहि स्वतः संस्कृतमध्यें निरनिराळया विषयावर ग्रंथरचना करीत होते. चंपाचें राजकुलहि मोठे विद्वान नि पंडितांनीं अन्वित होते. हें मागें आपण त्या त्या राजांच्या वृत्तांताच्या वेळीं पाहिलें आहे. चंपामध्यें तेथील विद्वानांनीं वेद, व्याकरण, ज्योतिष, रामायण महाभारत, जैनदर्शन, साहित्य, शैव, नि वैष्णव-वाङ्मय मनुस्मृति अित्यादि सर्व ग्रंथांचें अध्ययन चालू ठेवलें होतें. चंपामधील शिल्पकला फारच अुत्कर्षाला गेली होती. नि ती भारतीय शिल्पकलेची शिष्या होती.

चंपामध्यें ज्या धाडसी हिंदुवीरांनीं वसाहत प्रथम निर्माण केली, ते कोणत्या प्रांतामधील होते हा प्रश्न अजून विवादात्मक आहे. तरी पण ती वसाहत महाराष्ट्रीय लोकांनीं केली असली पाहिजे असा अभिप्राय 'बृहत्तर-भारत' या विख्यात हिंदी ग्रंथाचें विद्वान लेखक चंद्रगुप्त वेदालंकार यांनीं खालीलप्रमाणें प्रकट केला आहे. ते असे म्हणतात.

'अभीतक यह विचार भी विवादास्पद रहा है कि चंपा मे आवासित होनेवाले हिंदु, भारतसे किस प्रदेशमें सें आये थे ? प्राचीन शिलालेखोंकी शैलीके आधारपर अिस प्रश्न का भी अुत्तर देनेका प्रयत्न कीया जायेगा। अिस दृष्टीसे अध्ययन करनेपर यही परिणाम निकलता है कीं महाराष्ट्री लोगोंका अिसमे पर्याप्त हाथ था। प्राकृत भाषाका अेक सूत्र है 'अण् मुकुटादिषु' अर्थात् मुकुटादि शब्दों को 'अण्' होता है, महाराष्ट्री भाषामें, अिससे 'मुकुट' के स्थानपर 'मकुट' हो जाता है। अिसका प्रयोग चंपाके लेखोंमें कअी स्थानोंपर किया गया है। अिसी प्रकार ने 'न' स्थानपर 'ण' का प्रयोग महाराष्ट्रीय लोग करते हैं। अिसके लिये प्राकृत सूत्र 'नोणः' है, अुत्तरीय भारतके लोग अिस 'ण' त्व को पसंद नहीं करते। अुनमे किंवदंती भी है–'फाल्गुने गगने फेने 'ण' त्व मिच्छंति बर्बराः' अैसे प्रयोग भी चंपाके लेखोंमें पर्याप्त विद्यमान

है। अिसी प्रकार 'द' के स्थानपर 'ड' भी महाराष्ट्रीमें देखा जाता है। अिसका प्रयोग भी चंपाके लेखोंमें, यत्रतत्र देखनेको मिलता है। अिन आधारों-पर यह कहा जा सकता है कि चंपामें बसनेवालोंकी पर्याप्त संख्या, अथवा, कम से कम, अिन लेखोंके लिखनेवाले तो अवश्यही महाराष्ट्र सज्जन थे'

अशा रीतीनें ही चंपाची हिंदुराज्यलक्ष्मी, जवळ जवळ अेकोणीस शतकें चंपासारख्या दूर विदेशांत वैभवानें नांदून, अंतीं, तिची मातृभूमि जी भारत-माता, तिच्यापासून कोणतेहि नवीन जीवन न मिळाल्यामुळें, परकीय आक्र-मणाशीं, अनेक शतकें, अप्रतिहतपणें झगडा करून, क्षीणबल होत होत कालवश झाली! आणि आपणां महाराष्ट्रीयांनां तर या चंपाच्या हिंदु राज्याच्या अुत्क-र्षापकर्षाचा अधिकच अभिमान नि जिव्हाळा वाटला पाहिजे–कारण, त्या वैभवशाली चंपाचे निर्माते महाराष्ट्रीय हिंदूच होते, असें संशोधक विद्वानांचें मत बनत चाललें आहे!

अशा या अभिमानास्पद चंपाच्या हिंदुराज्याचा हा अल्पसा दिलेला वृत्तांत त्या विस्मृति पथाला गेलेल्या चंपाच्या ज्या वीरांनीं, मुत्सद्यांनीं, पंडि-तांनीं हिंदुसंस्कृतीचें यशोदीप शतकोशतकीं, देशोदेशीं नि सागरासागरांवर अुज्वलतेनें प्रकाशत ठेवले त्यांनां कृतज्ञतेनें वंदन करून पुरा करतों!

## : १७ :

## शैलेंद्रांचें सागर साम्राज्य.

आतांपर्यंत आपण भूप्रदेशांवर विस्तारलेल्या हिंदूंच्या विस्तीर्ण वसाहती राज्यांचा अितिहास त्रोटकपणें पाहिला. या भागांत हिंदूंनीं फार प्राचीन कालापासून कित्येक शतकें सागरावर नि महासागरांवर सत्ता गाजविलेल्या अेका हिंदूंच्या सागर साम्राज्याच्या अितिहासाचें अल्पसें दर्शन आपल्यास घ्यावयाचें आहे. मुसलमानांच्या आसुरी आक्रमणानंतर, प्रत्यक्ष हिंदुस्थानांतीलच सुरक्षितता नष्ट झाली. हिंदु देवतांची मंदिरें, प्रासाद, नगरें, ग्रामें नि गृहेंहि

यावनी अत्याचारांची केंद्रें बनलीं; आणि म्हणून, देशांतील प्रत्येक धाडसी, शूर, नि लढवय्या व्यक्तीलाही स्वदेशांतील पूज्य स्थानेंच लढविणें नि संरक्षिणें प्रथम-कर्तव्य बनलें. त्याचप्रमाणें हिंदुजातीवर झालेल्या या प्रचंड आक्रमणानें सबंध समाजाचीच घटना नि रचनाही हादरून जाअुन विस्खळित झाली. या झंझावातानें प्रथम प्रथम ठिकठिकाणीं बेसावध असलेल्या हिंदुराजांचीं छत्रचामरें सैन्यें नि राज्यें, भराभर अुन्मळून पडलीं नि त्यामुळें सबंद हिंदुजातीचाच आत्मविश्वास हादरून जाअून, तीव्र पराभूत वृत्तीची छाप, हिंदुजनतेवर पडली. त्यामुळें निराशा, निष्कर्तव्यता, दुर्बल बनविणारा दैववाद यांनीं सर्व सामान्य हिंदुजनांचीं मनें निस्तेज बनलीं नि धाडस, महत्वाकांक्षा, विजिगीषा या विश्वविजयी सद्गुणांचा लोप झाला. अशा अवस्थेंत प्रथम आत्मरक्षणाच्या नैसर्गिक प्रवृत्तीनें, त्या वेळच्या समाजधुरीणांनीं परदेशगमन निषिद्ध करून, शूर नि धाडसी वीरांना प्रथम आपला देश, धर्म नि संस्कृतिरक्षणालाच प्रवृत्त करणें अगदीं साहजीकच आहे. हें अेक कारण; नि दुसरें कारण, म्हणजे सामान्य हिंदुजनतेंतील वर वर्णिलेली पराभूत आणि असहाय्य बनलेली दुबळी वृत्ति, या दोन कारणांनीं हिंदूंचें परदेशगमन आणि परदेशविजय हे आटून गेले. आणि याचें प्रत्यंतर आपल्या परदेशी विस्तृत साम्राज्यांचेंहि वैभव आणि तेज अगदीं त्याच, हिंदुस्थानविराल यावनी आपत्तीच्या वेळेपासूनच, मंदमंद होअूं लागले, असें आपणांस आतांपर्यंतचा बृहत्तर भारताचा जो संक्षिप्त अितिहास आपण पाहिला, त्यावरून दिसून येअील.

परंतु, अि. स. चीं पहिलीं सहस्त्रवर्षे भारतांतील हिंदूंच्या या परदेशगमनाला, परदेश विजयाला आणि परदेश राज्यस्थापनेला सारखी भरतीच आली होती. याचें सत्यत्व आतांपर्यंत बृहत्तर भारताचें विस्तीर्ण साम्राज्य दूरदूरच्या भूप्रदेशावर जें विस्तारत गेलें, त्यावरून सिद्ध झालेंच आहे. आतां आपणांस सागरांवर आणि महासागरांवर हिंदूंच्या नाविकदलांनीं जे अपूर्व विजय मिळवून अनेक शतकेंपर्यंत आपलें समुद्रस्वामिनीपणाचें स्थान अढळ ठेविलें, तो स्फूर्तिदायक अितिहास थोड्यांत पहावयाचा आहे.

## हिंदूंचें नौकानयनांतील नैपुण्य

हिंदूंनीं फार प्राचीन काळापासून नौकानयनांत अग्रस्थान पटकाविलें

होतें. हें सत्य, अनेक अरेबियन आणि चिनी व्यापाऱ्यांच्या आणि प्रवाशांच्या अुपलब्ध झालेल्या लेखांवरून आतां निःशंक रीतीनें सिद्ध झालेलें आहे. नौकानयनांत हिंदूंच्या सर्व जातींतून नौकानयन करणारे धाडसी लोक निघत होते. ब्राह्मणजाति प्रमुखतः ज्ञानसंपादनार्थ अध्ययन आणि तें संपादन केल्यावर जगभर पसरविण्याकरतां अध्यापन यामध्येंच बहुतेक व्यग्र असे. परंतु, नौकानयनाचा हा नाद, त्यावेळच्या ब्राह्मणांमध्येंहि कांहीं कमी प्रमाणांत आढळत नाहीं. चौथ्या शतकांत अनेक चिनी यात्रेकरू बुद्धभगवंताच्या या पवित्र जन्मभूमीमध्यें यात्रा करण्यास गटागटानें येत असत. अशाच प्रकारचा अेक गट, भारतांतील यात्रा करून परत गेला, तेव्हां, त्यांनीं आपला मार्ग नमूद करून ठेविला आहे, तो अेल्फिन्स्टनच्या ' अिंडिया ' या पुस्तकांत खालील प्रमाणें वर्णिला आहे.

गंगाप्रवाहांतून नौकांमध्यें बसून ते प्रथम सीलोनमध्यें गेले. तेथून जावामध्यें गेले आणि जावामधून चीनमध्यें परतले. या सर्व नौका प्रवासामध्यें नौकानयन करणारे खलाशी हे ब्राह्मण होते असें त्यांनीं नोंदून ठेविलें आहे.

हिंदूंच्या नौकायन नैपुण्याचे आणखी अनेक विपुल दाखले आहेत. परंतु, तो निराळा अेक स्वतंत्र अितिहास आहे. सांप्रत, आपल्या अितिहास-कथनाच्या अनुरोधानें अेवढेंच प्रथम येथें दाखवावयाचें आहे कीं, आपल्या हिंदुस्थानच्या समुद्र तीरावरील बहुतेक प्रांतांतील हिंदुलोक समुद्रयानांत निष्णात होते.

या प्रांतांपैकीं कलिंग हा प्रांत अि. स. च्या पहिल्या शतकापासूनच आघाडीवर होता. हा प्रांत दक्षिण हिंदुस्थानच्या पूर्व किनाऱ्यास लागून अुत्तरेस महानदी आणि दक्षिणेस गोदावरी नदी यांच्या मध्यंतरी आहे. त्याचप्रमाणें पश्चिमेस पूर्वघाट व पूर्वेस समुद्र ( बंगालचा अुपसागर ) यामधील देश तो कलिंग देश होय. हा प्रांत फार प्राचीनकाळापासून प्रख्यात आहे. ' अंग, वंग, कलिंग ' हें त्रिकूट पौराणिक काळीं फार प्रसिद्ध होतें.

या कलिंग देशांतून फार प्राचीन कालापासून हिंदुलोक, मलाया, सुमात्रा, जावा, ते थेट बोर्निओपर्यंत केवळ व्यापाराकरितांच नव्हे तर, वसाहति स्थापण्याकरतां नि हिंदुराज्यें अुभारण्याकरतां जात होते. या सर्व द्विपसमूहाला

पूर्वी आपले लोक 'सुवर्णद्वीप' या सामुदाअिक नांवानें संबोधित होते. या सुवर्णद्वीपांचा अुल्लेख आपल्या संस्कृत वाङ्मयांत अनेकवार आला आहे. कथासरित् सागर, जातकग्रंथ अित्यादि ग्रंथांतील अनेक कथांमध्यें सुवर्णद्वीपाचा अुल्लेख आला आहे. भारतांतील अनेक धनवान् व्यापारी आपल्या स्वतःच्या नौका ठेवून आयात, निर्यातीचा व्यापार सुवर्णद्वीपांशीं करीत होते. त्याचवेळीं हिंदु धाडसी वीर तेथें वसाहति करून नि राज्यें अुभारून हिंदुधर्म नि हिंदुसंस्कृति यांचा विजयध्वज तिकडे रोवित होते.

यापमाणें मलाया प्रायद्वीप, सुमात्रा, जावा, बाली, बोर्निओ, सेलिबस् आदि सुवर्णद्वीपांत प्रत्येक द्वीपांतील संक्षित अितिहास हा आपण पुढें अनुक्रमानें पाहूंच. परंतु प्रथम या सर्व सहस्रावधि द्वीपांवर अेक हिंदु सार्वभौम सत्ता जवळ जवळ सातसें वर्षेंपर्यंत, प्रभुत्वानें राज्य करीत होती, हिंदी महासागर नि पश्चिम समुद्रापासून तो प्रशांत महासागरापर्यंत अक्षुण्णपणें आपले समुद्र स्वामित्व गाजवीत होती, त्या शैलेंद्रांच्या सागर सार्वभौमत्वाचा वृत्तांत आपण प्रथम वर्णन करण्यास घेअूं.

सुवर्णद्वीपांमधून (ज्यांस आज मलायोशिया, अिन्डोनेशिया म्हणून ओळखलें जाते) अि. स. च्या पहिल्या शतकापासून आणि त्याच्या आधींहि हिंदूच्या वसाहति स्थापन होअूं लागल्या होत्या. अि. स. च्या सातव्या शतकापूर्वी सुमात्रा जावा ते थेट बोर्निओपर्यंत स्थापन होअून, तेथें त्यावेळेपर्यंत, हिंदूंचीं अनेक राज्यें निर्माण होअून, तीं त्या त्या भागावर प्रतिष्ठितहि झालीं होतीं. परंतु, त्या सर्वांना अेका छत्राखालीं आणून, त्यांचें त्या विस्तीर्ण सागर साम्राज्यांत कुणी अजून परिवर्तन करूं शकलें नव्हतें. तें प्रचंड कार्य ७ व्या शतकाच्या आरंभापासून अेका साहसी हिंदुसत्तेनें हातीं घेअून यशस्वी केलें. त्या साहसी सत्तेचें नांव होतें 'शैलेंद्र!'

हें 'शैलेंद्र' नामाभिधान धारण करणारे साहसी लोक, म्हणजे पुराणप्रसिद्ध कलिंगांतील लोक होते. अि. स. च्या सातव्या शतकाच्या आरंभीं, कलिंगांतून, त्यांनी बाहेर पडून प्रथम ब्रह्मदेश हस्तगत करण्यास आरंभ केला. अेक शतकापर्यंत, त्यांनीं ब्रह्मदेश जिंकून तेथें आपलें आसन स्थिर केलें नि आठव्या शतकांत ते ब्रह्मदेशांतून मलायावर चालून गेले. मलायावर थोड्याच

शतकांत आपलें आधिपत्य स्थापन करून, त्यांनीं आठव्या शतकाच्या अंताला, सुमात्रा नि जावावरीहि आपलें प्रभुत्व स्थापन केलें; अितकेंच नव्हे तर या सर्व प्रदेशाला, आपल्या मायभूमीची पूज्य स्मृति चिरंतर करण्याकरतां 'कलिंग' हेंच नांव दिलें. यांचा वैभवसूर्य दोन शतकांच्या अवधींत साऱ्या सुवर्णद्वीपांवर प्रकाशूं लागला. सर्व मलायेशियाचे अेकछत्री साम्राज्य या कलिंगनिवासी यानें प्रस्थापित केलें नि आपणांस 'शैलेंद्र' हें अभिधान धारण केलें.

चिनी, अरबी वगैरे प्रवासी शैलेंद्र सम्राटाचा अुल्लेख 'महाराज' या सार्थ पदवीनें करीत असत. या शैलेंद्रांचें प्रबल नौकादळ, प्रशांत (पासिफिक) महासागरापासून तों हिंदी महासागर नि पश्चिम समुद्रा (अरेबियन समुद्रा) पर्यंत, आपलें सागर स्वामित्व गाजवीत होते. अरबस्थानापासून तों चीन जपान पर्यंतचे व्यापारी आणि प्रवासी शैलेंद्रांच्या समर्थसंरक्षणाखालीं निर्भय-पणें व्यापार करीत होते.

'सुलेमान' या नांवाच्या अेका अरब व्यापाऱ्यानें लिहिलें आहे कीं, 'शैलेंद्रमहाराजांच्या नौसेनेची प्रसिद्धि चीनपासून भारतीय समुद्रापर्यंत पसरली आहे. अि. स. ८४४ मध्यें अेक अरब प्रवाशी शैलेंद्रमहाराजांच्या समृद्धी-विषयीं लिहितों कीं, 'महाराजांची प्रतिदिवशींची आवक २०० मण सोन्याची आहे!' अि. स. ९०३ मध्यें आणखी अेक आरबी प्रवाशी लिहितो कीं, शैलेंद्र महाराजांच्या समान अितका समृद्ध आणि शक्तिशाली राजा दुसरा कुणीहि नाहीं! या प्रवाशाचें नांव 'अिब्नरोस्तेह' असें आहे. अशा आणखी कितीअेक आरबी प्रवाशांनीं शैलेंद्रांचीं स्तुतिस्तोत्रें गाअिलीं आहेत. अि. स. ९४३ मध्यें सुवर्ण-द्विपाहून प्रवास करून गेलेला 'मसुदी' नामक आरबी प्रवासी लिहितो कीं, 'महाराजांचें राज्य अतुलनीय आहे. अत्यंत वेगवान नौकाहि, या महा-राजांच्या साम्राज्यांत असलेल्या सर्व द्वीपांनां दोन वर्षांतहि प्रदक्षिणा घालूं शकणार नाहीं. ! सर्व प्रकारचे मसाले या साम्राज्यांत अुत्पन्न होत आहेत. या जगांत यांच्यासारख्या संपत्तिमान् राजा दुसरा कुणीहि नाहीं.'

अशा रीतीनें परदेशीय आणि त्यांतहि अरबी प्रवाशी, ज्याअर्थी या हिंदु समुद्रसम्राटांची अितक्या मुक्त कंठानें स्तुति करताहेत, त्याअर्थीं या शैलेंद्रांचें समुद्र साम्राज्य, त्यांचें अैश्वर्य, त्यांचें प्रबळ नौकादळ त्यांचा प्रचंड

व्यापार, हीं केवढ्या असामान्य प्रकरणावर असतील, याची सहज कल्पना येते. अेवढें हें बलिष्ट सागर साम्राज्य, आपले ते पराक्रमी पूर्वज दोन महासागरावर, त्या प्राचीनकाळीं प्रस्थापूं शकलें नि सात शतकांच्या दीर्घ कालापर्यंत तें टिकवूं शकलें, ही केवढी आश्चर्याची–नि केवढी अभिमानाची गोष्ट !

या शैलेंद्रांच्या मागून शतका दों शतकांतच पाश्चात्य युरोपीय देशांतून आलेल्या पोर्च्युगीज, डच, फ्रेंच, ब्रिटिश या लोकांनीं जरी समुद्रावरचें वर्चस्व आळीपाळीनें मिळविलें, तरी त्यांपैकीं अेकाहि सत्तेला, सबंद सात शतकांअितक्या दीर्घकालपर्यंत आपलें प्रभुत्व ठेवतां आलें नाहीं. पोर्च्युगीज, डच, फ्रेंच हे लोक तर दोन दोन, शतकांतच हतबल झाले, क्षीणशक्ति बनले आणि ब्रिटिशांनीं जरी आणखी अेकादें शतक अधिक आपली सत्ता टिकाविली असली तरी सांप्रतच्या कालीं, कांहीं काळ कां होअीना, ती सत्ता, जपानच्या सागरीसामर्थ्यापुढें निस्तेज झाली आहे ! या तुलनेनें, त्या प्रतापी शैलेंद्रांनीं सात शतकेंपर्यंत आपलें समुद्रस्वामित्व गाजविलें हें केवढें आश्चर्य ! हा केवढा चमत्कार ! आपल्याला हें केवढें अभिमानास्पद !

शैलेंद्र सम्राटांची सत्ता, केवळ सागरावरच अप्रतिहात वेगानें पसरत होती, असें नव्हे, तर भूमीवरहि ती आपल्या साम्राज्याखालीं चंपा, कंबुज यांसारखीं प्रबळ हिंदु राज्येंहि अंतर्गत करून घेत होती. अि. स. ८०२ मध्यें कंबुजच्या गादीवर बसलेल्या, दुसऱ्या जयवर्म्यानें, या शैलेंद्रांच्या आधीनतेपासून सुटण्यास सामर्थ्य येण्याकरतां, अेक मोठा यज्ञ केला होता, हा वृत्तांत मागें कंबुजच्या अितिहासांत आलेलाच आहे.

अशा रीतीनें या शैलेंद्रांची सार्वभौम सत्ता वाढत जाअून ११ व्या शतकांत, त्यांचा वैभव सूर्य माध्यान्हीं येअून तळपूं लागला.

तीनशें वर्षेपर्यंत असें अप्रतिहतपणें शैलेंद्रांनीं सार्वभौमत्व गाजविल्यावर, ११ व्या शतकापासून मात्र त्यांना अनेक प्रतिस्पर्धी अुत्पन्न होऊन, त्यांचें प्रभुत्व झुगारून देण्यास प्रयत्न करूं लागले. अेका बाजूनें जावाचा हिंदु राजा यांना शह देअूं लागला नि दुसऱ्या बाजूनें दक्षिण हिंदुस्थानांतील चोल देशाच्या राजांनीं हल्ले करण्यास आरंभ केला.

जावाच्या राजानें जें युद्ध सुरू केलें, त्यामध्यें प्रथम प्रथम जरी त्यास

यश आलें, तरी शैलेंद्रांनीं, त्यांचा पूर्ण पराजय केला. अेका शत्रूला असा परास्त केल्यावर, शैलेंद्रांच्या समुद्रसेना, समुद्राच्या लाटांप्रमाणें चौलाच्या समुद्रसत्तेशीं घडका देअूं लागल्या.

दक्षिण हिंदुस्थानच्या पूर्व पश्चिम तीरांवर पसरलेली पांड्य आणि चोल यांची राज्येंहि, कलिंगाप्रमाणेंच फार प्राचीन कालापासून हिंदुस्थानच्या अितिहासांत प्रसिद्ध आहेत. त्यांतील लोकहि मोठें नौकानयनकुशल म्हणून केवळ अनेक शतकेंच नव्हे, तर अनेक सहस्त्र वर्षांपासून प्रसिद्ध होते.

चोलराजांच्या नौकादलासी, शैलेंद्रांचें खटके अुडूं लागले. प्रथम प्रथम चोल नि शैलेंद्र या दोन्हीहि हिंदुसमुद्रसम्राटांची चांगली मैत्री होती. या दोन्ही राजांनीं संयुक्तपणें नालंदाच्या प्रख्यात विश्वविद्यालयाला देणग्याहि दिल्याचा अुलेख आहे. त्याचप्रमाणें दोघांचेहि व्यापारी संबंधहि अुत्तम होते. परंतु, पुढें काय कारण झालें तें कांहीं अुपलब्ध नाहीं, परंतु या दोन्हीहि हिंदूंच असलेल्या समुद्रसम्राटांमध्यें युद्ध जुंपलें–आणि याचें आश्चर्य वाटण्याचेंहि कारण नाहीं–कारण, पोर्च्युगीज, डच, फ्रेंच अिंग्रज हे सर्वजण ख्रिश्चनच नाहीं कां? आणि त्यांच्यामध्येंहि वैरें अुद्भवलीं, युद्धें झालीं, अेकमेकांनें अेकमेकांस नष्ट करण्याचे कसून प्रयत्न केले. त्याचप्रमाणें या दोन्हीं हिंदुसागर सत्तेमध्येंहि युद्ध जुंपलें.

चौलांचा महाप्रतापी महाराजा राजेंद्र चोल, यानें कलिंग, वंग (बंगाल) हे प्रांत जिंकून घेअून अि. स. १०१७ मध्यें मलायाप्रायद्वीपवर स्वारी करून शैलेंद्रांचा पाडाव केला नि तें जिंकून घेतलें. त्यावेळीं संग्राम विजयोत्तुंगवर्मा या नांवाचा शैलेंद्र राजा तेथें राज्य करीत होता. त्यांस राजेंद्र चोलानें पकडून त्याचीं राजधानीहि लुटली. सुमात्रा बेटाचा पूर्व भागहि त्यानें जिंकला थोड्या वेळांतच चोल साम्राज्यांत हिंदुस्थानमध्येंच बंडें झाली. कलिंग राज्य स्वतंत्र झालें. चालुक्यांशीं युद्ध जुंपलें. त्या संधीचा लाभ घेअून शैलेंद्रानें, राजेंद्रचोलापासून आपला प्रदेश परत जिंकून घेतला. परंतु, राजेंद्रचोल हा महापराक्रमी राजा होता. त्यानें पुन्हां अि. स. १०७० मध्यें मलाया प्रायद्वीप जिंकून घेतलें. नंतर १०९० अि. च्या सुमाराला या दोन समुद्रसत्रांमध्यें मैत्रीचा संधि घडून आला असा अुल्लेख आढळतो.

अशा रीतीनें शैलद्र आणि चोल यांचा झगडा कमी अधिक प्रमाणांत अेक शतकभर चालला होता. शैलेंद्र जरी या महायुद्धांतून यशस्वीपणें बचावलें, तरी तें अवाढव्य साम्राज्य चोलांच्या आघातांनीं चांगलेंच खिळखिळें झालें. परंतु, थोड्याच आवकाशांत शैलेंद्रांची सत्ता पुन्हां सावरली. यानंतर पुढें तीनशें वर्षें, शैलेंद्रांचें समुद्रस्वामित्व अविच्छिन्नपणें चाललें होतें. अि. स. १३२५ पर्यंत या वैभवशाली साम्राज्याचीं स्तुतिस्तोत्रें चिनी, अरबी आदि प्रवासी आणि व्यापारी मुक्तकंठानें गात होते. समुद्रावरचे सर्व शत्रू शरण आले होते. शैलेंद्रांच्या, अिकडे चीन अथवा तिकडे अिस्लामी अरब, कुणीच त्यांच्यापुढें टिकाव धरू शकत नव्हते! या सागर–साम्राज्याचा अंतिमचा सम्राट् 'चंद्रबाहु' हा होता. याच्या मृत्युनंतर मात्र शैलेंद्रांचे हे सातशें वर्षें टिकलेलें सागरसाम्राज्य विलयाला गेलें! या साम्राज्याच्या अंतिम काळांत, याच्याच अधिपत्याखालीं असलेल्या जावा येथील हिंदु राजानें शैलेंद्रांचें सार्वभौमत्व झुगारून देण्याकरतां बरिच वर्षें प्रयत्न चालविला होता. जावा बेटाचा त्यावेळचा राजा 'कृतनगर' हा मोठा शूर निघाला. त्यानें केवळ 'जावा' स्वतंत्र केलें, अितकेंच नव्हे, परंतु. शैलेंद्रांचें राज्यहि जिंकून घेअून आपलें समुद्रस्वामित्व स्थापन केलें. यावेळेपासून शैलेंद्रांचें साम्राज्य विलयाला जाअून त्या ठिकाणीं 'जावा'च्या हिंदु राज्यानें आपलें साम्राज्य विस्तारलें. शैलेंद्रांच्या साम्राज्यांतील मलाया प्रायद्वीप, सुमात्रा वगैरे बहुतेक सर्व प्रदेश 'जावा'च्या साम्राज्यांत अंतर्भूत झालें.

अंतीं, हें वैभवशाली सागर हिंदुसाम्राज्य सात शतकें टिकून, त्या सर्व भक्षक कालाच्या अुदरांत अंतर्हित झालें! त्यांचें तें अपराजित नौकादल, प्रशांत महासागरांत जणुं विरून गेलें! समुद्रतरंगांच्या तोलावर डुलणारा त्याचा विजयी ध्वज, सातशें वर्षांच्या स्वच्छंद विहारानंतर अंतर्धान पावला!

: १८ :

## मलाया-प्रायद्वीप

आतां आपणांस शैलेंद्र साम्राज्यामधील कांहीं महत्वाच्या देशांचे अितिहास त्रोटकपणें पहावयाचे आहेत. यांपैकीं प्रथम महत्वाचा देश जो मलाया त्यासंबंधीं प्रथम विवरण करूं.

मलायाच्या चतुःसीमा पुंढीलप्रमाणें आहेत. अुत्तरेस सयाम; दक्षिणेस सिंगापूर बेट नि सामुद्रधुनि, पूर्वेस चीनचा समुद्र आणि पश्चिमेस मलाकाची सामुद्रधुनि.

मलायामध्यें हिंदुलोकांची वसति केव्हां झाली, हें जरी निश्चित रीतीनें आज अितिहासाला माहीत नसलें, तरी अितकें निश्चित आहे कीं, अि. स. च्या पहिल्या शतकाच्या पूर्वीपासून हिंदूंची वसाहत येथें दृढ झाली होती. कारण, हिंदूंचें फूनानचें अथवा मलयसाम्राज्य त्याचप्रमाणें चंपा, कंबुज येथील हिंदुराज्यें, हीं पहिल्या शतकाच्या बेतालाच स्थापन झालीं होतीं. आणि या प्रदेशांत जाण्याचा मुख्य मार्ग म्हणजे मलाया द्वीपकल्पांतूनच होता. तेव्हां ती राज्यें स्थापन करण्याच्या आधींच हिंदुलोकांनीं मलाया व्यापला असला पाहिजे, हें अुघड आहे. फूनानचें साम्राज्य ज्यावेळीं विस्तार पावत होतें, त्यावेळीं मलायावरहि त्याचें सार्वभौमत्व प्रस्थापित झालें होतें. अि. स. ४४९ मध्यें मलायामध्यें श्रीपालवर्मा या नांवाचा राजा राज्य करीत होता, असा अुल्लेख चीनमधील सुङ्-कालीन लेखांमध्यें आला आहे. श्री. पालवर्मा यानें चीनच्या सम्राटाला भेटी दाखल कांहीं अुंची वस्तु पाठविल्याचा तो अुल्लेख आहे. त्याचप्रमाणें या लेखांमध्यें असेंहि म्हटलें आहे की येथील लोकांच्या

चालीरीति चंपा आणि कंबूजच्या लोकांशी मिळतात. यावरून मलायामधील हिंदु राज्य हें चंपा, कंबुज, प्रमाणेंच अेक हिंदुवसाहत राज्य होतें हें स्पष्ट होतें.

येथें शिवपूजा, विष्णुपूजा अित्यादि हिंदु देवदैवतांचीच पूजा होत होती, यांचे अवशेषहि मलायामध्यें सांपडतात. संस्कृतमध्यें लिहिलेले कांहीं शिलालेखहि सांपडले आहेत. ते अि. स. च्या ४–५ शतकांमधले आहेत. यावेळचे मलायाचे हिंदु राजे आपल्या नांवाला प्रथम 'श्री' लावीत असत. जसें श्री पालवर्मा, श्रीवरनरेंद्रवर्मा अित्यादि. सुमात्राचे राजेहि हीच पदवी धारण करीत असत.

अि. स. च्या सातव्या शतकांत शैलेंद्रांची प्रबल सत्ता प्रथम ब्रम्हदेश-मध्यें स्थापन झाली नि त्यानंतर मलायाहि त्यांच्याच आधिपत्याखालीं आला. त्यानंतर चवदाव्या शतकापर्यंत तो शैलेंद्रांच्या सत्तेखालींच राहिला.

शैलेंद्राच्या सत्तेवर शेवटचा आघात करणारा जावाचा पराक्रमी राजा 'कृतनगर' यानें मलायामधील 'अिंद्रपूर' (अर्वाचीन 'पहङ्') वर स्वारी करून तें घेतलें. जावाचे आक्रमण दक्षिणेकडून सुरूं झाल्यावर सया-मच्या राजांनींहि अुत्तर मलायावर आक्रमण करण्यास आरंभ केला.

या घटना घडत असतां, मलायाच्या पूर्व किनाऱ्यावरील मलाक्का या नांवाच्या राज्यांत अेक दुर्दैवी घटना घडत होती. हें मलाक्काचें संस्थान शैलें-द्रांच्या पतनानंतर स्थापित झालें होतें. त्याचा वृत्तांत असा: हा वृत्तांत पोर्च्युगीज गव्हर्नर अलबुकर्क (ज्यानें अि. स. १५१० मध्यें गोंवा जिंकलें तो) याच्या लिखाणाप्रमाणें घेतला आहे.

मलायांतील पलेम्बङ् येथील परमेश्वरनामक राजा नि जावाचा भट्टारक तुम्पेल या नांवाचा राजा, यांचें वारंवार युद्ध होत असे. हा समय १४ व्या शतकांतील अुत्तारार्धाचा होता, या युद्धांत अंतीं 'परमेश्वर' राजाचा पराभव झाला नि तो पळून 'सिंहपूर' ( सिंगापूर )च्या आश्रयास गेला. कांहीं कालानंतर सिंहपूरच्या राजाच्या भावानें, परमेश्वरांवर हल्ला चढविला. तेव्हां परमेश्वर तेथूनहि पळाला नि मुअर नदीच्या कांठीं वसति केली. ही नदी मलायाच्या पूर्वतिरावर आहे. तेथें अि. स. १४०३ मध्यें यानें चांगलाच जम बसवून व्यापारहि वाढ-

विला नि तेथें अेक स्वतंत्र राज्य अुदयास आहे. त्याचें नांव परमश्वरनें 'मेलका' असें टेविलें. थोडेंच वर्षांत परमेश्वर मृत्यु पावला. त्याचा मुलगा त्याच्यामागून राज्यावर बसला. यावेळेला, तेथें अनेक अरब, गुजराथ वगैरेकडचे मुसलमान व्यापाऱ्यांनीं आपला चांगला जम बसविला होता. परमेश्वराच्या मुलानें अेका मुसलमान कुमारिकेशी विवाह केला नि तिला हिंदु करून घेण्याच्या ठिकाणीं, स्वतःच मुसलमान होअून, त्यानें आपलें नांव 'सिकंदरशहा' असें ठेविलें ! अशा रीतीनें मलक्कांचें हिंदुराजघराणें मुसलमान झालें ! याच्यानंतर याचा मुलगा मुजफरशहा गादीवर आला. त्यानें आसपासच्या लहान लहान राज्यावर स्वाऱ्या करून मलक्काचें राज्य बरेंच वाढविलें.

मागें आपण पाहिलेंच आहे कीं, अिंद्रपूर (पहङ्) च्या राजास जावाच्या कृतनगर राजानें मांडलिक बनविलें होतें. त्यानंतर, अिंद्रपूरच्या राजानें, पंधराव्या शतकांत जावाचें स्वामित्व झुगारून दिलें. परन्तु सयामपुढें त्याचें कांहीं चाललें नाहीं. अिंद्रपूरचा हिंदु राजा अशा रीतीनें दोन प्रबल शत्रूंशीं झगडत असतांनाच मलाक्काच्या या अुदयोन्मुख यावनी राजानें मुजफ्फरशहानें-अिंद्रपूरावर स्वारी केली. यावेळीं अिंद्रपूरचा राजा महाराज 'देवशूर' हा होता. लढाअीमध्यें महाराज देवशूराचा पराजय झाला नि तो बंदिस्त केला गेला. याप्रमाणें मलायामधलें हें हिंदुराज्य, पंधराव्या शतकाच्या अंताला-सुमारें दीडसहस्र वर्षें मलायामध्यें हिंदुसंस्कृतीची जोपासना करून अंत पावला !

मलाक्काच्या मुसलमान राजांनीं यानंतर अि. स. १५११ पर्यंत राज्य केलें नि स्थापनेपासून अेक शतकांतच अि. स. १५११ मध्यें पोर्च्युगीजांचा गव्हर्नर अलबुकर्क यानें मलक्काचा अंतीमचा मुसलमान राजा सुलतान मुहम्मद यांस पराजित करून, मलक्काचें यावनी राज्य नष्ट केलें.

मलक्का पोर्च्युगीज लोकांनीं अि. स. १५११ मध्यें जिंकलें तें त्यांच्या आधिपत्याखालीं अि. स. १६४१ पर्यंत होतें. त्यावर्षी डच लोकांनीं पोर्च्युगीजांचा पराभव करून, तें आपल्या स्वाधीन करून घेतलें. डच लोकांनीं तेथें अि. स. १७९५ पर्यंत राज्य केलें. नंतर मलक्का ब्रिटिश लोकांनीं डच

लोकांपासून जिंकून घेतलें. नंतर ब्रिटिश व डच यांच्या मध्यें अेक संधि होअून, अि. स. १८१८ मध्यें तें डच लोकांना परत मिळालें. परंतु अि. स. १८२४ मध्यें ब्रिटिशांनीं सुमात्रामधील कांहीं ठाणी डच लोकांना देअून, पुन्हां मलक्का आपल्या ताब्यांत घेतलें. तेव्हांपासून हळूं हळूं सर्व मलाया, ब्रिटिशांनीं आपल्या स्वाधीन करून घेतलें. सुप्रसिद्ध सिंहपुऱ्याचें ( सिंगापूरचें ) ठाणें ब्रिटिशांनीं अि. स. १८१९ मध्यें जोहोरच्या सुलतानाजवळून विकत घेतलें होते. तेव्हांपासून मलाया द्वीपकल्प संपूर्णपणें विसाव्या शतकाच्या आरंभाला ब्रिटिशांकडे आलें. तेथें कांहीं नामधारी मुसलमान सुलतान आहेत. परंतु, ते पूर्ण ब्रिटिशांच्या अंकित आहेत.

पुढें अि. स. १९४२ मध्यें चालू जगद्व्यापी महायुद्धांत जपाननें अुडी घेतली. त्यानंतर थोड्याच अवधींत जपाननें ब्रिटिशांपासून सर्व मलाया, सिंगापूरच्या प्रबळ ठाण्याचा देखतां देखतां पाडाव करून, जिंकून घेतला आहे. सांप्रत जपानचें साम्राज्यांत तो समाविष्ट झाला आहे.

यापुढचें मलायाचें भवितव्य, भविष्यकालाचें अुदरांत अंतर्हित झालें आहे !

मलक्कामध्यें मुसलमान धर्माचा प्रत्यक्ष तेथील राजानेंच वर सांगितल्याप्रमाणें स्वीकार केल्यानें, मलायांतील हिंदुसंस्कृतीच्या अस्तित्वावरच गदा आली. अरबी, गुजराथी, अिराणी मुसलमान व्यापाऱ्यांनां मलक्का हें मोठें आश्रयस्थान झालें. तेथें त्यांना राजाश्रय मिळाला. धनवान् मुसलमान व्यापाऱ्यांनीं आपल्या संपत्तीच्या बलावर नि राज सत्तेच्या बलावर अिस्लाम धर्मांचा प्रचार फार दूरवर केला, आणि हळूं हळूं, हिंदु संस्कृतीचा तेथें लोप होअूं लागला. आणि तरीहि मलायामधील लोकांमध्यें आजहि हिंदू संस्कृतीची छाप अुठलेली, सूक्ष्म अवलोकनांनंतर, विल्किंसन सारख्या त्रयस्थ गृहस्थासहि दिसून येत आहे. याप्रमाणें मलय द्वीपकल्पांतील हिंदु संस्कृतीचें हें संकीर्ण अितिहासाचें दिग्दर्शन आहे.

: १९ :

## यवद्वीप ( जावा )

सुवर्णद्वीपांतील मलायांच्या हिंदुसंस्कृतीच्या अितिहासदर्शनानंतर, आपण ' जावा ' बेटांतील हिंदुराज्याची अितिहासकथा हातीं घेअूं. आकारानें लहान परंतु, कर्तृत्व, शौर्य, राज्यशासनशक्ति यांनीं जावा बेटांतील हिंदुराज्य अधिक प्रभावशाली होतें. म्हणून, आपण त्याचा अितिहास आधीं पाहूं.

जावाद्वीपाच्या पूर्वेस ' बाली ' ची सामुद्रधुनी आहे नि तिनें जावा हें बालीच्या बेटापासून विभक्त केलें आहे. पश्चिमेस सुंदाची सामुद्रधुनि आहे तिनें सुमात्राबेटापासून जावा विभक्त झालें आहे. दक्षिणेस हिंदीमहासागर नि अुत्तरेस जावाचा समुद्र आहे. जावामध्यें बरेंचसे ज्वालामुखी पर्वत होते. परंतु, सध्यां त्यांपैकीं थोडेंच जागृत आहेत.

या बेटाचें मूळ संस्कृत नांव ' यवद्वीप ' असें आहे. परंतु, ज्यावेळीं डच लोक या बेटांत पोचलें, त्यावेळीं त्यांनीं ' यव ' हा शब्द ' जव ' (java) असा अुच्चारित केला आणि तसेंच लिहूही लागले. तेंच नांव पुढें अिंग्रजींत नि तेथून मराठींत घेतलें गेलें. यवद्वीपामध्यें भारतामधून फार प्राचीन कालापासून भारतीयांची वसाहत स्थापन झाली. रामायणांत या बेटाचा अुल्लेख सीतासंशोधनाच्या वेळीं आला आहे. श्रीरामचंद्रानें ज्या ज्या देशांतरीं नि द्वीपांतरीं, वानरदूतांनां सीतासंशोधन करण्याकरतां पाठविलें, त्यामध्यें ' यवद्वीपा ' चा अुल्लेख आला आहे. यानंतरच्या अैतिहासिक काला-मध्यें पहिल्या शतकाच्या अुत्तरार्धांत ' यवद्वीपा ' मध्यें पहिल्यानें वसाहत कर

ण्याचा मान गुजराथनें संपादन केला. सौराष्ट्र (गुजराथचा) राजा 'प्रभुजय-भय' याचा साहसी प्रधान 'अजिशक' यानें अि. स. ७४ मध्यें यवद्वीपामध्यें पहिली वसाहत करून, तेथील रानटी अवस्थेंतील 'राक्षसांचा' पराजय केला. त्यानंतरची हिंदु वसाहतवाल्या लोकांची दुसरी लाट 'कलिंगा' मधून आली.

नंतर, यवद्वीपामध्यें हिंदुराज्याचा पाया अधिकाधिक दृढ होत जाअून, तें भरभराटीला येअूं लागले. अि. स. ६०३ मध्यें 'सौराष्ट्रा' मधून 'प्रभुजय-भया' चा सहावा वंशज, दहा सहस्र गुजराथी, वीर, व्यापारी, कारागीर वगैरे लोकांना घेअून, यवद्वीपांत वसाहतीस गेला असा अुल्लेख 'Henry Scott' नें 'जावा' वरील निबंधांत केला आहे.

यावेळीं 'यव' द्वीपामध्यें 'पूर्णवर्मा' हा राजा राज्य करीत असल्याचा अुल्लेख सांपडतो. यानें आपली राजधानी 'तारुम' नगरामध्यें वसाविली होती. याच्या वेळच्या शिलालेखामध्यें चंद्रभागा नदी, गोमती नदी, अशा पूर्ण भारतीय नांवाच्या नद्यांचा अुल्लेख सांपडतो. याच्या समयाला यवद्वीपांतील तिथि, वार, नक्षत्रामास, हे सर्व हिंदुपद्धतीप्रमाणें गणले जात होते.

अशा रीतीनें हिंदुधर्म सुप्रतिष्ठित झाला असतांना, संन्यस्त झालेला अेक भारतीय राजपुत्र, 'यवद्वीपा'मध्यें, अेका मंगल प्रभातकालीं, अेकाद्या देवदूताप्रमाणें अवतीर्ण झाला! हा राजपुत्र वैभवशाली काश्मीरच्या सिंहासनाचा वारस होता. त्यानें भगवान् बुद्धाप्रमाणेंच दुकूल राजवस्त्रांचा त्याग करून, भिक्षूचीं भगवीं वस्त्रें धारण केलीं होतीं! या राजकुलोत्पन्न भिक्षूचें नांव 'गुणवर्मन्' असें होतें. प्रथम त्यानें 'सीलोन'मध्यें जाअून, तेथें बुद्धधर्माचा प्रसार केला. याचवेळीं जावाच्या सिंहासनाधीश्वराच्या मातेच्या स्वप्नांत अेक दिव्य पुरुष, जावाच्या तीरावर अुतरलेला अेका शुभरात्रीं दिसला—आणि आश्चर्य हें कीं, त्याच रात्रीं नंतरच्या पहिल्या प्रभातकाळीं 'गुणवर्मन्' हा यवद्वीपांत जाअुन अुतरला! नंतर या राजभिक्षूनें बुद्धधर्माचा प्रचार राजकुलापासून सामान्य जनतेपर्यंत केला नि मग तो चीनमध्यें प्रचारार्थ गेला. चीनच्या सम्राटानें गुणवर्म्याला राजदूत पाठवून, निमंत्रून चीनमध्यें नेलें होतें. तेथें त्यानें ७६ व्या वर्षांपर्यंत बुद्धधर्माच्या प्रसाराचें कार्य अविरततेनें केलें. यानें अनेक संस्कृत ग्रंथान्चीं चिनी भाषेंत भाषांतरें करून, भारतीयांचें ज्ञानभांडार पूर्व

दिशेला अुषडे करून देअून, पूर्व दिशेचा, हिंदुबुद्ध संस्कृति दिग्विजय घडवुन आणला !

सातव्या शतका पासून नि त्यापुढें, शैलेंद्रांची सागरी सम्राट सत्ता, सर्व सुवर्ण द्वीपावर, त्याचप्रमाणें जावावरहि गाजली. त्यावळीं जावामध्यें अनेक मांडलिक राजे राज्य करीत होते. त्यामध्यें 'मयपाहित' हें राज्य फार शक्तिमान् होतें. या राज्याचा संस्थापक 'केनअंगरोक' हा होता. हा हिंदुराजा ब्रह्मदेवापासून अुत्पन्न झाला, अशी त्याची वंशावळ दिली आहे. 'अंगरोक' या राजानें, राज्यावर बसल्यावर स्वतःस 'श्रीराजस' हें अभिधान धारण केलें. त्याच्या मृत्यूनंतर 'विष्णुवर्धन' नि नंतर 'कृतनगर' हा राजा झाला. ही वेळ अि. स. १२६९ च्या सुमाराची आहे. यानें सुमात्रावर स्वारी केली. चीन देशाविरुद्धहि तेथील मंगोल बादशहाशी युद्ध केलें. त्याचा त्यावेळचा सेनापति 'रत्नविजय' हा होता. हा राजा मोठा धाडशी नि शूर होता.

अि. स. १२९० च्या बेताला तार्तार लोकांनीं जावावर स्वारी केली. यावेळीं 'कृतनगर'चा शूर सेनापति 'रत्नविजय', यानें मोठ्या शौर्यानें तार्तार लोकांशीं युद्ध करून त्यांस 'जावा' मधून हांकून लाविलें. यावेळीं 'कृतनगर' हा दिवंगत झाला होता. त्यामागून 'रत्नविजय' हाच राज्यावर बसला. त्यानें 'कृतराजस जयवर्धन' असें नांव धारण केलें. यानें जावाचें वैभव वाढवून प्रजेस सुखी केलें. यानें बरेच दीर्घकाल राज्य केलें.

यानंतर 'मयपहित' येथील राज्याचा कारभार 'जयविष्णुवर्धनी' या शूर स्त्रीकडे आला. हिच्या राजवटींत 'जावा'चें वैभव आणखी वाढलें. बालीआदि बेटांवर अिनें सत्ता स्थापिली.

या राणीचा पुत्र, 'राजसनगर' अि. स. १३४७ यावर्षी राज्यांवर आला. याच्या राजवटींत 'मयपहित' हें वैभव शिखरावर आरुढ झालें. 'राजसनगर' हा मोठा शूर नि विद्वान होता. त्याला नाट्यशास्त्राची मोठी आवड असून तो मोठा अप्रातिम अभिनयकुशल म्हणून प्रसिद्ध होता.

जावामधील या राजघराण्याचा अितिहास 'जोवानीं' भाषेमध्यें लिहि-

लेल्या 'परारतन' आणि 'नागरकृतागम' या दोन अैतिहासिक काव्य ग्रंथा-मधून अुपलब्ध झाला आहे.

याच सुमारास 'शैलेंद्रांचें' सागरसाम्राज्य पतनोन्मुख होअून, त्याचा शेवटचा राजा 'चंद्रबाहू' हा सिंहासनावर होता. त्याच्या मृत्यूनंतर जावा-मध्यें 'कृतनगर' या नांवाचा अेक विख्यात राजा गादीवर होता, त्यानें 'शैलेंद्रा'च्या साम्राज्याचे बहुतेक प्रदेश आपल्या राज्यास जोडून 'जावा'ला कांहीं काल 'साम्राज्यपद' लाभवून दिलें. मलाया, जंबी, (सुमात्रा), बाली, बोर्निओपर्यंत जावाचें साम्राज्य विस्तारलें.

'शैलेंद्रांचें' प्रबल साम्राज्य होतें, तोंपर्यंत मुसलमान लोकांचें आक्रमण या सुवर्णद्वीपामध्यें होअूं शकलें नाहीं. परंतु, त्या प्रबल हिंदुसाम्राज्याचें पतन झाल्यावर, त्याचें वारसदार झालेलें. जावाचें साम्राज्य फार काळ या मुसलमान आक्रमणास थोपवूं शकलें नाहीं. कारण, महापराक्रमी महाराज 'कृतनगर' याच्या मृत्यूनंतर, जावाच्या साम्राज्यामध्यें लौकरच फूट पडूं लागली नि ते निर्बल बनत चालले.

अिस्लामचा पहिला चंचु प्रवेश, सुवर्ण द्वीपामध्यें मलक्कामधील हिंदु राजा परमेश्वर, याच्या पुत्रानें मुसलमान मुलीशी लग्न लावून नि स्वतः मुसलमान बनून करून दिला, हें आपण मागें पाहिलेंच आहे. हा काल म्हणजे पंधराव्या शतकाच्या आरंभीचा काल होता. (अि. स. १४१०) हिंदुसंस्कृतीवर हा मोठाच आघात, परमेश्वराच्या अेका हिंदु राजपुत्रानेंच केला ही केवढी दुर्दैवी घटना!

या नंतर, या अिस्लामी झालेल्या मलक्काच्या राजकुलानें अिस्लाम प्रसारास राजाश्रय दिला. त्यामुळें, शैलेंद्रांच्या प्रबळ सत्तेनें आजवर रोखून धरलेली मुसलमान धर्मीयांची आक्रमणाची लाट, शैलेंद्रांच्या विनाशानंतर अेकदम वेगानें पुढें घुसली नि मलक्काच्या राजपुरुषांचा आश्रय मिळून, ती अेकदम राजमान्य झाली! त्यामुळें अरबी, गुजराथी वगैरे मुसलमान व्यापाऱ्यांनीं मलक्कास अिस्लामी प्रचाराचें केंद्र करून, सुमात्रा, जावा आदि सुवर्णद्वीपांतील बेटांमधून अिस्लामी प्रचाराची पराकाष्ठा केली. हिंदूंच्या दैवदुर्विलासाची आणखी अेक गोष्ट अशी कीं, हा प्रसार प्रत्यक्ष अरबी व्यापाऱ्यांपेक्षां, गुजराथमधील

बाटग्या मुसलमान व्यापाऱ्यांनींच अधिक केला! पंधराव्या शतकाच्या अंतापर्यंत, अुत्तर सुमात्राद्वीपांत अिस्लामचा प्रसार वेगानें सुरू झाला.

जावामध्यें अिस्लामधर्माचा प्रसार करणारा पहिला मुसलमान प्रचारक 'मलिक अिब्राहिम' या नांवाचा अि. स. १४१९ च्या सुमारास समुद्रतीराच्या प्रदेशांत प्रचार करीत होता. तरीपण जावाच्या अंतर्गत प्रदेशामध्यें हिंदुराजेच राज्य करीत होते. प्रथम प्रथम हे मुसलमान बनलेले बाटे लोक, धूर्ततेनें या हिंदु राजांची सत्ता मानीत होते. समुद्रतीरावर लहान लहान अिस्लाम संस्थानें निर्माण होत होतीं. नि त्यांचें बळ हळूं हळूं वाढत होतें. पोर्च्युगीजांच्या वर्णनावरून असें कळतें की, हे मुसलमान संस्थानिक मधून मधून केंद्र हिंदु-राज्याशीं बंडखोरी करीत असत; परंतु, हिंदु राजे जोंवर प्रबल होते तोंवर, त्यांची बंडखोरी ते लगेच बंद पाडीत असत. आणि हिंदुधर्म अत्यंत सहिष्णु असल्यानें, मुसलमानधर्माचा त्याने द्वेष केला नाहीं किंवा आपल्या सामर्थ्यानें, शक्य असतांहि, तो दडपून टाकला नाहीं. परंतु, अनाठायीं दाखविलेली ही सहिष्णुता, ही अुदारताच, हिंदुस्थानप्रमाणेंच बृहत्तर–हिंदुस्थानमध्येंहि हिंदूंच्याच आत्मघाताला कारण झाली!

समुद्रतटावरील ही मुसलमानी सत्ता, सोळाव्या शतकाच्या प्रथमपादांत अितकी बालिष्ट झाली कीं, अि. स. १५२८ मध्यें जावाचे केंद्र–हिंदु राज्य त्यांनीं नष्ट केलें. त्याचप्रमाणें, त्यानंतर पश्चिम जावाचें 'यजजवन' या प्रांतांतले हिंदु राज्यहि अिस्लामचे आधीन झालें!

अशा प्रकारानें, या यवद्वीपामधील हिंदु धर्माची पताका पौराणिक कालापासून जी फडकत होती, ती अि. स. च्या १५ शतकेंपर्यंत अव्याहत वैभवानें फडकून सोळाव्या शतकाच्या प्रथम पादांत मरणोन्मुख होअून पडली!

आणि तरीहि, पुढें कित्येक शतकें अि. स. १८०० पर्यंत–यवद्वीपांतील शूर नि धर्मनिष्ठ हिंदूंनीं, चितोडच्या हौतात्म्याच्या तेजाला साजेल असा झगडा, अिस्लामशी चालू ठेविला होता. यवद्वीपांतील मुख्य हिंदु राज्यें जरी विलयास गेलीं, तरी त्यांतीलच कांहीं शूर पुरुषांनीं बलिस, लव, मरबाबू अित्यादि पर्वतीय प्रदेशाच्या आश्रयानें, हिंदु धर्माचा झगडा प्राणपणानें चालविला होता. अेकादा गड, सर्व बाजूंनीं शत्रूकडून वेढला जावा नि त्यामध्यें

सर्व जगाचा संबंध तुटून कांहीं निष्ठावंत गड रक्षक तेवढें हटेलपणें लढत असावें, तसाच लढा सुमारें दोनशें वर्षें, जावांतील हिंदुत्वनिष्टांनीं चालविला होता. परंतु, हळूं हळूं येथेंहि त्यांना पिछेहाट निरुपायानें घ्यावी लागली; तेव्हां त्या धर्मवीरांनीं सुमेरु पर्वतावर आश्रय घेअून, हिंदु धर्माची ध्वजा, बलंबङ्‌ येथें सुमारें दोनशें वर्षेंपर्यंत फडकत ठेविली ! बाहेरच्या सर्व हिंदु जगताचा संबंध तुटला तरी २०० वर्षेंपर्यंत फडकत ठेवली !!

अंती अि. स. १८०० मध्यें, येथेंहि अिस्लामनें आक्रमण केल्यावरून, निरुपायानें तेथील राज घराण्यांतील पुरुषांनी नि अन्य धर्माभिमानी शेंकडों हिंदूंनीं, धर्माच्या रक्षणाकरतां प्रिय यवद्वीप मायभूमीचाहि त्याग करून यवद्वीप-पूर्वेस असलेल्या 'बाली' द्वीपांतील स्वतंत्र हिंदुराज्यांत आश्रय घेतला ! यवद्वीपामधील हिंदुसंस्कृतीचें मंगल स्वरूप अदृश्य झालें ! तिचें मंजुल गीत यवद्वीपांतील वातावरणांत विरून गेले ! आतां यवद्वीपांत हिंदुसंस्कृतीची स्मृति करून देणारी माणसें जरी विलुप्त झालीं असलीं, तरी त्यांनीं अुभारलेली दगड पाषाणांचीं आणि वाङ्मयकृतींचीं साधनें मात्र, अद्यापीहि तेथें हिंदुसंस्कृतीचें यशोगान मूकवक्तृत्वानें गात, विनाशकालाशीं झगडत असलेली सांपडत आहेत !

## यवद्वीपांतील हिंदुसंस्कृतीचे साक्षी !

यवद्वीपांतील हा विगत सांस्कृतिक अितिहास अुजेडांत आणण्याचें पहिलें श्रेय, डच सरकारमधील संशोधक आर. फ्रेडरिक या संस्कृतज्ञ विद्वानाला आहे. त्यानें बाली बेटाचाहि प्रवास करून, तेथील कांहीं हिंदू विद्वानांच्या सहाय्यानें अेक संशोधनपर निबंध बटेव्हिआ येथील संशोधन संस्थेच्या नियतकालिकांत प्रसिद्ध केला. ( अि. स. १८४८ च्या बेताला. )

जावामधील ग्रंथांची भाषा ही बोलण्याच्या जावानी भाषेपासून भिन्न असून, तिच्यावर संस्कृत भाषेचें प्रभुत्व आहे. त्याचप्रमाणें जावामधील प्राचीन राज्यकारभाराचें तंत्र, भारतीय राज्यतंत्राप्रमाणेंच होतें. राजा, राजपत्न्या, महिषीं, त्याचे अनेक मंत्री यांनीं संयुक्त असें राजसभेचें अस्तित्व, हें सर्व भारताप्रमाणेंच होतें. नुकत्याच अुपलब्ध झालेल्या जावानी भाषेंतल्या 'नागरकृतागम' नामक अेका काव्यांत, राजाधिकाऱ्यांची नि नगरांचीं नांवें बहुसंख्येनें संस्कृत असलेली सांपड-

तात. अमात्य, मंत्री, पुरोहित, धर्माध्यक्ष, अित्यादि शेंकडों नांवें अिकडचीच आहेत. जावामधील राजांस समुद्रतीर असल्यानें, निजावाचें समुद्रदल अनेक शतकें समुद्रस्वामित्व अुपभोगीत असल्यानें, हिंदुस्थानमधील राजवटीमध्यें मध्यदेशांतील राजवटींत न सांपडणारी अशी अेक नवी पदवीहि या कान्यांतून अुपलब्ध झाली आहे ती कर्णमधूर पदवी म्हणजे सागरदलाच्या अधिकाऱ्याची ' जलधिमंत्री ही होय.

जावामधील नि बाली बेटामधील देशी भाषेमध्यें संस्कृत भाषेचा पुष्कळ भरणा होअून, तेथें अेक नवीनच भाषा निर्माण झाली. तिचें नांव ' कवि ' असें पडलें. पारमार्थिक शिक्षण अुपदेश आणि ग्रंथलेखन ही याच भाषेत होत असे,

यवद्वीपांतील वाङ्मय खालीलप्रमाणें सामान्यतः आहेः—चार वेद तेथें अेकून ज्ञात होते. ब्रह्मांडपुराण, तंत्रग्रंथ, कविरामायण, महाभारत, हरिवंश, मानवधर्मशास्त्र, पौराणिक काव्यें,–यामध्यें ' बाबद ' ( अैतिहासिक-बखर ' काव्य प्रसिद्ध आहे–नीतिशास्त्र छंदःशास्त्र कामशास्त्र, कलाकौशल्या-वरील ग्रंथ, हेहि विद्यमान आहेत.

याचप्रमाणें अगम, आदिगम, देवागम सारसमुच्चय, अित्यादि ग्रंथाचेंहि अुल्लेख, युरोपीय संशोधकास आढळले आहेत, यावांचून पौराणिक स्वरूपाचेंहि अनेक ग्रंथ, अुदाहरणार्थ, आगस्त्यपर्व, अर्जुन विजय, भारत युद्ध, भीष्मपर्व, अित्यादि हें यवद्वीपांतील ग्रंथांच्या टिपणींत विद्यमान आहेत. यवद्वीपांतील छंदःशास्त्र हे भारतीय छंदःशास्त्राचें स्वरूप आहे. जावामध्यें छंदःशास्त्रावर ' आजरपिकतन ' ' अेजिकेनांग ' अित्यादि ग्रंथ जावानी भाषेत रचले गेले आहेत.

जावामध्यें भारतीय वैद्यक ग्रंथ मात्र विशेष आढळत नाहींत. कंबुज, चंपा, सयाम वगैरे भारतीय वसाहतीमध्यें, हें हि शास्त्र अुत्कर्षाला गेलें होते, हें आपण पाहिलेंच आहे. भारतीय कामशास्त्रावर मात्र जावामध्यें काहीं ग्रंथ झाले. ' अंगुलिप्रवेश ' या नांवाचा अेक ग्रंथ ऋषि संबिन्न 'यानें लिहिलेला आहे.

यवद्वीप नि बलिद्वीप यांमध्यें शालिवाहन शकच चालू आहे. सण नि

अुत्सव ठरविण्याच्या कामीं बालीद्वीपांत अद्यापहि हिंदी पंचांगांचाच अुपयोग करतात.

याप्रमाणें यवद्वीपांतील हिंदु राज्यांचा नि धर्म, संस्कृतीचा अस्त, अि. स. च्या सोळाव्या शतकांतच जरी झाला, तरी त्यांचा संधिप्रकाश अगदीं परवांपर्यंत म्हणजे अि. स. १८०० पर्यंत टिकून होता. आज जरी यवद्वीपांतील हिंदुसंस्कृतीचें बाह्य स्वरूप नष्ट झालें आहे, तरी तेथील जनतेच्या जीवनांतील अंतःप्रवाह, अजूनहि हिंदुसंस्कृतीच्या भाव भावनांनींच वहात आहे, असें अनेक प्रवाशांचे म्हणणें आहे. भविष्यकाळीं, जर कुणी हिंदुधर्माचें साहसी प्रचारक, त्या विस्मृत बृहद्भारतांमध्यें हिंदुधर्माची ध्वजा घेअून गेले, तर पूर्वजन्मींच्या संस्कारांची आठवण होअून, ही यावद्विपांतील हिंदुधर्मविस्मृत झालेली जनता, बलात्कारानें झालेल्या या दीर्घ विरहानंतर, हिंदुसंस्कृतीच्या माहेरघरी कशावरून पुन्हां परत येणार नाहीं ?

यवद्वीपावर मुसलमानी सत्ता अि. स. च्या सोळाव्या शतकांत स्थापन झाली. परंतु, पुढें अल्पकालांतच, पोर्च्युगीज, डच, अिंग्रज वगैरे पाश्चात्य देशीयांनीं आक्रमण सुरूं केलें नि अिस्लामी सत्तेचा डोलारा अेका शतका दीड शतकाच्या अल्पावधींतच कोलमडून पडून, अंतीं यवद्वीप हें डच लोकांच्या सत्तेखालीं गेलें.

परंतु या पाश्चात्य डच लोकांचीहि सत्ता नुक्तीच, बौद्धधर्मीय जपाननें अि. स. १९४२ मध्यें, सांप्रतच्या चालू युद्धांत नष्ट करून टाकून, आपली सत्ता तेथें बसविली आहे. भविष्यकालीन यवद्वीपाचा अितिहास–या अिंडोनेशियामधील–सुवर्णद्वीपांतील–जपानांकित अन्य प्रदेशाप्रमाणेंच अज्ञात भविष्यकालाच्या अुदरांत समाविष्ट झाला आहे !

## : २० :

# सुमात्रा द्वीप

सुवर्णद्वीपांतील सर्वांत पूर्व पश्चिम असे लांब पसरलेलें द्वीप सुमात्रा होय. या बेटाचें प्राचीन कालचें नांव 'श्रीविजय' असें होतें. याला 'आराम जावा' असेंहि संबोधिलेलें ७ व्या शतकांतील सांपडलेल्या अेका शिलालेखांत दिसून आले आहे. सुमात्रामधील पादांगभागांमध्यें कांहीं शिलालेख सांपडलेले आहेत. ते सातव्या शतकांतील आहेत. त्यावरून त्यावेळीं तेथें अेक प्रबळ हिंदु राज्य अस्तित्वांत होतें असें सिद्ध होतें. साप्रत 'पानवी' नदीवरील 'जंब्री' नगरांत, पालेंबांगमधील प्रदेशांतांत व आणखी कित्येक स्थळीं हिंदूंची पडकीं देवळें वगैरे पुष्कळ सांपडतात. अि. स. च्या सातव्या शतकांतील अेका राजाचे नांव 'जयनाश' असें होतें. त्यानें सुमात्राचें राज्य, मलायु, बंक वगैरे प्रदेशावर स्थापित केलें होतें. अि. स. ७७५ मधील मलायामध्यें सांपडलेल्या अेका संस्कृत शिलालेखावरून असें सिद्ध होतें कीं; श्रीविजय (सुमात्रा) चें राज्य मलायामध्येंहि त्यावेळीं पसरलें होतें. याचवेळीं चीन सम्राटांच्या राजसभेंत सुमात्राच्या हिंदु राजांचेहि राजदूत जात असत, असा अुल्लेख चिनी ग्रंथांत सांपडल्याचें नमूद आहे.

सातव्या शतकांत सुमात्रामध्यें बुद्धधर्मांचा चांगलाच प्रचार झाला होता सुमात्राचे राजे आपल्या नांवाच्या प्रथम 'श्री' हें अुपपद लावीत होते.

सातव्या शतकानंतर सागर सम्राट शैलेंद्र यांची सत्ता सर्व सुवर्ण द्वीपावर पसरली, त्यावेळीं त्यांनीं सुमात्राहि आपल्या छत्राखालीं आणलें. अि. स, च्या पंधराव्या शतकाच्या बेताला ज्यावेळीं तें साम्राज्य बुडालें त्यावेळीं सुमात्रा

देखील स्वतंत्र झालें नि त्यांतील पूर्वेकडील भाग ‘ जंबु ’ येथें अेका हिंदु राज्याचा अुदय झाला.

जंब्रीच्या पराक्रमी राजा मौलीवर्म देव यानें जावाच्या कृतनगर राजवंशजांचा पराभव केला. याच्यामागाहून अि. स. १३४७–७५ पर्यंत ‘ मर्मदेव ’ हा राजा झाला. त्यानें पुष्कळ लेख खोदविलें होते. पुढें पुढें सुमात्रामध्यें अनेक लहान लहान राज्यें निर्माण झालीं. त्यामुळें कोणतीहि अेक केंद्रीय सत्ता नष्ट होअून प्रत्येक संस्थान दुर्बळ बनलें. याचवेळीं ( पंधराव्या शतकाच्या मध्यांत ) मलक्कामध्यें मुसलमानी राज्य स्थापन झाल्यानें, मुसलमानांचें आक्रमण सभोंवार सुरू झालें, असें मागें सांगितलेंच आहे. सुमात्रांतील लहान लहान हिंदु संस्थानिकांच्या दौर्बल्यामुळें, सुमात्राद्वीप अिस्लामला पहिल्यानें बळी पडलें. जावाप्रमाणेंच येथेंहि प्रथम, समुद्रतटावरील प्रदेश अिस्लामला बळी पडले. जावामधील हिंदु राज्यांनीं अिस्लामला जसा निकराचा प्रतिकार केला तसा येथील दुर्बळ बनलेल्या हिंदुराज्यांनीं केलेला दिसत नाहीं. त्यामुळें सतराव्या शतकापर्यंत सबंध सुमात्रा अिस्लाममय झालें, अितकेंच नव्हे तर सुमात्रा हें जें दीडसहस्रवर्षे हिंदुधर्माचें नि संस्कृतीचें प्रमुख नाकें होतें, तें आतां अिस्लामचें प्रमुखस्थान बनलें नि येथून पूर्वद्वीपसमूहांतहि अिस्लामचा प्रचार होअूं लागला !

वृहद्‌भारतांतील प्रमुख हिंदु वसाहतींपैकीं कंबुज, चंपा, सयाम अित्यादि वसाहतींचा अितिहास जसा बराच विस्तृतपणें अुपलब्ध होत आहे, तसा तो या सुवर्णद्वीपांतील हिंदुराज्यांचा मिळत नाहीं; याचें प्रमुख कारण, म्हणजे येथें अिस्लामचें आक्रमण झाल्यानंतर अस्तास गेलेल्या अन्य ठिकाणांप्रमाणें येथेंहि मंदिरें, भवनें मूर्ति यांचें ध्वंसन झालें. त्यामुळें सुमात्रामधील अुध्वस्तता कांहींच अितिहास सांगूं शकत नाहीं. परंतु, कंबुजादि देशांमध्यें हिंदु राज्यांनंतर जरी बौद्ध सत्ता आली तरी ती हिंदुत्वनिष्ठच असल्यानें तिनें असें ध्वंसन केलें नाहीं.

असो, अिस्लामचे राजकीय वर्चस्व फार दिवस टिकलें नाहीं. अि. स. १५०८ च्या बेताला पोर्च्युगीज लोक प्रथम सुमात्रास आले. अेक शतकानंतर त्यांना डच लोकांनीं हुसकून लावलें. तोंच अिंग्रजहि सुमात्रांत प्रविष्ट झालें. त्यांचे नि डचांचे झगडे होअून अि. स. १८२४ च्या संधीनें अिंग्रजांस मलक्कावरच संतुष्ट राहून सुमात्रा संपूर्णपणें डच लोकांच्या स्वाधीन करावें लागलें.

सांप्रतच्या महायुद्धामध्यें, सुमात्रा हेंहि जपानच्या सागरी सत्तेच्या झंझावातांत सांपडून, जपानच्या अंकित बनलें आहे !

## : ११ :

## बोर्निओ, सेलिबिस्, फिलिपाअिन्स.

या तीनहि द्वीपांवर हिंदुसंस्कृतीची छाप अद्यापहि दिसतें नि तेथें सांपडलेलीं जीर्ण मंदिरें नि शिलालेख, हिंदुसंस्कृतीच्या तेथील अस्तित्वाची साक्ष देत आहेत.

**बोर्निओमध्यें** आग्नेयीस हिंदूंच्या वसाहती अि. स. च्या ६ व्या शतकाअितक्या प्राचीन कालापासून होत्या. त्यापैकीं कांहींचीं नांवें, अभुंगताअी, मार्तापूर, अशीं होतीं. तेथें प्रचीन अिमारती, मंदिरें वगैरेंचे अवशेष दिसून येतात. 'ब्रुनीअी' या संस्थानामध्यें १५ व्या शतकांत हिंदु राज्य होतें. नंतर त्यावर मुसलमानांनीं आक्रमण केलें. परंतु जावामधील हिंदु राजा, 'अदयमिंग्रत' याचा सेनापति 'अंकविजय' यानें 'बुनीअी' मुसलमानांपासून परत जिंकलें, असा अुल्लेख जावानी भाषेंतील जावाचे अितिहासकार लिहितात.

त्याचप्रमाणें 'सारावाक' या बोर्निओच्या विभागांत सध्यां अेक अिंग्रजी राजघराणें आहे. त्याचा संस्थापक सरजेम्स ब्रूक हा होता. यानें आपल्यास नि आपल्या घराण्यास 'राजा' ही पदवी घेतली हें विशेष अर्थ निदर्शक आहे असें वाटतें. याचा अेक अर्थ असा निघतो कीं, ज्याअर्थी, या खिश्चन माणसानें आपल्यास कोणतीहि अिंग्लिशभाषेंतील राजत्वसूचक पदवी न घेतां 'सारावाकचा राजा' हीच पदवी पसंत केली, त्याअर्थी तेथें पूर्वी हिंदुराजत्व चालू असले पाहिजे आणि तेंच जेम्सब्रूकनें पुढें चालविलें असलें पाहिजे. अर्थात् हा केवळ अेक तर्क आहे. परवांपर्यंत या बेटाचे चार राजकीय विभाग आहेतः—

१ ब्रिटिश नॉर्थ बोर्निओ २ ब्रूनी (हे अेका सुलतानाच्या स्वाधीन असून तो अिंग्रजांचा मांडलीक आहे.)

३ सारावाक ( अिंग्रजीराजा ) ४ बोर्निओ.

आतां हा सर्व प्रदेश अि. स. १९४२ मध्यें जपाननें जिंकून घेतला आहे.

**सेलिबिसः**—हें बेट बोर्निओच्या पूर्वेस आहे. सुंदद्वीपसमुहापैकीं हें अेक द्वीप आहे. ' सुंदद्वीपसमूह ' हें नांवच हिंदुत्त्वदर्शक आहे. येथील बुगी नांवाची अेक जात आहे, ती आतांपर्यंत हिंदु होती. या ' बूगी ' जातीचा प्रथम पूर्वज ' सविर गेर्दिग ' हा होता नि तो प्रत्यक्ष परमेश्वर प्रेषित ' बैतर ( वैतर ) गुरू, याच्यापासून अुत्पन्न झाला होता असें ते मानवतात. त्याचप्रमाणें सेलिबिसमध्यें प्रथम याच हिंदुराजानें वसाहत केली असें ते समजतात. आतां हे बूगी लोक मुसलमान झाले आहेत. तरी अद्यापिहि त्यांच्यांत पुष्कळसे हिंदुसंस्कृतीचे अवशेष बाकी आहेत. हे ' बुगीराष्ट्र ' ८० लहान लहान संस्थानें मिळून बनलें आहे. यांच्यामध्यें शिवपूजन अद्यापिहि चालू आहे. त्यांचा वारस अधिकार, मलबार प्रमाणेंच मातृकन्या परंपरेनें ठरविला जातो. हीं सर्व संस्थानें मिळून अेक अध्यक्ष निवडतात नि तो यावज्जीव तो अधिकार चालवितो. या सर्व संस्थाना मिळून बनलेल्या संघास ' बोनी ' संघ असें म्हणतात. अि. स. १६६६ मध्यें सुमात्राचा सुलतान हसन यानें स्वारी केली. त्यावेळीं डच लोक सुदाद्वीप समुहांत वावरत होते. या ' बोनी ' संघानें त्या सुलताना विरुद्ध डच लोकांचें सहाय्य मागितलें. हसन सुलतानाचा, ' बोनी ' संघानें पराजय केला-परंतु, डच लोकांनीं आपलें वर्चस्व स्थापन केलें. आपल्या अिकडे गोंवा येथें हीच घटना घडली होती. आदिलशाहीच्या धर्मांध मुसलमान सैन्यापासून रक्षण करण्याकरतां, हिंदूनी पोर्च्युगीजांचे सहाय्य घेतलें नि मागाहून पोर्च्युगीजच धनी होअून बसले ! ' बोनी ' संघाच्या त्यावेळच्या हिंदुराजाचें नांव ' पालक ' असें होतें. मध्यंतरी कांहीं काल ब्रिटिशांनींहि येथें चंचुप्रवेश केला होता.

परंतु, सांप्रत या दोन्हींहि पाश्चात्य सत्तांचें येथून जपाननें अि. स. १९४२ मध्यें अुच्चाटण करून, सेलिबिस बेट जिंकून घेतलें आहे.

**फिलिपाअिन्स द्वीपसमूहः**—या द्वीपसमूहामध्यें सोळाव्या शतकाच्या आरंभापासूनच, पाश्चात्यांचें प्राबल्य स्पानिश नि पोर्च्युगीज या धर्मवेड्या लोकांच्या आक्रमणानें सुरू झालें, सुमात्रा, जावा वगैरे ठिकाणीं हिंदुसंस्कृतीचा नाश जसा अिस्लामच्या आक्रमणामुळें झाला, तसा फिलिपाअिन्स

मध्यें स्पेन, पोर्च्युगीजांच्या धर्मवेडानें झाला. सध्यां तेथें प्रत्यक्ष हिंदुत्वाचे असे कांहीं प्रतीक अुरलें नाहीं. परंतु, फिलिपाअिन्समधील मूळ भाषा मात्र, हिंदु संस्कृतीच्या तेथील प्राबल्याची साक्ष मुक्तकंठानें देत आहे. त्या भाषांनाच विचारले असतां, त्यांनां जी वाचा फुटेल, तीच मुळीं संस्कृत संस्कारांनीं पवित्र असेल! या भाषांचे कांहीं कोश सिद्ध झाले आहेत. त्या कोशांवरून असे सहज सिद्ध होतें कीं, त्यातील बहुतेक महत्त्वाचे शब्द संस्कृत मधूनच घेतलेले आहेत. राजा, मंत्री, अित्यादि अनेक शब्द त्या कोशांत सापडतात.

ह्या फिलिपिन्स बेटांमध्यें अि. स. १५२१ मध्यें 'मागेलान' या नांवाच्या अेका पोर्च्युगीज साहेबानें प्रथम प्रवेश केला. हीं बेटें प्रथम पोर्च्युगीजांच्या सत्तेखालीं होतीं. नंतर हीं स्पेनच्या हस्तगत झाली. 'सेबू' या प्रांतांत प्रथम स्पानिश लोकांनीं, अि. स. १५६५ साली वसाहत केली. याच्या आधीं फिलिपाअिन्समधील स्वतंत्र हिंदुराज्यांचा नि मुसलमानांचा संघर्ष सुरू झालाच होता. स्पानिश लोकांनीं मुसलमानी सत्तेचा नाश केला. रोमन कथोलिक धर्मोपदेशकांनीं येथील हिंदुसंस्कृतीचाहि नाश केला. त्यानंतर युरोपमध्यें स्पेन, अिंग्लंड यांचें युद्ध जुंपून, कांहींकाल हें अिंग्लिशांच्या हातीं आलें. (अि. स. १७६२) परंतु या युद्धानंतर हीं बेटें पुन्हां स्पेनकडे गेलीं. अि. स. १८९८ मध्यें स्पेन नि अमेरिकेंत लढाअी चालू झाली. तिच्या अंतीं हीं बेटें अमेरिककडे या शतकाच्या आरंभाला आलीं.

सांप्रत जपाननें, येथून अमेरिकेचा पराभव करून, त्यांना घालवून दिलें आहे, नि सर्व फिलिपाअिन्स बेटावर जपानचा ध्वज अुभारला गेला आहे.

## : २२ :

## बाली द्वीपांतील हिंदु राज्य

बालीद्वीपांतील हिंदुसंस्कृति मात्र अद्यापहि पूर्ण हिंदुत्वाच्या स्वरूपांत विद्यमान आहे. सभोंवारचीं हिंदुराज्यें नि हिंदुवसाहती, अिस्लाम नि ख्रिश्चन संस्कृतीच्या आघातानें धाड् धाड् कोसळून पडत असतांना, 'बाली' या अंगुष्ठमात्र द्वीपामध्यें अद्यापहि हिंदुसंस्कृतीचें नि हिंदुधर्माचें अस्तित्व टिकून असावें हें केवढें आश्चर्य! हिंदुस्तानपासून सहस्रावधि कोसांवर, मध्यें अनेक

सागर नि महासागर आडवे आले असतांहि, 'बाली' द्वीपामध्यें हिंदुसंस्कृतीच्या ह्या पोरक्या झालेल्या पोरानें, अद्यापहि आपल्या पुण्यभूमीची–या हिंदुस्तानची संस्कृति नि धर्म, प्राणपणानें जतन करून ठेवावा हें केवढें आश्चर्य ! आणि त्याहूनहि हें केवढें आमच्या आत्मवंचनेचें आश्चर्य, कीं या परकीय आसुरी सत्तांच्या चक्रव्यूहांत अडकलेल्या आपल्या या चिमुकल्या अभिमन्यूचें आपल्याला स्मरण तर राहोच, परंतु ज्ञानहि नसावें ! जगांतील अितिहास-शास्त्रांचे नि भूगोलांचे आलोडन करून, ' तिंबक्तू ' आणि ' टोरांटो ' यांचेंहि अचुक ज्ञान संपादन करणाऱ्या आमच्या बहुतांश पंडितांनां, या शतकोंशतकें अेकाकी जीव धरून राहिलेल्या हिंदुधर्मनिष्ट बाली द्वीपाचा नामपरिचयहि असूं नये, ही केवढी आत्मविस्मृति !

नाहीं म्हणावयास, ' महाराष्ट्रीय ज्ञानकोशकार ' कै. डॉ. केतकर यांनीं ज्ञानकोशाच्या पहिल्याच प्रस्तावना खंडात आपल्या पूर्वदिशेकडे पसरलेल्या हिंदुवसाहतींचा नि हिंदुसंस्कृतीचा, मोठ्या आपुलकीनें प्रपंच केला आहे. आम्हाला या विस्मृत हिंदुवसाहतींची माहिती ग्रथित करण्यास, त्या खंडाचा पुष्कळ अुपयोग झाला हें आम्ही कृतज्ञतेनें नमूद करतो.

जावा बेटाच्या पूर्वेस सुमारें दीड मैल अंतरावर हें बाली बेट वसलें आहे. हें निसर्गदेवतेचें जणूं काय विहारमंदिरच शोभत आहे. सध्याच्या सर्व जगांतील प्रदेशामध्यें, बाली बेट निसर्गरम्यतेकरिता फार प्रसिद्ध आहे. त्याच-प्रमाणें तेथील नृत्यकलाहि नांवाजली गेली आहे. ही नृत्यकला हिंदु नृत्याचाच एक भाग म्हणून समजली जात आहे

बाली बेटांतील हिंदूंची संख्या आज एकंदर दहा लाख आहे.

हिंदुस्थानमधून पहिल्या नि दुसऱ्या शतकांत सहस्रावधि धाडसी हिंदूंनीं बाहेर बाली देशीं जाऊन सयाम, हिंदु चीन (Indo-China), मलाया, सुमात्रा, जावा, बोर्निओ येथें हिंदूंच्या मोठमोठ्या वसाहती १-२ शतकांच्या अवधींत तेथे मोठमोठीं वैभवशाली हिंदु साम्राज्यें स्थायन केलीं, त्याच वेळीं या सुंदर बाली बेटांतहि-विशेषतः वंग, कलिंग इत्यादि पूर्व समुद्रावरील हिंदुस्थानच्या प्रांतांतून दिग्विजय करण्याच्या महत्त्वाकांक्षेनें बाहेर निघालेल्या हिंदूंनीं वसाहत केली. बलिद्वीपांत प्रथम ' निरर्थ ' या नांवाचा अेक ब्राह्मण गेला नि त्यानें तेथें प्रथम वसाहत स्थापन केली १–२ शतकानंतर या बेटाशीं चिनी प्रवाश्यांचें दळणवळण सुरू झाल्याचे उल्लेख सांपडतात.

७७०२०



७ व्या शतकांतील ‘ लँग ’ कालीन चिनी इतिहासामध्यें या बाली बेटासंबंधीं ( या बेटाला चिनी लोक ‘ फो-लि ’ म्हणत असत. ) खालील प्रकारचा उल्लेख आला आहे. ‘ येथील राजघराणें ‘ छारियक ’ ( क्षत्रिय ) वंशाचें आहे. येथील राजा मोठा पराक्रमी नि वैभवसंपन्न आहे. त्याचें छत्र, सिंहासन, मुकुट नि हातांतील प्रचंड तलवार हीं सोन्याचीं आहेत नि त्याच्या मुकुटावर सप्तरत्नें दीप्ति देत आहेत. येथील शूर सैन्याचें मुख्य आयुध वर्तुलाकार असून त्याला मध्यें अेक छिद्र पाडलेलें असतें नि वर्तुलाच्या कडांना तीक्ष्ण लोखंडी आरा असतात. ( अर्थात् हें हिंदुस्थानांतील सुप्रसिद्ध ‘ चक्र ’ हेंच आयुध होय. ) हें आयुध हे लोक अत्यंत चापल्यानें नि अचूकपणें फेंकून शत्रूंचा नाश करतात. तसेंच तेथील लोकांचे कानांना छेद असतो नि त्यांमध्यें छल्ले घालतात.

‘ बाली ’ च्या हिंदु राजांनी चीनच्या राजांशीं राजनैतिक संबंध जोडल्याचेंहि दाखले आहेत. ‘ बाली ’ मध्यें अि. स. ९१५ मधील अेक शिलालेख मिळाल्यावरून या बेटाचा पहिला हिंदु राजा ‘ अुग्रसेन ’ हा होता, असें समजतें. अि. स. १०२५ मधील अेका शिलालेखावरून कळतें कीं, ‘ बाली ’ चा त्या वेळचा राजा ‘ जावा ’ बेटाचा हिंदु राजा जो ‘ अैरलंग ’ त्याचा धाकटा भाअू होता. या वेळीं बाली बेट जावाच्या हिंदु राज्याचें मांडलिक होतें. १११२ मध्यें बाली स्वतंत्र झालें. परंतु पुनः १२०४ मध्यें तें जावाच्या हिंदु राज्याचें अंकित बनलें. अशा रीतीनें जावाच्या हिंदु राज्याशीं बालीच्या हिंदु राज्याच्या संघर्ष होतां होतां, अि. स. १३३७ त बालीचें छोटें हिंदु राज्य जावाच्या मोठ्या नि वैभवशाली हिंदु राज्यांत कांहीं शतकें मिळून गेलें.

पुढें जावाच्या स्वतंत्र हिंदु राज्यावर पंधराव्या शतकांत, मलाया नि सुमात्रामधील हिंदु राज्ये नष्ट करून पुढें घुसणाऱ्या मुसलमान धर्मीयांचे आक्रमण सुरू झालें, पोर्तुगीज लोकांच्या अुल्लेखावरून असें दिसतें कीं, पंधराव्या शतकाच्या अंताला, जावामधील समुद्रतीरावरील प्रदेशांवर मुसलमानी सत्ता स्थापित होअून हिंदु राजांचें राज्य मध्य जावापर्यंत रेटलें गेले. मातृभूमि हिंदुस्थानमधून कोणतेंहि साहाय्य अथवा नवीन वसाहतवाले धाडधी हिंदु वीर येण्याचें, हिंदुस्थानवरच महमदी आक्रमणाचें वादळ अुठल्यामुळें, बंद पडलें. त्यामुळें मायभूमीशीं असलेलें सर्व संबंध तुटले व हीं दूरवरचीं हिंदु राज्यें पोरकी झाली. तरीहि आश्चर्याची नि अभिमानाची गोष्ट ही कीं, अशा अेकाकी अवस्थेंतहि जावामधील हिंदूनी १-१॥ शतकपर्यंत मुसलमानांशीं

तीव्र झगडा चालविला नि पर्वतश्रेण्यांमधून आश्रय घेअून, राणाप्रतापाप्रमाणें अि. स. १५२८ पर्यंत प्राणपणानें हिंदुत्वाकरिता झगडा केला. त्या वर्षीं जावा-तील हिंदु राज्याचा अंत झाला. हें आपण मागें पाहिलेंच आहे.

तरीहि हिंदु लोकांनीं येथून पराजित झाल्यावर अवघड अशा 'सुमेरू' या जावामधील पर्वतश्रेणीवर आश्रय घेतला. त्यानंतर 'बलंबंङ्' या ठिकाणीं सुमारें दोनशें वर्षें हिंदूनीं आपलें स्वातंत्र्य कायम ठेवून, स्वतंत्र राज्य चालविलें. अि. स. १८०० मध्यें अंतीं याहि अेकाकी राहिलेल्या हिंदु राज्याचा मुसल-मानांनी अंत केला. याच 'बलंबंङ्' राजघराण्यांतील अेक राजशाखा 'बाली' या बेटांत अुतरली नि तिने तेथे हिंदुत्वाच्या स्वतंत्र ध्वजाची नि हिंदुराज्याची स्थापना केली!

बाली बेटांतील हिंदूंचें हें अेकटें पडलेलें छोटेसें स्वतंत्र राज्य अनेक हल्ल्यांना नि आक्रमणांना शूरपणानें तोंड देत. हिंदु धर्माचें नि हिंदु संस्कृतीचें संरक्षण सबंध एकोणिसावें शतकभर करीत होतें ही केवढी आश्चर्याची नि अभिमानाची गोष्ट आहे! अि. स. १८३६ मध्यें डच लोकांनीं बालीवर आक्रमण सुरू केलें. या पाश्चात्य आक्रमकांबरोबर बालीच्या हिंदु राजांनी अखंड झगडा स्वातंत्र्याकरिता अर्धा शतकापर्यंत झुंजविला. अंतीं १९०८ मध्यें शेवटचें युद्ध होअून १९११ मध्यें (केवळ तीस वर्षामागे) बालीचा हिंदु राजवंश नष्ट झाला! या शेवटच्या युद्धांत स्वतः हिंदु राजा मारला गेला. तरीहि तेथील कडव्या हिंदूंना शांत करण्याकरितां डच लोकांना शस्त्रापेक्षां मुत्सद्देगिरीचाच अवलंब करावा लागला. बालीमध्यें खिश्चन मिशनरीनें धर्मां-तर करूं नये असें डच लोकांनी घोषित केलें. तेव्हापासून 'बाली' मधील हिंदु लोक डच लोकांच्या जोखडाखाली गेले.

आतां बालीचा सांस्कृतिक अितिहास थोडासा पाहूं. बालीमध्यें मुख्य अशा तीन भाषा प्रचलित आहेत.

१ मूळच्या रहिवाशांची भाषा ही भाषा मलायी भाषेसारखीच आहे.

२ जावानी भाषा ही भाषा जावामधून जे हिंदुवसाहतिवाले बालीमध्यें गेले त्यांनी नेलेली भाषा.

३ संस्कृत पासूनच निघालेली कवि भाषा. बालीतील विद्वान लोक याच भाषेतून बहुतेक ग्रंथ रचना करतात. संस्कृत भाषा ही धर्मग्रंथांमध्यें अजूनहि तेथें प्रचलित आहे.

बाली बेटामधील पुरोहितांच्या सांगण्यावरून अशी माहिती उपलब्ध होतें कीं, तेथें चारी वेदांच्या संहिता जरी पूर्ण नाहींत, तरी चारहि वेदांतील बराच महत्त्वाचा भाग अुपलब्ध आहे. तेथील पुरोहित लोक वेदांस फार गुप्त ठेवतात नि त्यांचें पठण पाठणहि फार गुप्तपणेंच करतात.

वेदानंतर दुसरा संस्कृत ग्रंथ बालीमध्यें सांपडतो. तो म्हणजे 'ब्रह्मांड-पुराण' हा होय, बालीमध्यें जे ब्राह्मण गेले ते बहुतेक सर्व शैव होते नि म्हणून ब्रह्मांड पुराणाला फार महत्त्व प्राप्त झालें. या पुराणावर 'बाली' भाषेंत (कवि-भाषेंत) टीकाहि झाली आहे. रामायणाचें कविभाषेंतील भाषांतर 'अेम्‌-पोअे राजकुसुम योगीश्वरं' या बालींतील विख्यात कवीनें केलें आहे.

'बाबद सुरपति' या नांवाच्या ग्रंथांत बालीचा अितिहास दिला आहे.

भारतीय संस्कृतीची वाक्ष पटविणारी अेक गोष्ट म्हणजे तेथें प्रचलित असलेलें छंदःशास्त्र हें होय. या शास्त्राचा पाया भारतीय छंदःशास्त्रावरच आधारलेला आहे.

बलिद्वीपांत सध्या शैव पंथच प्रामुख्यानें अस्तित्वांत आहे. ते सूर्याचीहि पूजा करतात. त्याला 'सूर्यसेवन' असें म्हणतात. त्याचप्रमाणें सूर्यास शिवाचा तृतीय नेत्र समजतात.

बालीमधील ब्राह्मणांच्या घरीं वेदपठण होतें तेव्हां, त्यांच्या घरचें पाणी पवित्र होतें असें लोक मानतात; आणि त्यास 'तोयतीर्थ' असें म्हणतात. आणि तें 'तीर्थ' घ्यावयास सर्व लोक जातात. त्यावेळीं त्या ब्राह्मणांस दक्षिणेचीहि प्राप्ति होतें.

बलिद्वीपांत ज्या ब्राह्मणांनीं प्रयाण केलें, ते ब्राह्मण जावामधील प्रमुख अशा 'मयपहित' या नांवाच्या राज्यांतून, त्यांचा मुसलमानाशीं चाललेल्या झगड्यांत पराभव झाल्यावर गेलें. या ब्राह्मणांनां 'बाहुचवु' ब्राह्मण म्हणतात. 'बाहुचवु' याचा अर्थ नवीन आलेले असा आहे.

येथील ब्राह्मणांचा वेष साधारणतः खालीलप्रमाणें असतो. धोतर, अुपरणें, व तांबडी टोपी; त्याचप्रमाणें ते जानवें, रुद्राक्षमाळा नि अन्य कर्णभूषणें नि केशाभरणेंहि धारण करतात. बलिद्वीपांत, हिऱ्यांपेक्षां माणिकांस अधिक महत्त्वाचे मानतात. कारण, त्यांच्या अंगीं अधिक दैवी शक्ति आहे, अशी त्यांची समज आहे. ब्राह्मण लोक या माणिकांच्या अंगठ्या घालतात. तेथील अुच्चवर्णीय ब्राह्मण-स्त्रियांनां वेदाधिकार आहे.

बालीमध्यें क्षत्रिय घराणीं थोडीं आहेत. वैश्यवर्ग मोठ्या प्रमाणांत आहे. त्यामुळें बलीमधील राजसत्ताहि पुष्कळ वैश्य घराण्यांत गेली होती. बलिद्वीपांत अि. स. १८४९–५० या वर्षी अेकंदर सात राजकुलें सात विभागांवर राज्य करीत होती, अशी माहिती डॉ. फ्रेडरिक या संशोधकानें दिली आहे.

बलि द्वीपाच्या समाजव्यवस्थेंत शूद्राला सर्वात खालचें स्थान देण्यांत आलें आहे आणि यांच्यामध्यें पुष्कळसे लोक बालीमधील अर्धशिक्षित रानटी रहिवासी समाविष्ट झाले आहेत. बलिद्वीपामध्यें युरोपीयन लोकांना त्रैवर्णिकांच्यापेक्षां कमी असा दर्जा देण्यांत आला आहे; कारण, ते द्वीज नाहींत, हें होय. बलिद्वीपांत अजूनीह वर्णव्यवस्था पुष्कळशी गुणकर्मावर आधीष्ठित आहे, हें विशेष आश्चर्य आहे. ब्राह्मणांच्या हातून कांहीं हीन कार्यें घडली तर तो 'चुने' (च्युत) होतो!

बालीमध्यें शालिवाहन शक चालू आहे. त्याच पंचांगाप्रमाणें अुत्सव सण पाळले जातात. अि. स. १९४१ मध्यें जपाननें विजेच्या चापल्यानें जावापासून बोर्निओपर्यंत जेव्हां, हा पूर्वीचा सुवर्णद्वीप या नांवानें संबोधिला जाणारा विस्तीर्ण द्वीपसमूह युरोपीय सत्तांपासून जिंकून घेतला, त्याचवेळीं हें सुंदर बलिद्वीपहि त्यानें जिंकून घेतलें आहे नि सांप्रत तें त्याच सत्तेखालीं आहे.

अशा रीतीनें, हिंदुस्थानापासून सहस्त्रावधि योजनांच्या अंतरावर, हिंदी महासागराच्या विशाल पृष्टभागावर, अेकाद्या लहानग्या कमलाप्रमाणें हें सुंदर बलिद्वीप अद्यापहि हिंदुसंस्कृतीनें पूर्णपणें नटलें आहे. तेथें भारत प्रवासी गेला म्हणजे, अत्यंत आदरानें नि आनंदभरानें, त्याचा बालिद्वीपस्थ हिंदु सत्कार करतात. गेल्या सहस्त्र वर्षांमधील मुसलमानांच्या नि पोर्च्युगीज स्पेन, डच अित्यादि युरोपीयनांच्या भीषण आक्रमणांच्या झंझावातांना तोंड देअून, सबंध सुवर्णद्वीपांतील, सहस्त्रावधि लहान मोठ्या द्वीपसमूहामधून हिंदुसंस्कृति लढत, झगडत, घायाळ होत, अंतीं, या अंगुष्टमात्र बलिद्वीपांत जीव धरून राहिली आहे! कुणी सांगावें? विश्वपित्याच्या अंगुष्टमात्रच अवशिष्ट अंशापासून, जसें हें विस्तीर्ण जगत् पुनः पुन्हां अुत्पन्न होते, तद्वतच सुवर्णद्वीपांतील, त्या विराट् विश्वांतील अवशिष्ट राहिलेल्या या अंगुष्टमात्र बलिद्वीपांतूनच, पुनरपि अेकदां, अेकाद्या विराट् हिंदुविश्वाचा आविष्कार होणार नाहीं म्हणून!

'तथास्तु!'

REFBK-0006549